म. ग्रं. सं. ठाणें
विषय- चरित्र
सं. क्र. ९६१
१९६०

रचित

# श्री शिवप्रभु चरित्र



REFBK-0010954
REFBK-0010954

संपादक
प्रा. स. रा. गाडगीळ

सिटी बुक स्टॉल
पुणे २.

विश्व-विद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीं

कृष्णाजी अनंत सभासदकृत

# श्री शिवप्रभु-चरित्र

## ( सभासदाची बखर )

[ पाठभेद, टीपा, स्पष्टीकरण, विवेचक प्रस्तावना, शब्दकोश यांसह ]

संपादक

श्री. सदाशिव रामचंद्र गाडगीळ,

प्राध्यापक पीपल्स कॉलेज, नांदेड

श्री. नरहर कुरुंदकर

पृष्ठें २०० ] सिटी बुक स्टॉल [ मूल्य ३ रु.

विश्व-विद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रमांक २५३२२ वि: चरित्र
क्रमांक २४९ नों. दि. २२/११/८०

## कृष्णाजी अनंत सभासदकृत

# श्री शिवप्रभु-चरित्र

## ( सभासदाची बखर )

[ पाठभेद, टीपा, स्पष्टीकरण, विवेचक प्रस्तावना, शब्दकोश यांसह ]

संपादक

श्री. सद

डेड

श्री

REFBK-0010954

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०५५४
संग्र. शाखा (स्थळ)

पृष्ठें २०० ] सिटी बुक स्टॉल [ मूल्य ३ रु.

प्रकाशक :
एस. जी. कुलकर्णी,
विद्यामंदिर प्रकाशन,
३२३ सदाशिव, पुणें २.

प्रथमावृत्ति १९६०.

गोदातीर इतिहास-वाङमय
संशोधन मंडळ व स्वाध्याय
मंडळ नांदेड, पुरस्कृत

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

मुद्रक :
शं. रा. दाते,
यशवंत छापखाना,
१८३५, सदाशिव, पुणें २.

# निवेदन

सभासद-विरचित श्रीशिवप्रभु चरित्राची ही महाविद्यालयीन आवृत्ति विद्यार्थ्यांच्या हातीं देतांना आनंद होत आहे. रा. ब. का. ना. साने यांनी संशोधन करून प्रसिद्ध केलेली **प्रतापगड प्रतच** प्रस्तुत चरित्रांत आधारभूत म्हणून घेतली आहे. सर्वच ठिकाणीं पाठभेद दिलेले नाहीत. इतिहास-संशोधनाऐवजीं विश्वविद्यालयीन विद्यार्थीच प्रामुख्याने डोळ्यापुढे ठेवून या चरित्रग्रंथाचें संपादन केलेलें आहे. प्राचीन मराठी गद्याचें स्वरूप, बखर गद्याचें इतिहास आणि साहित्य या दृष्टींनी अवलोकन, इतिहास, ऐतिहासिक ललितवाङ्मय आणि बखर गद्य यांचें तुलनात्मक विवेचन आणि सभासदबखरीचें वरील दृष्टिकोनांतून मूल्यमापन हे सर्व विषय प्रस्तावनेंत चर्चिले आहेत. टीपा आणि शब्दार्थ त्या त्या परिच्छेदाखालीच दिलेले असल्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचा उपयोग होईल अशी खात्री वाटते.

शिवचरित्रावरील बहुतेक सर्व अद्ययावत् सामग्री वाचूनच शिवाजी-महाराजांच्या कर्तृत्वाचें मूल्यमापन प्रस्तावनेंत केलें आहे.

प्रस्तुत आवृत्ति तयार करतांना ज्या ज्या ग्रंथांचें साहाय्य घेतलें आहे त्या ग्रंथलेखकांचा मी अत्यंत ऋणी आहे. नांदेड येथील पीपल्स कॉलेजचें ग्रंथालय, केसरी-मराठा वाचनालय, या संस्थांतील ग्रंथभांडाराचा मला बहुमोल उपयोग झाला आहे. स्कूल अ‍ॅन्ड कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर या संस्थेचे चालक श्री. दा. ना. मोघे व श्री. प्र. ज. पाध्ये यांनी, त्यांच्या साठी पूर्वी केलेल्या लेखनाचा उपयोग या आवृत्तीमध्ये करूं देण्यास परवानगी दिली. नांदेड येथील माझे स्नेही श्री. नरहर कुरुंदकर, प्रा. श्री. र. भिडे, प्रा. ग. ह. खरे, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें यांच्याशीं केलेल्या चर्चेचा मला भरपूर लाभ झाला आहे.

सिटी बुक स्टॉल, पुणें २, या प्रकाशन संस्थेने प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली म्हणूनच सदर चरित्र वाचकांच्या हातीं देण्याचा योग येत आहे. श्री. सालकर यांनी आकर्षक मुखपृष्ठ तयार करून दिलें.

वरील सर्व संस्था आणि व्यक्ति यांचा मी अत्यंत आभारी आहे.

नांदेड
१०-६-६०

**स. रा. गाडगीळ**

# अनुक्रमणिका


| अ. नं. | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना | १ ते ५१ |
| १. | शिवचरित्र लिहिण्याविषयी राजारामाची आज्ञा | १ |
| २. | मालोजी राजे | ७ |
| ३. | शिवाजी महाराजांचा जन्म | ७ |
| ४. | बारा मावळें काबीज केलीं | १२ |
| ५. | जुन्नर पुरंदरचा कबजा | १३ |
| ६. | कल्याण-भिवडी मारिली–जावळी काबीज केली | १३ |
| ७. | विविध नेमणुका-संभाजीचा जन्म | १५ |
| ८. | आदिलशहाची शहाजीला धमकी | १६ |
| ९. | शिवाजीवर अफजलखानाची रवानगी | १७ |
| १०. | अफजलखानाचें प्रयाण | १७ |
| ११. | शिवाजीचा विचार | १८ |
| १२. | शिवाजीचें अफजलखानाच्या भेटीस प्रयाण | २० |
| १३. | कृष्णाजीपंत व पंताजीपंत यांच्याशीं विचार विनिमय | २० |
| १४. | कृष्णाजीपंताची पंताजी पंतासह परत रवानगी | २१ |
| १५. | पंताजीपंताचें शिवाजीकडे प्रत्यागमन | २२ |
| १६. | खान वाईहून जावळीस येतो | २३ |
| १७. | खान जावळीस आल्याचें पंताजीपंत शिवजीला निवेदितो | २४ |
| १८. | शिवाजीराजे गडाखाली येतात | २४ |
| १९. | खान सभास्थानी येतो | २५ |
| २०. | अफजलखान शिवाजी भेट व अफजलखानाचा वध | २६ |
| २१. | खानाच्या सैन्याची दाणादाण | २७ |
| २२. | शरणागतांना उपकृत करून सोडिले | २९ |
| २३. | दिलासा करून नेमणुका दिल्या | २९ |
| २४. | शिवाजी म्हणजे भीमच | ३० |

| अ. नं. | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| २५. अफजलखान वधामुळे पादशाहाने धास्त खाल्ली | ३१ |
| २६. प्रतापगडावर देवीची स्थापना | ३१ |
| २७. शिवाजीचा वाढता पराक्रम | ३२ |
| २८. गडांची व्यवस्था | ३३ |
| २९. लष्कराची व्यवस्था | ३३ |
| ३०. लष्कराची शिस्त | ३४ |
| ३१. मावळे सैन्याची व्यवस्था | ३५ |
| ३२. मोकासे कोणास देणें नाही | ३६ |
| ३३. राज्यव्यवस्थेंतील बारकावे | ३६ |
| ३४. अंमल राजाचा; जहागीरदार, जमीनदार यांचा नाही | ३७ |
| ३५. देवस्थानांची व ब्राह्मणांची व्यवस्था | ३९ |
| ३६. शास्ताखानाची दक्षिणेस रवानगी | ३९ |
| ३७. शिवाजीचा शास्ताखानाच्या महालावर छापा | ४० |
| ३८. शास्ताखानाने शिवाजीची धास्त घेतली | ४३ |
| ३९. शिवाजीचा आनंदोत्सव | ४३ |
| ४०. औरंगजेबाची बेदिली, राजा जयसिंगाची योजना | ४४ |
| ४१. जयसिंगाचें दक्षिणेकडे प्रयाण; शिवाजीच्या पारिपत्यासाठी होमहवन | ४५ |
| ४२. शिवाजी महाराजांची चिंता | ४६ |
| ४३. रघुनाथ पंडिताची रवानगी | ४७ |
| ४४. जयसिंगाचें शिवाजीस भेटीचें निमंत्रण | ४८ |
| ४५. दिलेरखान पुरंदरावर चालून जातो | ५० |
| ४६. मुरारबाजीचें पुरंदरावरील दिव्य | ५० |
| ४७. शिवाजी जयसिंगाच्या भेटीस जातो | ५२ |
| ४८. पुरंदरचा तह | ५४ |
| ४९. उभयतांचें विजापुरी आगमन | ५६ |
| ५०. शिवाजीचें दिल्लीस प्रयाण | ५७ |

| अ. नं. | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ५१. | शिवाजी औरंगजेब भेट | ५७ |
| ५२. | शिवाजीची रामसिंगाजवळ तक्रार | ५९ |
| ५३. | शिवाजीचें ओरंगजेबास पत्र | ६० |
| ५४. | शास्ताखानाचा जाफखारनास सावधगिरीचा इशारा | ६० |
| ५५. | शिवाजी जाफरखान भेट | ६१ |
| ५६. | शिवाजीच्या मुक्कामाभोंवती पोलादखाचाचा पहारा बसतो | ६१ |
| ५७. | मिठाईची खैरात सुरू | ६२ |
| ५८. | मिठाईच्या पेटाऱ्यांतून शिवाजीचें पलायन | ६२ |
| ५९. | हिरोजी फर्जंदहि बाहेर पडतो | ६३ |
| ६०. | रामसिंगाने आपल्यावरची जबाबदारी दूर करून घेतली | ६४ |
| ६१. | शिवाजीच्या पलायनाची बातमी औरंगजेबाला समजते | ६४ |
| ६२. | शिवाजीचे काशी-प्रयाग-भागानगर मार्गे राजगडास आगमन | ६५ |
| ६३. | गेलेलें राज्य परत घेण्यास प्रारंभ | ६७ |
| ६४. | एक गड घेतला, परंतु एक गड गेला | ६७ |
| ६५. | पुरंदरच्या तहाने गेलेले किल्ले परत घेतले | ६९ |
| ६६. | संभाजीचें स्वदेशीं आगमन | ६९ |
| ६७. | शरीररक्षकांची योजना | ७१ |
| ६८. | शरीररक्षकांना साज देण्यांत येतो | ७१ |
| ६९. | पन्हाळगडास सिद्दीचा वेढा | ७२ |
| ७०. | नेताजीची बडतर्फी | ७३ |
| ७१. | औरंगजेबाने शहाअलम मार्फत शिवाजीशी मैत्री करण्याचा बेत केला | ७४ |
| ७२. | शिवाजी शहाअलमशीं मैत्री करतो | ७५ |
| ७३. | शहाअलम-निराजीपंत-प्रतापराव भेट | ७५ |
| ७४. | शहाअलम-शिवाजी सख्य औरंगजेबास मानवत नाहीं | ७६ |
| ७५. | शहाअलम मराठ्यांना अंत:स्थ सूचना देतो | ७६ |
| ७६. | शहाअलमचें औरंगजेबास उत्तर | ७७ |
| ७७. | मोगली प्रदेशाची लुटालूट | ७८ |

| अ. नं. | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ७८. | रस्तुमजान व बेलोलखान यांचा पराभव | ७८ |
| ७९. | मोंगली शहरें परत घेतलीं | ७८ |
| ८०. | सुरतेची दुसरी लूट | ७९ |
| ८१. | पाणियांतील डोंगर बांधून दर्यामध्ये गड वसविले | ८१ |
| ८२. | कायसावंत आणि बाजी पासलकर यांचें युद्ध | ८३ |
| ८३. | शहाजीचा मृत्यु | ८३ |
| ८४. | राजापुरीवर स्वारी | ८४ |
| ८५. | कोकणाकडे महाराजांचा मोर्चा | ८६ |
| ८६. | बसनूर उर्फ बार्सीलोर | ८८ |
| ८७. | कारंजें लुटलें | ८८ |
| ८८. | रायगड | ८९ |
| ८९. | राजारामाचा जन्म | ९० |
| ९०. | मोरोपंताने अनेक किल्ले घेतले | ९१ |
| ९१. | महाबतखान व दिलेरखान यांची रवानगी | ९१ |
| ९२. | सालेरचा वेढा | ९३ |
| ९३. | सालेरीचा विजयोत्सव | ९५ |
| ९४. | बहादूर कोकाची रवानगी | ९५ |
| ९५. | पन्हाळा, सातारा आदि किल्ले घेतले | ९६ |
| ९६. | राज्याची व्यवस्था | ९६ |
| ९७. | उंबराणीची लढाई | ९७ |
| ९८. | निळो सोनदेवाचा व प्रतापरावाचा मृत्यु | ९८ |
| ९९. | हंबीरराव मोहिते सरनोबत होतो | ९८ |
| १००. | व्यंकोजीचे कारभारी शिवाजीला येऊन मिळतात | ९९ |
| १०१. | हुसेनखान मायणाचा पराभव | १०० |
| १०२. | दक्षिणचा दरवाजा घेतला | १०० |
| १०३. | मोंगली प्रदेशावर स्वारी करून प्रदेश काबीज केला | १०१ |
| १०४. | राज्याभिषेक आणि अष्टप्रधानांची नेमणूक | १०१ |

| अ. नं. | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १०५. | राज्याभिषेक शक सुरू केला | १०४ |
| १०६. | बादशहाला खेद होतो. | १०५ |
| १०७. | भागानगरच्या शहाशीं सख्य | १०६ |
| १०८. | शिवाजी-कुतुबशाहा भेट | १०७ |
| १०९. | शिवाजीचा प्रामाणिकपणा पाहून पादशहा चकित होतो. | ११० |
| ११०. | मादंणापंत व अकंणापंत यांची शिवाजीस मेजवानी | ११० |
| १११. | राजांचें श्रीशैल्यास आगमन | १११ |
| ११२. | चंदीस वेढा | १११ |
| ११३. | शिवाजी व्यंकोजी भेट | ११२ |
| ११४. | रघुनाथ नारायण हणमंते यांजकडे चंदीची व्यवस्था सोपविली | ११४ |
| ११५. | व्यंकोजीच्या फौजेचा पराभव | ११६ |
| ११६. | मोंगलाईतील जासनापूर लुटलें | ११७ |
| ११७. | संभाजी मोंगलांकडे जातो | ११७ |
| ११८. | स्वराज्यांतील गड, जंजिरे, संपत्ति, अधिकारी सैनिक वगैरेची गणना | १२० |
| ११९. | राज्याची मर्यादा | १२६ |
| १२०. | राजारामाचा विवाह | १२६ |
| १२१. | शिवाजी महाराजांचा शेवट | १२७ |
| १२२. | महाराजांच्या निधनाने निसर्गाला झालेलें दुःख | १३० |
| १२३. | शिवाजीराजांच्या कार्याचा गौरव | १३० |
| १२४. | समाप्ति | १३१ |
| | परिशिष्ट अ | १३२ |
| | परिशिष्ट ब | १३३ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०५५८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलगत
26322 पारि
24/1/60

## कृष्णाजी अनंत सभासद-कृत

# श्रीशिवप्रभु-चरित्र

## प्रस्तावना

**प्राचीन मराठींतील गद्यवाङ्मय** -- कोणत्याहि भाषेंत गद्याची वाढ पद्यानंतरच झालेली दिसून येते. मानावाचें आद्य वाङमय पद्यांतच लिहिलें गेलें आहे. इतकेंच काय पण भाषेचा प्रारंभहि मनुष्याच्या काव्यमय मनोवृत्तींत झाल्याचें कांही विचारवंत मानतात. आर्यसंस्कृतीच्या उषःकालीं लिहिलें गेलेलें वाङमय अत्यंत मनोहर अशा काव्यस्वरूपामध्ये आज उपलब्ध आहे. पाश्चिमात्य देशांतील प्राचीन वाङमयहि काव्यात्मक आहे, हें होमर आदि कवींच्या काव्याकडे पाहून सहज ध्यानांत येईल. मानवी जीवन बाल्यावस्थेंत असतांना भावनामय होतें आणि भावनेंतूनच ताल-लयबद्ध रचना संभवते. रानटी, मागासलेल्या लोकांच्या भाषा ताललयबद्ध असतात असें भाषाशास्त्रज्ञांनी दाखवून दिलें आहे.

मानवी जीवनांत जसजशी वास्तवता प्रवेश करूं लागली तसतसा गद्याचा प्रादुर्भाव होऊं लागला. या गद्यपद्यक्रमाला भौतिक कारणेंहि आहेत. मुद्रणोत्तर जगामध्ये गद्याची वाढ झपाट्याने झालेली दिसून येते. मुद्रणपूर्व जगामध्ये गद्य नव्हतें असा याचा अर्थ नव्हे, गद्य होतें पण अगदी मामुली. व्यवहारांमध्येच काय तें गद्याचें प्राधान्य; आणि शिवाय जें गद्य होतें तें काव्यगुणांनी युक्त असेंच होतें. वाङमयाची एक शाखा या दृष्टीने गद्याची फारशी वाढ झालेली नव्हती. ही वाढ मुद्रणोत्तर जगामध्ये झपाट्याने होऊं लागली. मुद्रणकलेने ज्ञानाच्या क्षेत्रांत क्रांतिकारक असे बदल घडवून आणिले. मानवी जीवन बहुशाखान्वित होऊं लागलें. निरनिराळीं ज्ञानें उपलब्ध होत होतीं व त्यांतून नवनवीं शास्त्रें वाढीस लागूं लागलीं; त्याबरोबर गद्यास महत्त्व येऊं लागलें. ज्ञानाची नोंद त्या वेळपावेतों जी काव्यांत – पद्यांत होत असे ती गद्यांत होऊं लागली. ज्ञानाचें एकंदर स्वरूप समाजशास्त्रें, विज्ञानशास्त्रें व कला असें विभागलें. कलांतर्गत काव्याला स्वतंत्र स्थान मिळाल्याने

इतर शास्त्रांनी गद्याचा आश्रय केला आणि गद्यवाङमयाची वाढ नव्या स्वरूपामध्ये होऊं लागली.

मराठी साहित्याकडे नजर टाकल्यास हाच विचार मान्य करावयास हरकत वाटणार नाही. ज्ञानेश्वरी हा तत्त्वप्रधान ग्रंथ काव्यांत लिहिला गेला आहे; पण आज तत्त्वज्ञानपर विचार कोणीहि काव्यांत अगर पद्यांत न लिहितां गद्यांत लिहील. प्राचीन मराठी साहित्य हें मुख्यत: पद्यांतच आढळून येतें. ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी आपलें जीवन बहुशाखान्वित झालेलें नव्हतें. गेल्या शतकांत यांत्रिक संस्कृतीच्या आगमनाबरोबर आपल्या जीवनाला अनेक शाखा फुटल्या. या सर्व शाखांची वाढ गद्याच्या आधारेंच होत आहे. मराठी भाषेच्या आरंभापासून गेल्या शतकापर्यंत लिहिलें गेलेलें गद्य मुद्रणोत्तर युगांतील गद्याशीं तुलना करितां अगदीच किरकोळ आहे हें स्पष्ट दिसून येईल.

या प्राचीन गद्यामध्ये आजच्या अर्थानें ज्याला गद्य म्हणतां येईल असें फार थोडें वाङमय आहे. अगदी प्रारंभीचें गद्य म्हणजे शिलालेख व ताम्रपट. एखाद्या राजाची आज्ञा, एखादा जाहीरनामा, एखादें बक्षीसपत्र, एखाद्या जेत्याचें विजयचिन्ह म्हणून कोरलेले हे शिलालेख अगर ताम्रपट यांना आजच्या अर्थानें गद्य म्हणणें कठीण आहे. लोकांचा व्यवहार गद्यांत चालतो त्यांना वरील आज्ञापत्र, जाहीरनामा, बक्षीसपत्र इ. ज्ञात व्हावींत एवढ्याचसाठी तीं लोकभाषेंतील गद्यांत लिहिलीं गेलीं आहेत. या शिलालेखांना अगर ताम्रपटांना भाषाशास्त्राच्या दृष्टीनें अतिशय महत्त्व असलें तरी **गद्य-साहित्य** या दृष्टीनें कांही महत्त्व नाही.

मराठीच्या बाल्यावस्थेंत गद्य वाङमय लिहिण्याचा उपक्रम महानुभावांनी केलेला दिसतो. काव्यामध्ये–पद्यामध्ये सर्व तत्त्वज्ञान सांगण्याची प्रथा रू असतां या पंथांतील विचारवंतांनी आपल्या पंथांतील प्रमुख व्यक्तींची जीवनचरित्रें व त्यांनी सांगितलेला आचार-विचार-धर्म गद्यांत सांगितला हें विशेष आहे. असा प्रकार अपवादात्मकच सापडतो. बहुजनसमाजाकडे जावयाचें असल्यानें संस्कृत सोडून महानुभावीय विचारवंत ज्ञानेश्वराप्रमाणेच मराठीकडे वळले. याहीपुढे जाण्यासाठी कदाचित् पद्य टाकून ते अगदी दैनंदिन बोलभाषेकडे वळले असावेत. अर्थात् हें गद्यसुद्धा पद्याप्रमाणेच ताललयबद्ध, 'अल्पाक्षररमणीय' असेंच आहे.

यानंतरचें महत्त्वाचें गद्य म्हणजे बखरवाङ्मय हें होय. ऐतिहासिक घटना कल्पनारम्यतेचा मालमसाला भरून पुराण पद्धतीने कथन करण्याचा बखरकारांचा प्रयत्न आहे. साहित्यदृष्टीने मात्र यांपैकी कांही गद्य मोलाचें आहे. बखर वाङमयाला इतिहास-साधन म्हणून किती महत्त्व आहे हें पुढे तपशीलवार पाहूं; पण त्या त्या काळांतील सामाजिक चालीरीती, आचार-विचार, यांवर प्रकाश टाकणारें साधन या दृष्टीने मात्र तें फार महत्त्वाचें आहे.

ऐतिहासिक व्यक्तींचा पत्रव्यवहार हा प्राचीन गद्य-वाङमयाचा फार मोठा भाग आहे. आजच्या अर्थाने याला गद्य-साहित्य म्हणतां येणार नाही. हा पत्रव्यवहार ऐतिहासिक घटनांचा अस्सल पुरावा या दृष्टीने महत्त्वाचा आहे. साहित्यगुणांच्या दृष्टीने त्याकडे पाहणें फारसें योग्यहि होणार नाही. कांही खाजगी पत्रांतून तत्कालीन सामाजिक चालीरीती, धार्मिक रीति-रिवाज, आचारविचार, वैयक्तिक आवडीनिवडी यांवर प्रकाश मात्र पडतो.

पंचतंत्राचें भाषांतर, कांही एकनाथी प्रकरणें यांसारखें आणखी कांही गद्यवाङमय उपलब्ध आहे; पण याचें प्रमाण फारच कमी आहे. प्राचीन मराठी वाङमय हें प्रामुख्याने पद्यमय आहे. महानुभावांचें कांही धार्मिक वाङमय आणि उपरोक्त बखरी हेंच काय तें महत्त्वाचें गद्य वाङमय होय.

हें सर्व गद्यवाङमय साहित्याची एक स्वतंत्र शाखा या दृष्टीने लिहिलेलें नाही हें लक्षांत ठेवावयास हवें. महानुभावी गद्यांत महाराष्ट्रांतील एका धार्मिक आंदोलनाचें प्रतिबिंब पडलें आहे; बखरीमध्ये त्या त्या काळांतील राजकीय इतिहास विशिष्ट पद्धतीने लिहिला गेला आहे आणि इतर गद्य-वाङमय तर प्रामुख्याने लोकव्यवहारांतूनच निर्माण झालें आहे. महाराष्ट्रीय समाजाच्या व्यावहारिक जीवनाचें प्रतिबिंब पाहण्याचें साधन या दृष्टीनेच तें महत्त्वाचें आहे. काव्यवाङमयामध्ये कल्पनावैभवालाच फार महत्त्वाचें स्थान असल्याने तें जीवनाचें वास्तव प्रतिबिंब दाखवूं शकत नाही. विशेषत: महाराष्ट्रीय काव्यवाङमय प्राधान्येकरून भक्तिरसात्मक असल्याने व्याव-हारिक जीवनाला त्यामध्ये फारसें स्थान मिळालेलें नाही. यामुळे या प्राचीन मराठी गद्याला लोकजीवनाच्या दृष्टीने महत्त्व आलें आहे.

**बखर वाङमयाचें संशोधन-प्रकाशन** — गेल्या शतकांत आपल्या राष्ट्रीय जीवनामध्ये पुनरुज्जीवनाची एक प्रचंड लाट उसळली होती. पाश्चिमात्य

विचारांनी आणि त्यांच्याबरोबर आपल्याकडे आलेल्या नव्या यांत्रिक संस्कृतीने आपल्या देशाचें जीवन अंतर्बाह्य ढवळून निघालें. राष्ट्रवादाचें बीजारोपण आणि आधुनिक युगाचा प्रारंभ झाला. पण हें सर्व होत असतांना आपल्या इतिहासाचा, संस्कृतीचा, परंपरेचा, ज्ञानाचा पदोपदीं अधिक्षेप होत होता. यांतूनच आपल्या प्राचीन वैभवाच्या पुनरुज्जीवनाची चळवळ सुरू झाली. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे या पुनरुज्जीवनाचें स्फूर्तिस्थान होते. युरोपियन लोकांनी आपला जो इतिहास लिहिला होता तो विश्वसनीय नव्हता; उलट, आपल्या राष्ट्रीय जीवनाचा अधिक्षेप करण्याच्या दृष्टीनेच बऱ्याचशा पाश्चात्य इतिहासकारांनी आपली लेखणी राबविली होती. यामुळेच आपल्या प्राचीन इतिहासाचें, संस्कृतीचें संशोधन करण्याच्या कार्याला चालना मिळाली. नुकतीच विद्यापीठें सुरू झालेलीं असल्यामुळे 'इतिहास' विषयाचा चिकित्सक दृष्टीने अभ्यास सुरू झालेला होता. न्या. रानडे, कीर्तने आदि मंडळींचे प्रयत्न या दृष्टीनेच सुरू झाले होते. पण शास्त्रीबुवांच्या स्फूर्तीने आपल्या प्राचीन इतिहासाबद्दलच्या अभिमानाची जी एक प्रचंड लाट उसळली तिचा परिणाम म्हणूनच मराठ्यांचा इतिहास नव्याने लिहिण्याची गरज भासू लागली. ग्रँट डफ, मेकॉले, मिल आदि मंडळींनी जो आमचा इतिहास लिहिला होता तो विपर्यस्त होता. यामुळे अस्सल कागदपत्र, बखरी, टिपणें इ. चें संशोधन सुरू झालें. चिपळूणकर-साने यांनी १८७८ त 'काव्येतिहाससंग्रह' मासिक सुरूं केलें. यांतूनच प्रथम जुन्या बखरी प्रसिद्ध होऊं लागल्या. त्यांचें रसग्रहण आणि चिकित्सक परीक्षणही सुरू झालें. या बखरीमध्ये कांही अपुरेपणा असावा अशी शंका कांहींना आली. तिच्या निरसनार्थ अस्सल कागदपत्रें शोधून काढण्याचें कार्य सुरू झालें. राजवाडे, साने, पारसनीस व खरे यांच्या परिश्रमांतून नवें इतिहास संशोधन सुरूं झालें. यांनाच म. म. द. वा. पोतदार इतिहास-संशोधनांतील 'मुनिचतुष्टय' म्हणतात. आजपर्यंत अनेक बखरी प्रसिद्ध झाल्या आहेत. यांतील ४०।५० बखरी तरी निदान इतिहास व वाङमय यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

**'बखर' शब्दाची व्युत्पत्ति :—** बखर या शब्दाचा अर्थ, हकीकत, बातमी, इतिहास, कथानक, चरित्र असा कोशांत आढळतो. हा शब्द 'खबर' या

फारशी शब्दापासून वर्णव्यत्यासाने आला असावा. बखरी ज्या काळांत लिहिल्या गेल्या त्या काळांत मराठी भाषेवर फारशी भाषेचें असलेलें वर्चस्व लक्षांत घेतां वरील व्युत्पत्ति बरोबर असावी असें वाटतें. राजवाडे यांच्या मतें 'बख्=बकणें, बोलणें' या शब्दापासून बखर शब्द मराठींत आला असावा. त्यांचें विवेचन पुढीलप्रमाणे आहे. 'खबर या फारशी शब्दाचा अर्थ News असा आहे आणि बखर या मराठी शब्दाचा अर्थ 'इतिहास, कहाणी' असा आहे. तेव्हां News वाचक शब्द इतिहासवाचक बखर कसा झाला? शिवाय बखर हा शब्द मुसलमानांच्या पूर्वीपासून शालिवाहनांची बखर, विक्रमाची बखर, पांडवांची बखर, बकासुराची बखर इ. शब्दप्रयोगांत महाराष्ट्रांत प्रचलित होता. अर्थात् त्याची व्युपत्ति फारसीपासून करणें गैर आहे. वस्तुतः हा शब्द भष्, भख्, बख् या धातूपासून निघाला आहे. बखर म्हणजे कहाणी. कहाणी हा शब्द जसा कथ्, कह् या धातूपासून निघाला तसा बखर हा शब्द बख् या अपभ्रष्ट धातूपासून निघाला आहे. पूर्वी भाट लोक मोठमोठ्या वीरपुरुषांच्या बखरी तोंडाने बोलत असत. त्यावरून बखर हा शब्द प्रथमतः तोंडी इतिहासाला लावूं लागले आणि नंतर लेखी इतिहासालाहि तो शब्द लावण्यांत आला. (राजवाडे ले. सं. भा. ३) याप्रमाणे बखर शब्दाची व्यत्पत्ति 'खबर' (फा.) आणि भख् (सं.) अशा दोनहि शब्दांपासून सांगतां येते. या दोनहि शब्दांचें मूळ एकच असण्याची शक्यता आहे. संस्कृत आणि पर्शियन भाषांच्या देवघेवीमध्ये असे बरेच शब्द दोन्ही भाषांना समान आहेत. 'तलाव' शब्दाची व्युत्पत्ति 'तडाग' (सं.) आणि 'तालाव्(फा.) या दोन्ही शब्दांपासून सांगतां येते. राजवाडे यांनी मुसलमानपूर्वकालीन बखरींचा उल्लेख केला आहे; पण त्यांना 'बखर' हें नांव पूर्वीपासूनच होतें कीं नंतर लावलें गेलें हें कळावयास मार्ग नाही. बखर शब्दाचा जो रूढ अर्थ आहे तो मात्र फारशीमधूनच आला असावा असें अनुमान खुद्द राजवाडे यांच्याच एका विधानावरून काढतां येतें. मुसलमानांच्या सहवासाने त्यांच्या तवारिखा पाहून मराठ्यांनीहि बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला हें राजवाडे यांचें म्हणणेंच अधिक सयुक्तिक वाटतें.

**बखरींचें स्वरूप** — बखर शब्दाचा जो रूढ अर्थ आहे तो राजकीय हकीकत, राजा अथवा थोर पुरुष यांचें चरित्र अथवा यांनी केलेल्या लढ्यांचें

वर्णन वा हकीकत असा आहे. यामध्ये 'इतिहास' कल्प नेलाच प्राधान्य आहे. आपल्या देशाचा प्राचीन काळचा इतिहास पुराणांत लुप्त झाला आहे. पुराण हें इतिहासाचेंच मुख्य अंग समजलें जाई. प्राचीन काळीं इतिहास व पुराण हे शब्द जवळजवळ एकाच अर्थाने वापरले जात. यांचें कार्य कित्येक प्रसंगीं काव्यग्रंथांनीहि केल्याचें आढळून येतें. 'हर्षचरित' हें याचें उत्तम उदाहरण होय. 'राजतरंगिणी' हा इतिहासग्रंथ आहे, पण तोही काव्यात्मकच आहे. मुसलमानांच्या आगमनानंतर इतिहासलेखनाचें स्वरूप बदललें. घटनांचा कालक्रमानुसार तपशील देण्यासाठी, निरनिराळ्या बादशाहांच्या कारकीर्दींत झालेल्या लढायांची नोंद करून ठेवण्यासाठी स्वतंत्र लेखकांची योजना केलेली असे. मोंगल बादशहांचीं आत्मचरित्रें व चरित्रें प्रसिद्ध आहेत. या प्रकारच्या इतिहासलेखनाच्या संपर्कानेच आपल्याकडे बखररूपाने इतिहासलेखन सुरू झालें. मुसलमानी राजवटींतील तवारिखा, नामे, अखबार हे सर्व इतिहासाचेच प्रकार होत. जहूर, अबूल फजल, मिर्झा मुहंमद, काफीखान यांसारख्या लेखकांनी बादशहांच्या आज्ञेनेच इतिहासलेखन केलें आहे. बखरीच्या लेखनाचें मूळ यांतच आहे. हे इतिहासकार पक्षपाती असल्याने बादशाहाची स्तुति व परकीयांची निंदा हे त्यांच्या लेखनाचे विशेष पुढे बखरींतूनहि आढळून येतात. बखरकार हा कोणातरी राजाच्या आश्रयाला असल्यामुळे विशिष्ट धोरण पुढे ठेवून त्याने बखरी लिहिल्या आहेत. '...पत्रीं आज्ञा जाली कीं, हिंदुस्थानांतील आदिअंतीं वर्तमान प्याद्याचा फर्जी नजीब खान रोहिला होऊन दक्षिणदेशीं हिंदुपद [श्री राजा] शाहु छत्रपती यांचा प्रधान मुख्य आदिकरून सवालक्ष फौजेनिशींहि भाऊगर्दी होऊन प्यादेमात कैशी जाली हें सविस्तर वर्तमान लिहावयास आज्ञा केली...' (भा. बखर) '...तुम्ही पुरातन, राज्यांतील माहित(गार) लोक आहां तरी इस्तकबिलपासून चरित्र लिहून देणें म्हणोन आज्ञा केली त्याजवरून वर्तमान ऐसे जे ...' (सभासद बखर) 'नवी बखर श्रीमंत यांजकडून आजपर्यंत झालें तें विदित व्हावें म्हणून आज्ञाधारकास आज्ञा जाहाली ...' (पा. ब. : रघुनाथ यादव) राजाच्या अगर यजमानाच्या आज्ञेवरून बखरी लिहिल्या असल्यामुळे त्यांचें स्वरूप कांहीसें पक्षपाती असणें साहजिक आहे.

प्राचीनकाळीं पुराणांतच आपल्या देशाचा इतिहास लिहिला गेला असल्यामुळे बखरलेखनावरहि पुराणांचा बराच परिणाम झाला आहे.

पुराणाचा प्रारंभ विश्वाची उत्पत्ति, मोठमोठाले वंश यांच्या निवेदनाने होतो; आणि शेवट ग्रंथपठनाच्या फलश्रुताने होतो. ब-याचशा बखरकारांनी हाच मार्ग अवलंबिला आहे. शिवकालीन बखरींत हा विशेष प्रामुख्याने आढळून येतो. सभासदाने प्रस्तुत बखरीचा शेवट याच पद्धतीने केला आहे.

बखरकार हा प्रामुख्याने इतिहासलेखकाच्या भूमिकेवरून लेखन करीत असला तरी तो सामान्यपणें व्युत्पन्न पंडित असल्यामुळें त्याची लेखनशैली काव्यलेखनाला अनुकूल अशी आहे. बखरींतील निरनिराळ्या घटना व प्रसंग यांचें वर्णन करतांना तें वर्णन कल्पनारम्य करण्याकडे लेखकाचा कल दिसतो. अतिशयोक्ति व अद्‌भुतता यांच्या आश्रयाने आपले वर्णन आकर्षक करून प्रसंगनायकाचें श्रेष्ठत्व प्रस्थापित करणें हा बखरकाराचा एक प्रमुख उद्देश दिसतो.

आपलें लेखन आकर्षक करण्यासाठी अत्युक्ति आणि अद्‌भुतता यांशिवाय बखरकार काव्यमय शैलीचा उपयोग करतो. उपमा, अलंकार, सुभाषितें, म्हणी, प्रसंगाचें हुबेहुब वर्णन इत्यादि साहित्यगुणांनी आपली बखर सजविण्याचा बखरकारांचा प्रयत्न असतो. त्यामुळेच बखरींना इतिहाससाधनापेक्षा साहित्यग्रंथ म्हणून अधिक महत्त्व आलें. रामायण-महाभारतासारख्या ग्रंथांचा आदर्श त्यांच्यापुढे होता. इतिहासलेखनाची भूमिका त्यांनी घेतली असली तरी त्यांचें इतिहासलेखन पुराणपद्धतीवर गेलें आहे. त्यांचें निवेदन, त्यांचीं वर्णनें, त्यांची भाषाशैली या सर्वांवर पुराणांचा परिणाम झाला आहे. त्यामुळे अनेक बखरी इतिहाससाधन या नात्याने निरुपयोगी ठरल्या आहेत. इतिहासाचें स्वतंत्र शास्त्र आपल्याकडे निर्माण झालेलें नसल्यामुळे बखरकारांचें इतिहासलेखन सदोष झालें आहे. उपलब्ध अशा प्रमुख बखरींपैकी फार थोड्या बखरी जुन्या काळीं लिहिलेल्या आहेत. शिवकालीन आणि पेशवेकालीन घटनांवर अनेक बखरी उपलब्ध आहेत. पण त्यांपैकी अगदी थोड्या समकालीन आहेत. बहुसंख्य बखरी पेशवाईचा शेवटचा काळ व इंग्रजी राज्याचा प्रारंभकाल या काळांत लिहिल्या गेल्या आहेत. राक्षसतागडीची बखर, महिकावतीची बखर यांसारख्या कांही बखरी जुन्या आहेत. शिवचरित्र आणि शिवकालीन घटना यांवर दहाबारा बखरी प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी दत्तो त्रिमलकृत ९१ कलमी बखर व सभासद बखर या

पहिल्या व जवळजवळ समकालीन होत. (इ. स. १६८५ व १६९७). याच बखरींमध्ये भर घालून नंतरच्या काळांत आणखी बखरी सजविल्या गेल्या आहेत. पेशवेकालीन घटनांवरहि कांही समकालीन बखरी आहेत. त्यांमध्ये भाऊसाहेबांची बखर ही सर्वांत उत्तम आहे. इतिहास आणि वाङमय या दोन्ही दृष्टींनी ही बखर महत्त्वाची आहे.

बखरींच्या बाबतींत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा लक्षांत घ्यावयास हवा. आज उपलब्ध असलेलीं बखरींचीं नांवें हीं नकलाकारांनी अथवा संपादकांनी प्रकाशनाच्या वेळीं दिलेलीं नांवें आहेत. मुळांत हींच नांवें होतीं असें नाही. उदा., भाऊसाहेबांची बखर हें नांव संपादकांनीं दिलें आहे. नांवावरून आंतील विषयाचें कमीअधिक महत्त्व ठरविणें शक्य होतें. उपलब्ध नांवावरून बखरकाराची भूमिका आणि संपादकाची वा नकलकाराची भूमिका यांमधील फरक ध्यानांत येऊं शकतो. उदा., पानपत प्रकरणावरील सर्वांत महत्त्वाची अशी बखर म्हणजे 'भाऊसाहेबांची बखर' होय. तिच्या नामकरणाच्या बाबतींत मतभेद आहेत. याचें कारण बखरींतील घटना, प्रसंग व व्यक्ति यांचेपैकी कोणाला महत्त्व द्यावयाचें याबाबतचा मतभेद हेंच होय.

**'बखर' वाङमयाचें इतिहास या दृष्टीने मूल्यमापन** — 'इतिहास' शास्त्राची आपल्याकडे अगदी अलीकडे वाढ झाली आहे हें जरी खरें असलें, तरी पुराणें व बखरी यांमधून आपला प्राचीन इतिहास बराच सांपडतो. 'इतिहास म्हणजे पुरावृत्त' या दृष्टीनेंच बखरी लिहिलेल्या आहेत. बखरकाराचा हेतु तत्कालीन घटनांचें वृत्त प्रामाणिकपणें लिहून ठेवणें हाच होता. प्रामाणिकपणा, निर्विकार वृत्ति आणि अस्सल कागदपत्रांचा आधार या गोष्टी इतिहासलेखनाला आवश्यक आहेत. तत्कालीन सामाजिक, धार्मिक कल्पना, आणि राजकीय घटना यांचें वास्तव प्रतिबिंब उमटविणें हा इतिहासाचा उद्देश असतो. या सामाजिक, धार्मिक कल्पनांचा आणि राजकीय घटनांचा कार्यकारणभावाने उलगडा करून इतिहासाची गति निश्चित करणें, त्या त्या काळांतील घटनांमागील प्रेरणांचें स्वरूप निश्चित करणें हें आधुनिक इतिहासशास्त्राचें उद्दिष्ट आहे.

इतिहास आणि इतिहासशास्त्र यांच्या कार्याचें हें स्वरूप लक्षांत घेऊन

बखरींची तपासणी करूं लागल्यास आपणांस असें आढळून येईल की बखरी या इतिहासाचें **अस्सल साधन** म्हणून वापरणें योग्य ठरणार नाही. बखरीमध्ये इतिहास आहे पण तो अस्सल कागदपत्रांवर आधारलेला नसून परंपरेने चालत आलेली हकीकत, दंतकथा, लेखकाची स्मृति आणि पूर्वकालीन पुराणांची लेखनपद्धति यांनी 'सजविलेला' असतो.

बखरींचा लेखनकाल, चारदोन अपवाद वगळल्यास बराच नंतरचा आहे. समकालीन लेखकाने लिहिलेल्या बखरी बऱ्याच विश्वसनीय असल्या तरी त्यांतहि अनेक दोष आहेत. याचें मुख्य कारण लेखक आपल्या स्मृतीवरच प्रामुख्याने अवलंबून असतो हें होय.

गेल्या शतकांत आपल्याकडे इतिहासलेखनाचें महत्त्व जेव्हा ध्यानांत येऊं लागलें तेव्हा या बखरी लिहिल्या गेल्या आहेत. पण अद्यापि कागदपत्रांचें संशोधन झालेलें नव्हतें; परकीयांनी लिहिलेला आपला इतिहास आणि या बखरी हीं दोनहि साधनें अस्सल कागदपत्रांच्या साहाय्याशिवायच लिहिलीं गेलेलीं आहेत. राजवाड्यांनी या बखरींचे दोन भाग कल्पिले. समकालीनांनी लिहिलेल्या बखरी; व १९ व्या शतकांत लिहिलेल्या बखरी. पहिल्या बखरी ते बऱ्याच विश्वसनीय मानतात. सभासदकृत शिवचरित्र, चित्रगुप्तकृत शिवाजीमहाराजांची बखर, भाऊसाहेबांची बखर, भाऊसाहेबांची कैफियत यांसारख्या बखरी विश्वसनीय मानावयास हरकत नाही. पण त्यांतीलहि विश्वसनीयतेला मर्यादा आहेच असें स्वतः राजवाडेच म्हणतात.

बखरींचा दुसरा प्रकार म्हणजे कर्णोपकर्णी ऐकलेल्या वृत्तांतांचीं बाडें होत. या बखरी अविश्वसनीय होत. कारण कोणा अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून, पांचदहा लोकांच्या विनंतीवरून व कांही वृद्ध लोकांच्या माहितीवरून, स्वतःच्या स्मृतीवरून हीं बाडें लिहिलीं गेलीं आहेत. या लेखकांचा एकंदर मगदूर व ऐतिहासिक ज्ञानहि बेताचेंच असल्याने या बखरी जेमतेम उतरल्या आहेत.

तिसरा एक वर्ग बखरींचा आहे; कांही मूळची हकीकत जमा करून, ग्रंथ पाहून, टिपणें पाहून, मूळ ग्रंथांतच भर घालून या बखरी लिहिल्या गेल्या आहेत. चिटणीसकृत बखरी या प्रकारांत मोडतात. या बखरींतहि

स्थलविपर्यास, कालविपर्यास इ. दोष बरेच आढळतात. अर्थात् लेखकाला यावद्दल फारसा दोष देणें योग्य होणार नाही. तत्कालीन उपलब्ध साधनें व इतिहासलेखनशास्त्राचा अभाव यामुळेच त्यांनी आपल्याला परिचित अशा पुराणपद्धतीने या बखरी लिहिल्या आहेत. हे लेखक त्या काळांतील जाणते लोक होते, कोणी कोणी सरकारी अधिकारी होते हें लक्षांत घेतलें पाहिजे. त्यांच्या या वैशिष्टयामुळेच बखरींचें दुहेरी स्वरूप स्पष्ट होतें. ते जाणते, सरकारी अधिकारी असल्यामुळे जुन्या कागदपत्रांचा त्यांना उपयोग करून घेतां आला. परंपरेने राजदरबारीं नोकरी करीत असल्यामुळे कांही कांही हकीकत त्यांना परंपरेने समजली असली पाहिजे. यामुळे त्यांच्या लेखनांत पूर्वलेखनाचा आधार सांपडतो व बऱ्याच विश्वसनीय घटनांची नोंदहि त्यांत सांपडते. पण त्याबरोबर त्यांची भूमिका सेवकाची, लेखनिकाची असल्यामुळे पक्षपाती असण्याचीहि शक्यता बरीच आहे. एखाद्या सरदाराच्या आज्ञेने त्याच्या आश्रिताने लिहिलेलें लिखाण कितपत खरें मानावें याबद्दल शंका वाटते. चरित्रनायकांनी केलेल्या कृत्यांचें समर्थन करणें अथवा खुलासा करणें हा लेखकाचा बऱ्याच ठिकाणीं हेतु दिसतो. या साऱ्या 'कैफियती' आहेत. यांत निर्विकारपणा नाही. प्रसंगीं या लेखकांनी घटनांचा कार्यकारणभाव तपासण्याचा प्रयत्न केला आहे पण तो फारच अपुरा आहे; कारण अगदी निःपक्षपाती भूमिका घेणें लेखकाला शक्यच नव्हतें. भाऊसाहेबांची बखर, होळकरांची कैफियत, पानपतची बखर यांसारख्या समकालीन बखरींतहि लेखकाच्या या भूमिकेचें प्रतिबिंब पडलें आहे. होळकरांची बखर तर होळकरांच्या कृत्याचें समर्थन करण्यासाठीच लिहिली आहे. होळकरांचें करणें योग्य असेलहि; पण लेखकाचा कटाक्ष त्यांचें समर्थन करणें एवढाच आहे. योग्य त्या सर्व कार्यकारणभावाची चिकित्सा करून पानिपतच्या पराभवाची मीमांसा अशा बखरींत मिळत नाही. पानिपतावरील समकालीन बखरींतहि भिन्न भिन्न हकीकत आढळते, याचें कारण लेखकांची भिन्न भिन्न भूमिका हेंच होय.

इतिहासलेखनाचें शास्त्र आपल्याकडे विकसित झालेलें नसल्यामुळे या बखरकारांनी पुराणांचा आदर्श आपल्यासमोर ठेवला होता. आपलें निवेदन **कल्पनारम्य** करणें हा यांचा हेतु होता. त्यामुळे बखरींत अद्‌भुतता

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २८३२२ वि: पारेग
२२१७७।८०

आणण्याकडेच बखरकारांचा कल दिसून येतो. अतिरंजितता, अद्भुतता व कल्पनारम्यता यांमुळे ऐतिहासिक दृष्टचा बखरींचें स्वरूप अशास्त्रीय समजलें जाणें साहजिक आहे. शिवकालीन बखरींत अद्भुततेचें प्रमाण अधिक आहे. सभासदकृत शिवचरित्रामध्ये असे प्रसंग बरेच आहेत. भवानी-देवी शिवाजीच्या अंगांत संचारत असल्याचे सहा प्रसंग या बखरींत वर्णिले आहेत. मालोजीला शंभुमहादेवाचा साक्षात्कार झाल्याचें बखरकाराने लिहिलें आहे. शिवाजीमहाराजांच्या मृत्यूचा प्रसंगहि असाच अद्भुत वातावरणांत लेखकाने वर्णिला आहे. शिवदूतांच्या विमानांत बसून महाराजांनीं कैलासगमन केलें असें बखरकार म्हणतो. महाराजांच्या मृत्यू-नंतर निसर्गालाहि दुःख झाल्याचें दर्शविणाऱ्या अद्भुत घटना लेखकाने वर्णिल्या आहेत. धरणीकंप, धूमकेतूचें दर्शन, उल्कापात, तळ्यांतील पाण्याचें रक्त होणें, पाण्यांतील माशांचें निर्गमन, रात्रीं जोड इंद्रधनुष्याचें दर्शन इत्यादि भीषण घटना पौराणिक वर्णनांत अशा प्रसंगीं दिसून येतात. सीझरच्या हत्येनंतर निसर्गाचा असाच प्रकोप झाल्याचें रोमन बखरकाराने वर्णिलें आहे. महापुरुषांच्या निर्याणसमयीं होणारा हा निसर्गाचा प्रकोप सर्वत्र रूढ असावा असें दिसतें.

'भोसलेवंशा' च्या बखरींतील प्रास्ताविक मांडणी तर पुराणासारखीच आहे. शिवाजीच्या पूर्वींच्या १४ पिढ्यांची माहिती बखरकार प्रथम देतो. महाराजांचा हा वंश श्रीनारायण, सूर्यनारायण, मनु, इक्ष्वाकु आदि सूर्यवंशीय पुरुषांपर्यंत नेऊन पोचविण्याचें काम बखरकारांनी केलें आहे. शिवाजी गुप्तरूपाने तंजावरच्या किल्ल्यामध्ये आला व एकोजीस कांही निरोप ठेवून गेला अशी हकीकत बखरकार देतो; संभाजीने आपणाला कुर्निसात करावा म्हणून बादशहाने योजिलेली युक्ति व संभाजीने त्यावर केलेली मात या गोष्टीहि कपोलकल्पित आहेत. बखरकारांची भूमिकाच कल्पनारम्य इतिहास लिहिणें ही असल्यामुळे त्याने अशा अद्भुत आणि अतिरंजित गोष्टींचा त्यामध्ये समावेश केला आहे. पण इतिहासदृष्टीने या गोष्टी निरुपयोगी आहेत.

इतिहासदृष्टीने आणखी एक दोष बखरीमध्ये दिसून येतो. हा दोष बखरीची नकल करतांना निर्माण झाला आहे. बखरी मोडी लिपींत

लिहीत असत. अनेक अक्षरांच्या साम्यामुळे बरेच दोष निर्माण झाले आहेत. कांही अक्षरें नीट न लागल्यामुळे नकलकाराने चुकीचीं अक्षरें लिहून घेतलीं आहेत. कांही कांही घटनांबाबत नकलकाराचें अज्ञान असल्यामुळे दोष निर्माण झाले आहेत. मळ प्रतींतील कागद गहाळ होणें, नकलकाराने पदरचा मजकूर भर घालणें यांसारख्या गोष्टी घडल्या असल्यामुळे बखरीं-मध्ये अनेक दोष निर्माण झाले आहेत.

शेवटचा पण महत्त्वाचा दोष म्हणजे बखरींतील स्थलकालांच्या निश्चित स्वरूपाचा अभाव हा होय. घटनांचा क्रमहि पुष्कळ वेळां बिघडविलेला असतो. हा दोष ऐकीव माहितीवर अवलंबून राहून पुष्कळ वेळां बखरकार आपलें लेखन करतो यामुळे निर्माण झाला आहे.

बखरींना ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीने कमी महत्त्व असण्याचीं कारणें राजवाड्यांनी पुढीलप्रमाणें दिलीं आहेत : (१) बखरकारांनी कालविपर्या-साचा दोष केला आहे. (२) त्यांनी स्थलविपर्यासाचा दोष केला आहे. (३) त्यांनी व्यक्तिविपर्यासाचा दोष केला आहे. (४) त्यांनी या तिहींचा प्रत्येकी व सामग्र्याने लोप करण्याचा दोष केला आहे. (५) त्यांना कोण-त्याहि प्रकारचें शास्त्रीय शिक्षण नव्हतें. (६) त्यांना आपले विचार नीट प्रकट करतां येत नाहीत. व (७) त्यांना सामान्य सिद्धान्त स्पष्टपणें मांड-ण्याची ऐपत नाही.

शिवाय इतरहि दोन तीन कारणें आपण वर पाहिलींच आहेत. बखर-काराची भूमिका पक्षपाती असते; बखरकारांचा आदर्श पुराणग्रंथ आहे; त्याला अद्भुताची, कल्पनारम्य वर्णनाची आवड आहे. या सर्व दोषांमुळे उपलब्ध बखरींपैकी बऱ्याच बखरी समकालीन असूनहि इतिहासाच्या दृष्टीने त्यांचें महत्त्व अस्सल कागदपत्रांच्या योग्यतेचें मानतां येत नाही. एक अस्सल कागदाचा चिठोरा अनेक बखरींतील एकमताने प्रस्थापित झालेला सिद्धान्त खोटा ठरविण्यास समर्थ आहे. बखरकाराने जाणूनबुजून असत्याचें निवेदन केलें आहे असें नाही. तो अत्यंत प्रामाणिकपणानेच लिहावयास सिद्ध झाला आहे; पण त्याला उपलब्ध झालेलीं साधनें व त्याची भूमिका यांचा विचार करतां बखरींमधील इतिहास हा अस्सल इतिहास नव्हे हें कोणासहि मान्य करावें लागेल. बखरींच्या ऐतिहासिक महत्त्वाचें विवेचन

करून शेवटीं राजवाडे म्हणतात : 'या सर्व बखरींत असा एक मोठा अद्वितीय गुण आहे कीं प्रायः झाल्या प्रसंगाची हकीकत सांगतांना सत्याचा अपलाप जाणूनबुजून कोठेहि केलेला नाहीं, त्यांचीं कांहीं विधानें जर सध्या अविश्वसनीय भासूं लागलीं तर त्याचें कारण लेखकांचा असत्याभिमान नसून त्यांचें अज्ञान किंवा गैरसमजूत आहे असें आढळून येतें. लेखकांच्या ज्ञानाच्या व्याप्तीच्या प्रमाणे लेखांतील माहिती नाना प्रकारची आहे. प्रत्यक्ष कर्णोपकर्णी जी माहिती जशी मिळाली तशीच ती टिपून ठेविलेली ह्या बखरींत आढळते. युरोपांतील राष्ट्रांच्या अडीचशें वर्षांपूर्वी ज्या बखरी हकीकती वगैरे आहेत त्यांच्यापेक्षां या बखरी सरस असून विश्वसनीयतेच्या बाबतींतहि जास्त मान्य आहेत.... परंतु या बखरकारांच्या ज्ञानाची व्याप्ति अत्यंत संकुचित होती हीहि गोष्ट सांगितल्याशिवाय गत्यंतर नाहीं.' (रा. प्र. खं. ६ वा.)

या सर्व विवेचनावरून बखरींचे इतिहास म्हणून वा इतिहाससाधन म्हणून काय मोल आहे याची कल्पना येऊं शकेल. बखरींच्या या अविश्वसनीयतेमुळेच पुढे पत्रसंशोधन सुरू झालें. त्यामुळे बखरीचें मूल्य अधिकच काटेकोरपणें ठरविणें शक्य झालें; व आज बखरी या प्रामुख्याने इतिहासग्रंथ म्हणून न अभ्यासतां त्या वेळचे गद्य साहित्यग्रंथ म्हणूनच त्यांचें परिशीलन होणें शक्य आहे.

**बखरींचें साहित्यकृति म्हणून मूल्यमापन** बखर — हा लेखनप्रकार विशिष्ट सांस्कृतिक परिस्थितींत निर्माण झाला आहे. मुद्रणपूर्व युगांत गद्याला अगदी कमी महत्त्व होतें हें प्रारंभीं पाहिलेंच आहे: करारनामे, जाहीरनामे व प्रत्यक्ष व्यवहार यांसाठीच फक्त गद्याचा वापर होई. पण ज्या वेळीं कांही सांस्कृतिक, वैचारिक, भावनात्मक दृष्टीने श्रेष्ठ असा अनुभव वा प्रसंग वर्णावयाचा असेल त्या वेळीं प्रायः पद्य हेंच माध्यम स्वीकारलेलें दिसतें. त्यासाठी गद्याचा अवलंब सहसा कोणी केलेला नाही. बखरी ज्या काळांत लिहिल्या गेल्या तो काळहि अशाच स्वरूपाचा आहे. म्हणजे या काळाचें श्रेष्ठ असें साहित्य पद्यांतच सांपडतें. समाजाने पुरस्कारिलेल्या धर्म, नीति, कर्तव्य, अध्यात्म इत्यादि जीवनमूल्यांचा विचार पद्याच्या माध्यमांतूनच केला जाई. त्यांच्यापुढे या बाबतींत रामायण, भारत हे आदर्श

असत; आणि संस्कृत साहित्यशास्त्राने पुरस्कारिलेलीं रसअलंकारादि साहित्यमूल्यें त्यांना प्रमाणभूत वाटत असत.

स्वराज्यसंपादनाच्या प्रयत्नाने नवीन असें राज्यकर्तृत्व या देशांत निर्माण झालें. ऐहिक जीवनांत एका नव्या परंपरेचा प्रारंभ झाला, धर्म आणि संस्कृति यांच्या संरक्षणाचें महान् कार्य करणारा लोकपाल उदयाला आला. प्राचीन काव्यग्रंथांतील नायकांची योग्यता अंगीं असलेला एक नवा पुरुष अवतरला. याचें यशोगान करणें हें नव्या युगांतील साहित्याचें साहजिकच वैशिष्टच बनलें. शिवाजीसारख्या असामान्य कर्तृत्वाच्या राष्ट्रपुरुषाचा समाजमनावर अतिशय खोल परिणाम होणें अपरिहार्य होतें. अशा या युगपुरुषाचें चरित्र लिहिणें, त्याच्या कर्तृत्वाचे पोवाडे गाणें, त्याच्या अचाट कृत्यांचें रसभरित वर्णन करणें हें तत्कालीन लेखकांना अभिमानाचें वाटूं लागलें. मुसलमानांच्या सहवासाने इतिहासलेखनाला नवें वळण लागलेंच होतें. 'बखर' हा गद्य वाङ्मयप्रकार याच परिस्थितींत उदयाला आला. थोर अशा राजकर्तृत्वाची हकीकत लिहून ठेवणें – इतिहास लिहिणें हा या लेखकांचा मूळ हेतु; पण चरित्रनायकाचें अवतारकार्य, धर्म आणि संस्कृतिदृष्टचा मूल्यवान् असल्याने हें चरित्रलेखन पुराणग्रंथांच्या योग्यतेचें होणें आवश्यक होतें. यामुळेच त्यांत अद्‌भुतता आली, काव्य आलें, कल्पनारम्यत्व आलें आणि इतिहासहि आलाच.

बखरींची सांस्कृतिक पार्श्वभूमि ही अशा प्रकारची आहे, व बखरींचें साहित्यमूल्य ठरवितांना ती विचारांत घ्यावी लागते. 'बखरी' या 'बखरी' म्हणूनच अभ्यासिल्या जावयास पाहिजेत. इतिहास म्हणून त्यांची योग्यता कांहीं मर्यादेपर्यंतच आहे. पण बखरकारांची भूमिका कलावंताचीहि नाही. तो साहित्यनिर्मितीच्या उद्दिष्टाने लिहिण्यास प्रवृत्त झालेला नाही. ...'दक्षिण देशीं हिंदुपद शाहुछत्रपती यांचा प्रधान मुख्य आदिकरून सवा लक्ष फौजेनिशीं भाऊगर्दी होऊन प्यादेमात कैशी जाली हें सविस्तर वर्णन लिहावयास आज्ञा केली.'... 'तुम्ही पुरातन राज्यांतील माहित (गार) लोक आहां तरी इस्तकबिलपासून चरित्र लिहून देणें' म्हणोन आज्ञा केली त्याजवरून वर्तमान ऐसे जे' या वाक्यात लेखकांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. साहित्याच्या निर्मितीची ही भूमिका नव्हे. तेव्हा निर्भेळ साहित्याकृति

म्हणूनहि बखरीचा अभ्यास करतां येणार नाही. व्यक्तिचरित्रें म्हणून कांही प्रमुख बखरी लिहिलेल्या आहेत. पण आजच्या अर्थाने यांना चरित्र-ग्रंथहि म्हणतां येत नाही. अशा प्रकारें इतिहास, चरित्र, साहित्य यांसारख्या लेखन प्रकारांत बखरींची गणना करतां येत नाही. तथापि या प्रत्येक प्रकाराचे कांही कांही विशेष प्रत्येक बखरींत कमी जास्त प्रमाणांत आढळून येतात. यास्तव बखर हा एक स्वतंत्र गद्य साहित्यप्रकार मानावा. इतिहास, चरित्र, कथा हें वाङमयप्रकार आजच्या कालाचे द्योतक आहेत. त्या प्रत्येकासंबंधीचे विचार निश्चित स्वरूपाचे बनलेले आहेत. हे वाङमयप्रकार स्वतंत्रपणें आज विकसित झालेले आहेत. बखरींत हे सारे प्रकार बीजरूपाने आहेत. बखरींतील इतिहासाचें स्वरूप मागे पाहिलें आहे. आता त्यांमधील साहित्याचें स्वरूप अवलोकन करूं.

साहित्याचे प्रमुख गुण म्हणजे रसोत्कटता, कल्पनाविलास, रम्य भाषा-शैली, उत्कृष्ट वर्णनपद्धति, आकर्षक निवेदनपद्धति आणि लेखकाची आत्मनिष्ठा हे होत. बखरकार हा इतिहासकालांतील घडलेल्या घटनांचें निवेदन करण्याच्या उद्देशाने लिहिण्यास प्रवृत्त झालेला असल्याने त्यांतील प्रमुख प्रसंग अगर घटना लेखकाच्या कल्पनाविलासांतून निर्माण झालेल्या आहेत असें म्हणतां येणार नाही. प्रस्तुत घटना ऐकीव असोत वा एखाद्या पत्राच्या साहाय्याने लिहिलेल्या असोत, त्या खऱ्या घडलेल्या आहेत हीच बखरकारांची भूमिका. या मुख्य घटनेच्या अनुषंगाने घडलेल्या घटना वा उद्भवलेले प्रसंग यांचें लेखन मात्र बखरकाराने कल्पनेच्या साहाय्याने केलेलें आढळतें. या ठिकाणीं त्याचा कल्पनाविलास, अद्भुततेचें प्रेम यांचा प्रत्यय येतो. भाऊसाहेबांची बखर, सभासद बखर अथवा चिटणीशी बखर यांतील प्रमुख घटना लेखकाने कशाच्या तरी आधारानेच लिहिल्या आहेत. हा आधार कच्चा असेल; आज अस्सल पत्रांच्या संशोधनाने त्याचें महत्त्व कमीहि झालेलें असेल; पण बखरकारांच्या दृष्टीने ती सर्व माहिती खरी होती. पानपतावर घडलेल्या घटनांचें त्याने जें वर्णन केलें आहे तें बरेंचसें वास्तव आहे. पण या घटनांमागील मनोवृत्तींचें त्याने केलेलें वर्णन बखर-काराच्या कल्पनाविलासाचें द्योतक आहे. रणधुमाळीचें त्याने केलेलें वर्णन, विविध वीरांच्या वीरश्रीचें वर्णन, त्यांच्या दैवी स्वरूपाचें वर्णन हें सर्व

त्याच्या कल्पनाशक्तींतून संभवलें असलें पाहिजे. यामुळेच या सर्व वर्णनाला साहित्याची सुरसता आली आहे. शिवचरित्रांतील घटनांची नोंद सभासदाने त्याला मिळालेल्या माहितीच्या आधारानेच केली असेल; पण शिवाजीच्या अंगांत येणें, भवानी देवीचा साक्षात्कार होणें यांसारख्या अद्भुत घटना वा इतर प्रसंगांचीं वर्णनें त्याने आपल्या कल्पनेच्या साहाय्यानेच केलीं असलीं पाहिजेत. परंतु बखरींना ऐतिहासिक कादंबरीची कल्पनारम्यता येणेंहि शक्य नाही. कारण बखरकाराची भूमिका आणि कादंबरीकाराची भूमिका या भिन्न आहेत. ऐतिहासिक घटनांच्या पार्श्वभूमीवर उभ्या असलेल्या व्यक्तींच्या मनोवृत्तींचें चित्रण आणि कल्पनात्मक नवनिर्मिति हे कादंबरीचे विशेष होऊं शकतील तर त्या ऐतिहासिक घटनांची नोंद हा बखरींचा विशेष ! कांही घटना उपलब्ध नसल्यास बखरकार कल्पनेच्या साहाय्याने त्या वास्तव घटनांची उणीव भरून काढूं शकेल; पण त्यामुळे कलात्मक निर्मिति होणार नाही. उपलब्ध बखरींपैकी कोणतीहि बखर घेतली तरी तिच्यामध्ये कलात्मक निर्मिति आढळते असें म्हणतां येत नाही. साहित्याचा महत्त्वाचा विशेष बखरींच्या ठिकाणीं नसल्याने त्यांना कलावाङ्मयाच्या क्षेत्रांत प्रवेश देतां येत नाही.

**राक्षसतागडीची बखर** (विजयनगरच्या साम्राज्यावरील बखर) आणि **वज्राघात** कादंबरी (ह. ना. आ.) यांचा पिंडच भिन्न मानला पाहिजे. सभासदी बखर अगर चिटणीशी बखर आणि ह. ना. आपटे यांची शिवकालावरील कोणतीहि कादंबरी यांचाहि पिंड भिन्नच आहे. पानपतावरील कोणतीहि बखर आणि पेशवाईवरील हडपांची कोणतीहि कादंबरी यांचाहि पिंड असाच भिन्न आहे. बखरींमध्ये ऐतिहासिक घटना आणि ऐकीव अथवा काल्पनिक घटना यांचें मिश्रण असतें तर कादंबरीमध्ये कलात्मक निर्मिति असते. बखरीमध्ये कल्पनाविलास नसतो असें म्हणावयाचें नाही. शिवचरित्रांतील अनेक घटनांचें वर्णन करतांना अथवा पानिपतावरील प्रसंगाचें वर्णन करतांना बखरकार कल्पनाविलासाचा आश्रय घेतोच, पण या कल्पनाविलासांत निर्मिति नसते; यामुळेच बखरी या कलावाङ्मयापासून वेगळ्या ठरतात.

वाङ्मयाचा दुसरा महत्त्वाचा गुण म्हणजे रसोत्कटता हा होय. बखरीमध्ये

हा गुण बऱ्याच प्रमाणांत आढळून येतो. इतिहासांतील वीर आणि अद्‌भुत रसात्मक प्रसंगांवरच बहुतेक बखरी लिहिल्या असल्याने या रसांचा उत्कर्ष चांगला साधला आहे. हें बखरवाङ्मय अत्यंत चटकदार झालें आहे. याचें कारण त्यांतील **रसोत्कट प्रसंग** हें होय. बखरकाराची वर्णनशैली रसोत्कटतेला अनुकूल आहे. एखाद्या प्रसंगाचें अथवा घटनेचें हुबेहुब चित्र वाचकांच्या डोळ्यापुढे उभें करण्याचें कार्य बखरकार आपल्या निवेदन आणि वर्णनशैलीच्या सामर्थ्यावर सहज करतो. युद्धांतील धुमश्चक्रीचें वर्णन मोठ्या ओजपूर्ण भाषेमध्ये बखरकार करतात; शोकपूर्ण प्रसंगाचें चित्रणही अतिशय हृदयंगम करण्यांत ते कुशल असतात. पानिपतची बखर, होळकरांची कैफियत यासारख्या बखरींत अशा रसोत्कट प्रसंगांची रेलचेल आहे. बखरकाराला वर्ण्यविषयाशी जिव्हाळा वाटत असल्याने त्याच्या वर्णनशैलीला आपोआपच जिवंतपणा येतो. बखरकारापुढे रामायण महाभारतासारखे ग्रंथ आदर्श म्हणून असल्यामुळे विविध प्रसंगांचीं वर्णनें तो काव्यसदृश शैलींत करतो. राज्याभिषेक, मुत्सद्द्यांच्या भेटी, समरभूमीवरील संवाद, थोर पुरुषांचीं सत्कृत्यें, विवाह, रंगपंचमीसारखे क्रीडाप्रसंग, युद्ध, तज्जन्य करुण प्रसंग या सर्वांची अत्यंत मनोवेधक अशीं वर्णनें बखरींतून आढळतात. हीच बखरींची रसवत्ता होय.

बखरींची भाषाशैली हीं एखाद्या साहित्यकृतीला शोभण्याजोगीच असते. छोटीं छोटीं परिणामकारक वाक्यें, मधूनच एखादें सुभाषित, जुन्या धर्मग्रंथाचा एखादा आधार, एखादा सुंदर दृष्टान्त यांसारख्या भाषाविशेषांनी बखरकार आपली बखर ‘सजवीत’ असल्याने त्या भाषेला मोठा डौल आलेला असतो. या दृष्टीने भाऊसाहेबांची बखर ही सर्वोत्कृष्ट आहे. चिटणीसांच्या बखरीहि भाषेच्या दृष्टीनें अत्यंत सरस आहेत.

कलात्मक नवनिर्मिति हा साहित्यकलेचा विशेष बखर वाङ्मयांत आढळून येत नसला तरी थोडाफार कल्पनाविलास, वीर, करुण, अद्‌भुत, आदि रसांनीं युक्त अशा प्रसंगांचें रम्य चित्रण, उत्कृष्ट वर्णनशैली, डौलदार भाषा हे साहित्यगुण बखरींच्या ठिकाणीं असल्याने बखरींचा अभ्यास साहित्यदृष्टीनेच सुरू झाला. इतिहास या दृष्टीने जरी मुळांत त्यांचे लेखन झालेलें असलें तरी इतिहास लेखनशास्त्राच्या अज्ञानामुळे त्यांचें इतिहासाच्या

दृष्टीने महत्त्व बरेंच कमी झालें आहे. त्यामुळे **बखरींची साहित्यशैली** हाच अभ्यासाचा विषय बनला. इतिहास नव्हे आणि कलावाङमयहि नव्हे, अशा तऱ्हेचें हें एक स्वतंत्र वाङमय मराठी गद्यांत मान्यता पावलें. त्याचा अभ्यास स्वतंत्र '**बखर-गद्य**' म्हणून करणें योग्य होईल. त्यांत कल्पनाविलास आहे, पण कलात्मक निर्मिति नाही; रसोत्कट प्रसंग आहेत, पण ते ऐतिहासिक वास्तवतेच्या बंधनांतून मुक्त झालेले नाहीत; त्यांत उत्कृष्ट व्यक्तिचित्रें आहेत, पण कलावाङमयांतील व्यक्तिचित्रणांत आढळून येणारें कल्पनारम्यत्व नाही. त्यामुळे बखरी म्हणजे निव्वळ इतिहासही नव्हे; आणि साहित्य-कलाहि नव्हे ! साहित्य, इतिहास, चरित्र, इ. चीं बीजें मात्र बखरवाङमयांत आढळतात. यास्तव बखर हें प्राचीन मराठींतील एक स्वतंत्र गद्यवाङमयच आहे असें मानावयास हरकत नाही.

**प्रस्तुत बखरीचा काल**— शिवचरित्रावर ज्या ६।७ बखरी उपलब्ध आहेत त्यांमध्ये कृष्णाजी अनंत सभासदांची ही बखर बरीच जुनी आहे. या बखरीचें लेखन इ. स. १६९४ त पूर्ण झालें असा शेवटीं उल्लेख आहे. 'ही बखर पूर्ण जाहली. चैत्रशुद्ध प्रतिपदा. ते दिवशीं वर्णन समाप्त झालें. ईश्वर संवत्सर–मुक्काम चंदी शालिवाहन शके १६१६ (त) जाहली......' संवत्सराचें नांव देण्यांत कांहीतरी घोटाळा झाला आहे. इ. स. १६९४ मध्ये भाव संवत्सर होतें. पण येथे उल्लेख ईश्वर संवत्सराचा आहे. हें संवत्सर इ. स. १६९७ मध्ये येतें. तेव्हा राजवाडे आदि संशोधकांचा तर्क असा आहे की लेखनाचा प्रारंभ इ. स. १६९४त झाला असावा व शेवट इ. स. १६९७ (ईश्वर संवत्सर)त झाला. तर्काशिवाय याला कांही आधार नाही. कारण ग्रंथसमाप्तीच्या वेळीं लेखकाने शके १६१६ हें वर्ष दिलें आहे. तेव्हा तें वर्ष लेखनारंभाचें मानणें निव्वळ अनुमानच आहे. नक्कलकाराची चूक असण्याचाच अधिक संभव आहे. श. १६१९ ऐवजीं श. १६१६ चुकीनें लिहिलें गेलें असावें. ग्रंथाच्या शेवटीं उल्लेख असणें व संवत्सराचें निश्चित नांव देणें यावरून शके १६१९ म्हणजे इ. स. १६९७ हाच या बखरीचा लेखनकाल (समाप्तिकाल) असावा.

शिवाजीच्या मृत्यूनंतर साधारणपणें २५।३० वर्षांच्या आंत ही बखर लिहिलेली असल्याने तिला समकालीन मानावयास हरकत नाही. शिवाय

ती त्या काळांतील एका माहितगार व्यक्तीने लिहिलेली आहे. शिवाजीच्या काळांत वावरलेली अशी ही व्यक्ति आहे. राजारामाने सभासदाला लेखनाची आज्ञा करतांनाच म्हटलें आहे. 'तुम्ही पुरातन, राज्यांतील माहित (गार) लोक आहां तरी इस्तकबिलपासून चरित्र लिहून देणें.' अर्थात् राजाराम यावेळीं जिंजीला होता. रायगडावरून आपल्या निवडक सहकाऱ्यांसह निघून तो जिंजीला पळून आलेला होता. सरकारी कागदपत्रें अथवा इतर साधनेंहि त्याच्याबरोबर जिंजीला आलेली नव्हती हें ध्यानांत घ्यावयास पाहिजे. समकालीन व्यक्तीनें लिहिलेली असूनही महाराष्ट्रापासून दूर अंतरावर, कोणतीहि साधनसामग्री नसतांना, लेखकाने आपल्या स्मृतीवर अवलंबून ही बखर लिहिलेली असल्याने ती त्रोटक झाली आहे. सभासद या वेळीं वृद्ध झालेला होता. त्याची स्मृतिहि कमी होऊं लागली होती. या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊनच बखरीचा विचार करावयास हवा. इतकें असूनही शिव-कालीन विषयावरील समकालीन म्हणून प्रस्तुत बखरीला बरेंच महत्त्व आहे. वास्तविक कालदृष्टया इ. स. १६८५ मध्ये लिहिलेली ९१ कलमी बखर ही शिवचरित्रावरील अगदी पहिली बखर होय. पण आज तिची मूळ प्रत उपलब्ध नाही. दत्तो त्रिमलच्या मूळ हस्तलिखिताची खंडो अण्णाजी मलकरे यांनी केलेली नक्कल बऱ्याच भ्रष्ट स्वरूपांत उपलब्ध आहे. म्हणूनच सभासद बखर ही पहिली समजली जाते. ही बखर अगदी अस्सल स्वरूपांत उपलब्ध झाली आहे. रा. ब. का. न. साने यांनी या बखरीचे संशोधन करून तिच्या चार आवृत्त्या काढल्या.

या बखरीचा लेखक कृष्णाजी अनंत सभासद हा होय. शिवाजीच्या कारकिर्दीत हा एका प्रांताचा ब्राह्मण सुभेदार होता. राजारामाच्या कारकिर्दीत सभासदाला बरेंच महत्त्व प्राप्त झालें. प्रल्हाद निराजीचा तो हस्तक होता. केशव पंडिताने आपल्या राजाराम चरित्रामध्ये सभासदाचा '**महामति**' असा उल्लेख केला आहे. फ्रेंचांनीहि सभासद फार मोठा अधिकारी असल्याचें लिहून ठेविलें आहे. पाँडिचरीचा फ्रेंच गव्हर्नर त्याचा The Second Minister and the Third Personage in the Government' असा उल्लेख करतो.

**प्रस्तुत बखरींतील विषय** — शिवाजी महाराजांच्या आयुष्यांतील

महत्त्वाचे असे ७१ प्रसंग प्रस्तुत बखरींत वर्णिले आहेत. या दृष्टीने हें चरित्र अत्यंत त्रोटक व अपुरें आहे. जेधे शकावलीमध्ये आणि अन्य बखरींमध्ये कितीतरी अधिक प्रसंगांचें तपशीलवार वर्णन आलें आहे. सभासद बखर समकालीन असली तरी शिवाजीच्या पूर्वचरित्रांतील माहिती अगदीच त्रोटक स्वरूपांत सभासद देतो. राजवाडे म्हणतात : 'यद्यपि सभासदी बखर समकालीन लेखकाने लिहिलेली आहे तत्रापि तींतील शके १५८१ पर्यंतची हकीकत, धरसोडीची, त्रोटक, तुटक व कालविपर्यस्त अशी असून, पुढील हकीकत यद्यपि कोठेकोठे जास्त विस्तृत आहे तथापि रसभरीत नसून प्रायः कोरडी अशी आहे.'

प्रारंभीं लेखकाने मालोजीराजांची माहिती दिली आहे. शिखरशिंगणापुरीं दर चैत्र महिन्यांत मोठी जत्रा भरत असे. तेथे पाण्याची सोय नव्हती. मालोजीने मोठ्या खर्चाने तळें बांधलें. रात्रीं स्वप्नांत श्रीशंभुमहादेवाने साक्षात्कार दिला व सांगितलें की 'आपण राजाच्या वंशांत जन्म घेऊन म्लेंच्छांचा क्षय करतों व देवब्राह्मणांचें रक्षण करतों.' पुढे शहाजीची माहिती अर्ध्या परिच्छेदांत देऊन लेखक शिवाजीमहाराजांच्या जन्माकडे वळतो. पुन्हा या प्रसंगीं शंभुमहादेवाने स्वप्नांत येऊन सांगितलें की 'आपणच अवतरलों आहे. पुढे बहुत ख्यात करणें आहे. बारा वर्षेंपर्यंत तुम्ही आपले जवळ ठेवावें. पुढे न ठेवणें. जातील तिकडे जाऊं देणें. आरोप न करणें' हें जन्मप्रसंगीचें वर्णन करून लागलीच वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत लेखक येतो. दादोजी कोंडदेव, जिजाबाई व शिवाजी असे सगळे बेंगळूरला शहाजीकडे गेले. या वेळीं शिवाजी १२ वर्षांचा होता. तिकडून परत येतांच शिवाजीने बारा मावळे काबीज केलीं आणि स्वराज्यस्थापनेला प्रारंभ केला. प्रारंभीं त्याच्या कार्याचें स्वरूप लुटमारीचें होतें असें अनेकांना वाटलें. जुन्नर, अहमदनगर, कोंडाणा, पुरंदर, कल्याण, भिवंडी इ. ठाणीं घेऊन त्याने आपल्या कार्याचा पाया घातला. चंद्रराव मोरे यांस मारून परक्याच्या सेवेंत असलेल्या स्वकीयांचा बंदोबस्त केला. जावळीचें खोरें जिंकून प्रतापगड बांधला.

शिवाजीची ही धामधूम पाहून विजापूरच्या दरबारांतून अफझलखानाची रवानगी करण्यांत आली. या प्रसंगाचें वर्णन मात्र लेखकाने बऱ्याच विस्ताराने दिलें आहे.

शिवाजी महाराजांना या प्रसंगाची चिंता वाटत होती. पण भवानी देवीने स्वप्नांत येऊन निर्भय राहण्यास सांगितलें. एकमेकांचे वकील एकमेकांना भेटून गेले. अफझलखानाचा हेतु काय आहे हें माहीत करून घेऊन शिवाजीने डावास प्रतिडाव या न्यायाने योग्य ती तयारी केली आणि अफझलखानाचा शेवट केला.

यानंतर लेखकाने शिवाजीच्या राज्यव्यवस्थेचें, सैन्याचें, शिस्तीचें, गडावरील नेमणुकीचें वर्णन केलें आहे;. रयतेची सुधारणा, देवदेवस्थान, पीर मशिदी यांच्या देणग्या वगैरेंचीहि माहिती दिली आहे.

दक्षिणेंतील शिवाजीचें हें बंड पाहून दिल्लीपतीला मोठी चिंता पडली. त्याने शास्ताखानाची दक्षिणेंत रवानगी केली. पण त्याचाही शिवाजीने मोठ्या युक्तीने पाडाव केला. नंतर मिर्झा राजा जयसिंग व दिलेरखान यांची रवानगी झाली. जयसिंगाशीं तह करून शिवाजी औरंगजेबाच्या भेटीस दिल्लीला गेला. (सभासदाने ही भेट आग्र्याऐवजी दिल्लीला झाली असें म्हटलें आहे.) तेथून सुटका करून घेऊन शिवाजी दक्षिणेकडे आला व परत राज्यवाढीच्या कामाला लागला. औरंगजेबाने आपल्या पुत्राकडून भेदनीतीचा अवलंब करून पाहिला. पण त्यांत औरंगजेबालाच धोका दिसूं लागला. शिवाजी व शाहाजादा एक होतील अशी त्यास भीति वाटली म्हणून त्याने उभयतांमध्ये भांडण वाढविण्याचा विचार केला.

नंतर सुरतेची लूट वर्णिली आहे. या लुटींत शिवाजीला फार मोठी संपत्ति मिळाली. यानंतर कोकणांतील स्वाऱ्या, नौदलाची वाढ, राजारामाचा जन्म, दिलेरखानाशीं युद्ध, सालेरीचें युद्ध, बहादूर कोकाचें दक्षिणेंत आगमन इ. घटना वर्णिल्या आहेत.

अशा प्रकारें स्वराज्याची स्थापना करून शिवाजीने राज्याभिषेक करवून घेतला व नव्या शकाचा प्रारंभ केला. यानंतर दक्षिणेकडील स्वारी व गृहकलहाचें वर्णन आलें आहे. यानंतर सर्व राज्यांतील गड, किल्ले, महाल, कारखाने, खजिना, सैन्य, इ. चे विस्तृत आकडे दिले आहेत. शेवटीं शिवाजीच्या मृत्यूचें वर्णन देऊन बखर संपविली आहे.

सभासदबखरींत शिवचरित्रांतील प्रसंग आले आहेत. एकदोन ठिकाणें सोडल्यास कोठेहि निश्चित काळ दिलेला नाही. घटनांचा क्रमहि कांही कांही

ठिकाणीं चुकीचा आहे. शिवजन्माची तिथीहि सभासदाने दिलेली नाही. दोन प्रसंग सोडून घटनांचें निवेदन अगदीच सामान्य आणि त्रोटक आहे. त्याच्याकडून आणखी विस्तृत वर्णनाची अपेक्षा होती. सभासद बखरीचें इंग्रजी भाषांतरकार श्री. सेन म्हणतात : ‘ Very brief is he and we wish he might have been more communicative... ’ या बखरीच्या त्रोटकपणाबद्दल लिहितांना राजवाडे म्हणतात : ‘ माफक व त्रोटक उत्तर देणाऱ्या साक्षीदारापासून खटल्यांतील उपांगांची माहिती होणें जसें अशक्य असतें तद्वतच सभासद बखरीची गोष्ट आहे. सदर बखर त्रोटक असण्याचें एक कारण असें असावें की अद्यापि शिवाजीभोवती प्रचंड दंतकथांचें वलय निर्माण झालेलें नव्हतें. जें घडलें तें तसेंच अगदी थोडक्यांत सांगून टाकावयाचें. त्याला इतर गोष्टींनी सजवून मांडण्याची त्याला गरज वाटली नाही, कारण तसा काळच अद्यापि आलेला नव्हता. या बखरीवरूनच लिहिल्या गेलेल्या नंतरच्या बखरींत अनेक घटनांची विस्तृत माहिती आहे. कारण या वेळीं (इ. स. १८१०) शिवाजी हा इतिहासांतील एक थोर पुरुष झालेला होता, त्याच्या भोवतालीं तेजोवलय निर्माण झालें होतें. सभासदाच्या काळांत हें अद्यापि घडलेलें नव्हतें. ’

शिवाजीच्या पूर्वायुष्यांत त्याने ज्या स्वकीयांचा पाडाव करून राज्य स्थापन केलें त्या कृत्यांचें नैतिक अथवा राजकीय समर्थन करण्याचीहि सभासदाला गरज पडली नाही. कारण ही गोष्ट नंतरच्या काळांतच होत असते. उदा०, चंद्रराव मोरे प्रकरण सभासदाने अगदी स्पष्ट शब्दांत जसें घडलेलें त्याला माहीत होतें तसें त्याने वर्णिलें आहे. नंतरच्या लेखकांनी त्याचें नैतिक वा राजकीय समर्थन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**बखरकाराची भूमिका**— कृ. अ. सभासद हा राजारामाच्या सांगण्यावरून ही बखर लिहितो आहे. त्यामुळे साहजिकच कांही गोष्टींबाबत त्याचा दृष्टिकोन स्वतंत्र असणें शक्य नव्हतें. राजारामाच्या जन्माच्या वेळच्या ज्या गोष्टी सभासदाने वर्णिल्या आहेत त्या लक्षांत ठेवण्याजोग्या आहेत. “ ...मोहित्यांची कन्या सोयराबाई गरोदर होती. तीस पुत्र जाहला तो पालथा उपजला. राजियासी वर्तमान सांगितलें. राजे म्हणूं लागले की ‘दिल्लीची पादशाही पालथी घालील ’ असें बोलले. मग ज्योतिषी म्हणो

लागले की, 'थोर राजा होईल. शिवाजीराजियाहून विशेष कीर्ति होईल' असें भविष्य केलें. मग राजियांनी राजाराम म्हणून नांव ठेवलें. आणि बोलिले की, 'राजाराम राजा प्रजा सुखी राखील. आपणापेक्षा याचा पराक्रम होईल. नांवाची कीर्ति बहुत होईल. आपलें नांव रक्षील तर एवढाच रक्षील.' असे बोलले.

शिवकालीन बखरीचा एक विशेष म्हणजे पुराणपद्धतीने कथानकाचा प्रारंभ व शेवट करावयाचा. प्रस्तुत बखरीच्या प्रारंभीं पुराणपद्धतीच्या वंशावळी दिलेल्या नाहीत. सप्त प्रकरणात्मक चरित्रामध्ये तसा प्रारंभ आहे. 'चरित्र पुण्यश्लोक राजियाचे जे घरीं लिहून ठेवतील त्यांच्या भाग्यास पारावार नाही. व जे जे वाचतील त्यास मोठें पुण्य जोडेल. निपुत्रिकास पुत्र होतील व दरिद्री यांस लक्ष्मीवंत होतील व अपेशीयास यशवंत होतील.'

इतिहासलेखनाचें शास्त्र विदित नसल्यानें सर्वच जुन्या बखरींमध्ये अद्‌भुतरम्य घटनांचें वर्णन येतें. प्रस्तुत बखरींत ६।७ वेळां शिवाजीच्या अंगीं भवानी देवीचा संचार होतो असें वर्णिलें आहे. अफजलखान प्रसंग, दिल्लीचा प्रसंग, यांसारख्या महत्त्वाच्या प्रसंगीं भवानी माता स्वतः येऊन शिवाजीला धीर देत असे. बखरकाराने या घटना कोणतीहि शंका मनांत न आणतां वर्णिल्या आहेत. मालोजी राजांना दृष्टान्त देऊन श्रीशंभू महाराजांनी राजांच्या कुळांत अवतार घेतों असें त्यास सांगितल्याचें याच श्रद्धेनें त्याने वर्णिलें आहे. तत्कालीन संकेत आणि पुराणासारख्या वाङ्मयाचा पगडा यामुळे अशा गोष्टी बखरींतून निःशंकपणे वर्णिल्या जातात.

शिवाजीच्या मृत्युसमयाचेंहि असेंच अद्‌भुत वर्णन केलें आहे. इतिहासांतील थोर पुरुषांच्या मृत्युसमयीं निसर्गालाहि दुःख होतें हें सांगण्याची सर्वत्र पद्धति आहे. ज्यूलियस सीझरच्या मृत्यूच्या प्रसंगीं अशाच घटना घडल्याचें बखरकारांनीं आणि शेक्सपीयरसारख्या नाटककाराने वर्णिलें आहे. 'राजियाचें देहावसान झालें. ते दिवशीं पृथ्वीकंप जाहला. गगनीं धूमकेतु उदेला. उल्कापात आकाशाहून झाला. रात्रीं जोड इंद्रधनुष्यें निघालीं. अष्टदिशा दिग्‌दाह होऊन गेल्या. श्रीशंभुमहादेवी तळयाचें उदक रक्तांबर झालें. पाण्यांतील मच्छ बाहेर पडून अमासवाणी उदक जाहलें. ऐशी अरिष्टें जाहली...' शेवटीं शिवकार्याची फलश्रुति सांगतांना बखरकार म्हणतो :

'प्रतिइच्छा मरण पावून कैलासांत गेला. ये जातीचा मागे कोणी जाहला नाही. पुढेहि होणार नाही...'

**सभासदबखरींचें इतिहासदृष्टीनें मूल्यमापन**—सभासद बखरीचें त्रोटक स्वरूप व बखरकाराची भूमिका यांचें स्वरूप याप्रमाणे असलें तरी शिव-चरित्रावरील सर्व बखरींत हीच बखर अधिक प्रमाणभूत आहे हें मात्र सर्व इतिहासकारांना मान्य आहे. सभासदाला इतिहासलेखनाच्या शास्त्राची माहिती नव्हती; त्याने कोणत्याहि कागदपत्रांच्या आधाराने ही बखर लिहिलेली नाही; उत्तर आयुष्यांत महाराष्ट्रापासून दूर अशा ठिकाणीं आपल्या स्मरणशक्तीवर अवलंबून त्याने ही बखर लिहिलेली आहे; त्यामुळे तींत अनेक दोष राहून गेले आहेत. तरी देखील समकालीनाच्या हातची बखर म्हणून प्रस्तुत बखरीला फार मोठें महत्त्व आहे. राजवाडे, सेन, जदुनाथ सरकार, डॉ. बाळकृष्ण यांसारखे सर्व इतिहासकार या बखरीचें महत्त्व मान्य करतात.

शिवचरित्रावरील सात बखरी अभ्यासासाठी निवडून त्यांतील तीन बखरींचे विशेष महत्त्व सांगतांना राजवाडे म्हणतात : सभासदाची बखर केवळ स्मृतीवर हवाला ठेवून दूर प्रांतीं लिहिली असल्यामुळे तींत काल-क्रमाची व्यवस्था राहिली नाही. परंतु लेखकाने शिवाजीची कांही कारकीर्द स्वतः अनुभविली असल्यामुळे ज्या प्रसंगांची हकीकत त्याने दिली आहे ते प्रसंग खरोखरीच घडले, एवढें कबूल करावें लागतें...' या विषयावरील प्रमुख बखरीचा विचार करून सेन म्हणतात : '...But Sabhasad, I think, should be credited with greater authority than his successors in historical effects.' हा विचार ते कांही उदाहरणें देऊन स्पष्ट करतात. अफझलखानाने शिवाजीवर चालून येत असतां वाटेवर तुळजापूरच्या भवानी देवीच्या मूर्तीचा भंग केला अशी हकीकत फक्त सभा-सदच देतो. इतर बखरकार ही हकीकत देत नाहीत. देवीने स्वप्नांत येऊन पूर्व इषारा दिल्यामुळे पुजाऱ्यानें मूर्ति अफझलखान येण्यापूर्वीच पळवून अन्य ठिकाणीं नेली असें ते सांगतात. पण यांत अर्थ नाही. सभासदाने घडलेला प्रकार जसाच्या तसा दिला असावा. सेन म्हणतात : 'Modern criticism will not allow the admission of such divine

agencies into sober history and Sabhasad as a contemporary had certainly better means to know the truth.' बखरकारांच्या निवेदनांतील फरक कोणत्या कारणामुळे झाला असावा हें सांगतांना ते म्हणतात : ' It was perhaps the Hindu pride of these later writers that led them to give an irrational account of the Tuljapur incident. Evidently for such events Sabhasad is more reliable.' सभासद बखरीच्या उणीवा सांगून जदुनाथ सरकार म्हणतात : 'But Sabhasad's book is still the most valuable source of information on the national hero from the Maratha side. The proof of it is that most later bakhar writers, who could find no other source of such usefulness, have borrowed extensively from it.

सभासदाने कांही महत्त्वाच्या गोष्टी पूर्णपणें वगळल्या असल्या तरी कांही गोष्टी अगदी मूळ स्वरूपांत वर्णिल्या आहेत. 'चंद्रराव मोरे' प्रकरण सभासदाने अगदी आहे त्या स्वरूपांत मांडलें असावें असा सरकार आणि सेन यांचा तर्क आहे. शिवाजीने आपलें राज्य वाढविण्याचें काम झपाट्याने चालविलें होतें. अनेक स्वतंत्र सरदारांचा मोड करून प्रबल मध्यवर्ती राज्य स्थापन करण्याच्या दिशेनेच त्याचे सर्व प्रयत्न चालू होते. 'चंद्रराव मोरे यास मारल्याविरहित राज्य साधत नाही. त्यास तुम्हांवाचून हें कर्म न होय.' असे रघुनाथ बल्लाळास सांगून शिवाजीने त्याला या कामगिरीवर पाठविलें. त्याने कांही बोलण्याचें निमित्त करून चंद्रराव मोरे व सूर्याजीराव मोरे या उभयतांस कटयारीचा वार करून मारिलें. लागलीच शिवाजीने स्वारी करून जावळी सर केली. नंतर चंद्ररावाचा भाऊ हणमंतराव हा कांही प्रदेश धरून बसला होता त्याजकडे सोयरिकीचें बोलणें करण्याच्या निमित्ताने संभाजी कावजीस पाठवून हणमंतरायालाहि ठार केलें. या प्रकरणाबाबत नंतरच्या लेखकांनी शिवाजीच्या या कृत्याला नैतिक कारणें पुरविण्याचा प्रयत्न केला आहे. सरकार व श्री. सेन यांना हा प्रयत्न मान्य नाही. किंकेड व पारसनीस यांच्या म्हणण्याप्रमाणे शिवाजीचें व चंद्ररावाचें

हिंदवी राज्याबद्दल बोलणें चालूच होतें. चंद्ररावाने एकदा विश्वासघात करून शिवाजीला पकडून ठेवण्याचा प्रयत्न केला होता. या उभयतांच्या मताप्रमाणें हा चंद्ररावाचा खून पूर्वनियोजित नव्हता. बोलण्याच्या भरांत आवेशामुळे आणि त्याचा विश्वासघातकी डाव माहीत असल्यामुळे त्याचा वध केला असावा. पारसनिसांनी प्रसिद्ध केलेल्या एका बखरीवर हें शिवाजीचें समर्थन आधारलेलें आहे. पण या अज्ञात बखरीवर विश्वास ठेवण्यास सेन व सरकार हे संशोधक तयार नाहीत. सभासदाने लिहून ठेवलेली माहिती खरी असावी असें त्यांचें म्हणणें आहे. जदुनाथ सरकारांनी याबद्दल पुढील मत दिलें आहे : 'The acquisition of Javli was the result of deliberate murder and organised treachery on the part of Shivaji. His power was then in its infancy, and he could not afford to be sempulous in the choice of the means of strengthening himself.' राजवाड्यांनी सातहि बखरींतील या घटनेबद्दलची माहिती देऊन असें म्हटलें आहे की अस्सल कागदपत्रांच्या अभावीं बखरींतील या मजकुरावर विश्वास ठेवतां येणार नाही.

डॉ. बाळकृष्णांना जदुनाथ सरकारांचें हें मत मान्य नाही. त्यांनी या सर्व प्रकरणाचा पूर्व इतिहास देऊन व बखरींमधील विसंगति दाखवून शिवाजी व चंद्रराव मोरे यांची बरेच दिवस हिंदवी स्वराज्याबद्दल व 'राजा' हा किताब धारण करण्याबद्दल वादावादी चालू होती. हा पूर्वनियोजित खून नसून स्वराज्यस्थापनेच्या प्रयत्नांतील ही एक घटना आहे असें त्यांनी दाखविलें आहे. सभासदाची बखर आठवणीवर विसंबून लिहिली असल्यामुळे या बाबतींत आधारास घेणें योग्य नव्हे असें त्यांचें मत दिसतें.

सरदेसायांनीहि शिवाजी आणि मोरे यांचा झगडा बरेच दिवस चालला होता असें म्हटलें आहे. दौलतराव मोऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या पत्नीने यशवंतराव नांवाचा मुलगा दत्तक घेतला. हाच चंद्रराव मोरे. चंद्रराव हें त्याचें नांव नसून हा त्याचा किताब आहे. मोरे आपणाला चंद्रगुप्त मौर्याच्या घराण्यांतील समजतात. शिवाजीने आपल्या साहाय्यकांच्या मदतीने मोऱ्यांना शरण येण्याविषयी सांगून पाहिलें. पण प्रकरण शांतपणें आटपलें नाही.

शिवाजीने संभाजी कावजीला सैन्य घेऊन मोऱ्यांचेवर पाठविलें. नंतर रघुनाथ बल्लाळला पाठविलें. युद्धांत हणमंतराव मारला गेला. यशवंतरावाने रायरीच्या किल्लयांत जाऊन आश्रय घेतला आणि प्रतापराव विजापूर दरबारीं पळाला. पुन्हा जेव्हा यशवंतरावाने गडबड सुरू केली तेव्हा शिवाजीने हैबतराव सिलीमकराला सैन्य देऊन पुन्हा यशवंतरावावर पाठविलें. बऱ्याच वाटाघाटीनंतर बोलणीं करण्याचें ठरलें. बैठकीमध्ये शिवाजीने यशवंतरावाचा वध करून त्याच्या मुलांना कैद करून पुण्यास नेलें. त्यांनीहि तेथून विजापुराशीं पत्रव्यवहार चालविलेला उघडकीस येतांच त्यांपैकी एकाचा वध करण्यांत आला. दुसरा मुलगा बाजी तुरुंगांतून निसटला आणि पुढे जयसिंगाला मिळाला. शिवाजीचें उद्दिष्ट विचारांत घेतां शिवाजीचें हें कृत्यहि लोकांच्या दृष्टीने समर्थनीय ठरलें असें सरदेसाई म्हणतात. : 'History will certainly pronounce an adverse judgement upon Shivaji's dealings with the Morays. The result, however, proved highly beneficial to his purpose, as the world come to know what to expect from him if an open opposition were offered to his plans and desire.' (The History of the Marathas vol. I Page 113.)

मावळ खोऱ्यांतील देशमुख-देशपांडयांना एकत्र आणून, त्यांच्याकडून आणा-शपथा घेऊन हिंदवी स्वराज्याचा पाया घालण्याचें कार्य शिवाजीने दादाजी कोंडदेवाच्या मार्गदर्शनाखालीच सुरू केलें होतें हें दादाजी नरसप्रभूला लिहिलेल्या पत्रावरून स्पष्ट होतें : 'श्री रोहिरेश्वर तुमचे खोरियांतील आदि कुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्रीलगत स्वयंभू आहे. त्याणी आम्हास यश दिल्हे व पुढे तो सर्व **मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार** आहे. त्यास, बावास हवाल होऊं नये, खामखा सांगावा आणि तुम्ही तो कागद घेऊन सिताब हुजूर येणें. राजश्री दादापंताचे विद्यमाने बावाचे व तुमचे व आमचे श्रीपासी इमान जाले तें कायम वज्रप्राय आहे. हें राज्य व्हावें हें श्रीचें मनांत फार आहे.... यानंतरच्या अनेक पत्रांवरून व शिवाजीच्या उद्गारांवरून, शिवाजीने कोणत्या ध्येयासाठी लढा सुरू

केला होता हें अगदीं स्पष्ट होतें. 'आपल्या भूमीचें संरक्षण करणें हें माझें कर्तव्य आहे...' असें अगदी स्पष्ट विधान त्याने शास्ताखान प्रकरणानंतर एका मोगल अधिकाऱ्याला लिहिलेल्या पत्रांत केलें आहे. 'बाजी घोरपडे यास लिहिलेल्या पत्रावरून दक्षिणेकडील पादशाही बलिष्ठ करून उत्तरेकडून आलेल्या पठाणी पादशाहीशीं मुकाबला करण्याचा त्याचा हेतु स्पष्ट दिसतो. हें सर्व साध्य होण्यासाठी सह्याद्रीच्या आसमंतांतील लहान लहान राजे, देशपांडे आणि इतर मराठे सरदार यांना एका मध्यवर्ती सत्तेखाली आणणें अत्यंत आवश्यक होतें. साम, दाम, दंड, भेद या चतुर्विध साधनांच्या साहाय्याने शिवाजीने हा उद्योग वयाच्या १५ व्या वर्षापासून चालविला होता. जावळीच्या मोऱ्यांना त्याचा हा उद्योग मान्य नव्हता. हिंदवी स्वराज्याचें ध्येय मोऱ्यांना समजणेंच शक्य नव्हतें. सर जदुनाथ सरकारांचे शेवटच्या चंद्रावाबद्दलचे उद्गार लक्षांत ठेवण्याजोगे आहेत. ते म्हणतात : 'Generations of the enjoyment of wealth and authority had turned the last Chandra Rao into a proud indolent drunkard,' शिवाजीने मावळ खोऱ्यांत दादाजीच्या मार्गदर्शनाखाली एक प्रकारची शिस्त आणि सुव्यवस्था सुरू केली. यामुळे त्याची लोकप्रियता वाढूं लागली. मोऱ्यांना हें सहन होणें शक्य नव्हतें. विजापूरकरांच्या साहाय्याने शिवाजीच्या विरुद्ध इतर सरदारांना संघटित करण्याचा त्यांनी प्रयत्न सुरू केला होता. या सर्व घटनांचें वर्णन सर जदुनाथ सरकारांच्या शब्दांतच देतों. ते म्हणतात : 'As the fame of his justice, firmness and stand for the weak was noised abroad from village to village in Maharashtra, more and more people looked upto him as their protector and longed to come under his rule.... Chandra Rao tried to form an **anti-Shivaji** coalition in concert with the neighbouring Adil Shahi Governor.' अशा परिस्थितींत चंद्रराव मोऱ्यांविरुद्ध शिवाजीने जी कारवाई केली ती वैयक्तिक स्वार्थासाठी केली हें म्हणणें केव्हांहि योग्य होणार नाही. दादाजी नरसप्रभूला इ. स. १६४५ मध्ये लिहिलेल्या पत्रावरून शिवाजीचें ध्येय निश्चित झालेलें

स्पष्ट दिसतें. तेव्हा " Even Shivaji never pretended that the murder of the three Mores was prompted by a desire to found a 'Hindu Swaraj' or to remove from his path a treacherous enemy who had repeatedly abused his generous leniency." या सर जदुनाथांच्या उद्गारांना काय अर्थ आहे? विशिष्ट ध्येयासाठी मराठ्यांची प्रबल मध्यवर्ती सत्ता निर्माण करण्याच्या प्रयत्नामध्ये आड येणाऱ्या सर्व स्वकीयांचा आणि परकीयांचा निःपात करणें आवश्यक होतें. चंद्रराव मोऱ्यांचें प्रकरण यांपैकीच एक होतें हें अगदी स्पष्ट आहे.

या प्रकरणाचा इतका विस्तृत विचार करण्याचा हेतु असा आहे की सभासद बखरींतील वर्णनाचें सत्य वाचकांना पडताळून पाहतां यावें. शिवाजीचा हेतु आणि त्याचें स्वराज्यस्थापनेचें महान् कार्य विचारांत घेऊनच तत्कालीन समाजानेसुद्धा या कृत्याचें मूल्यमापन केलें असावें. अमुक अमुक घटना घडलीच नाही असें म्हणणें, आणि त्या घटनेमागील कारणपरंपरा आणि नंतर होणारा परिणाम यांचा विचार करून त्या घटनेचा अर्थ लावणें या दोन भिन्न गोष्टी आहेत. सभासदाला असा अर्थ लावण्याचें कारणच पडलें नाही. त्याने घडलेली घटना आपल्या स्मृतीप्रमाणे नोंदवून ठेविली आहे. तपशिलांत मतभेद दिसतो पण मूळ मोऱ्यांच्या वधाची घटना सर्वच इतिहासकारांना मान्य आहे असें दिसतें.

अफजलखानाच्या वधाची माहिती सभासदाने अगदी यथार्थ रंगविली असली पाहिजे. शिवाजीनें अफजलखानाचा वध विश्वासघाताने मुळीच केला नाही, उलट खानाचीच योजना विश्वासघाताची होती. शिवाजीला खानाचें पूर्वचरित्र माहीत असलेंच पाहिजे. इ. स. १६३९ मध्ये अफजलखानाने कस्तुरीरंगाचा, भेटीस बोलावून खून केला होता. विजापुरी वजीर खान महंमद याचा खून करण्यांत त्याचा हात होता. खानाने स्वारीवर निघतांना आपल्या अनेक बेगमांचा वध केल्याचा उल्लेख समकालीन लिखाणांत आढळतो. १६-६-५९ या तारखेला, कान्होजी जेधे यांना सादर केलेल्या विजापुरी फर्मानांत 'शिवाजीचा पराभव करून निर्मूळ फडशा करण्यासाठी अफजलखानास वाईप्रांतीं पाठविण्यांत आल्याचा स्पष्ट

उल्लेख आहे. अशा प्रसंगीं शिवाजीने बचावाची, आणि वेळप्रसंग पडल्यास चढाईची तयारी ठेवणें अगदी आवश्यक होतें याबद्दल मतभेद नसावा. सर्वच बखरी या बाबतींत एकमताने घडलेली हकीकत सांगतात. सभासदाने चंद्रराव मोरे याला ठार मारण्याच्या कृत्याचें निवेदन स्पष्ट शब्दांत केलें आहे. तेथे त्याला शिवाजीचें नैतिक अगर राजकीय समर्थन करावेसें मुळीच वाटलें नाही. यावरून अफजलखानाच्या वधाचें त्याने खोटें समर्थन केलें असेल असें मुळीच समजण्याचें कारण नाही. समर्थनच करावयाचें होतें तर चंद्रराव मोरे प्रकरणीं तें अधिक आवश्यक होतें. या बाबतींत सेन आणि सरकार यांचें एकमत आहे. जदुनाथ सरकारांनी या प्रसंगाचें निवेदन करतांना सभासद बखरीचा बराच आधार घेतला आहे. अर्थात् त्यांनी हा सर्व इतिहास इतर अनेक साधनांच्या साहाय्यानेच लिहिलेला असल्यामुळे सभासद बखरीचें ऐतिहासिक महत्त्व चांगलेंच प्रस्थापित होतें. अफजलखानाचें आगमन, त्याचा वकील कृष्णाजी भास्कर याचें शिवाजीशीं झालेलें बोलणें, शिवाजीचा वकील गोपीनाथपंत यांचें अफजलखानाच्या गोटांत जाणें, अफजलखानाच्या सरदारांना लांच देऊन अफजलखानाचा अंतःस्थ हेतु काढून घेणें आणि त्यानुसार शिवाजीला इशारा देणें या सर्व घटना सभासदाने अगदी तपशिलाने दिल्या आहेत.

शिवाजीची भूमिका कोणत्याहि स्पष्टीकरणाशिवाय सर्व पूर्वघटनांवरून स्पष्ट दिसते. सभासदानेहि स्वतंत्र खुलासा अगर समर्थन करण्याचा प्रयत्न केलेला नाही. जदुनाथ सरकारांसारख्या आधुनिक चिकित्सक इतिहासकारांना देखील सभासदाचें या प्रसंगाचें वर्णन सर्वांत अधिक विश्वासार्ह वाटतें. या प्रसंगाचें वर्णन करतांना त्यांनी जवळ जवळ सभासदाचा अनुवाद केला आहे, यावरून सभासदाच्या बखरीचें ऐतिहासिक महत्त्व ध्यानांत येऊं शकेल. एकदोन उतारे तुलनेसाठी घेऊं. सभासद : 'गोटांतून भेटीस यावयास खानहि सिद्ध होऊन चालले. बराबरी लष्कर हजार दीड हजार बंदुकी मुस्तेद होऊन चालिले. मोठमोठे धारकरी लोक समागमें चालिले. इतक्यांत पंताजी पंत पुढे होऊन अर्ज केला की, 'इतका जमाव घेऊन गेलियाने राजा धाशत खाईल, माघारा गडावरी जाईल. भेटी होणार नाही. शिवाजी म्हणजे काय? यास इतका सामान काय

करावा ? राजा दोघा माणसानिशी तिकडोन येईल. तुम्ही इकडोन दोघा-निशी चलावें. दोघे बैसोन भेटावें. तेथे तजवीज करणें तें करा' असें सांगितल्यावरी अवघा जमाव दूर बाणाचे टपियावरि उभे राहून खासा खान एक पालखी, दोघे हुद्देकरी व कृष्णाजीपंत हेजीब असे पुढे चालिले. सैद बंडा म्हणोन पटाईत एक लष्करी समागमें घेतला. पंताजीपंतही बरोबरी आहेत. असे सदरेंत गेले. सदर देखोन खान मनांत जळला की : 'शिवाजी म्हणजे काय ? शाहाजीचा लेक. वजीर यास असा जरी बिछाना नाही ! अशी मोतीलग सदर म्हणजे काय ? पादशाहास असा सामान नाही. येणें जातीचा त्याने सामान मेळविला.' असें बोलतांच पंताजीपंत बोलिला जे 'पादशाही माल पादशहाचे घरीं जाईल. त्याची इतकी तज-वीज काय ? ... ' याच घटनेचें वर्णन प्रो. सरकार पुढीलप्रमाणे करतात :

" Meanwhile Afzalkhan had started from his camp at Par, with a strong escort of more than a thousand musketeers. Gopinath objected to it, saying that such a display of force would scare away Shiwa from the interview and that Khan should, therefore, take with himself only two bodyguards exactly as Shiva had done. So, he left his troops some distance behind and made his way up the hill-path in a Palki accompained by two soldiers and a famous swordsman named Sayyid Bunda, as well as the two Brahman envoys, Gopinath and Krishnaji. Arrived in the tent Afzalkhan angrily remarked on its princely furniture and decorations as far above the proper style of a jagirdar's son. But Gopinath soothed him by saying that all these rich things were meant to be soon sent to the Bijapur palace as the first fruits of Shiva's submissions." (Shivaji)

खानाच्या वधाची हकीकतही सभासदाने जशी दिली आहे तशीच जदुनाथांनी घेतली आहे. अनेक आधार पाहूनच अत्यंत चिकित्सेने त्यांनी

ज्या अर्थी या प्रसंगाचें वर्णन केलें आहे त्या अर्थी सभासदाच्या वर्णनाचें सत्यत्व यांना पूर्णपणें पटलें असलें पाहिजे. प्रत्यक्ष प्रसंग असा घडला : ' खानही उभा राहून पुढे सामोरा येऊन राजियास भेटला. राजियाने भेटी देतांना खानाने राजियाची मुंडी कवटाळून खांकेखाली धरिली. आणि हातीची जमदाड होती तिचें मेण टाकून कुशींत राजियाचे चालविली. तों अंगांत जरीची कुडती होती त्यावरी खरखरली. अंगास लागली नाहीं. हें देखोन राजियांनीं डावे हाताचें वाघनख होतें तें पोटांत चालविलें. खानानें अंगांत झगाच घातला होता. वाघनखाचा मारा करतांच खानाची चरबी बाहेर आली. दुसरा हात उजवे हातचे बिचवियाचा मार चालविला. ऐसे दोन वार करून मुंडी आसडून चौथरियाखाले उडी घालोन निघून गेले...' जदुनाथ सरकार हा प्रसंग पुढीलप्रमाणें वर्णितात.

'...The Khan rose from his seat, advanced a few steps, and opened his arms to receive Shiva in his embrace. The short slim Maratha's head only came up to the shoulders of his opponent. Suddenly Afzal tightened his clasp, and held Shiva's neck fast in his left arm with an iron grip, while with his right hand he drew his long straight-bladed dagger and struck at the side of Shiva. The hidden armour rendered the blow harmless. Shiva groaned agony as he felt himself being strangled. But in a moment he recovered from the surprise, passed his left arm round the khan's waist and tore his bowels open with a blow of the steel claws. Then with the right hand he drove the bichwa into Afzal's side. The wounded man relexed his hold, and Shivaji wrested himself free, jumped down from the platform, and ran towards his men outside......'

हे दोन उतारे एवढ्या विस्ताराने देण्याचा उद्देश हाच होता की या ऐतिहासिक महत्वाच्या प्रसंगाचे वर्णन सभासदाने कसें निर्विकारपणें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलगत.
अनुक्रम 26322 दि: पोहेच
क्रमांक ...... 22/7/64

केलें आहे हें ध्यानांत यावें. तो भावनावश होत नाही, तो इतकेंच नव्हे तर नैतिक समर्थनही करीत नाही, कारण त्याला तशी जरुरीच भासली नाही. सर जदुनाथ सरकारांनीं हें सर्व वर्णन आहे त्या स्वरूपांत मान्य करून अनेक आधारांच्या द्वारा त्या वर्णनाची सत्यता सिद्ध केली आहे. इंग्रज वखारींतील समकालीन पत्रांच्या आधाराने त्यांनीं आपलें मत परिशिष्टांत नोंदविलें आहे. तो सर्व उताराच वाचनीय आहे. (Shivaji : 3rd Edition : Page 72) त्यांतील कांही वाक्यें पुढे देतों.

'No careful student of the sources can deny that Afzal khan intended to arrest or kill Shivaji by treachery at the interview. The absolutely contemporary and impartial English factory record (Rajapur letters, 10 Dec. 1659) tells us that Afzal khan was instructed by his Government to secure Shivaji by 'pretending friendship with him,' as he could not be resisted by armed strength, and the latter learning of his design, made the intended treachery recoil on the Khan's head. This exactly supports the Marathi chronicles on the point that Shivaji's spies learnt from Afzal's officers, about the Khan's plan to arrest him by treachery at the proposed interview...'

'Who struck the first blow at the interview ? The old Maratha chronicles (as distinct from the English-educated 20th century apologists of the national hero) all assert that it was Afzal. These genuine old historians never shrink from charging Shivaji with murder or teachery whenever they know him to be really guilty. They wrote long before Grant Duff's book had roused public indignation against shivaji's alleged murder of an invited guest. — Sabhasad (1694) and Malkare (? 1750) at least cannot be suspected of any design to whitewash this hero's character by falsifying history. In saying that

Afzal struck the first blow they truly record a genuine old tradition and not a modern nationalist invention...'

मोरे-प्रकरण आणि अफजलखान-प्रकरण यांचा एकत्र विचार केला असतां सभासदाची माहिती बरीच यथार्थ असावी असें वाटतें.

या दोन प्रमुख घटनांशिवाय इतर अनेक घटनांची नोंद सभासदाने अगदी यथार्थ करून ठेविली आहे. खजिना, सैन्य, गड यांची त्याने दिलेली माहिती निव्वळ आठवणीवरून दिलेली असणें शक्य नाही. राज्यकारभारांतील त्याचें महत्त्व लक्षांत घेतां त्याने जिजीस उपलब्ध झालेल्या अस्सल कागदपत्रांचा उपयोग करून घेतला असावा असें वाटतें. बेंगरूळहून आल्यावर शिवाजीने बारा मावळें सर केलीं हा उल्लेख महत्त्वाचा आहे. इ. स. १६४४त निघालेल्या विजापूर दरबारच्या एका फर्मानाने ही माहिती सिद्ध झाली आहे. (सरदेसाई : N. H. O. T. M. 98) शिवाजीच्या स्वराज्य स्थापनेचा प्रारंभ कसा झाला याची माहिती या उल्लेखावरून समजते. राज्याभिषेकाचा काळ, दक्षिणेकडील स्वारी, भागानगरीस प्रयाण, शिवाजी-व्यंकोजी भेट इ. अनेक गोष्टींची त्याने करून ठेविलेली नोंद पुढील इतिहासकारांना मार्गदर्शक ठरली आहे.

या महत्त्वपूर्ण उल्लेखाप्रमाणेच **शिवाजी-रामदास** संबंधाचा अनुल्लेखहि अत्यंत सूचक आहे. शिवाजीच्या राष्ट्रनिर्मितीच्या कार्यांत रामदासांनी पहिल्या पासून फार मोठें कार्य केलें आहे ही कल्पना उत्तरकालीन असावी. शेकडों युद्धांपैकीं एखादें युद्ध विस्मृतींत जाणें शक्य आहे. पण वरील घटना वास्तव असती, तर सभासदाच्या आठवणींतून ती पूर्णपणें नष्ट होणें असंभवनीय आहे. शिवचरित्रांत उल्लेख करण्याजोगें महत्त्व या कल्पनेला, त्या काळांत तरी आलेलें नव्हतें. या दोन पुरुषांचें कार्य स्वतंत्रपणें चालू होतें. आपलें **आनंदवनभुवनाचें** स्वप्न साकार करणारा राष्ट्रपुरुष शिवाजीच्या रूपानें दिसतांच रामदासांनी आपला आशीर्वाद त्याला दिला. पण हीहि घटना अगदी शेवटीं शेवटीं घडली. राजकीय महत्त्व प्राप्त होण्याजोगी ही घटना त्या काळांत तरी मानली जात नव्हती हेंच सभासदाने केलेल्या या घटनेच्या अनुल्लेखावरून स्पष्ट दिसतें.

**सभासद बखरींतील उणीवा–**

आतां या बखरींतील कांही उणीवा पाहूं. मुख्य उणीव म्हणजे कांही महत्त्वाच्या घटनांचे उल्लेखच लेखकाने केलेले नाहीत. अन्य पुराव्यावरून या घटना आता सर्वमान्य झाल्या आहेत. पावनखिंडींतील बाजीप्रभूचें दिव्य सभासदाने दिलेलें नाही. खांदेरी बेटावरील आरमारी युद्धाचा उल्लेख नाही. त्याचप्रमाणें शिवाजी-औरंगजेब भेट दिल्लीस झाली असें सभासद म्हणतो, पण तें चूक आहे. दिल्लीहून परत येतांच शिवाजीने मोगलांशीं युद्ध सुरू केलें असें सभासद म्हणतो. पण हें बरोबर नाही. दोन वर्षें शांत राहून नंतरच त्याने पुन्हा कार्याला प्रारंभ केला.

कल्याणच्या खजिन्याची लूट झाली तेव्हा सुभेदाराची सून पकडून आणून शिवाजीला नजराणा म्हणून आबाजी सोनदेवाने पाठविली होती, या घटनेचा उल्लेख सभासद करीत नाही. जदुनाथ सरकार या घटनेचा तळटीपेंत फक्त उल्लेख करतात आणि सरदेसाई या घटनेकडे एक दंतकथा म्हणूनच पाहतात. पण जेधे शकावलींत या घटनेची नोंद आहे. काफीखान या थोर कृत्याबद्दल शिवाजीची स्तुति करतो.

नेताजी पालकर याला शिवाजीने इ. स. १६६० मध्ये पन्हाळगडच्या वेढ्याचें प्रसंगीं नोकरीवरून कमी केलें असें सभासद म्हणतो. पण दुसऱ्या ठिकाणीं इ. स. १६६६ मध्ये नेताजी पालकरच्या कामाचा तो उल्लेख करतो. दिल्लीला प्रयाण करतांना शिवाजीने जी निवडक मंडळी राज्य-रक्षणासाठी मागे ठेविली होती त्यांमध्ये नेताजीचें नांव आहे तेव्हा त्याला इ. स. १६६० मध्ये कामावरून कमी केलें ही माहिती चुकीची ठरते. नेताजी १६६६ च्या जानेवारीपर्यंत सरनोबतपदावर होता हें जदुनाथांनी इंग्रजी अधिकाऱ्यांच्या पत्रावरून सिद्ध केलें आहे. याचा अर्थ असा की, १६६० मधील पन्हाळगडाच्या युद्धांत ही घटना घडली नसून इ. स. १६६६ मध्ये शिवाजीने जेव्हा पन्हाळ्यावर हल्ला केला तेव्हा नेताजी नव्हता. म्हणून त्याला कमी करण्यांत आलें. पन्हाळ्यावरील या दोन स्वाऱ्यांची सभासदाने गल्लत केली आहे.

इतर बखरींप्रमाणें याही बखरीचा एक महत्त्वाचा दोष म्हणजे शिव-चरित्रांतील अनेक घटना कालक्रमानुसार सांगितलेल्या नाहीत. घटनांचा

एकदोन अपवाद वगळल्यास काळ दिलेला नसल्याने कालक्रम लावण्यास या कालक्रमविरहित घटनांचा उपयोग नाही. कांही महत्त्वाच्या घटनांचा क्रम आणि त्या घटना घडल्याचें वर्ष यांचें अवलोकन केल्यास निवेदनांतील क्रमहीनता सहज ध्यांत येईल.

| सभासदाने दिलेला घटनांचा क्रम | वास्तव कालक्रम |
|---|---|
| (कांही महत्त्वाच्या घटना) | |
| ( १ ) शिवजन्म | इ. स. १६३० |
| ( २ ) बारा मावळें काबीज केलीं. | १६४४ |
| ( ३ ) जुन्नर शहर घेतलें | १६५७ |
| ( ४ ) कल्याण भिवंडी | १६५६ |
| ( ५ ) चंद्रराव मोरे प्रकरण | १६५६ |
| ( ६ ) शृंगारपूर घेतलें | १६५६ |
| ( ७ ) शिर्के यांची कन्या आपल्या पुत्रास केली | १६६७ |
| ( ८ ) अफजलखानाचा वध | १६५९ |
| ( ९ ) कल्याणी, कलबुर्गे, आवसें वगैरे भागांत नेताजीने धुमाकूळ घातला. | १६६२ |
| (१०) शास्ताखानाची स्वारी | १६६० |
| (११) शास्ताखानाची शास्त केली | १६६३ |
| (१२) राजा जयसिंगाची स्वारी | १६६५ |
| (१३) शिवाजीचें दिल्लीस प्रयाण | १६६६ |
| (१४) शिवाजीचें आग्र्याहून पलायन | ऑगस्ट १६६६ |
| (१५) तानाजी कोंडाणा सर करतो | १६७० |
| (१६) शिद्दी जोहार | १६६० |
| (१७) नेताजीची बडतर्फी | १६६६ |
| (१८) सुरतेची पहिली लूट | १६६४ |
| (१९) शहाजीचा मृत्यु | १६६४ |
| (२०) शिद्दीशीं युद्ध | १६७४ |
| (२१) कोंकणांत लखम सावंताचा पराभव व बाजी घोरपडे यास मारिलें. | १६६४ |

| | | |
|---|---|---|
| (२२) | बसनूरची स्वारी | १६६५ |
| (२३) | कारंजें लुटलें | १६७० |
| (२४) | सालेरीचें युद्ध | १६७३ |
| (२५) | उमराणीस बेलोलखानाचा पराभव | १६७३ |
| (२६) | प्रतापराव पडला | १६७४ |
| (२७) | हुसेन मायाणाचा पराभव व कोपलचा किल्ला जिंकला. | १६७९ |
| (२८) | हंबीरराव मोगलाईंत धुमाकूळ घालतो | १६७८ |
| (२९) | राज्याभिषेक | १६७४ |
| (३०) | कुतुबशहाशीं सख्य | १६७७ |
| (३१) | व्यंकोजीची भेट | १६७७ |

वरील घटना देतांना मधल्या मधल्या कांही घटना घेतलेल्या नाहीत. तरी पण त्यांचा क्रम मागेपुढे होऊं दिलेला नाही. यावरून सभासदाचा घटनांचा क्रम कालक्रमाला धरून मुळीच नाही हें सहज दिसून येतें. ‘ त्यानंतर ’ ‘ पुढे ’ वगैरे शब्दांनी काळाचा बोध होऊं शकत नाही.

याप्रमाणें सभासद बखरीच्या गुणदोषांचें स्वरूप आपण येथवर पाहिलें. सभासदाने ही बखर महाराष्ट्रापासून दूर, आपत्तीच्या प्रसंगीं आणि मुख्यत: आपल्या स्मृतीवर अवलंबून लिहिली असल्यामुळे कांही उणीवा राहिल्या आहेत. विशेषत: कालक्रमाचा अभाव आणि घटनांचा अनुक्रम न सांभाळणें यासारखे दोष बरेंच खटकतात. पण इतकें असूनही समकालीन व्यक्तीनें लिहिलेली असल्यामुळे आणि सभासदाचें राजदरबारांतील महत्त्व बरेंच असल्यामुळे सर्व बखरींत ऐतिहासिकदृष्टचा अधिक उपयुक्त व विश्वासार्ह म्हणून हीच बखर मान्यता पावली आहे.

**सभासद बखरीचें वाङ्मयीन स्वरूप** — वाङमयीन दृष्टचा प्रस्तुत बखर सामान्यच आहे. शिवाजीराजांनी स्वराज्य स्थापनेचा प्रचंड विक्रम केला. त्यांच्या आयुष्यांतील सर्वच घटना अद्भुतरम्य आहेत. निदान त्या वेळीं इतर मराठे सरदार विजापूरची नोकरी करीत असतांना शिवाजीने हा जो भव्य उद्योग केला त्याने सभासद भारून गेलेला नाही. त्यामुळे त्याच्या

लेखनशैलींत साहित्याचा विलास अल्प दिसतो. इतिहासांतील कांही घटनांची यथातथ्य नोंद करून ठेवण्याचें काम त्याने बजाविलें आहे.

साहित्यशैलीला आवश्यक असे गुण त्याच्या लेखणींत फारसे दिसत नाहीत. प्रसंग आणि घटना यांचें विस्तृत रेखीव वर्णन, प्रसंगाची भव्यता, विशालता, गांभीर्य, वाचकाच्या मनःचक्षूंपुढे उभें करण्याची हातोटी, रम्य कल्पनाविलास, उत्कट रसपूर्ण निवेदन, भाषेचें सौंदर्य हे साहित्यगुण सभासदबखरींत अगदी अल्प प्रमाणांत दिसून येतात. २–३ प्रसंगांचा अपवाद वगळल्यास विशेष महत्त्वाच्या प्रसंगांचें विस्तृत वर्णन करण्याच्या भानगडींत तो पडतच नाही.

शिवाजीसारख्या युगपुरुषाच्या जीवनांत ज्या घटना घडल्या त्यांमध्ये बारा मावळें जिंकून स्वराज्याचा पाया घालणें, अफजलखानाचा वध, पन्हाळगडचा वेढा, शास्ताखानाचें शासन, आग्र्याहून सुटका, सिंहगड प्रकरण, कल्याण व सुरतेची लूट, राज्याभिषेक, आरमाराची निर्मिति, आदि घटना विशेष महत्त्वाच्या आहेत. यांपैकी अफझलखानाचा वध, दिल्लीहून सुटका, राज्याभिषेक या दोनतीन घटनाच सभासदाने थोडचाफार विस्तृत वर्णिल्या आहेत. त्या वर्णनांतहि इतिहासाची नोंद करण्याचीच त्याची दृष्टि आहे. प्रसंगांचें कल्पनानिष्ठ सौंदर्य त्याने मुळीच वर्णिलेलें नाही. वर्णनामध्ये कोठेहि भावनात्मक अनुभूति जाणवत नाही आणि त्यामुळेच शुष्क व नीरस इतिहास निवेदन एवढेंच या बखरीला महत्त्व राहिलें आहे. चिटणीसकृत शिवचरित्र अथवा चित्रगुप्ताची बखर यांतील वर्णनें सभासदापेक्षा कितीतरी रसाळ आणि ठसठशीत आहेत. भाऊसाहेबांच्या बखरीच्या तोडीचें एकहि वर्णन या बखरींत आढळत नाही. युद्धाचें वर्णन करण्याचे अनेक प्रसंग येऊनहि एकदोन ठिकाणींच सभासद विस्तृत आणि शैलीदार वर्णन करतो. अफजलखानाच्या वधाचे व त्यानंतर झालेल्या युद्धाचें वर्णन मात्र त्याने सरस केलें आहे. या प्रसंगीं त्याचें सर्व लेखनकौशल्य प्रकट झालें आहे. अफजलखानाचें एकंदर सामर्थ्य फारच दांडगें असल्यामुळे शिवाजीने त्याला योजनापूर्वक तोंड देण्याचें ठरविलें. सभासदाने या सर्व घटनांचें अगदी बारकाईने वर्णन दिलें आहे.

प्रत्यक्ष भेटीचें व भेटींत घडलेल्या प्रसंगांचें वर्णनहि चांगलें आहे.

शिवाजीची मोतीलग झालरींची सदर पाहून खानाच्या मनाचा जो चडफडाट झाला तोही सभासदाने नोंदवून ठेविला आहे. खानाने भेटीचे प्रसंगीं शिवाजीला कसें वगलेखाली पकडलें, शिवाजीने लागलींच वाघनखें व नंतर विचवा कोणत्या प्रकारें चालविला याचेंहि तपशीलवार वर्णन त्याने दिलें आहे. सय्यद बंडाने केलेले चार वार व शेवटच्या वाराचे वेळीं जिऊ महाल्याने त्याचा हात वरचेवर पट्टयासह कसा तोडला इ. सर्व घटनांचें अगदी सूक्ष्म वर्णन त्याने केलें आहे. या वर्णनामुळे शिवाजी-अफजलखान प्रकरणाची तपशीलवार माहिती मिळून इतिहासलेखनाचें कार्य फार सोपें झालें. नंतर झालेल्या युद्धाचेंहि वर्णन बरें आहे. 'मोठें क्षेत्र जाहालें. राजियाचे लष्करी लोकांनी व मावळे लोकांनी पायउतारा होऊन मारामारी केल्या. हत्ती तोडिले ते जागीं ठार जाहले, कित्येक हत्तींचीं पुच्छें तोडिलीं. कित्येक हत्तींचे दांत तोडिले, कित्येक हत्तींचे पाय तोडिले. तसेच घोडे एकच वारानें जिवे मारिलें. तसेच खानाचे लष्करी कित्येक ठार मारिले. कित्येकांचे पाय तोडून पाडिले, कित्येकांचे दांत उडविले, कित्येकांची डोचकीं फोडलीं, कित्येक मेले. युद्धास आले ते मारून पाडून भुईस रगडिले. तसेच ऊंटें मारिलीं. मारीत असतां रण अपार पडलें. संख्या न करणें. रक्ताच्या नद्या चालल्या रणकंदन जालें...'

मोरोपंत पेशवे, प्रतापराव रामाजी पांगेरा यांनी दिलेरखानाविरुद्ध केलेल्या युद्धांचीं वर्णनेंहि सरस उतरलीं आहेत. राजा जयसिंगाच्या सैन्याचें वर्णनहि बरें केलें आहे. शिवाजीची चिंताग्रस्त मनःस्थितिहि चांगली रेखाटिली आहे. पण लागलीच नेहमीप्रमाणे देवीचा साक्षात्कार वर्णून शिवाजीचें मानवी मोठेपण लेखकाने हिरावून घेतलें आहे.

दिल्ली दरबारांतील भेटीचें वर्णन लेखकाने अगदी थोडक्यांत आटपलें आहे. शिवाजी दरबारांत येतो, त्याची व पादशहाची दृष्टादृष्ट होते; पादशहा 'आवो शिवाजी राजे' या शब्दांनी त्याला बोलतो व त्याची उभे राहण्याची जागा दाखवितो; शिवाजीचा अपमान होतो ; तेथेच शिवाजी रामसिंगाजवळ कुरबूर करतो; ही कुरबूर ऐकून पादशहास शंका येते व तो शिवाजीची डेऱ्यांत रवानगी करतो.

शिवाजीने मिठाईच्या पेटाऱ्यांतून पळून जाण्याची युक्ति काढली. या

घटनेचें तर लेखकाने फक्त २०।२२ ओळींत वर्णन केलें आहे. इतका रोमहर्षक प्रसंग, पण सभासदाने अवघ्या २।४ परिच्छेदांत संपवून टाकला !

वाङमयीनदृष्टचा वरील दोनहि प्रसंगांचें परीक्षण करावयाचें म्हटल्यास असें म्हणावें लागेल की सभासदाने फक्त घटना दिल्या आहेत. आपली भावनात्मक अनुभूति अगर प्रतिक्रिया कोठेच नोंदविलेली नाही. अशा रोमहर्षक प्रसंगवर्णनाचें खरें सौंदर्य त्याच्या घटनात्मक नोंदीमध्ये नसून लेखकाच्या अथवा तत्कालीन समाजाच्या भावनात्मक प्रतिक्रियेच्या कल्पनारम्य वर्णनांत असतें. पण सभासदाचा हेतुच साहित्यनिर्मिति नसल्याने त्याने निव्वळ घटनांची नोंद करून ठेविली आहे.

शिवचरित्रांतील इतकाच आणखी एक रोमहर्षक प्रसंग म्हणजे बाजीप्रभूने पावनखिडींत केलेलें आत्मबलिदान हा होय. पण सभासद या प्रसंगाची नोंदहि करीत नाही.

शिवाजीच्या राज्याभिषेकाचें वर्णन साधारणच आहे. हेंच वर्णन चिटणिसांनी अप्रतिम केलें आहे. सभासदाचे दीडपानी त्रोटक वर्णन कोणीकडे आणि चिटणिसांचें रसभरित १०।१२ पानांचें वर्णन कोणीकडे ! हा प्रसंग फक्त ऐतिहासिक नोंद करून ठेवण्याचा नाही. मराठ्यांचें अंतःकरण उचंबळून आणणारा, भारतीय स्वातंत्र्येतिहासांत सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्याजोगा असा हा अपूर्व प्रसंग सभासदाने अगदीच त्रोटक वर्णिला आहे. गागाभटाची मनीषा, शिवाजीच्या कुळाचा शोध, व्रतबंध, सुवर्ण तक्ताची घडण, रायरीचें 'रायगड' हें नामकरण आणि शेवटीं सप्तमहानद्यांच्या व समुद्राच्या तीर्थोदकांनी झालेला राज्याभिषेक या सर्व घटना अवघ्या दीडपानांत वर्णिल्या आहेत. एकादी यादी करावी त्या पद्धतीने हें सारें वर्णन आलें आहे. वर्णनांत कोठेहि प्रसंगाचें गांभीर्य व त्याचें ऐतिहासिक, राजकीय, सांस्कृतिक महत्त्व यांचें वर्णन नाही. या उलट चिटणिशी वर्णनाचें सौंदर्य पाहण्याजोगें आहे. चिटणीस रायगडावरील मंडपाचें वर्णन करतात. '...... तेथे सिंहासनास सभा करविली. ज्या सभेंत सहस्रावधि मनुष्यें बसावीं त्यांस शीतोष्णबाधा न व्हावी, चित्रविचित्र स्तंभ, अष्टप्रधानांचीं स्थानें, भिंती वगैरे परम रमणीय ऐसें करवून त्यांस उल्लोच व वित्तानें म्हणजे चांदवे चांदण्या सुवर्णमय वस्त्रें किनखाप बदली ऐशा करविल्या. पटल

म्हणजे असे किनखापी करविले. सिंहासनाचें स्थान, तेथे सुवर्णाचें स्तंभचे चार त्यांत चांदवा अमोल्य जरीचा, त्यास मुक्ताफळांचे गेंदाचे घोस, ऐसे बहुत चांगलें सभास्थान करवून सर्व राजमंदिरें यास चित्रें रंग देऊन जागा जागा उत्तम स्थळें केलीं ...... ' नंतर सभामंडपांत निरनिराळ्या मंडळीसाठी बसावयास केलेल्या जागेचें वर्णन केलें आहे. भोजनमंडपाचें भव्य वर्णन त्यानंतर आलें आहे. त्यानंतर राज्यारोहणाच्या संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा कशी राहील याविषयीं जी योजना केली होती तिचें वर्णन आलें आहे. शेवटच्या अभिषेकप्रसंगाचें वर्णन तर अत्यंत भव्य आणि उदात्त असें झालें आहे. चिटणिसांच्या या बखरीशीं साहित्यदृष्टीने सभासदबखरीची तुलनाच करतां येत नाही इतकी ती त्रोटक आणि नीरस आहे.

भाषाविलास आणि निवेदनाचें कौशल्य याही बाबतींत प्रस्तुत बखर अगदीच सामान्य आहे. मधून मधून येणारा एखादा दृष्टान्त अथवा एखादी उपमा या पलीकडे सभासद जात नाही. छोट्या छोट्या वाक्यांचा परिणामकारक उपयोग करून वस्तुवर्णन करण्याचें कौशल्य मात्र त्याच्या ठिकाणीं होतें. शास्ताखानाचें शासन, शंभुमहादेवाचे क्षेत्रीं मालोजीराजांनी तळें बांधून तेथे पाण्याची सोय केली या घटनेचें वर्णन, जुन्नर, अमदानगर आदि ठिकाणांचा पाडाव, अफझलखानाची दरबारांतील प्रतिज्ञा, प्रतापगडावरील युद्ध इ. घटनांच्या वर्णनाची भाषा बरीच परिणामकारक आहे. या वर्णनांतील छोट्या छोट्या वाक्यांनी वर्णनाला गतिमानता आलेली आहे. सभासदाच्या भाषाशैलीचा हा विशेष म्हणतां येईल. अर्थात् ही भाषाशैली भाऊसाहेबांच्या बखरींत अगदी परिणत अवस्थेला गेली आहे.

व्यक्तिवर्णन हा या बखरीचा आणखी एक विशेष होय. शिवाजी, एक शास्ताखान अफझलखान, राजा जयसिंग, दिलेलखान, सूर्यराव आदि व्यक्तींची चित्रें प्रस्तुत बखरींत चांगलीं रेखाटलीं आहेत. त्या त्या व्यक्तीचें स्वभाववैशिष्ट्य एखाद्या लहानशा वाक्याने सभासद मार्मिकतेने व्यक्त करतो. 'नवाब शास्ताखान म्हणजे पादशहाची प्रतिमाच दुसरी' 'शिवाजी म्हणजे काय ? त्यासी जातांच कैद करतो. गडकोट घेऊन फत्ते करतो.' 'खान म्हणजे कलियुगीचा रावणच' हें शास्ताखानाचें वर्णन व त्याचे उन्मत्त उद्गार देऊन खानाची योग्य कल्पना वाचकांना चटकन आणून दिली आहे. अफझलखानाचे

असेंच वर्णन केलें आहे. 'शिवाजी काय ? चढे घोडियानिशी जिवंत कैद करून घेऊन येतो' हे त्याचे उद्‌गार त्याच्या उन्मत्त स्वभावाची कल्पना उत्तम प्रकारें आणून देतात. अफझलखानाचें व शिवाजीचें वर्णन पुढील शब्दांत केलें आहे.' अफझलखान सामान्य नव्हे. केवळ दुर्योधनच जातीने होता. आंगाचा, बळाचाही तैसाच आणि दुष्टबुद्धीनेहि तैसाच. त्यास एकले भीमाने मारला. त्याचप्रमाणें (येथे राजाने) केले. शिवाजी राजाहि भीमच. त्यांनीच अफजल मारिला. हें कर्म मनुष्याचें नव्हे. अवतारीच होता. तरीच हें कर्म केलें...' दिलेलखानाचें वर्णन पाहा. दिलेलखान म्हणजे मोठा बळकट. एका हत्तीचें बळ किंवा जास्तच होईल. आणि हत्ती बराबरी खाणें. दररोज हत्ती खातो तेणेप्रमाणे वजने खाणें. शरीर तरी दुसरा हेडंब राक्षसच...!

अशीं रेखीव व्यक्तिवर्णनें प्रस्तुत बखरींत बरींच आहेत. छोटचा छोटचा वाक्यांच्या गतिमान् शैलींत कांही कांही प्रसंगांचीं वर्णनेंहि परिणामकारक साधलीं आहेत. हाच या बखरीचा वाङमयीन विशेष होय. अन्यथा प्रस्तुत बखर इतिहास म्हणूनच महत्त्वाची आहे. इतर बखरसाहित्याशीं तुलना करतां सभासद बखर सामान्य वाटते हें चिकित्सक टीकाकारांना मान्य व्हावें. बखरींच्या साहित्यगुणांचें मूल्यमापन करतांना भावनात्मक आणि कल्पनारम्य वर्णनें, ओजपूर्ण निवेदन, भाषेचा डौल, प्रसंगांचें रसोत्कट चित्रण, रेखीव व्यक्तिचित्रण आदि ज्या प्रमुख घटकांचा विचार करावा लागतो, त्या बाबतींत सभासद इतर बखरकारांच्या बरोबर येऊं शकत नाही. कांही व्यक्तिरेखा आणि कांही प्रसंगचित्रें त्याने थोडक्यांत पण मार्मिक रेखाटलीं आहेत हें खरें; पण एकंदरींत त्याचें लेखन त्रोटक स्वरूपाचेंच आहे. संयम हा साहित्यगुण महत्त्वाचा असला तरी संयम म्हणजे त्रोटकपणा नव्हे आणि या त्रोटकपणामुळेंच, सभासदबखर ही निव्वळ घटनांची प्रामाणिक नोंद करणारी बखर झाली आहे. राजवाडे यांनी या बखरीबद्दल दिलेला अभिप्राय यथार्थ आहे. ते म्हणतात : 'यद्यपि सभासदी बखर समकालीन लेखकाने लिहिलेली आहे तथापि तींतील शके १५८१ पर्यंतची हकीगत धरसोडीची, त्रोटक, तुटक व कालविपर्यस्त अशी असून, पुढील हकीकत यद्यपि कोठें कोठें जास्त विस्तृत आहे तत्रापि रसभरित नसून प्राय: कोरडी अशी आहे. माफक व त्रोटक उत्तर देणाऱ्या साक्षीदारापासून खटल्यांतील उपांगांची जशी माहिती होणें अशक्य असतें, तद्वतच सभासदी बखरीची गोष्ट आहे.

## शिवाजीचें स्वभावचित्र व त्याची योग्यता

सभासद बखरीवरून शिवाजीच्या व्यक्तित्वासंबंधी व त्याच्या एकंदर धोरणासंबंधी निश्चित अशी कल्पना करतां येते. शिवाजीचें अपूर्व युद्धकौशल्य, असामान्य धैर्य, प्रचंड आत्मविश्वास, संघटनाकौशल्य, समयसूचकता, दूर-दृष्टि, मुत्सद्देगिरी राज्यकारभारकौशल्य, प्रजाहितदक्षता, इ. विविध गुण शिवचरित्रांत प्रकट झाले आहेत. जगांतील अद्वितीय महापुरुषांच्या मालिकेंत शिवाजीची गणना करतां येण्याजोगे त्याचे स्वभावविशेष एका समकालीनाने लिहून ठेविले आहेत हें विशेष लक्षांत ठेवण्याजोगें आहे. व्यक्तीचें मोठेपण तिच्या हयातीनंतर अनेक ग्रंथकार प्रस्थापित करतात. पण हयातींतच मोठेपण प्रस्थापित होण्याचें आणि समकालीन इतिहासकाराने त्या मोठेपणाची नोंद करून ठेवण्याचें भाग्य फार थोड्या व्यक्तींना लाभतें. शिवाजी हा यांपैकी एक महापुरुष आहे. सभासद तर तत्कालीन संकेता-प्रमाणे शिवाजीला श्रीशंभुमहादेवाचा अवतार समजतो. अनेक प्रसंगीं भवानी देवी प्रत्यक्ष भेटून त्याला साहाय्य देते या कल्पनेवर सभासदाचा विश्वास आहे. आजच्या दृष्टिकोनांतून पाहतां ही गोष्ट चिकित्सक इतिहासकारांना मान्य होण्याजोगी नाही हें खरें; पण तत्कालीन रूढ संकेताप्रमाणे शिवाजी हा शंभुमहादेवाचा अवतार हें एकदा मान्य केल्यावर पुढील भवानीदर्शनाची कल्पना पहिल्या कल्पनेशीं सुसंगत मानावी लागते. शिवाजीसारखा कर्तृत्ववान् पुरुष एकांतांतील चिंतनाने कांही निर्णय घेत असला पाहिजे. परिस्थितीचें अचूक ज्ञान असल्यामुळे आणि आपल्या ध्येयावर आणि मार्गावर त्याचा पूर्ण विश्वास असल्यामुळे एकांतामध्ये चिंतनाने घेतलेला निर्णय योग्य ठरण्याची शक्यता असते. गांधीजी यालाच आंतला आवाज (inner voice) म्हणत असावेत. शिवाजी बहुतेक कठीण प्रसंगीं सर्व मंडळींचा प्रथम सल्ला घेऊन नंतर अशा प्रकारे एकांतांत निर्णय घेत असावा. सभासदाने याच घटनेचें भवानीचा साक्षात्कार या कल्पनेने वर्णन केलें असावें. प्रचंड आत्मविश्वास आणि परिस्थितीचें अचूक निदान असल्याशिवाय मात्र वाटेल त्याला हा आंतला आवाज ऐकूं येऊं शकणार नाही.

वयाच्या बाराव्या वर्षीच त्याने आपल्या कार्याची दिशा आखली. महा-राष्ट्रांत त्या वेळीं अनेक मराठे सरदार मुसलमानांची नोकरी करीत होते.

त्यांना नवा मार्ग दाखवून एकेकाला आपल्याकडे खेचणें, सरळमार्गाने तो न आल्यास जरबीने, दहशतीने त्याला आपल्याकडे आणणें अथवा शेवटीं युद्ध वा अन्य मार्गाने त्याचा निकाल लावून महाराष्ट्रांत एक मध्यवर्ती बलवान् असें स्वदेशी राज्य स्थापन करणें हें ध्येय अगदी प्रारंभीं त्याने आपल्यापुढे ठेवलें होतें. त्याच्या प्रारंभींच्या सर्व हालचाली याच दिशेने झाल्या. शहाजीला भेटून आल्याबरोबर बारा मावळें जिंकून तेथील मराठा देशमुखांना त्याने प्रथम नवा मार्ग दाखविला. या त्याच्या कार्यक्रमाला मोरे घराण्याने तीव्र विरोध केला. मोरे स्वतःला चंद्रगुप्त मोर्याच्या घराण्यांतले समजत. म्हणून त्यांचा शिवाजीसारख्या लहानशा जहागीरदाराला विरोध होता. याच विरोधाचा परिणाम शत्रुत्वांत होऊन पुढे शिवाजीने मोऱ्यांचा निकाल लावला. सभासदाला यांत कांही वावगें वाटलें नाही. कारण त्याच्या दृष्टीने शिवाजीचा उद्योग 'देवब्राह्मणांचें रक्षण करण्याकरितां म्लेच्छांचा क्षय करणें' हा असल्याबद्दल त्याची खात्री होती.

पहिल्या झपाटयांत त्याने हा प्रचंड उद्योग उभारला. त्याने विजापूरची पादशाही बिचकून गेली. अफझलखानासारखा बडा मोहरा शिवाजीवर पाठविण्याचा निर्णय घेण्याची पाळी पादशाहीवर आली याचाच अर्थ शिवाजीने घातलेला धुमाकूळ आतां निव्वळ दांडगाईच्या स्वरूपाचा राहिलेला नव्हता. शिवाजीच्या बालवयांतील कांही घटनांविषयी अनेक दंतकथा उपलब्ध आहेत. त्या सर्व जरी बाजूस ठेवल्या तरी त्याने अनेक जहागिरी जिंकून मराठा सरदारांना स्वराज्याची दिशा दाखवून दिली एवढें निश्चित. त्याची दूरदृष्टि आणि ध्येयावरील निष्ठा हे गुण त्याच्या प्रारंभींच्या उद्योगांत प्रकट झालेले दिसून येतात. दादाजी नरसप्रभूला लिहिलेल्या पत्रावरून त्याच्या ध्येयाचें स्पष्ट दर्शन होतें. निव्वळ स्वतःची जहागीर वाढवावी हें त्याचें ध्येय नव्हतें हें या प्रसंगाने मावळच्या सर्व देशमुख देशपांडयांना दिसून आलें.

शिवाजीचें युद्धकौशल्य, त्याची धडाडी, असामान्य धैर्य हे गुण तर सर्वमान्य आहेत. अनेक प्रचंड मोगल सरदारांशीं त्याने मोठया धडाडीने सामना दिला. दिलेलखान, बेलोलखान, अफझलखान, शिद्दी जोहार, यांसारख्या बलाढय सरदारांशीं कधी उघड तर कधी गनिमी काव्याने युद्ध करून त्यांचीं

प्रचंड सैन्यें त्याने नामोहरम केलीं आणि दिल्लीच्या बादशहाच्या मनांत चिंता उत्पन्न केली.

अफझलखान प्रकरण, शास्ताखान प्रकरण आणि दिल्लीची भेट (आग्र्याची भेट) हीं तीन प्रकरणें तर शिवाजीच्या वैयक्तिक सामर्थ्याचीं आत्मविश्वासाचीं, साहसी वृत्तीचीं आणि महान् बुद्धिमत्तेचीं प्रतीकें आहेत. अफझलखानासारख्या प्रचंड सरदाराशीं गांठ आहे हें ओळखून शिवाजीने पहिल्यापासून योजना आखली. आपला वकील खानाकडे हेजिबीस पाठवून त्याने गुप्त माहिती मिळवून घेतली, आणि योग्य त्या सावधगिरीनें तो खानाच्या भेटीस गेला. दोन बुद्धिमान् माणसांच्या डावपेचांत कोण कोणावर मात करतो हें या ठिकाणीं ठरावयाचें होतें. शक्तीने खान शिवाजीला फारच वरचढ होता. पण शिवाजीने सर्व प्रसंग आधीच हेरून खानाचा डाव त्याच्यावरच उलटविला. अत्यंत सावधगिरीने आणि समयसूचकतेने शिवाजीने हें प्राणावरील संकट दूर केलें. सभासदाने शिवाजीच्या सर्व हालचाली अत्यंत बारकाईने नोंदविल्या आहेत. या प्रकरणाने शिवाजीच्या व्यक्तित्वावर फार चांगला प्रकाश पडतो.

शास्ताखान प्रकरणांत त्याची धडाडी आणि साहस हे गुण व्यक्त होतात. स्वतःचा जीव धोक्यांत घालून तो खानाच्या महालांत शिरला. त्याच्या सेनापतींना आणि जवळच्या पराक्रमी पुरुषांना यापेक्षा आणखी कोणतें आवाहन हवें होतें? त्यांनाहि प्राणावर उदार होण्यांत कांहीच वाटत नसे याचें कारण शिवाजी स्वतःच आघाडीवर असे हें होय.

दिल्लीहून (आग्र्याहून) सुटका करून घेण्यांत त्याने विलक्षण बुद्धिमत्ता दाखविली आहे. जगाच्या इतिहासांत जे रोमहर्षक प्रसंग आहेत त्यांपैकीच हा एक आहे. या घटनेने उत्तरेंत शिवाजीची दहशत निर्माण झाली आणि महाराष्ट्रांत स्वराज्यावरील श्रद्धा दृढ झाली.

सैन्य, किल्ले, आरमार यांची पुनर्रचना करण्याचें काम शिवाजीने केलें. सैन्याला विशिष्ट शिस्त घालून दिली. सैन्यांतील अधिकाऱ्यांचा दर्जा ठरवून दिला. नवे किल्ले बांधले, जुने दुरुस्त केले आणि राज्याला बळकटी आणण्याचें महान् कार्य साधलें. शिवाजीने आरमार निर्माण करून मराठ्यांना सागरसत्तेचें महत्त्व पटवून दिलें ही त्याच्या जीवनांतील विशेष

महत्त्वाची गोष्ट समजली जाते. पश्चिम किनारा अंमलाखाली आणण्याची प्रचंड योजना या आरमारनिर्मितीनें साधली.

शिवाजी ज्याप्रमाणे उत्कृष्ट सेनापति होता त्याप्रमाणेच तो प्रजाहितदक्ष राज्यकर्ता होता. त्याला नवी शासनसंस्था निर्माण करावयाची होती. जमिनीची मोजणी करून त्याने साऱ्याचें मान ठरवून दिलें. प्रदेशाची नव्याने लागवड करण्यासाठी जीं कुटुंबें येतील त्यांना 'गुरेंढोरें द्यावीं. बीजास दाणापैका द्यावा. भक्षावयासि दाणेपैका द्यावा. तो ऐवज दोहों चोहों वर्षांनीं आयुर्दाव पाहून उगवून घ्यावा ' अशी योजना त्याने सरकारमार्फत केली होती. जमीनदार, देशमूख व देसाई यांनी प्रजेवर जुलूम करूं नये याची त्याने काळजी घेतली. 'यांणीं साहेबी करून नागवीन म्हटलियाने त्यांचे हातीं नाही. आदिलशाही, निजामशाही राजवटींत हे देशमूख देसाईच प्रजेचे राजे! यांनी वाटेल तसें प्रजेला पिळून काढावें आणि नाममात्र सारा सरकारांत भरावा. हे मिरासदार अशा प्रकारें सर्व पैसा स्वत: खाऊन, गडकोट बांधून निर्धास्तपणें आपली मिरासदारी चालवीत होते. शिवाजीने यांचा पूर्ण बंदोबस्त केला.' त्यास राजियाने देश काबीज करून हुडे वाडे कोट पाडिले. नामांकित कोट जाहला तेथे ठाणें ठेविलें. आणि मिरासदाराचे हातीं नाहीसें ठेविलें...जमीनदारांनीं वाडा बुरजाचा बांधूं नये. घर बांधून रहावें. ऐसा मुलखाचा बंद केला.'

लष्करी अधिकाऱ्यांना अगर किल्लेदारांना जहागिरी देण्यास त्याचा विरोध होता. 'लष्करांत व हशमास व गडास एकंदर मोकाशे महालगांव दरोबस्त देणें नाही. जें देणें तें वरातेनें द्यावें...' मुलखांत साहेबी कारकुनाखेरीज कोणाची नाही. लष्करास व हशमास व गडास देणें तें कारकुनांनीं द्यावें. मोकाशी जाहलियानें रयत अफरा होईल आणि बळावेल. कमाविशीची कैद चालणार नाही. रयत बळावली म्हणजे जागां जागां बंडें होतील. ज्यास मोकासे द्यावे तो व जमीदार एक जाहलियाने बेकैद होतील, म्हणून **मोकाशे कोणास देणेचें नाही.**' शिवाजीचें हें धोरण अतिशय महत्त्वाचें आहे.

लष्करी सत्ता नागरी अधिकारावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करील हा धोका ओळखूनच त्याने ही योजना केली होती. पूर्वीच्या समाजव्यवस्थेंत

अस्तित्वांत असलेली ही जहागीरदारी पद्धत नष्ट करून मध्यवर्ती सत्ता बलवान् करण्याचें धोरण त्याने अंगीकारिलें. यामध्ये जशी प्रजेविषयी आस्था दिसून येते तशीच नवी समाजव्यवस्था आणि राज्यव्यवस्था निर्माण करण्याविषयीची शिवाजीची दूरदृष्टिहि दिसून येते.

आपल्या ध्येयाच्या दृष्टीने त्याने अष्टप्रधानमंडळाची योजना केली. ही घटना राज्याभिषेकानंतरची नसून बऱ्याच पूर्वीपासून शिवाजीने तिची अंमलबजावणी सुरू केली होती. भारतीय शासनसंस्थेचें इतकें परिणत स्वरूप कौटिल्याच्या काळानंतर प्रथमच प्रत्यक्षांत आलेलें दिसतें. अष्ट-प्रधानमंडळाच्या या योजनेवरून शिवाजीची शासनविषयक सूक्ष्मदृष्टि तर दिसून येतेच, पण राष्ट्राचें पुनरुज्जीवन घडवून आणण्याची त्याची व्यापक दृष्टिहि प्रत्ययास येते.

राष्ट्राचें भौतिक आणि मानसिक दास्य नाहीसें करून एक स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याचा त्याचा प्रयत्न होता हें अनेक गोष्टींवरून स्पष्ट होतें. 'राजव्यवहारकोशा'ची निर्मिति ही यांपैकीच एक महत्त्वाची घटना आहे. पारतंत्र्याने होणारी मानसिक अवनति नष्ट करून स्वराष्ट्र, स्वधर्म, स्वसंस्कृति, स्वभाषा यांविषयींचा अभिमान जागृत करणें हें नवराष्ट्र-निर्मितीच्या काळीं अत्यंत महत्त्वाचें असतें. राष्ट्रीय अस्मितेचें पुनरुज्जीवन घडवून आणणाऱ्या ज्या अनेक गोष्टी शिवाजीने केलेल्या दिसतात, त्यांवरून त्याचें हिंदवी स्वराज्याचें ध्येय स्पष्ट दिसून येतें. हिंदवी स्वराज्य हा अंतिम टप्पा होता. पण व्यावहारिक दृष्टीने, दक्षिणेकडील साम्राज्यांची एकजूट करण्याची दूरदृष्टिहि त्याने ठेविली होती. गोवळकोंडयाच्या कुतुबशहाशी त्याने केलेलें सख्य आणि मुधोळचे मालोजी घोरपडे यांना लिहिलेलें पत्र यांवरून त्याचें अंतरंग स्पष्ट दिसून येतें. '...दक्षणचे पादशाहीस पठाण जाला, हे गोष्ट बरी नव्हे! पठाण वळावला म्हणजे एका उपरी एक कुली दक्षिणियांचीं घरें बुडवील, कोण्हास तगों देणार नाही. ऐसें आम्ही समजोन हजरत कुतुबशहा पादशहा यांसी पहिलेपासून रुजुवात राखिली होती.' कुतुबशहाशीं शिवाजीचा जो तह झाला त्याचें स्वरूप पुढीलप्रमाणें होतें. 'आपली पादशाही जितकी वाढवूं ये तितकी नोढविणें, पठाणाची नस्तनाबूद करणें; दक्षणची पादशाही आम्हां दक्षणियांच्या हातीं राहे तें करावें.'

शिवाजीच्या या दक्षिणी धोरणाचा परिणाम नंतरच्या राजकारणावरहि झालेला दिसतो. हैद्राबादच्या पहिल्या असफजहाने मरते वेळीं आपल्या मुलाला जो उपदेश केला त्यामध्ये 'मराठ्यांशीं युद्ध करूं नये; त्यांच्याशीं सलूक करण्यांतच आपलें हित आहे.' या विचारांचा पुनरुच्चार केला आहे.

ग्रँट डफ आदि परकीय इतिहासकारांना शिवाजीच्या राष्ट्रनिर्मितीचें कार्य कधीच समजूं शकलें नाही, आणि म्हणूनच हे इतिहासकार शिवाजीला एक लुटारू समजतात. न्या. रानडयांनी आपल्या 'The Rise of Maratha Power' या ग्रंथांत त्यांचा हा दृष्टिकोन खोडून काढून शिवाजीच्या कार्याचें राष्ट्रीय स्वरूप प्रथम स्पष्ट केलें.

स्वराज्यस्थापनेचा उद्योग करीत असतां त्याने स्वतःच्या प्रजेला वा निरपराध प्रजेला कोठेहि त्रास दिला नाही. उलट, जनतेला त्रास न देण्याबद्दल आपल्या सैन्याला त्याने सक्त ताकीद दिलेली होती. सुरत, कल्याण यांसारखीं व्यापारी शहरें लुटून आपल्या स्वराज्यस्थापनेच्या उद्योगाला त्याने द्रव्य जमा केलें. हें करीत असतांना अनवश्यक हत्या घडणार नाही, स्त्रियांना धक्का पोचणार नाहीं याची त्याने काळजी घेतली होती. सैन्याला त्याने दिलेला हुकूम पाहण्याजोगा आहे. '...परमुलखांत पोरबायका न धरावी. मर्दाना सांपडला तरी धरावा. गाई न धरावी. बईल ओझ्यास मात्र धरावा. ब्राह्मणांस उपद्रव न द्यावा. खंडणी केल्या जागा ओळखियासि ब्राह्मण न घ्यावा. कोणी **बदअंमल न करावा...'**

ग्रँट डफने शिवाजीवर दुसरा जो आरोप केला आहे तोहि असाच चुकीचा आहे. शिवाजी विश्वासघातकी आणि हीन डावपेचांचा आश्रय करणारा होता असें डफ व इतर कांही टीकाकार म्हणतात. अफझलखान प्रकरण आणि मोरे प्रकरण या दोन घटना या बाबतींत पुरावा म्हणून पुढे करण्यांत येतात. अफझलखान प्रकरणाचा मागे विस्तृत विचार करून दाखविलें आहे की शिवाजीने या ठिकाणीं मुळीच विश्वासघातकी वृत्ति दाखविलेली नाही. डावास प्रतिडाव याच शब्दांत या घटनेचें वर्णन करावें लागेल. जदुनाथ सरकारांनी या घटनेचें वर्णन फार सुंदर केलें आहे. ते म्हणतात : 'It was a case of diamond cut diamond.' चंद्रराव मोरे प्रकरणहि मागे सविस्तर मांडलेंच आहे. स्वराज्यस्थापनेच्या प्रयत्नाला विरोध करणाऱ्या

स्वकीयांशीं शिवाजीला कठोरपणाने वागावें लागलें, यापैकीच हा प्रकार आहे. जावळी घेतल्याशिवाय सह्याद्रि प्रदेश ताब्यांत येत नाही, आणि सह्याद्रीवर ताबा मिळविल्याशिवाय कोकण काबीज करतां येत नाही अशी परिस्थिति होती. बरेच दिवस अन्य मार्ग चोखाळून शेवटीं शिवाजीने मोऱ्यांचा निकाल लावला. तत्कालीन लोकमताला यांत कांही वावगें दिसलें नाही असें सभासदाच्या लेखनपद्धतीवरून वाटतें. त्या वेळच्या एका रूढ वाक्प्रयोगावरूनहि हें दिसून येतें. ‘मिळाले बारभाई, बुडाली चंद्रराई’ यांत तत्कालीन लोकमत व्यक्त झालेलें दिसतें. तेव्हा अशा घटना घेऊन शिवाजीला दोष देण्याचें कारण नाही.

शिवाजीच्या पूर्वीची आणि त्याच्या मृत्यूनंतरची महाराष्ट्राची परिस्थिति कोणत्या प्रकारची होती हें डोळ्यांपुढे आणिल्यास त्याच्या कार्याचें महत्त्व ध्यानांत येऊं शकेल. १३ व्या शतकानंतर मुसलमानी साम्राज्याने सारा दक्षिण देश व्यापून टाकिला होता. विजयनगरच्या साम्राज्याचा पराभव झाल्यानंतर तर मुसलमानी सत्तेला प्रतिस्पर्धीच उरला नाही. सर्व मराठे सरदार पादशाही चाकरी करण्यांत धन्यता मानीत होते. स्वराज्याची कल्पनाच त्यांच्या मनाला कधी शिवली नाही. शहाजीने सुद्धा दिल्ली-करांशी शेवटपर्यंत निकराने संग्राम केला. पण तो निजामशाही वांचविण्या-साठी! दादाजी कोंडदेवांनासुद्धा शिवाजीच्या स्वातंत्र्याच्या कल्पना अतिरेकी वाटत. अशा परिस्थितींत एकेक मराठा सरदार आपलासा करून त्याच्या मनांत स्वातंत्र्याची कल्पना रुजवून, थोड्याच दिवसांत विजापूरच्या पादशाहीला त्याने दहशत निर्माण केली ही सामान्य गोष्ट नव्हे. अफजल-खानासारखे बलाढ्य सरदार नामोहरंम करून त्याने आपल्या नांवाचा दरारा सर्वत्र निर्माण केला. स्वराज्यस्थापनेचें त्याचें ध्येय आता त्याच्या लोकांना पटूं लागलें होतें. उत्तर भारतांतील परकीय सत्ता नाहीशी करून एक नवें राष्ट्र निर्माण करण्याचें स्वप्न त्याने बालपणींच पाहिलें आणि आयुष्यभर अविश्रांत श्रम करून तें प्रत्यक्षांत आणिलें हें त्याचें मोठेपण होय.

शिवाजीच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रांत ज्या घटना घडल्या त्यांमुळे तर त्याचें मोठेंपण अधिकच जाणवतें. शिवाजीच्या मृत्यूनंतर औरंगजेब स्वतः

प्रचंड फौजेनिशी दक्षिणेंत येऊन राहिला होता. संभाजीच्या वधानंतर महाराष्ट्राला नेता उरला नाही; कर्त्या माणसांची पिढी यापूर्वीच अस्ताला गेली होती; संभाजीची पत्नी येसूबाई आणि तिचा पुत्र – म्हणजे मराठ्यांचा राजाहि मोगलांच्या हातीं सांपडला होता. अशा प्रसंगीं महाराष्ट्रापासून शेकडों मैल दूर असलेल्या जिंजीसारख्या ठिकाणापर्यंत सर्वत्र युद्ध चालू ठेवून औरंगजेबासारख्या बलाढ्य पादशहाला २६ वर्षेंपर्यंत दक्षिणेंत खिळवून ठेवण्याचें कार्य स्वयंप्रेरणेने मराठा मंडळाने केलें यांतच शिवाजीच्या राष्ट्रनिर्मितीचें रहस्य आहे. औरंगजेबाच्या वैभवसंपन्न कारकीर्दीमुळे भारावून गेलेल्या जदुनाथ सरकारांना मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करण्याची प्रेरणा याच महान् घटनेमुळे झाली. सारांश, शिवाजीच्या पूर्वकालीन आणि उत्तरकालीन महाराष्ट्रीय जीवनाच्या संदर्भांत शिवाजीचें हें राष्ट्र निर्मितीचें कार्य पाहिलें म्हणजे त्याचें खरें रहस्य ध्यानांत येतें.

रामचंद्रपंत अमात्यांनी आज्ञापत्रांत शिवकार्याचें स्वरूप फार सुंदर वर्णिलें आहे. तें वाचल्यानंतर शिवाजीच्या कार्याविषयी आणि ध्येयाविषयी कोणासहि शंका राहण्याचें कारण नाही. एका समकालीनानें केलेलें वर्णन या दृष्टीनें आज्ञापत्र अत्यंत महत्त्वाचें आहे. शिवाजीच्या प्रचंड उद्योगाचें, त्याच्या बुद्धिमत्तेचें, त्याच्या मुत्सद्देगिरीचें वर्णन करून शेवटीं अमात्य म्हणतात : '९६ कुळी मराठ्यांच्या या राष्ट्राला या युगपुरुषाने स्वतंत्र पादशाहीचें वैभव प्राप्त करून दिलें. छत्रपति हा किताब धारण करून आणि राज्याभिषेक समारंभ घडवून आणून आपल्या कार्याला त्याने राष्ट्र-कार्याचें महान् स्वरूप प्राप्त करून दिलें. आपला धर्म, देव आणि गोब्राह्मण यांच्या प्रतिपालनासाठी हें महान् कार्य करून त्याने एक धर्मराज्यच निर्माण केलें. त्याच्या राज्यांत चोऱ्या, लूटमार, अन्याय यांचा जवळ जवळ लोप झाला. दिल्लीपतीला नामोहरम करून एक महान् घटना त्याने घडवून आणिली. शिवाजीच्या हातून ईश्वरानेच हें कार्य घडवून आणिलें असें म्हणावें लागतें.' (सारांश रूपाने) सर जदुनाथ सरकार हे शिवचरित्राचे कांहीसे पूर्वग्रहदूषित टीकाकार होत. त्यांच्याच शब्दांत शिवकार्याचें अंतरंग व्यक्त करून ही प्रस्तावना आटोपती घेतों. आपल्या शिवाजी अॅन्ड हिज् टाइम्स' या ग्रंथाचा समारोप करतांना ते म्हणतात : 'He (Shiwaji)

has proved by his example that the Hindu race can build a nation, found a state, defeat enemies; they can conduct their own defence; they can protect and promote literature and art, commerce and industry; they can maintain navies and ocean trading fleets of their own, and conduct naval battles on equal terms with foreigners. He taught the modern Hindus to rise to the full stature of their growth.

He has proved that the Hindu race can still produce not only Jamadars (non-commissioned officers) and chitnises(clerks)but also rulers of men and even a King of Kings (Chhatrapati.) The Emperor Jahangir cut the **Akshay Bat** tree of Allahabad down to its roots and hammered a red hot iron cauldron on to its stump. He flattered himself that he had killed it. But lo! Within a year the tree began to grow again and pushed the heavy obstruction to its growth aside!

Shawaji has shown that the tree of Hinduism is not really dead, that it can rise from beneath the seemingly crushing load of centuries of political bondage, exclusion from the administration and legal repression; it can put forth new leaves and branches; it can again lift up its head to the skies.'

## कांही संदर्भ-ग्रंथ

(१) मराठा रियासत : प्रो. सरदेसाई
(२) शिवाजी दि ग्रेट : डॉ. बाळकृष्ण
(३) शिवाजी अॅन्ड हिज् टाईम : डॉ. जदुनाथ सरकार
(४) सभासद बखरीचें इंग्रजी भाषांतर : डॉ. सेन
(५) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें–प्रस्तावना खंड : राजवाडे
(६) मार्टिन्स डायरी (सरदेसाईकृत भाषांतर)
(७) राजारामचरितम् : केशव पंडित (संपादक वा. सी. बेंद्रे)
(८) छत्रपति शिवाजी महाराज : दि. वा. काळे
(९) पुण्यश्लोक छत्रपति शिवाजी : बाळशास्त्री हरदास
(१०) शिवाजी सोव्हिनूर
(११) आज्ञापत्र
(१२) शिवचरित्र संशोधन वृत्त, राजशक २७९ व २८३ : ग. ह. खरे
(१३) हाउस ऑफ शिवाजी
(१४) सभासद बखर : संपादक रा. ब. का. ना. साने
(१५) मराठी बखर : हेरवाडकर
(१६) छत्रपति संभाजी महाराज : वा. सी. बेंद्रे

# कृष्णाजी अनंत सभासद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................. वि: ..................
नोंद दि: ..................

कृत

# श्रीशिवप्रभु-चरित्र

॥ श्री ॥

श्रीमंत महाराज राजश्री राजाराम[1] साहेब छत्रपती,
साहेबांचे सेवेशीं.

## १. शिवचरित्र लिहिण्याविषयीं राजारामाची आज्ञा :

विनंती सेवक कृष्णाजी अनंत सभासद[2] कृतानेक विज्ञापना ऐसी जे. साहेबीं[3] मेहरबानी करून सेवकास पुसिलें कीं, 'आपले पिते थोरले राजे यांणीं इतका पराक्रम केला व चार[4] पातशाहींशीं दावा लाविला, ऐसा पराक्रम केला. ऐसे असतां औरंगजेब येऊन [त्यानें] किल्लोकिल्लीं अनर्थ मांडिला.[5] याचा अर्थ काय? तुम्ही पुरातन, राज्यांतील माहीत [गार] लोक आहां, तरि इस्तकबिल[6] पासून चरित्र लेहून देणें.' म्हणोन आज्ञा केली. त्याजवरून वर्तमान ऐसी जे--

---

१. शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर मराठेशाहीवर फार मोठीं संकटें कोसळलीं. संभाजीची कारकीर्द त्याच्या उग्र प्रकृतीमुळे व मंत्र्याच्या कारस्थानांमुळें महाराष्ट्राला लाभदायक झाली नाही. औरंगजेबाच्या तुरुंगांत त्याचा जेव्हा वध करण्यांत आला तेव्हा त्याचा धाकटा भाऊ राजाराम हा १९ वर्षांचा होता. मोगलांच्या हल्ल्यामुळे त्याला रायगड सोडून दक्षिणेस जिंजीकडे पळून जावें लागलें. प्रल्हाद निराजी, खंडो बल्लाळ, रामचंद्रपंत अमात्य यांसारख्या विश्वासू आणि धडाडीच्या सहकाऱ्यांच्या मदतीने त्याने याही परिस्थितींतून मराठेशाहीला पुन्हा ऊर्जितावस्थेस आणिलें.

या काळांत औरंगजेब स्वत: दक्षिणेंत येऊन राहिला होता. पण मराठ्यांचें राज्य नष्ट करण्याचा आनंद त्याला शेवटपर्यंत लाभला नाही.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वत: औरंगजेबाने दक्षिणेकडील स्वारीचें नेतृत्व केलें. ५ लक्ष फौजेनिशीं तो दक्षिण देशावर चालून आला. त्याची ही स्वारी १६८१ ते १७०७ पर्यंत २६ वर्षे चालू होती. मोगलांची एक पिढी या कामीं खर्ची पडली. संभाजी कैदेंत असतांना त्याची पत्नी येसूबाई हिने मोठ्या धीराने आणि मनमिळाऊपणाने उर्वरित मराठे सरदारांना एकत्र आणिलें. बालराजे शिवाजी ( शाहू ) यांना राज्यावर बसवून निभाव लागणार नाही हें ओळखून स्वार्थत्यागी वृत्तीने राजारामास छत्रपतिपद देण्याची तिने आपल्या सरदारांना सूचना केली. तिने स्वत: पुत्रासह रायगडींच राहावें असें ठरविलें. रामचंद्रपंत अमात्य, प्रल्हाद निराजी आदि सरदारांच्यासह राजाराम रायगडाहून बाहेर पडला. महाराष्ट्रांत राहूनच औरंजेबाच्या सैन्याशीं गनिमी काव्याने युद्ध चालू ठेवावें असा त्यांचा विचार होता. पण मोगली सैन्याच्या वाढत्या सामर्थ्यामुळे त्यांना हा विचार टाकावा लागला. राजगड, रोहिडा, तोरणा, कल्याण, माहुली वगैरे ठिकाणें बादशाही सैन्याने हस्तगत केलीं. इतिकदखानाने रायगडला वेढा दिलेलाच होता. राजाराम प्रतापगडावर होता. तिकडेहि मोगली फौजा चालून आल्या. प्रतापगडाहून राजाराम पन्हाळ्याला गेला. मोगलांना हें कळतांच त्यांचा मोर्चा पन्हाळ्याकडे वळला. आतां मात्र निभाव लागणें शक्य नव्हतें. रामचंद्रपंताने विशाळगडावर राहून महाराष्ट्रांतील हालचालींची व्यवस्था पाहावी आणि राजारामानें जिंजीस जावें असें ठरलें. गुप्तवेषाने अनेक हालअपेष्टांना तोंड देत देत राजाराम १६८९ च्या आक्टोबरमध्ये वेलोरला येऊन पोंचला. वेलोरच्या आग्नेयीस ५० मैलांवर जिंजी आहे. सेनापति पानसंबळ, प्रल्हाद निराजी, नीलकंठ मोरेश्वर, नीलकंठ कृष्ण, खंडो बल्लाळ, कृष्णाजी अनंत सभासद आदि मंडळी त्याच्याबरोबर होती. संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांनी महाराष्ट्रांत फिरते राहून मोगली सैन्याच्या पिछाडीस धुमाकूळ घालावा असें ठरलें. इकडे रायगडचा किल्लेदार सूर्याजी पिसाळ खानाला फितूर झाला आणि त्याने येसूबाई व बालराजे शिवाजी यांना मोगलांच्या स्वाधीन

केलें. (रायगडचा किल्लेदार सूर्याजी पिसाळ याने फितुरीने किल्ला शत्रूच्या स्वाधीन केला हें मत नव्या संशोधनाअंतीं चुकीचें ठरलें आहे. वेढा पडला तेव्हा चंगोजी कातकर हा किल्लेदार होता. शेवटपर्यंत किल्ला लढवून शेवटीं नाइलाजाने, राजघराण्याचें संरक्षण करण्याचें मोगलांकडून आश्वासन घेऊन त्याने किल्ला सोडला.)

सात वर्षेपर्यंत जिंजीचा किल्ला जिंकण्यांत मोगलांना यश आलें नाही. औरंगजेबानें झुल्फिकारखानास किल्ला जिंकण्याविषयी सारखी निकड लाविली होती. स्वतःचा पुत्र कामबक्ष व झुल्फिकारखानाचा बाप वजीर आसदखान यांच्याबरोबर भलें मोठें सैन्य देऊन त्या दोघांना त्याने जिंजी-कडे पाठविलें. शेवटीं १६९८ च्या सुरवातीस किल्ला सर करण्यांत त्यांना यश आलें. पण राजाराम मात्र त्यांच्या हातीं लागला नाही. खानानेच त्याला गुप्तपणें बाहेर पडण्याची संधि दिली (सरदेसाई). राजारामाने दक्षिणेंत परत येऊन साताऱ्यास मराठ्यांची राजधानी आणिली व पुन्हा मोगली फौजेशीं झगडा सुरू केला. १६९४ च्या सुमारास जिंजी येथे राजारामाने कृष्णाजी अनंत सभासद यास प्रस्तुत बखर लिहिण्याची आज्ञा केली.

२. शिवचरित्रावर ज्या बखरी आहेत त्यांमध्ये कृष्णाजी अनंत सभासदाची ही बखर जवळ जवळ समकालीन आहे. कृष्णाजी अनंत सभासद हा राजारामाबरोबर जिंजीस आला होता. शिवाजीच्या कार-कीर्दीतहि याने अधिकाराची जागा भूषविली असल्याने राजाराम त्याला “तुम्ही पुरातन, राज्यांतील माहित (गार) लोक आहां” असें म्हणतो. हा शिवाजीच्या वेळेस एका प्रांताचा ब्राह्मण सुभेदार होता. पुढे राजा-रामाचे काळीं त्याचें महत्त्व बरेंच वाढलें. प्रल्हाद निराजीचा हा हस्तक (साहाय्यक अधिकारी) होता. जिंजी येथे राजारामाच्या दरबारीं सभा-सदाचें बरेंच वजन होतें. पांडिचरीचा फ्रेंच गव्हर्नर त्याचा “The second Minister and the third personage in the Government” असा उल्लेख करतो. फ्रेंचांनीं एका प्रसंगीं कृष्णाजी अनंताचा राग ओढवून घेतला होता. त्याला खूष करण्यासाठी “२०० पागोडा रोख व चाळीस पंनास पागोडा किंमतीचें कापड नजर करून आम्ही त्याची मर्जी प्रसन्न करून घेतली.” (मार्टिनची रोजनिशी : भाषांतर सरदेसाई)

केशव पंडिताने लिहिलेल्या '**राजारामचरितम्**' या काव्यग्रंथांत सभासदाचा '**महामति**' असा उल्लेख आहे. सभासदाचें घराणें नंतर ताराबाईबरोबर कोल्हापुरास आलें. त्याचे वंशज नारो कृष्ण सभासद कोल्हापुरीं खाजगी कडील कारकून आहेत, एवढी माहिती श्री. साने यांनी दिली आहे. मार्टिनची रोजनिशी व केशव पंडिताचें राजाराम चरित्र या नव्याने उपलब्ध झालेल्या ग्रंथांवरून सभासदाची माहिती मिळते. ३ राजाराम महाराजांनी.

४. **आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही आणि मोंगलाई या चार शाह्या-**

**इदिलशाही, कुतुबशाही व निजामशाही**–हसनगंगू ऊर्फ अलाउद्दीन याने इ. स. १३४७ मध्ये बहामनी राज्याची स्थापना केली. या राज्याचा विस्तार मुख्यत: महाराष्ट्रास व्यापून होता. उत्तरेस गोदावरी नदी, पश्चिमेस अरबी समुद्र, दक्षिणेस कृष्णा नदी आणि पूर्वेस तेलंगणाचें राज्य व गोंडवन. एक विजयनगरचें राज्य सोडलें तर संपत्तीने व ऐश्वर्याने बहामनी राज्याच्या तोडीचें त्या वेळीं दक्षिणेंत एकही राज्य नव्हतें. लहान लहान हिंदु राज्यें जिंकून बहामनी राज्याचा विस्तार झाला. महंमूद गावानाच्या कारकिर्दीपर्यंत या राज्याच्या चार तर्फा किंवा सुभे होते. परंतु गावानानें विजापूर, दौलताबाद, हसनाबाद, जुन्नर, राजमहेंद्री, वरंगल, दाविलगड व माहूर अशा आठ तर्फा केल्या. बहामनी राजे राज्यविस्तार करीत, परंतु राज्यांत व्यवस्था ठेवण्याकडे त्यांचें लक्ष नसल्यानें राजे दुर्बल होतांच सुभेदार बलिष्ठ झाले. गावानाच्या सुव्यवस्थेमुळे त्याच्या मृत्यूपर्यंत ते स्वतंत्र होऊं शकले नाहीत. इ. स. १५०० च्या आगेमागे या राज्याचीं पांच शकलें झालीं तीं येणेंप्रमाणें–विजापूरची आदिलशाही (इदलशाही), गोवळकोंड्याची कुतुबशाही, वऱ्हाडची इमादशाही, अहमदनगरची निजामशाही आणि बिदरची बरीदशाही.

आदिलशाही घराण्याचा संस्थापक यूसुफ आदिलखान हा बहामनी राज्याचा कारभारी ख्वाजाजहान गावान याचा परममित्र. प्रथम याची नेमणूक दौलताबादला झाली; परंतु गावानाच्या मृत्यूनंतर त्याची विजापूरला नेमणूक झाली. इ. स. १४८९ मध्ये स्वतंत्र होऊन याने राजचिन्हें

धारण केलीं. हें घराणें इ. स. १६८६ पर्यंत म्हणजे जवळ जवळ दोन शतकें टिकलें. इ. स. १६५९ मध्ये शिवाजीवर मोहीम पाठवून समोरासमोर लढण्याचा प्रसंग येईपर्यंत आदिलशाही राजांचा सर्व काळ सत्तावर्धनांतच गेला. आरंभीं बेदर प्रभृति सरदारांशीं लढावें लागलें तें मूळ स्वतंत्र राज्य स्थापन करण्यासाठीच. निजामशाहीशीं सुरू झालेला लढा राज्याची मर्यादा वाढविण्यासाठीच होता. दक्षिणेंत विजयनगरच्या मुलुखावर आदिलशाही राजांना चांगला हात मारतां आला. मराठ्यांच्या उदयकालीं, प्रारंभीं शहाजीसारख्या बलिष्ठ मराठा सरदाराकडून दक्षिणेंत राज्यविस्तार करण्याच्या कामीं मदतच होत गेली. आदिलशाहीचा ऱ्हास झाला तो अखेरच्या अवघ्या पाव शतकांतच. आदिलशाहीचीं पावणे दोन शतकें वर्धिष्णु स्थितींत गेल्यामुळे व या कालांत जे राजे लाभले तेहि गुणग्राहकच निघाल्यामुळे तिचें वैभव अपरंपार वाढलें. आदिलशाहींत जीं कांहीं ठळक ठळक शिल्पकामें झालीं त्यांच्या यादीकडे नुसती नजर फेकली तरी आदिलशाहींतील संपत्तीची व कलाकौशल्याच्या कामीं तिचा कसा विनियोग झाला याची कल्पना येऊं शकते. इब्राहीम मुहंमद आणि दुसरा अली यांच्या कारकीर्दींत विजापुरांत सोन्याचा धूर निघत असे. दुसऱ्या अली आदिलशहाच्या कारकीर्दींतच आदिलशाहीच्या अवनतीस सुरुवात झाली. आणि पुढच्या शहाच्या आमदानींत ती रसातळाला गेली.

मलिक महंमद हा अहमदनगरच्या निजामशाही घराण्याचा मूळ पुरुष. याचा आजा बहिरंभट नांवाचा ब्राह्मण असून तो गोदेच्या उत्तरेस वऱ्हाडांतील पाथरी नांवाच्या शहराचा देशपांडे होता. दुर्गादेवीच्या दुष्काळांत तिमाजी नांवाच्या आपल्या मुलास घेऊन तो विजयनगरकडे गेला. बहमनी सुलतान अहमदशाह वली याच्या शिपायांनी विजयनगरच्या स्वारींत तिमाजीस कैद करून सुलतानाकडे आणलें. सुलतानाने त्याला मुसलमानी धर्माची दीक्षा दिली. खाजाजहान याच्या शिफारसीवरून सुलतान महंमुदाने त्यास मोठ्या योग्यतेस चढविलें, व निजाम-उल्मुल्क ही पदवी देऊन तेलंगण सुभ्यावर त्याची नेमणूक केली. परंतु तिकडे स्वत: न जातां त्यानें आपला मुलगा मलिक अहंमद याला पाठवून खाजाजहानाविरुद्ध कारस्थान रचून सुलतानाच्या हुकमाने त्याचा वध करवून तो स्वत: कारभारी बनला.

महंमूदशाह सुलतानाच्या कारकीर्दीत निजामउल्मुल्कने आपल्या अगोदरच मोठ्या बनलेल्या जहागिरींत बीड व इतर जिल्ह्यांची भर टाकली आणि तेलंगणांतून मुलाला बोलावून घेऊन त्याने त्याची दौलताबाद सुभ्यावर नेमणूक केली. या निजामउल्मुल्काचा वध झाल्यावर त्याचा मुलगा मलिक अहमद बंड करून स्वतंत्र झाला व त्यानें स्वतःस निजामशाह अशी पदवी लावून घेतली. तीच पुढे अहमदनगरच्या सर्व राजांनी लावून घेतल्यामुळें त्या राज्यास निजामशाही असें नांव पडलें. अहमदने अहमदनगर वसवून तेथे आपली राजधानी केली. निजामशाही राज्य महाराष्ट्रांत साधारणपणें १५० वर्षें होतें. त्याचा बहुतेक कारभार मराठ्यांच्याच हातीं होता. आदिलशाहींत हिंदूंचा जितका छळ झाला किंवा त्यांना जितकें हलकें लेखण्यांत आलें तितकें निजामशाहींत झालें नाही.

कुतुबशाही हें राज्य म्हणजे प्राचीन वरंगलचें काकतीयांचेंच राज्य. तें इ. स. १४२३ मध्ये अहमदशाह बहामनी याने बुडविलें. या राज्याचा विस्तार गोदा व कृष्णा नद्यांच्या प्रदेशांत होता. पूर्वेस बंगालचा उपसागर आणि पश्चिमेस बरीदी राज्य या त्याच्या सीमा होत्या. कुत्बुद्दीन (कुत्ब उल मुल्क) या इराणांत जन्मलेल्या एका तुर्की सरदाराला इकडे आल्यावर महंमूद बहामनीने प्रथम आश्रय दिला आणि नंतर महंमूद गावानने त्यास या प्रदेशाचा सुभेदार नेमलें. इ. स. १४९३ मध्ये जामकोंडयाचा किल्ला घेण्यास पाठविलें असतां हा मरण पावला. त्याच्या पश्चात् त्याच्या पदव्या व अधिकार त्याचा मुलगा सुलतान कुली यास मिळाले आणि शिवाय गोवळकोंड्याची जागीरही मिळाली. गावानला अन्यायाने फासावर चढविल्यानंतर त्याने बेदरचा संबंध तोडला. इ. स. १५१८ मध्ये स्वतंत्र होऊन त्याने सुलतान कुली कुत्बशहा ही पदवी घेतली व तो कुत्बशाहीचा संस्थापक झाला. गोवळकोंडा येथे राजधानी ठेवून त्याने बराच राज्यविस्तार केला. या घराण्याने १७५ वर्षें राज्य केलें. त्यांत सहा सुलतान झाले. त्यांनी बांधलेल्या इमारती अद्यापि शिल्लक असून या घराण्यांतील शहांच्या बहुतेक कबरी गोवळकोंड्यांत आहेत.

५. औरंगजेबाच्या सैन्याने शिवाजीच्या मृत्यूनंतर दक्षिणेंत घातलेल्या धुमाकुळीचा उल्लेख मागे आला आहे. टीप १ पाहा. ६. प्रारंभापासून.

२. **मालोजी राजे** :

राजियांचे बाप थोरले महाराज राजश्री शाहाजी राजे, यांचे बाप म्हणजे राजियांचे आजे राजश्री मालोजी राजे व विठोजी राजे भोंसले, हे निजामशाही वजीर[१] दौलता[२] करून तोलदारीनें[३] होते. त्यांची निष्ठा श्रीशंभुमहादेव[४] यांचे भजनीं बहूत होती. त्यास शिखरीं यात्रा चैत्रमासीं भरते. पांच सात लक्ष माणसें मिळतात. पाणियाचें बहूत संकट. उदक नाहीं. तीन कोशांवरून उदक आणतात. लोक श्रमी बहूत होतात. म्हणून राजश्री मालोजीराजे यांनीं तेथें जागा पाहून तळें एक थोर बांधिलें. सर्वत्र लोकांस उदक कार्यास येई असें केलें. अपरमित द्रव्य खर्च केलें. तळें संपूर्ण उदकानें भरलें. हें करितांच रात्रौ श्रीशंभुमहादेव स्वप्नास येऊन, प्रसन्न होऊन बोलिला जे,[५] 'तुझ्या वंशांत आपण अवतार घेऊं. देवब्राह्मणांचें संरक्षण करून म्लेंछांचा क्षय करतों. दक्षण देशाचें राज्य देतों.' म्हणोन त्रिवार वचन करून वर दिला. त्याजवरून राजे (यांस) बहुत संतोष होऊन (त्यांनीं) दानधर्म बहूत केला.

१. वजीर हा किताब निव्वळ मुख्य प्रधानालाच लावतात असें नाही. एखाद्या अधिकाऱ्याला, सरदारालाहि तो किताब लावतात. २. जहागीर ३. मोठ्या प्रतिष्ठेने ४. हें भोसल्यांचें पूज्य दैवत. सातारा जिल्ह्यांत **माण** नांवाचा तालुका आहे. या तालुक्यांत **शिखर-शिंगणापूर** हें ठिकाण आहे. येथे शंभुमहादेव हें दैवत आहे. एका डोंगराच्या पठारावर पुन्हा एका शिखरासारख्या कड्यावर हें देऊळ आहे. म्हणून त्याला शिखरशिंगणापूर म्हणतात. हें ठिकाण सिंधण यादवाने वसविलें. ( १३ वें शतक) ५. कीं.

३. **शिवाजी महाराजांचा जन्म** :

पुढें राजश्री मालोजी राजे यांच्या पोटीं राजश्री शाहाजीराजे[१] (व) राजश्री सरफजी[१] राजे हे दोघे पुत्र जाहाले. दोघांनीं पातशाहीमध्यें दौलता केल्या. दौलत करीत असतां निजामशाही[२] **बुडाली.**

यावरि शाहाजी राजे इदलशाही[३] वजीर जाले. महाराज (हा) किताब दिला. दहाबारा हजार फौज चालू लागली. शाहाजी राजियासी दोघी स्त्रिया. प्रथम स्त्री जिजाई आऊ.[४] दुसरी स्त्री तुकाई आऊ.[५] तिचे पोटीं एकोजी[६] राजे पुत्र जाले. जिजाई आऊ तिचे पोटीं राजश्री शिवाजी राजे पुत्र होतांच[७] श्रीशंभुमहादेव जागृतीं येऊन स्वप्न जालें कीं, 'आपणच अवतरलों आहें. पुढें बहूत ख्यात करणें आहे. बारा वर्षेंपर्यंत[८] तुम्हीं आपले जवळ ठेवावें. पुढें न ठेवणें. जातील तिकडे जाऊं देणें. आटोप न करणें.' ऐशी जागृति जाली. शाहाजीराजे कर्नाटक बेंगरूळ[९] येथें होते.त्यापाशीं कारभारी राजश्री नारोपंत दीक्षित होते, त्यांच्या पोटीं रघुनाथपंत व जनार्दनपंत हे दोघे पुत्र बहूत शाहाणे जाले. शाहाजी राजे यांसि दौलते मध्यें पुणें परगणा होता. तेथें दादाजी कोंडदेव[१०] शाहाणा, चौकस ठेविला होता। तो बेंगरुळास महाराजांचे भेटीस गेला, त्याबरोबर राजेश्री शिवाजी राजे व जिजाबाई आऊ ऐशीं गेलीं. तेसमयीं राजियास वर्षें बारा[११] होतीं. बराबर शामराव निळकंठ म्हणून पेशवे करून दिले व बाळकृष्णपंत,[१२] नारोपंत दीक्षिताचे चुलतभाऊ, मजुमदार[१३] दिले व सोनोपंत डबीर[१४] व रघुनाथ बल्लाळ सबनीस,[१५] ऐसे देऊन दादाजीपंतास व राजे यांसि पुण्यास रवाना केलें. ते पुण्यास आले.

---

१. निजामशाहींतील 'शहाशरीफ' नांवाच्या एका फकीराच्या नांवावरून मालोजीच्या पुत्रांचीं शहाजी व सरफजी हीं नांवें ठेविलीं. पण या नांवांचें मूळ सिंह व शरभ या संस्कृत शब्दांत आहे असें राजवाडे म्हणतात. विशिष्ट दृष्टिकोनामुळे राजवाड्यांनी अनेक शब्दांचें मूळ संस्कृतपर्यंत नेऊन भिडविलें आहे. २. दक्षिणेंतील पांच शाह्यांपैकी अहमदनगरची निजामशाही इ. स. १६३६ मध्ये बुडाली. अकबराचा पुत्र मुराद याने यापूर्वी निजामशाहीवर केलेली स्वारी विफल ठरली. खुद्द चांदबिबी किल्ल्याच्या रक्षणार्थ शस्त्रसज्ज होऊन उभी राहिली. पुढे दरबारी राजकारणांत तिचा खून झाला. इ. स. १६०० मध्ये अहमदनगर मोगलांच्या

प्रथम हातीं पडलें. मोगलांचें पुढे दुर्लक्ष झालें. मलिक अंबर नांवाच्या सरदाराने पुन्हा निजामशाहीला ऊर्जितावस्था आणिली. दौलताबाद येथे त्याने राजधानी नेऊन मोगलांशीं युद्ध सुरू केलें. शहाजीनेंहि या कामीं फार मोठी कामगिरी केली. शेवटीं शेवटीं तर निजामशाहीचा कर्ताकरविता शहाजीच होता. मलिक अंबरच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा फत्तेखान याने निजाम मूर्तजा याचा खून करून हुसेन नांवाच्या मुलास पुढे करून राज्य बळकाविलें. पण मोगलांपुढे त्याचें कांही न चालून तो महाबत-खानाला मूर्तजासह शरण गेला. (१६३३) मोगलांनी फितूर फत्तेखानास शहाजीची जहागीर दिली. पुढील ३ वर्षें शहाजीनें विजापूरच्या आदिल-शहाच्या मदतीने निजामशाहीचें संरक्षण करण्याचा निकराचा प्रयत्न केला. पण इ. स. १६३६ मध्ये आदिलशहा मोगलांना सामील झाला. शहाजीने मूर्तजा नामक राजघराण्यांतील एका मुलास हाताशीं धरून निजामशाही वांचविण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत त्याला यश आलें नाही. शेवटीं इ. स. १६३६ मध्ये शहाजहानला निजामशाही नष्ट करण्यांत यश आलें.

३. विजापूरची आदिलशाही ( वरील पांच शाह्यांपैकीं एक ) निजाम-शाहीच्या विनाशानंतर शहाजी विजापूरला येऊन मिळाला. ४. जिजाबाई ही निजामशाहींतील प्रख्यात सरदार लखूजी जाधवराव यांची कन्या. हा सर्व काळ शहाजीच्या जीवनांत अत्यंत धामधुमीचा गेला. इ. स. १६३० मध्ये गरोदर जिजाबाईला त्याने शिवनेरी येथे आणून ठेविलें. पण निजाम-शाहीच्या बचावार्थ चाललेल्या युद्धामुळे त्याला स्वतःला तेथे राहणें शक्य झालें नाहीं. शहाजीचा वडील पुत्र संभाजी याचा विवाह याच वेळीं झाला. त्याची पत्नी मात्र शिवनेरीस जिजाबाईच्या संगतींत होती. ५. ही मोहित्यांची मुलगी; व्यंकोजीची आई. ६. शहाजीने आपला तिसरा पुत्र **व्यंकोजी** यास आपली कर्नाटकांतील जहागीर दिली. शिवाजी व व्यंकोजी यांच्या संबंधावर प्रकाश टाकणारा मजकूर ११३ व्या परिच्छेदांत व त्यापुढें आला आहे. ७. शिवजन्माच्या तिथीबद्दल बराच मतभेद आहे. पूर्वी, श. १५४९ वैशाख शुद्ध द्वितीया—ता. ६ एप्रिल १६२७ ही तिथि मानली जात असे. पण जेधे शकावलीच्या आधारें फाल्गुन वद्य तृतीया शक १५५१ ता. ३० मार्च १६३० ही तारीख मान्य झाली. राजवाड्यांनीं ही जेधे

शकावलींतील नोंद चुकीची आहे असें म्हटलें आहे. बुसातीनुस्सलातीन ( आदिलशाहीचा इतिहास), या ग्रंथांतील नोंदींच्या आधाराने **सर जदुनाथ** सरकार यांनीहि जेधे शकावलींतील नोंद चुकीची आहे असें म्हटलें आहे. जेधे शकावलींत १५४९ च्या नोंदी १५५१ मध्ये केल्याचें त्यांनी दाखवून दिलें आहे. ते स्वतः शिवजन्माची तारीख ६ एप्रिल १६२७ हीच मानतात. पण अलीकडील बहुतेक सर्व संशोधकांनी १९-२-१६३० हीच तारीख निश्चित म्हणून मान्य केली आहे. वास्तविक आता याबद्दल वाद असण्याचें कारण नाही. अनेक निर्विवाद पुरावे उपलब्ध झाले आहेत. अन्यत्र बखरींना अविश्वसनीय मानणारे प्रो. सरकार मात्र चिटणिशी बखरीवर या बाबतींत विश्वास ठेवतात हें आश्चर्यकारक आहे. कांही महत्त्वाचे मुद्दे खाली दिले आहेत :

(१) **शिवशकावलि** : " शके १५५१ शुक्लनाम संवत्सरे फाल्गुन वद्य ३ शुक्रवार, हस्त घटी १८ प. ३२ गंड ५।७ ते दिवशीं राजश्री सिवाजीराजे शिवनेरीस उपजले. "

(२) **शिवभारत** : फाल्गुन वद्य ३, शक १५५१ हीच तिथि कवि परमानंद देतो याने हें काव्य शिवाजीच्या आज्ञेवरून लिहिलें आहे.

(३) बिआर संस्थानांतील पं. मीठालाल व्यास यांच्या संग्रहीं शिवाजी महाराजांची जन्मकुंडली सांपडली आहे. शिवराम ज्योतिषी हा या कुंडलीचा कर्ता. तो शिवाजीचा समकालीन होता हें सिद्ध झालें आहे. या कुंडलीचा शिवशकावलि व शिवभारत यांच्याशी पूर्ण मेळ बसतो हें महत्त्वाचें आहे. तीनही उल्लेख शिवकालांतील लेखकांचेच आहेत. तिघांना एकच माहिती मिळाली असली पाहिजे.

(४) तंजावर येथील शिलालेखांत हीच तिथि आहे.

(५) आज्ञापत्राचे लेखक रामचंद्रपंत अमात्य यांचा अप्रत्यक्ष उल्लेख याच तिथीला पोषक आहे :

स्वराज्य स्थापनेच्या वेळीं शिवाजी महाराज १५ वर्षांचे होते असा उल्लेख आहे. स्वराज्य स्थापनेचा प्रारंभ १६४५ त झाला. म्हणजे शिवाजी १६३० मध्ये जन्मला हें स्पष्ट होतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
(११)
अनुक्रम २८३२२ वि: परिशिष्ट
८४९ २२।११।५०

यांसारख्या अनेक पुराव्यांवरून आता शिवजन्माची तिथि निश्चित झाली आहे. याबद्दल वाद नसावा.

८. या बारा वर्षांच्या उल्लेखाला शिवजन्म तिथीच्या दृष्टीने महत्त्व आलें आहे. शिवाजीची एक सनद इ. स. १६३९ ची उपलब्ध आहे. या सनाच्या मागे १२ वर्षें गेल्यास जन्म सन १६२७ हा येतो. शिवभारतांतहि हा बारा वर्षांचा उल्लेख आहे. पण शिवभारतकार जेधे शकावलींतील तारखेलाच पाठिंबा देतो. जेधे शकावलीचा स्वीकार करूनहि या **१२ वर्षांच्या** उल्लेखाचा खुलासा होऊं शकतो. शिवाजीच्या जन्मानंतरची ५–६ वर्षें शहाजीच्या दृष्टीने अतिशय धांदलीची गेलीं. इ. स. १६३६ त निजामशाहीचा शेवट झाल्यानंतर तो आदिलशाहीला जाऊन मिळाला. त्याची नेमणूक कर्नाटकाकडे झाली. पुणें प्रांतांतील आपल्या जहागिरीची व्यवस्था **दादोजी कोंडदेव** याच्याकडे सोंपवून शहाजी बायकामुलांसह कर्नाटकांत गेला. इ. स. १६४१ मध्ये शहाजीने बेंगरुळहून शिवाजीला पुण्यास पाठविलें. या वेळीं शिवाजीस १२ वें वर्ष लागलें होतें.

९. शहाजीचें कर्नाटकांतील जहागिरींचें ठिकाण. १०. दादाजी कोंडदेव हा पाटस मधील मलठण गांवचा कुलकर्णी. हा शहाजीच्या विश्वासांतला होता. कर्नाटकांत जातांना शहाजीने दादजीचीच नेमणूक आपला मुतालिक म्हणून केली. शिवाजीला इकडे पाठविल्यावर दादाजीच त्याचा पालक बनला. थोडयाच दिवसांत या भागांतील आदिलशाहीचा सुभेदार म्हणूनहि त्याची नेमणूक शहाजीने करवून घेतली. याने उद्ध्वस्त झालेल्या या मुलखांत लावणी, सिंचाई करून मलिकंबरी धारापद्धति सुरू करून हा प्रदेश ऊर्जितावस्थेस आणिला. मावळे लोकांच्या जीवनांत त्याने स्थैर्य आणिलें. शिवाजीच्या पुंडाईबद्दल त्याने प्रथम त्यास इषारा देऊन पाहिला पण पुढे तोच त्यांत सामील झाला. रोहिडखोऱ्याचा देशपांडे दादाजी नरसप्रभु हा जेव्हा शिवाजीला सामील झाला तेव्हांच्या आणाशपथा दादाजी कोंडदेव यांचे विद्यमानेच झाल्या होत्या. (शिवाजीने दादाजी नरसप्रभूस पाठविलेलें पत्र.) इ. स. १६४७ मध्ये दादाजी मरण पावला. मरतेसमयी त्याने शिवाजीच्या कार्याबद्दल फार मार्मिक उद्गार काढून त्यास आशीर्वाद दिला.

११. बारा वर्षांचा खुलासा — टीप ८ पाहा. १२. बाळकृष्णपंत व नारोपंत असें हवें. १३. अमात्यः स्यात् मुजुमदारः (रा. व्य. कोश) १४. युक्त्यभिज्ञो डबीरः स्यात् (मुत्सद्दी) १५. सबनीसस्तथा सेनानायकः परिकीर्तितः ।

## ४. बारा मावळें काबीज केलीं :

येतांच बारा[१] मावळें काबीज केलीं. मावळे देशमूख बांधून, दस्त[२] करून, पुंड होते त्यांस मारिलें. त्याजवर, कालवशात, दादाजी कोंडदेव मृत्यू पावले. पुढें शिवाजी राजे आपणच कारभार करीत चालले. मग सुपें महाल येथें कोणे एके जागां संभाजी[३] मोहिता म्हणोन सावत्र आईचा भाऊ, मामा होता. तो महाराजांनीं[४] महालावरि ठेविला होता. त्याचे भेटीस शिमग्याचे सणास पोस्त[५] मागावयास म्हणून गेले. मामास कैद करून ठेविलें.[६] त्याचे तीनशें घोडे पागेचे होते व द्रव्यही बहूत होतें. वस्तभाव, कापड हस्तगत करून सुपें देश साधिला. तुकोजी चोर मराठा म्हणोन लष्करचा सरणोबत[७] केला. शामराव निळकंठ पेशवे व बाळकृष्णपंत मजुमदार व नारोपंत व सोनाजीपंत व रघुनाथ बल्लाळ सबनीस असे कारभारी करून, बहुत सावधपणें चौकशीनें वर्तणूक करीत चालले.

---

१. अंदर मावळ, नाणें मावळ, पवन मावळ, कोरबारसें मावळ, पौड खोरें, मुठें खोरें, मुसें खोरें, गुंजण मावळ, कानद खोरें, वेळवंड खोरें, हिरडस मावळ व रोहिडखोरें हीं बारा मावळें. २. कैद करून ३. संभाजी मोहिते हा शिवाजीचा सावत्र मामा. तो शिवाजीचें नेतृत्व मान्य करीना. त्यास शहाजीकडे पाठवून दिलें. ४. शहाजीमहाराजांनी ५. पोस्तः शिमगा दिवाळी यांसारख्या सणांचे प्रसंगीं आपल्या आश्रितांना देणगी देण्याची पद्धत आहे. त्या देणगीस पोस्त हें नांव आहे. ६. टीप ३ पाहा. ७. सेनापति.

### ५. जुन्नर-पुरंदरचा कबजा

पुढें जुन्नर शहर मारिलें.[१] घोडे दोनशें पाडाव केले.तीन लक्ष होनांची मत्ता, खेरीज कापडजिन्नस, जडजवाहिर, हस्तगत करून पुण्यास आले. मग अमदानगर शहर मारलें. मोंगलांशीं मोठें युद्ध केलें. सातशें घोडे पाडाव केले. हत्तीही पाडाव केले. द्रव्य बहूत सांपडले. तेसमयीं पागा बाराशें व शिलेदार दोन हजार जाहाले. अशी तीन हजार स्वारांची बेरीज जाली. तेव्हां माणकोजी दहातोंडे सरनोबत लष्करचे केले. मग किल्ले कोंढाणा[२] इदलशाही होता, तो भेद[३] करून घेतला. ठाणें आपलें ठेविलें. सवेंच पुरंदरगड इदलशाही येथें निळकंठराव म्हणोन ब्राह्मण गडास खावंद[४] होते, ते मेले, त्यांचे पुत्र दोघे,[५] ते एकांत एक भांडू लागले. त्यांची समजावीस करावयास म्हणोन राजे पुरंदरास गेले. आणि ते दोघे भाऊ कैद करून तोही गड आपणच घेतला. आपलें ठाणें बसविलें.

१. जिंकून घेतलें. जुन्नर इ. स. १६५७ मध्ये घेतलें. २. इ. स. १६४७ मध्ये कोंडाणा घेतला. शिवाजीने या किल्ल्याला सिंहगड हें नांव दिलें. ३. दादाजी कोंडदेव या प्रांतीचा सुभेदार होता. त्याच्या मृत्यूनंतर विजापूरकरांचा नवा सुभेदार नेमण्याचा प्रश्न आला. शिवाजी स्वतःच या प्रदेशाचा वहिवाटदार व सुभेदारहि झाला. पुण्याचा हवालदार बापूजी नऱ्हेकर आणि सिंहगडाचा हवालदार सिद्दी अंबर याच्याकडून त्याने तो किल्ला मिळविला. (भेद करून हाच पाठ योग्य.) ४. मालक. ५. 'तीघे भाऊ ' पाहिजे.

### ६. कल्याण-भिवंडी मारिली – जावळी काबीज केली.

त्याजवरि कोंकणांत कल्याण[१] भिवंडी मारिली. आणि माहुली किल्ला अदलशाही घेतला. मावळे लोक यांची संचणी[२] करीत चालले. मुरबाद म्हणोन डोंगर होता त्यास वसविलें.[३] त्याचें नांव राजगड म्हणोन ठेविलें. त्या गडाच्या चार माच्या[४] वसविल्या.

कोंकणांत चंदरराव मोरे म्हणून राज्य करीत होते. शृंगारपुरीं[५] सुर्वे राज्य करीत होते. त्यांचे प्रधान शिरके होते. असे जबरदस्त गड, कोठ,[६] दहा बारा हजार लष्कर हाशम[७] समेत राज्य करीत असत. त्यांजकडे रघुनाथ बल्लाळ सबनीस बोलावून पाठविले. विचार करितां चंदरराव मोरे यास मारल्या विरहित राज्य साधत नाहीं. त्यास तुम्हांवांचून हें कर्म कोणास न होय. तुम्ही त्यांजकडे हेजबीस[८] जाणें.' ऐसें सांगितलें. बराबर निवडक धारकरी[९] शें सवाशें माणूस निवडून दिले. ते स्वार होऊन जावली नजीक जाऊन पुढें चंदररायास सांगून पाठविलें कीं, 'आपण राजियाकडून आलों आहों. कित्येक बोलणें-चालणें तहरह कर्तव्य आहे' असें सांगून पाठविलें. उपरि त्यांनीं त्यांस आपणाजवळ बोलावून भेट घेतली. कित्येक बाह्यात्कारी बोलणें जाहालें. बिराड दिलें तेथें जाऊन राहिले. दुसरे दिवशीं मागती गेले. एकांतीं भेट घेतली. बोलणें जाहालें. प्रसंग पाहून चंदरराव[१०] व सूर्याजीराव दोघां भावांस कटारीचे वार चालविले. जमातींशीं निघून चालिले. पाठीवर लाग जाहाला त्यास मारून निघून चालिले. खांसाच पडलियावरि लोक काय चालून येतात? असें कर्म करून, परतोन राजियाकडे भेटीस आले. तेच[११] खांसा राजा चालोन जाऊन जावली सर केली. मावळे लोकांस कौल[१२] देऊन संचणी केली. प्रतापगड म्हणवून नवाच वसविला.[१३] हणमंतराव म्हणवून चंदररायाचा भाऊ चतुर्बेट[१४] म्हणून जागा जावलीचा होता तेथें बल[१५] धरून राहिला. त्यास मारल्याविना जावलीचें शल्य[१६] तुटत नाहीं. असें जाणून संभाजी कावजी म्हणून महालदार[१७] राजियाचा होता त्यास हणमंतराव याजकडे राज्यकारणास पाठवून सोइरिकीचें नातें लावून एकांती बोलीचालीस जाऊन, संभाजी कावजी यानें हणमंतरायासि कटारीचे वार चालवून जिवें मारिलें. जावली काबीज केली. सिवतर खोरियांत बाबजी राऊ म्हणून पुंड होता तोही कैद करून त्याचे डोळे काढिले.

---

१. कल्याणच्या सुभेदाराची सून आबाजी सोनदेवाने पकडून आणून शिवाजीस नजर केल्याची कथा सभासद देत नाही. जेधे शकावलींत या

घटनेचा उल्लेख आहे. प्रो. सरकार तळटीपेंत या घटनेची नोंद करतात. सरदेसाई या घटनेकडे एक दंतकथा म्हणूनच पाहतात. पण काफीखानाने या थोर कृत्याबद्दल शिवाजीची स्तुति केली आहे. इ. स. १६५७ मध्ये कल्याण घेतलें. २. जमवाजमव. ३. राजगड किल्ला १६४६ त बांधला. ४- " उपात्यका तु माची स्यात् "। डोंगराच्या पायथ्यापासून वर शिखराकडे जाताना लागणारा सपाट प्रदेश. युद्धाच्या हालचालीच्या दृष्टीने हा भाग महत्त्वाचा आहे. ५. कोंकण प्रांतींचें ठाणें. हें ठाणें इ. १६५६ मध्ये शिवाजीने घेतलें. ६. " प्राकार: कोठ इत्युक्तो गिरिदुर्गं गड: स्मृत: "। ७. पायदळ. ८. हेजीब = दूत. ९. योद्धा. ( तरवारीने लढणारा) १०. **चंद्रराव** प्रकरणासाठी प्रस्तावना पहा. ११. त्याबरोबर १२. लावणी करून वसाहत करावी या संबंधींचा सरकारी लेख. १३. प्रतापगड हा किल्ला मोरो त्रिमल पिंगळे यांनी बांधला. शिवाजीने त्यास पेशवाईपद दिलें. १४. जावळी खोऱ्यांत कोयनेच्या कांठों हें ठिकाण आहे. १५. मजबुती करून १६. जावळी प्रकरण. प्रस्तावना पाहा. शैल्य – शल्य. १७. भालदार.

## ७. विविध नेमणूका – संभाजीचा जन्म.

पुढें, सुर्वे राज्य करीत होते त्यांजवर चालून गेले. शृंगारपूर घेतलें. सुर्वे पळोन देशांतरास गेले. त्यांचे कारभारी शिर्के होते त्यांशीं भेद करून राज्य हस्तगत केलें. त्यांसि महाल मुलूख देऊन त्यांची कन्या राजियानें आपले पुत्रास केली.[१] या प्रकारें जावलीचें राज्य व शृंगारपूरचें राज्य ऐशीं दोन राज्यें काबीज केलीं. तेव्हां मोरो त्रिंबक पिंगळे ब्राह्मण यांनीं बहूत मेहनत केली. त्याजवरून शामराव[२] निळकंठ यांची पेशवाई दूर करून मोरोपंतास पेशवाई दिली, व निळो सोनदेव यांणींही मेहनत केली म्हणोन सुरनिशी[३] सांगितली. गंगाजी मंगाजी म्हणोन होते त्यांस वाकनिशी[४] सांगितली. प्रभाकरभट म्हणून थोर ब्राह्मण उपाध्ये होते त्यांचे पुत्र बाळंभट व गोविंदभट हे उपाध्येपण चालवीत होते. लष्करचा सरनोबत नेताजी पालकर केला. नेताजी सरनोबती करीत असतां सात हजार पागा व तीन हजार शिलेदार[५] अशी दहा हजार फौज जाहाली. मावळे

लोकांची संचणी दहा हजार पावेतों जाली. यांसि सरनोबत येसाजी कंक म्हणून केला. ऐसें राज्य चौकशी बंदोबस्त करून राहिले. राजियाची स्त्री निंबाळकर यांची कन्या सईबाई केली होती ती प्रसूत जाहाली पुत्र जाहाला. त्याचें नांव संभाजी राजा म्हणून ठेविलें. बहूत उत्साह[६] केला. धर्म बहूत केला. राजगडीं राहिले.

१. शृंगारपूर इ. स. १६६१ व जावळी इ. स. १६५६ मध्ये सर झाली. या वेळीं शिरक्यांची मुलगी आपल्या पुत्रास केली हा उल्लेख कालदृष्ट्या चुकीचा आहे. कारण इ. स. १६५७ मध्ये संभाजीचा जन्म झाला. त्याचे लग्न इ. स. १६६७ मध्ये झालें. त्याची पत्नी शिर्के घराण्यांतीलच. २. शामराव नीलकंठाचा सिद्दीच्या लढाईंत पराजय झाला. म्हणून त्यास दूर केलें असावें. ३. "सूर्नीस: सचिवस्तथा"। ४. वृत्तान्तलेखक. ५. स्वत:चें घोडें बाळगून नोकरी करणारा. "शिलेदार: स्वतुरगी." ६. उत्सव.

## ८. आदिलशहाची शहाजीला धमकी

मग पुढें या खबरी दिल्लीस पातशाहास कळाल्या. विजापूर (येथें) अली[१] इदलशाहा पातशाही करूं लागले व बडी साहेबीण[२] सुलतान महंमद याची बायको ही कारभार कुल[३] करीत असतां त्यांस हें वर्तमान कळून बहूत कष्टी जाहालीं. पातशाही किल्ले घेतले. देशही काबीज केला. एक दोन राज्यें बुडविलीं. हा पुंड जाहाला. त्यास मारून गर्दीस[४] मेळविण्याचें कसें करावें, म्हणून विचार करून, राजश्री शाहाजी राजे बेंगरुळाकडे होते, त्यांस पत्रें लिहिलीं. महालदार रवाना केले कीं, 'तुम्ही पादशाही चाकर, आणि शिवाजी लेक पुण्याकडे पाठवून यांणीं पादशाहाशीं बदलून हरामखोरी केली. चार किल्ले पादशाही घेतले. देश, मुलूख काबीज केला व मारिला. एक दोन राज्यें बुडविलीं व एक दोन राजे पादशाहीं रुजवात[५] होते ते मारिले. आतां लेंकास कैदवार[६] ठेवणें. नाहीं तरि पादशाही हवाला[७] घेतील.' असें लिहून पाठविलें. मग

महाराजांनीं उत्तर दिलें कीं, 'शिवाजी आपला पुत्र, परतु आपणाजवळून पळोन गेला. तो आपल्या हुकुमांत नाहीं. आपण तो[८] पादशाहांशीं रुजुवात एकनिष्ठेनें आहों. शिवाजी आपला पुत्र याजवरि हल्ला करावी, मन मानेल तें करावें. आपण दरम्यान[९] येत नाहीं.' असें उत्तर पाठविलें.

१–२. अली आदिलशहा हा महंमद आदिलशहाचा पुत्र. १६५६ मध्ये महंमदशहाच्या मृत्यूनंतर हा गादीवर आला. पण महंमदशहाची बायको **बडी साहेबीण** हीच सर्व कारभार पाहात असे. ३. सर्व. ४. नायनाट करणें. ५. राजनिष्ठ. ६. हुकमांत. ७. ताब्यांत घेणें. ८. आपण तर. ९. मध्ये.

## ९. शिवाजीवर अफजलखानाची रवानगी

त्याजवरून बडी साहेबीण हिणें कुल वजीर उमराव अदलशाही बोलावून आणून शिवाजी राजियावरि रवाना करावे म्हणोन पुसतां कोणीं कबूल केलें नाहीं. अफजलखान वजीर यांणीं कबूल केलें कीं, 'शिवाजी काय? चढे घोडियानिशीं[१] जिवंत कैद करून घेऊन येतों.' असें बोलिलियावरि पादशाहाजादी खुशाल होऊन वस्त्रें, अलंकार हत्ती, घोडे, दौलत, इजाफा[२] देऊन, नावाजिक[३] बरोबर उमराव जमाव बारा हजार स्वार, खेरीज पायदळ रवाना केलें.

१. घोड्यावर एकदा चढल्यावर न उतरता; एका दमांत. २. इनाम, तनखा. ३. नांवाजलेले.

## १० अफजलखानाचें प्रयाण.

तेव्हां अवघी फौज एकत्र होऊन औरस चौरस लष्कर उतरलें. आणि पुढें तुळजापुरास आलें. तेथें येऊन मुक्काम केला. श्रीभवानी कुलदेवता महाराजांची, तीस फोडून, जातियांत घालून, भरडून पीठ[१] केलें. भवानीस फोडतांच आकाशवाणी जाहाली कीं, 'अरे अफ़जल

खाना, नीचा, आजपासून एकविसावे दिवशीं तुझें शीर कापून, तुझें लष्कर अवघें संहार करून नव कोटी चामुंडांस संतृप्त करितें.' अशी अश्रणी[२] जाहाली. पुढें लष्कर कूच करून श्रीपंढरीस आलें. भीमातीरीं उतरलें. देवास उपद्रव देऊन वांईस आलें. तेथें येऊन विचार केला कीं, 'राजियाकडे हेजिबीस पाठवून, सला करून पातेजून[३] जिवंत हातीं धरावा.' अशी मनांत योजना करून कृष्णाजी भास्कर हेजीब यास बोलावून आणून सांगितलें कीं, 'तुमचे बाप महाराज त्यांचा आमचा भाईचारांत[४] पुरातन स्नेह चालला आहे. त्याजमुळें तुम्ही कांहीं आपणांस इतर नाहीं. तुम्हीं येऊन आपल्यास भेटणें. आपण पादशाहाजवळून तुम्हांस तळकोंकणचें राज्य व जाहागिरी देववितों. गडकोट घेतले ते करार करवितों. वरकडही नावांजितों. जितकें तुमचे मनांत असेल तेणेंप्रमाणें सरंजाम देववितों. पादशाहाशीं भेट घेणें तरि घ्या, नाहीं तरि मुलाजमत[५] माफ करवितों.' ऐशा कित्येक गोष्टी सांगोन 'सल्यांत राजासि भेटीस आणावें. अगर आपण येऊं.' असें कृष्णाजीपंतापाशीं[६] सांगितलें. आणि त्यास पुढें रवाना करावें [असें केलें.]

---

१. चिटणीस बखरींत आणि शिवदिग्विजयांत भवानी देवीच्या मूर्तीचा भंग केल्याचा उल्लेख नाही. देवीने पुजाऱ्यांच्या स्वप्नांत येऊन पुढील घटना त्याला सांगितल्या आणि नंतर त्याने मूर्ति हलविली. डॉ. सेन यांच्या मतें ही नंतर तयार झालेली अद्‌भुतकथा खरी नव्हे. सभासदानेच सत्य सांगितलें आहे. २. अशरीरिणी – आकाशवाणी. ३. विश्वासांत घेऊन. ४. बंधूप्रमाणें असलेला स्नेह. ५. भेट. ६. कृष्णाजी पंत हा अफजलखानाचा दूत. पंताजी पंत हा शिवाजीचा दूत. पण ग्रँट डफ हीं नांवें बरोबर उलट देतो. पुढील ३–४ परिच्छेद वाचतांना या दोन वकिलांच्याबद्दलची ही शंका दुणावते.

## ११. शिवाजीचा विचार

तों या खबरी राजियासि पावल्या कीं, 'विजापुराहून अफजलखान बारा हजार स्वारांनिशीं नामजाद[१] जाहाला. हें कळून राजानें आपली कुल फौज लष्कर मुस्तेद[२] करावें, आणि जावलीस युद्ध

करावें, आपण प्रतापगडास जावें, हा विचार केला. तेव्हां सर्वांनीं निवारिलें कीं, जुंज देऊं नये, सला[३] करावा. त्यास राजे बोलिले जे 'संभाजी राजियास[४] जसें मारिलें तसें आपणास मारितील. मारितां मारितां जें होईल तें करूं. सला करणें नाहीं' हा विचार केला. तों रात्रीं श्रीभवानी तुळजापूरची [इणें] मूर्तिमंत दर्शन दिलें आणि बोलिली कीं, आपण प्रसन्न जाहालों. सर्वस्व साह्य तुला आहें. तुझे हातें अफजलखान मारवितों. तुजला यश देतों. तूं कांहीं चिंता करूं नको.' म्हणून धीर भरंवसा देऊन अभय दिलें. राजे जागे होऊन जिजाबाई आऊस बोलावून आणून स्वप्नाचें वर्तमान सांगितलें. व गोमाजी[५] नाईक पानसंबळ जामदार व कृष्णाजी नाईक व सुभानजी नाईक असे सातबर लोक व सरदार व सरकारकून मोरोपंत व निळोपंत व अण्णाजीपंत व सोनाजीपंत व गंगाजी मंगाजी व नेताजी पालकर सरनोबत व रघुनाथ बल्लाळ सबनीस व पुरोहीत असे बोलावून स्वप्न सांगितलें. 'श्री प्रसन्न जाहाली, आतां अफजलखान मारून गर्दीस मेळवितों [असें म्हणाले.] हें सर्वांचें मतें कठीण कर्म, सिद्धीस गेलें म्हणजे बरें, नाहीं तरि कसें होईल? म्हणोन विचार पडला. मग राजे बोलिले की, 'सला केलियानें प्राणनाश होईल. युद्ध केलियानें जय जाहालियास उत्तम. प्राण गेलियानें कीर्ति आहे. येविषयीं श्लोक :—

> जितेन[६] [जयेन?] लभते लक्ष्मीं मृत्युनापि सुरांगनाः ।
> क्षण-विध्वंसिनी काया का चिंता मरणें रणे ॥१॥

असा नीतीमध्यें विचार सांगितला आहे. त्याजकरितां युद्ध करावें हें खरें. आतां एकच तजवीज करावी. संभाजी राजे पुत्र व मातोश्री आहेत हीं राजगडीं[७] ठेवावीं. जर अफजलखान मारून जय जाहाला, तरि माझा मीच आहें. एखादे समयीं युद्धीं प्राणनाश जाहला, तरि संभाजी राजे आहेत, त्यांस राज्य देऊन त्यांचे आज्ञेंत तुम्हीं राहाणें' अशी निर्वाणूक करून, सर्वांस सांगून, मातुश्रीच्या पायांवरि डोई ठेऊन, निरोप घेतला. मातुश्रींनीं आशीर्वाद दिला कीं, "शिवबा! विजयी होशील."

१. नेमणूक झालेला. २. जय्यत, सिद्ध. ३. मैत्री, तह. ४. शिवाजीचा वडील भाऊ संभाजी याला अफजलखानाने कपटाने मारविलें अशी बखरकारांची समजून दिसते. कर्नाटकांत कनकगिरीच्या स्वारींत तोफेचा गोळा लागून तो मारला गेला. अफजलखान त्याच्या मदतीला गेला नाही, यामुळे हा समज झाला असावा. ५. हा लखूजी जाधवरावांकडील विश्वासू माणूस जिजाबाईच्या सेवेस दिला होता. ६. युद्धांतील विजयाने वैभवाचा लाभ होतो. युद्धांत मृत्यु आल्यास स्वर्गसुखाची प्राप्ति होते. हें शरीर क्षणभंगूर असल्याने रणामध्ये येणाऱ्या मृत्यूची विवंचना कशासाठीं करावी ? ७. जिजाबाई व संभाजी प्रतापगडावरच होते असाहि उल्लेख आहे.

## १२. शिवाजीचें अफजलखानाच्या भेटीस प्रयाण*

असा आशिर्वाद घेऊन मग राजे निघोन प्रतापगडास गेले. नेताजी पालकर सरनोबत यास लष्कर घेऊन व घाटावरि येणें म्हणोन सांगितलें. आणि अफजलखानास जावलीस बोलावितों, सला करून भेटतों, विश्वास लावून जवळ आणितों, ते समयीं तुम्हीं घाट माथां येऊन मार्ग धरणें. असें सांगितलें. त्याजबरोबर रघुनाथ बल्लाळ सबनीस दिले. व मोरोपंत पेशवे व शामराव निळकंठ व त्रिंबक भास्कर यांसही समागमें घेऊन तेही कोंकणांतून यावे असें केलें.

*शिवाजीची सावधगिरीची योजना दिसून येते.

## १३. कृष्णाजीपंत व पंताजीपंत यांच्याशीं विचारविनिमय

इतक्यांत कृष्णाजीपंत हेजीब खानाकडील आले. त्यांस प्रतापगडावर घेतलें. राजियाची भेट जाहाली. कित्येक खानांनीं गोष्टी सांगितल्या होत्या त्या विदित[1] केल्या. लौकिक बोलणें जाहालें. राजे बोलिले कीं, 'जसे महाराज तसे खान आपणास वडील आहेत. त्यांची भेट अलबत्ता[2] घेऊं.' असें बोलून कृष्णाजीपंत यांस बिराड[3] एक घर दिलें. तेथें जावयास निरोप दिला. दुसरे दिवशीं राजे

सदरेंत बैसले. सरकारकून, सर्व सरदार असे सर्वही बोलावून आणिले. व पंताजी गोपिनाथ म्हणून राजियाजवळ विश्वासू मातबर होते त्यांस बोलावून आणून एकांतीं महालांत खलबत बैसले. राजे पंताजीपंतांस बोलिले जे, 'खानाचे हेजीब कृष्णाजीपंत हेजिबीस आले आहेत, त्यांस निरोप देऊन रवाना करितों, व तुम्हांसही अफजलखान याजकडे रवाना करितों. तेथें जाऊन, खानाची भेट घेऊन बोलीचाली करणें. खानास शपथ मागणें. तुम्हीं ते शपथ मागतील तरि देणें. अनमान न करणें. हर-प्रकारें जावलीस घेऊन येणें. याखेरीज सैन्यामध्यें युक्तिप्रयुक्तीनें ज्या रितीनें शोध मनास आणावयाचा त्या रितीनें आणा. खानाचें चित्त आमच्या बरियावरि किंवा वाइटावरि आहे असा शोध करणें. इतकें सांगून, राजे सभेस आले. कृष्णाजीपंतास बोलावून आणिलें. राजे म्हणों लागले कीं, 'खानाची क्रिया[४] पाहिजे. याजकरितां आमचे पंताजी गोपिनाथ यांस तुम्हीं आपणांसमागमें खानाच्या भेटीस नेणें. यांजवळ हस्तपंजराची[५] आण देववणें. खानास जावलीस घेऊन येणें. काकाची भेट घेऊन येऊं. आमच्या मनांत कांही कपट नाहीं.' असें सांगितलें. त्यांस ही गोष्ट मानली. मग कृष्णाजीपंतास वस्त्रें देऊन रवाना केलें. तसेंच पंताजीपंतास वस्त्रें देऊन अफजलखानाकडे रवाना केलें.

---

१. माहीत करून दिल्या. २. निश्चित, बेशक. ३. कृष्णाजीपंतास बिऱ्हाडासाठीं घर देवविलें त्या अर्थी तो अफजलखानाचाच वकील असावा हें ग्रँटडफचें मत चुकीचें आहे. ४. आणभाक. ५. हातांत हात देऊन वचन देणें, शपथ घेणें.

### १४ कृष्णाजीपंताची पंताजीपंतासह परत रवानगी

त्याणीं जाऊन खानाची भेट घेतली. खानांनीं सन्मान केला. कृष्णाजी भास्कर यांनीं अर्ज केला कीं, 'शिवाजीनें हेजिबीस पंताजीपंतास पाठविले आहेत. एकांतीं बैसून बोलावें.' असें सांगितल्यावरि खान एकांतीं बैसून, कृष्णाजीपंत व पंताजीपंत यांस बोलावून आणून

वर्तमान पुसिलें. कृष्णाजीपंत बोलिले कीं, 'राजे तुम्हांवेगळे नाहींत. जसे महाराज शाहाजीराजे तसे तुम्ही, म्हणून शपथ दिली. राजे निर्भय होऊन जावलीस येतील. खानानींही शंका न धरतां जावलीस यावें. त्यांची तुमची मुलाजमत[1] होईल. तुम्ही सांगाल तें ऐकतील.' हा भावार्थ खानास कळल्यावरि मनांत नष्टाई[2] धरून शपथ दिली. खान बोलिले कीं, 'राजा हरामजादा काफर, जावली कुबल[3] जागा, येथें भेटीस यावें म्हणोन बोलावितो. यास्तव तूं ब्राह्मण मध्यस्थ होऊन शपथ देशील तरि शिवाजी राजियाचे भेटीस येईन. मुलाजमत घेऊं.' त्यास पंताजीपंतीं क्रिया दिली जे, 'राजे तुमच्या वाइटावरि नाहींत. संदेह न धरणें. भेटीस यावयाचें करणें.' ऐसें खानास सांगून सैन्यांत लांचलुचपत देऊन, मुत्सद्दी वजीर यांजवळ शोध करून विचारलें. त्यांनीं सांगितलें कीं, 'शिवाजी हरामजादा आहे. याशीं युद्ध करितां सांपडणार नाहीं. यांजकरितां राजकारण लावून भेटी घ्यावी, [ आणि ] भेटीचे समयीं धरावा, ऐसी खानांनीं तजवीज केली [ आहे. ]' म्हणून कळलियावरि दुसरे दिवशीं पंताजीपंत खानाकडे येऊन, राजियाकडे जातों म्हणून हुकूम मागितला. खानानें बहुमान करून राजाकडे पाठविलें.

१. भेट. २. कपट. ३. अडचणीची, कठीण.

### १५. पंताजीपंताचें शिवाजीकडे प्रत्यागमन

पंताजीपंत प्रतापगडास आले. राजाची भेट जाहाली. ते समयीं पंताजीपंतास घरीं जावयास निरोप दिला. रात्री एकले पंताजीपंत भेटीस बोलाविले. राजे व पंत दोघे बैसून आण शपथ घालून, एकांतीं वर्तमान पुसिलें कीं, "यथार्थ करीणा[1] सांगणें. खानाच्या मनांत कसें काय आहे हें सांगणें. आम्ही तुम्ही वेगळे नाहीं. आपलें राज्य संरक्षिलें म्हणजे सर्व कारभार तुम्हांस देतों. द्रव्यही बहूत देतों. आम्हांस वर्तमान यथार्थ सांगणें." ऐसें घरोबियांत[2] घेऊन राजांनीं पुसिलें. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, "खानाच्या मनांत

दुष्ट बुद्धी आहे. सला करून, तुम्हांस भेटीस आणून, दगा करून कैद करून, विजापुरास धरून न्यावें ऐसें आहे. जर तुम्हांस हिंमत असली तरि खानास नानाप्रकारें भेद करून जावलीस घेऊन येतों. तुम्ही हिंमत धरून एकांतीं एकांगी[३] करून मारणें आणि लष्कर सर्व लुटणें. राज्य सर्व आपलें करणें." ऐसा विचार सांगितला. [तो] राजाच्या मनांत आला. तेव्हा पंताजीपंतास पांच हजार होन बक्षीस दिले. आणि खानास सांगणें जे,[४] 'राजा बहूत भितो. वांईस भेटीस यावयास धीर पुरत नाहीं. खान वडील आहेत, मेहेरबानी करून जावलीस येऊन भेट देतात तरि आपण भेटीस येतों. आपण यास हातीं धरून, धीर भरंवसा देऊन, पादशाहाचे मुलाजमतीस घेऊन जाऊन ऊर्जित[५] करतील तरि थोरपण आहे. ऐसे कित्येक मजकूर सांगून घेऊन येणें. म्हणोन विचार सांगोन पंताजीपंत यांस रवाना केलें.[६]

१. बातमी. २. विश्वासांत. ३. एकटयाने. ४. कीं. ५. उन्नतावस्था प्राप्त करून देतील. ६. पंताजी पंताची इतकी विनवणी व मनधरणी चाललेली पाहून हा खानाकडील असावा कीं काय अशी शंका रा. ब. साने यांनाहि आली आहे.

## १६. खान वाईहून जावळीस येतो

ते जाऊन वाईस खानास भेटले. करीणा जाहीर केला. "राजा कचदील[१] आहे. येथें भेटीस येतां शका धरितो. तुम्हींच तेथें जावलीस चलणें. तेथें भेटीस येतील, दिलासा[२] करून बराबर घेऊन जाणें.' असें सांगितलें. त्यावरून खान बहूत खुशाल होऊन, कूच करून, जावलीस रडतोंडीचा घाट उतरून आला. तो प्रतापगडाखालीं डेरे देऊन राहिला. आसपास चौगर्दी[३] बारा हजार लष्कर व बंदुखी,[४] आराबियाच्या[५] गाड्या, हत्ती, सुतारनाल्याच्या[६] गाड्या जागां जागां पाणी पाहून उतरले. पंताजीपंतास गडावरि राजियाकडे पाठविले कीं, 'भेटीस येणें.'

१. भयभीत मनाचा. २. आश्वासन. ३. चोहोंकडून. ४. बंदुकधारी सैनिक. ५. तोफखाना. ६. उंटावरील तोफा.

## १७. खान जावळीस आल्याचें पंताजीपंत शिवाजीला निवेदितो

त्याजवरून ते राजियासि जाऊन भेटले. लौकिक बोलणें जें बोलावयाचें तें बोलिले. एकांती मागती सर्व वर्तमान सांगितलें कीं, 'आपण बोलल्याप्रमाणें खानास घेऊन आलों. आतां तुमची त्यांची भेटी एकांतीं खासे खासे यांची करवितों. तुम्हीं हरीफी[1] करून कार्यभाग करणें तो करावा.' म्हणोन सांगितलें. भेटीस एक दिवस आड करून दुसरे दिवशीं भेटावें असें केलें. "राजे गडावरून उतरावे, खानांनीं गोटांतून पुढें यावें, उभयतांनीं दरम्यान डेरे देऊन खासे खासे भेटावे.' ऐसा निर्वाद[2] करून राजाचा निरोप घेऊन खानाजवळ गडाखालीं माचीस उतरून गेले. खानास वर्तमान सांगितलें. खानानेंही मान्य केलें.

१. चतुराई. २. करार, बोलणें.

## १८. शिवाजीराजे गडाखाली येतात

मग दुसरे दिवशीं गडाखाली राजियांनीं सदर[1] केली. डेरे बिछाने व असमानगिरी,[2] तिवाशिया,[3] व मोतियांच्या झालरी लाविल्या. चित्रविचित्र बाडें[4] व लोडें, गाद्या, पडगाद्या टाकिल्या. सदर सिद्ध केली. घाटमाथां लष्कर [ सुद्धा ] नेताजी पालकर आणविलें होतें, त्यासि इशारत सांगोन पाठविली कीं, 'उद्यां खानाचे भेटीस जातों, फत्ते करितों, आणि गडावरि येतों. तेव्हां एकच आवाज गडावरि करितों. तेव्हां तुम्हीं घाटाखालीं उतरोन लष्करांत खानाच्या चालोन येऊन मारामारी करणें.' तैसेच कोंकणांतून राजश्री मोरोपंत पेशवे आणविले. त्यांसही गडावरील आवाजाची इशारत सांगितली. आपण निवडक लोक गडावरून उतरोन जागां जागां झाडींत ठेविले. आणि खांसा राजियांनीं

जरीची[५] कुडती घातली. डोईस मंदील बांधिला त्यांत तोडा बांधिला. पायांत चोळणा घालून कास कसली, व हातांत एक बिचवा[६] व वाघनख[७] चढविलें. आणि बरावर जिऊ महाला म्हणून मरदाना होता त्याजवळ एक पट्टा व एक फिरंग[८] व ढाल, तैसाच संभाजी कावजी महालदाराजवळ पट्टा व फिरंग व ढाल, ऐसे दोघे माणसें मर्दानी आपणाबरावरी भेटीस घेतलीं. वरकड आसपास धारकरी लोक जागां जागां जाळींत उभे केले. आणि राजियाने स्नान करून भोजन केलें. सिद्ध होऊन गडाखालीं भेटीस जावयास उतरले.

१. बैठक, सभास्थान. २. छत. ३. तक्के. ४. कनाती. ५. जिराचे-लोखंडी जाळीचा (Coat of mail : डॉ. सेन) जरीची हा पाठ चुकीने पडल असावा. ६. वक्र कटचार. ७. वाघाच्या पंजाच्या आकृतीचें शस्त्र. ८. तरवार

## १९. खान सभास्थानीं येतो

गोटांतून भेटीस यावयास खानही सिद्ध होऊन चालले. बरावरि लष्कर हजार दीड हजार बंदुखी मुस्तेद[१] होऊन चालिले. मोठे मोठे धारकरी लोक समागमें निघाले, चालिले. इतक्यांत पंताजीपंत पुढें होऊन अर्ज केला कीं, 'इतका जमाव घेऊन गेलियानें राजा धाशत[२] खाईल. माघारा गडावरि जाईल. भेटी होणार नाहीं. शिवाजी म्हणजे काय? यास इतका सामान[३] काय करावा? राजा दोघा माणसांनिशीं तिकडोन येईल. तुम्ही इकडोन दोघांनिशीं चलावें. दोघे बैसोन भेटावें. तेथें तजवीज करणें ते करा.' असें सांगितल्यावरि अवघा जमाव दूर बाणाचे टपियावरि उभे राहून खासा खान, एक पालखी, दोघे हुद्देकरी[४] व कृष्णाजीपंत हेजीब असे पुढें चालिले. सैदबंडा म्हणोन पटाईत[५] एक लष्करी समागमें घेतला. पंताजीपंतही बरावरि आहेत. असे सदरेंत गेले. सदर देखोन खान मनांत जळाला कीं, 'शिवाजी म्हणजे काय? शाहाजीचा लेंक. वजीर यास असा जरी बिछाना नाहीं! अशी मोतीलग[६] सदर म्हणजे काय! पातशाहास असा सामान नाहीं,

येणें जातीचा त्यानें सामान मेळविला.' असें बोलतांच पंताजीपंत बोलिला जे, 'पादशाही माल पादशाहाचे घरीं जाईल. त्याची इतकी तजवीज[७] काय?'' असें बोलून सदरेस बैसले. राजियास सिताब[८] आणवणें म्हणून जासूद हरकारे रवाना केले.

१. जय्यत, तयार. २. धास्ती, घेणें. ३. जमाव. ४. शस्त्रधारी अथवा साधे नागरी अधिकारी. ५. पट्टा चालविण्यांत कुशल. ६. मोत्यांची किनार लावलेली. ७. विचार. ८. त्वरित, जलद.

## २०. अफजलखान-शिवाजी भेट व अफजलखानाचा वध

राजे गडाचे पायीं उभे होते. तेथून हळू हळू चालिले. समाचार घेतां खानाबरोबर सैदबंडा मोठा धारकरी आहे हें ऐकून उभे राहिले. आणि पंताजीपंतास बोलावूं पाठविलें. ते आले. त्यास म्हणूं लागले जे, 'जैसे महाराज तैसे खान. आपण खानाचा भतीजा[१] होय. ते वडील. सैदबंडा खानाजवळ आहे त्याकरितां शंका वाटते. हा सैदबंडा इतका यांतून दूर पाठविणें,' म्हणोन पंताजीपंतास सांगितलें. त्यावरून पंताजीपंत [ यानें ] जाऊन कृष्णाजीपंताकडून खानास सांगोन सैदबंडाही दूर पाठविला. खान व दोघे हुद्देकरी राहिले. तेव्हां राजेही हिकडून जिऊ महाला व संभाजी कावजी व दोघे हुद्देकरी [ या ] सहित गेले. खानही उभा राहून, पुढें सामोरा येऊन राजियास भेटला. राजियानें भेटी देतां खानानें राजियाची मुंडी कवटाळून खांकेखाले धरिली. आणि हातींची जमदाड[२] होती तिचें मेण[३] टाकून कुशीस राजियाचे चालविली. तों आंगांत जरीची[४] कुडती होती त्यावरि खरखरली. आंगास लागली नाहीं. हें देखोन राजियांनीं डावे हाताचें वाघनख होतें, तो हात पोटांत चालवला. खानानें आंगांत झगाच घातला होता. वाघनखाचा मारा करितांच खानाची चरबी बाहेर आली. दुसरा हात, उजवे हातचे बिचवियाचा मारा चालविला. ऐसे दोन वार करून, मुंडी आंसडून, चौथरियाखालें उडी घालोन निघोन गेले

खानानें गलबला केला कीं, ‘मारिलें! मारिलें! दगा दिधला! वेगी धावा!!’ असें बोलतांच भोयांनीं पालखी आणिली. आणि पालखींत घालून, उचलून चालविला. इतकियांत संभाजी कावजी महालदार यानें भोयांचे पाय[५] मारिले. आणि पालखीखालें भोयांस पाडिलें. खानाचें डोंचकें कापिलें. हातीं घेऊन राजियाजवळ आला. इतक्यांत सैदबंडा पटाईत धावला. त्यानें राजे जवळ केले. पट्टयाचे वार राजियावरि चालविले. तों राजियानें जिऊ महालियाजवळ आपला हुद्दियाचा[६] पट्टा [होता तो] घेऊन, पट्टा व बिचवा असे कातर[७] करून सैदबंडा याचे चार वार ओढिले.[८] पांचवे हातानें राजियास मारावें तों इतकियांत जिऊ[९] महाला याणें फिरंगेनें खांद्यावरि सैदबंडियासि वार केला. तो पट्टियाचा हात हत्यारा-समेत तोडिला. आणि खानाचें शीर घेऊन राजे सिताब[१०] गडावरि जिऊ महाला व संभाजी कावजी महालदार असे गेले.

१. पुतण्या. २. ‘‘जमदाड् यमदंष्ट्र: स्यात्’’; मोठी तरवार. ३. तरवार ठेवण्याचें टोपण. ४. परिच्छेद १८ टीप ५ पाहा. ५. पट्टयाने तोडले. ६. स्वत:च्या वापरांतला. ७. पट्टा व बिचवा हीं दोन हत्यारें एकमेकांवर कातरी-प्रमाणें (×) या चिन्हाप्रमाणें धरून. **साने** याला पट्टयाचा एक हात म्हणतात. हा बचावाचा प्रकार आहे. ८. चुकविले. ९. जिऊ महालाने अत्यंत कौशल्याने सैद बंडाचा शस्त्रासहित हात छाटून शिवाजीचा प्राण वाचविला. याबद्दल त्याच्या वंशजास एक गांव इनाम मिळालें आहे. ‘‘होता जिवा म्हणून वांचला शिवा’’ असा वाक्प्रचार रूढ झाला. १०. त्वरित.

## २१. खानाच्या सैन्याची दाणादाण

गडावरि जातांच एक भांड्याचा[१] आवाज केला. तेच[२] गडा-खालील लोक व घाटावरील लोक व लष्कर व कोंकणांतून मोरो-पंत व मावळे असे चौतर्फी चोहोंकडून चालोन खानाचे गोटावरि आले. आणि खान मारून, शीर कापून राजे गडावरि गेले ही खबर कळोन कुल खानाचें बारा हजार लष्कर धास्त घेऊन अवसान

खस्त[३] जाहालें. इतकियांत राजियाच्या फौजा चौतर्फा मारीत चालले. मोठें घोरांदर[४] युद्ध जाहालें. दोन प्रहर घोरांदर युद्ध जाहालें. खानाकडील मोठेमोठे वजीर व लष्करी महदीन[५] व उज-दीन पठाण, रोहिले, सुरनीस (?) व आरबी वगैरे मुसलमान आणि जातिवंत मराठे, धनगर व ब्राह्मण तसेच तोफाची, बैले[६] व कर्नाटकी प्यादे, बंदुखी, आड-हत्यारी रो चे वा र[७] (?) व लो क[८] वा र (?) ये लं गे वा र[९] (?) बाजे जातचे[१०] इटेकरी[११] ह तु ल वे[१२] (?) तिरंदाज व छडीवाले व पटाईत व बंकाईत[१३] व बाणाईत[१४] व तोफखाना ऐसे एकंदर जम[१५] निदान करून भांडण दिधलें. मोठें क्षेत्र[१६] जाहालें. राजियाचे लष्करी लोकांनीं व मावळे लोकांनीं पायउतारा होऊन मारामारी केल्या. हत्ती तोडिले, ते जागां ठार जाले. कित्येक हत्तींचीं पुच्छें तोडिलीं. कित्येक हत्तींचे दांत तोडिले. कित्येक हत्तींचे पाय तोडिले. तसेच घोडे एकच वारानें जिवें मारिले. तसेच खानाचे लष्करी कित्येक ठार मारिले. कित्येकांचे पाय तोडून पाडिले. कित्येकांचे दांत उडविले. कित्येकांचीं डोचकीं फोडिलीं. कित्येक मेले. युद्धास आले ते मारून पाडून भुईस रगडिले. तसेंच उंटें मारिलीं. मारीत असतां रण अपार पडलें. संख्या न करवे. रक्ताच्या नद्या चालल्या. रणकंदन जालें. ऐसे मारामारी करून हत्ती, घोडे, उंट व मालमत्ता व पालख्या वजीर पाडाव करून आणिले.—बितपशील.[१७]

| | |
|---|---|
| ६५ हत्ती व हत्तिणी सुमार. | ४००० घोडे सुमार. |
| ३००००० जडजवाहीर. | १२०० उंटें सुमार. |
| २००० कापड वोझीं. | ७००००० नगद व मोहोरा व |
| भांडीं तोफखाना सर्वही घेतलें. | होन सोनें रुपये. |

कलम १. वजीर पाडाव जाहाले बितपशील——

१ सरदार व वजीर मातबर. १ लां [ कं ? ] बाजी भोंसले. १ अफझलखानाचे पुत्र.[१८] १ नाटकशाळेचे[१९] पुत्र. १ राजेश्री झुंजारराव घाडगे. १ यांखेरीज लोक. कलम १.

१. तोफ. २. लागलीच. ३. नष्ट; अवसान खस्त–अवसानभग्न. ४. घनघोर ५. महंमददीन व रुजेदीन असाहि पाठ आहे. रुजेदीन–निष्ठावान(?) महादीन, उज्दीन, पठाण, रोहिला आणि अरब हे शब्द विविध मुसलमानी वंशाचेद्योतक असावेत. ६. पायदळ. ७–९. रोचेवार लोकवार येलंगेवार. या दक्षिणेंतील क्षत्रिय लढवय्यांच्या जाती आहेत. रोचेवार तेलगु क्षत्रिय असा अर्थ मिळतो. १०. इतर जातीचे. ११. बर्चीधारी. १२.(?) १३.बांकाईत–शिंगवाले, बंकाईत-तंबूचे पहारेकरी १४. दारूचे बाण सोडणारे. १५. एकत्र करून. १६. रण. १७. तपशीलवार. १८. फजल महंमद. १९. रखेलीचे पुत्र.

## २२. शरणागतांना उपकृत करून सोडिलें

येणेंप्रमाणें पाडाव केले. याखेरीजही जिन्नस, मालमत्ता, गुरें-ढोरें, बैल, मबलग मत्ता पाडाव केले. भांडते लोकांनीं तोंडीं तृण धरून शरण आले त्यांसि व बायकामुलें, भटब्राह्मण, गोरगरीब असे अनाथ[1] करून सोडिले. राजा पुण्यश्लोक, शरणागतास मारीत नाहीं, याजकरितां त्याचे लोकांनींही कित्येक अनाथ सोडिले. अफजलखानाचा लेंक फजल हा पायीं चिरगुटें बांधून झाडींत पळोन गेला. तसेच कित्येक भले लोक पळोन गेले. संख्या न करवे.

१. **अनाथ** हा शब्द मुळांत **अजात** असा आहे. मोडी **ना** आणि जा या वर्णांमधील साम्यामुळें ही वर्णविवृत्ति झाली असावी. शरण आलेले गोर-गरीब, बायकामुलें यांना **अनाथ** करून सोडले हा अर्थ संदर्भाला अयोग्य आहे. कारण या शरणागतांना द्रव्य, कपडेलत्ते वगैरे देऊन सोडले असा सर्वत्र उल्लेख आहे. **अजात** करून सोडले यालाहि अर्थ नाही. डॉ. सेन यांनी दिलेलें स्पष्टीकरणच योग्य वाटतें. 'अनात' हा शब्द **'अनायत'** या पर्शियन शब्दाचें रूप असावा. **अनायत** म्हणजे उपकृत हा अर्थ संदर्भाशीं अगदी सुसंगत आहे.

## २३. दिलासा करून नेमणुका दिल्या

ऐसी फत्ते करून जय जाहाला. मग राजे यांणीं खानाचे पुत्रास व सरदार पळून गेले होते त्यांस धरून आणिलें. राजा खासा

प्रतापगडाखालीं उतरोन कुल आपले लोक व अफझलखानाचे लोक व त्यांचे पुत्र भांडते माणूस होते तितकियास भेटून, पोटाशीं धरून, दिलासा करून, भांडते लोक जे पडले होते त्यांच्या लेंकांस चालविलें.[1] पुत्र नाहीं त्यांच्या बायकांस निमे वेतन करून चालवावें असें केलें. जखमी जाहाले त्यांस दोनशें होन व शंभर होन, पंचवीस होन, पन्नास होन, दर असामीस जखम पाहून दिधले. मोठमोठे लोक धारकरी जुमले होते, त्यांस बक्षीस हत्ती, घोडे दिधले. हस्तकडीं, कंठमाला, तुरे, पदकें, चौकडे, मोत्याचे तुरे, कित्येकांस बक्षीस फार दिलें. ऐसें देणें लोकांस दिधलें. कित्येकांस गांवमोकासे[2] बक्षीस, दिधले. लोक नांवाजिले. दिलासा[3] केला.

१. वाडवडिलांची तैनात तशीच पुढें चालविली. २. इनाम गांव. ३. अभय, आश्वासन.

## २४. शिवाजी म्हणजे भीमच

मागें कौरवांचा क्षय पांडवीं केला, [ तेव्हां ] असा वीरावीरांस झगडा जाहाला. खांसा खान राजियानें एकांगी करून मारिला. अफजलखान सामान्य नव्हे. केवळ दुर्योधनच जातीनें होता. आंगाचा, बळाचाही तैसाच आणि दुष्टबुद्धीनें तैसाच. त्यास एकलें भीमानें मारिला. त्याचप्रमाणें [ येथें राजानें ] केलें. शिवाजी राजाही भीमच. त्यानींच अफजल मारिला. हें कर्म मनुष्याचें नव्हे. अवतारीच होता. तरीच हें कर्म केलें. यश आलें. असें जाहालें. खानाकडील वजीर पाडाव केले होते त्यांस वस्त्रें, भूषणें, अश्व देऊन अनाथ करून सोडिलें. त्याउपरि राजश्री पंताजीपंतासही उदंड वस्त्रें, अश्व, अलंकार दिधले. अपार द्रव्यही दिधलें. खुशाली केली. राजगडास मातुश्रीस व सर्वांसही फत्तेची खबर लिहून पाठविली. त्यांनींही वर्तमान ऐकून साखरा वांटून, नगारे-करणे केले, भांडीं मारिलीं. मोठी खुशाली केली. येणें रितीनें राजियाकडील वर्तमान जाहालें.

## २५. अफझलखानवधामुळे पादशाहाने धास्त खाल्ली

त्याउपरि विजापुरास चवथे दिवशीं जासूद, हरकारे[1] यांणीं खबर पादशाहास व पादशाहा-जादीस जाहीर केली कीं, 'अफजल-खान खांसा मारून शीर कापून नेलें. कुल लष्कर लुटून फस्त केलें.' ऐसें सांगतांच अली अदलशाहा तक्तावरून उतरोन, महालांत जाऊन, पलंगावरि निजला. [ त्याणें ] बहुत खेद केला. असेंच पाद-शाहा-जादीस खबर लागतांच पलंगावरि बैसली होती तेथेंच 'अल्ला अल्ला! खुदा खुदा!' म्हणून आंग पलंगावरि टाकून रडत पडली. 'मुसलमानाची पादशाही खुदानें बुडविली,' ऐसा कित्येक विलाप करून बहूत शोक केला. पादशाहा-जादीनें तीन दिवस अन्न-उदक [ घेतलें ] नाहीं. तसेच कुल मोठेमोठे वजीर व लष्कर व कुल शहर दिलगीर जाहालें. म्हणू लागले कीं, 'उद्यां राजा येऊन शहर मारील व कोट घेईल.' ऐसे घाबरे जाहाले. 'खुदानें मुसलमानाची पातशाही दूर करून मराठ्यासि दिली असें वाटतें,' असें म्हणों लागले.

१. जासूद, बातमीदार, टेहळ्या.

## २६. प्रतापगडावर देवीची स्थापना

त्या उपरांत मग राजियासि स्वप्नास श्रीभवानी तुळजापूरची येऊन बोलूं लागली कीं, 'आपण अफझल तुझ्या हातें मारविला व कित्येक पुढेंही आले त्यांस पराभवांत नेलें. पुढेंही कर्तव्य उदंड कारण करणें आहे. आपण तुझ्या राज्यांत वास्तव्य करावें. आपली स्थापना करून पूजा-पूजन-प्रकार चालविणें.' त्याउपरि राजियानें गंडकी[1] नदीस द्रव्य गाडियावरि घालून, गंडकी[1] पाषाण आणून, श्रीभवानी सिद्ध करून, प्रतापगडा [ वर ] देवीची स्थापना केली. धर्मदान उदंड केला. देवीस रत्नखचित अलंकार भूषणें नानाप्रकारें करून दिलीं. महालमोकाशे देऊन सचंतर[2] हवालदार व मुजुमदार व

पेशवे देवीचे करून महोत्साव चालविला. नवस यात्रा सर्वदा तुळजापूरच्या प्रमाणें तेथें चालती जाली आणि तुळजापूरचे यात्रेस लोक जातात त्यांस दृष्टांत स्वप्नें होतात कीं, 'आपण प्रतापगडास आहें तेथें तुम्हीं जाऊन दर्शन घेणें व नवस फेडणें' असें [ देवी ] बोलू लागली. मोठें जागृत स्थान जाहालें.

१. गंडकी नदींत सांपडणारी शिला–शाळिग्राम आणवून भवानीची मूर्ति तयार केली. २. स्वतंत्र.

### २७. शिवाजीचा वाढता पराक्रम

या नंतरि, विजापूरचा मातबर वजीर अफजलखान होता तो बुडविला, तेव्हां पातशाही कमतर पडली, असें समजून राजियानें विजापूरचे किल्ले तळ-कोंकणांत होते ते सर्व घेतले. पन्नास साठ गड घेतले. तळकोंकण काबीज केलें. वर-घाटही घेतला. तेव्हां लष्कर पागा सात हजार व शिलेदार आठ हजार, एकूण पंधरा हजार व हशम लोक बारा हजार ऐसी तोलदार[1] फौज जमा जाहाली. लष्कर कुल जमाव घेऊन नेताजी पालकर सरनोबत मोंगलाईंत स्वाऱ्या करून, बालेघाट, परांडे, हवेली, कल्याण,[2] कलबुर्गे, आवसें, उदगीर, गंगातीर[3] पावेतों मुलूख मारीत चालले. खंडण्या घेतल्या. मुलूख जप्त केला. औरंगाबादचे पुरे मारिले. मोंगलाकडील फौजदार औरंगाबादेंत होता, तो चालून आला. त्याशीं युद्ध जाहालें. हत्ती घोडे पाडाव केले. मोंगलाईंत धुंद उठविली. ऐसा पराक्रम करीत चालले.[4]

१. मोठी, वैभवसंपन्न. २. कल्याणी (बिदर). ३. गोदातीर. ४. या सर्व घटना इ. स. १६६२ मधील आहेत. अफजलखानाचा वध इ. स. १६५९ मध्ये झाला. त्यानंतरच्या अनेक घटना सभासदाने दिलेल्या नाहीत. पन्हाळ्याचा वेढा. शिवाजीचें पन्हाळ्यावरून विशाळगडाकडे प्रयाण, बाजीप्रभूचें पावनखिंडींतील दिव्य, सिद्दीचें पारिपत्य इ. घटना महत्त्वाच्या असूनहि सभासदाच्या स्मरणांतून गेलेल्या दिसतात. तो एकदम इ. स. १६६२ मधील घटना देतो.

म. ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थलमत.
अनुक्रम २८३२२ वि: चरित्र...
क्रमांक ८९१ नों. दि: २४/११/६०

### २८. गडांची व्यवस्था

जे जे गड घेतले त्या गडांवर राजियानें कारभारी बंदोबस्ती ऐसी पद्धत घातली कीं, गडावरि हवालदार एक व सबनीस एक व सरनोबत एक, असे तिघेजण एका प्रतीचे. जो कारभार करणें तो तिघांनीं एका प्रतीचा करावा. गडावरि गल्ल्याचें, सामानाचें अंबर[1] करावें. त्यास कारखाननीस[2] म्हणून कारभारी केला. त्याचे विद्यमानें सर्व कारखाने[3] यांस जमाखर्च लिहावा. गड तोलदार आहे तेथें, त्या गडाचा घेरा थोर, त्यां जागां सात पांच तट-सरनोबत ठेवावे. त्यांस तट वांटून द्यावे. हुशारी-खबरदारीस त्यांनीं सावध असावें. गडावरि लोक ठेवावे, त्यांस दाहा लोकांस एक नाईक करावा. 'नऊ पाईक[4] दाहावा नाईक,' येणेंप्रमाणें जातीचे[5] लोक ठेवावे. लोकांत बंदुखी व इटेकरी व तिरंदाज व आडहत्यारी[6] असे लोक मर्दाने चौकशीनें आपण राजियांनीं नजरगुजर[7] [करून] एक एक माणूस पाहून ठेवावें. गडावरि लोक हवालदार व सरनोबत मराठे जातिवंत ठेवावे. त्यांस जामीन आपले हुजरातीस लोक असतील त्यांपैकीं घेऊन मग ठेवावे. सबनीस ब्राह्मण हुजरातीचे ओळखीचे ठेवावे व कारखाननीस परभू ठेवावे. असे एकास एक प्रतिमेळ[8] ठेवावे. एक हवालदाराचे हातीं किल्ला नाहीं. हरएक फितवा-फांदा यास किल्ला कोणाच्यानें देववेना. ये रितीनें बंदोबस्तीनें गड-कोटाचे मामले केले. नवी पद्धत घातली.

१. कोठार. २. कारखाननीस–कारकून. ३. उद्योगशाळा. ४. पायदळांतील सैनिक. ५. जातिवंत ६. सुरे, कोयते इ. हत्यारें वापरणारे. ७. पाहाणी ८. समतोल राखू शकणारे.

### २९ लष्कराची व्यवस्था

तसेंच लष्करांत पागा केली. पागेचें बळ तोलदार केलें. पागांच्या तोलदारीखालीं शिलेदार ठेविले. स्वतंत्र बंड कोणाचें चालेना. पागेमध्ये दर घोड्यासि बारगीर एक. [असे] पंचवीस बारगिरांस

मराठा धारकरी हवालदार एक केला. पांच हवाल्यांचा एक जुमला[१] म्हणून नांव ठेविलें. जुमालदारास पांचशे होन तैनात व पालखी त्यास एक, व (त्याच्या) मजुमदारास[२] शें सवाशें होनांची [ तैनात ] करावी. पंचवीस घोड्यांस एक पखालजी व एक नालबंद. असे दाहा जुमले म्हणजे एक हजारी. यास एक हजार होन तैनात, एक मजुमदार व एक मराठा कारभारीं व एक जमनीस[३] परभू कायस्थ. त्यांस पांचशें होन. याप्रमाणें असामींस तैनात [ व ] पालखी द्यावी. आला जमाखर्च चौघांचे विद्यमानें करावा. अशा पांच हजारिया मिळोन एक पांचहजारी करावा. त्यास दोन हजार होन तैनात. तसेच मजुमदार, कारभारी, जमनीस करावे. अशा पांचहजारिया सरनोबताच्या हुकुमांत. ये जातीचा मामला पागेचा. तसे शिलेदाराकडे सुभे वेगळाले, तेही सरनोबताचे आज्ञेंत. पागा (व) शिलेदार मिळोन सरनोबत याचे आज्ञेंत वर्तावें. दर हजारी, पंचहजारी, सरनोबत यांजवळून वाकनिसीचे कारकून व हरकारे व जासूद ठेवावे. सरनोबताजवळ बहिरजी जाधव नाईक, मोठा शाहाणा, जासुदांचा नाईक केला. तो बहूत हुशार चौकस करून ठेविला.

१ : १२५ बारगिरांची तुकडी. २ वसूली कारकून. ३ मुलकी कारकून.

### ३०. लष्कराची शिस्त

लष्कर पावसाळिया दिवशीं छावणीस आपले देशांत यावें. त्यास दाणा, रतीब, औषधें, घोडियांस (व) लोकांस घरें, गवतानें शाकारून ठेवविलीं असावीं. दसरा होतांच छावणीहून लष्कर कूच करून जावें. जातेसमयीं कुल लष्करचे लहान थोर लोकांचे बिशादीचे[१] जाबते[२] करावे, आणि मुलुखगिरीस जावें. आठ महिने बाहेर लष्करांनीं परमुलखांत पोट भरावें. खंडण्या घ्याव्या. लष्करांत बायको व बटकी व कलावंतीण नसावी. जो बाळगील त्याची गर्दन मारावी. परमुलखांत पोर बायका न धरावीं. मर्दाना सांपडला तरि धरावा. गाई न धरावी. बईल ओझ्यास मात्र धरावा. ब्राह्मणांस

उपद्रव न द्यावा. खंडणी केल्या जागां ओळखियासि ब्राह्मण न घ्यावा. कोणी बदअमल[३] न करावा. आठ महिने परमुलखांत स्वारी करावी. वैशाखमासीं परतोन छावणीस येतांच आपले मुलखाचे सरदेश[४] कुल लष्कराचा झाडा घ्यावा. पूर्वील बिशादीचे जाबते रुजू घालावे. ज्याजती[५] होईल तितकी किंमत करून त्याच्या हक्कांत धरावी. थोर किंमतीची वस्तभाव असलियास दिवाणांत[६] द्यावी. कोणी चोरून ठेवील आणि दाखल सरदारास जाहलियानें शासन करावें. लष्कर छावणीस अलियावर हिशेब करून सोनेंरुपें, जडजवाहीर व कापड वस्तभाव कुल सरदारांनीं बराबर घेऊन राजाचे दर्शनास जावें. तेथें अवघे हिशेब समजावून माल हुजूर द्यावा आणि लष्करच्या लोकांचे हिशेब देणें, [ व ] फाजील समजावीस जो ऐवज जो मागणें तो हुजूर मागावा. मग छावणीस यावें. काम, कष्ट मशागत[७] केलिया लोकांस सरंजाम करून द्यावा. बेकैद[८] वर्तणूक कोणीं केली असेल आणि नामर्दी केली असेल त्यांची चौकशी करून, बहुतां मतें शोध करून, त्यास दूर करून शासन करावें. वरचेवर शोध करावा. चार मास छावणी करावी आणि राजाचे भेटीस दसऱ्यास जावें. राजियाच्या आज्ञेनें ज्या प्रांतीं स्वारी जावयाची होईल त्या प्रांतीं जावें. अशी लष्करची रीत.

१ मालमत्ता. २ टिप्पण, यादी. ३ गैरवर्तणूक. ४ हद्द, शींव. ५ वाढ, ज्याजती→जास्त). ६ सरकारांत. ७ मेहनत, कष्ट ८ बेकायदेशीर.

### ३१. मावळे सैन्याची व्यवस्था

तसेंच मावळे लोकांत दाहा लोकांत एक नाईक. पन्नास लोक म्हणजे पंच-नायकी यास एक हवालदार. दोन तीन हवाले मिळून एक जुमलेदार. दाहाजुमले मिळून एक हजारी. जुमलेदारास शंभर होन तैनात सालीना. एक सबनीस, त्यास चाळीस होन तैनात. हजारी यास पांचशें होन तैनात. (त्याच्या) सबनिसास शंभर सवाशें होन पर्यंत. ऐशा हजारियांस (नेमणूका केल्या.) सात हजारिया

मिळोन एक सरनौबत येसजी कंक म्हणून केला. याचे आज्ञेंत सर्वांनीं असावें.

### ३२. मोकासे कोणास देणें नाही

सरनौबतास व मजुमदारास व कारकुनांस व हुजुरांतील लोकांस तनखे वराता[१] देत होते. शेत करीत होते त्याचा आकार रयतेप्रमाणें त्यांच्या हक्कांत धरीत होते. वरकड वांटणी हुजूर व मुलुकावरि वराता. येणेंप्रमाणें सालझाडा[२] वरचेवर करीत होते. लष्करांत व हशमास व गडास एकंदर मोकाश[३] महाल गांव दरोबस्त देणें नाहीं. जें देणें तें वरातेनें द्यावें. अगर पोत्याहून[४] रोख ऐवज द्यावा. मुलखांत साहेबी[५] कारकुनाखेरीज कोणाची नाहीं. लष्करास व हशमास व गडास देणें तें कारकुनांनीं द्यावें. मोकाशी जाहालियानें रयत अफरा[६] होईल आणि बळावेल. कमाविशीची[७] कैद[८] चालणार नाहीं. रयत बळावली म्हणजे जागां जागां बंडें होतील. ज्यास मोकासे द्यावे तो व जमीनदार एक जाहलियानें बेकैद होतील. म्हणून मोकाशे कोणास देणेचे नाहींत.

१. हुंडी, पैसा देण्याविषयींची चिट्ठी. २. वार्षिक वाटणी, तपासणी. ३. मोकाश-महाल-गांव = इनाम जहागीर, गांव, प्रांत. ४. सरकारी खजीना. ५ अम्मल. ६ अव्यवस्था, गोंधळ. ७ मुलकी अधिकारी (नागरी अधिकारी) ८ कायदा.

### ३३. राज्यव्यवस्थेंतील बारकावे

मुलूख काबीज होतो त्यास मुलखास सरबरा[१] चौकशीस कारकून ठेवावा. आधीं लिहिणार चौकस दप्तरदारी करून, कागदघडणी[२] (?) करून, मोकासबा[३] दिला म्हणजे दप्तरदारीमध्यें शाहाणा पाहून मुलुखांत ठेवावा आणि माहालची मजमू[४] सांगावी. कोणास माहालचा हवाला सांगावा. कोणास सुभ्याची मजमू सांगावी. पुढें होतां होतां शाहाणा पाहून हवालदार चौकस पाहून सुभा द्यावा.

सुभ्याचा मजमुदार लिहिणार, चौकस, हिशेब जाणता त्यासच मामला माहालाचा सांगावा. केवळ लिहिणें येईना, कमाविशी न केली, त्यास मुलकीचा हुद्दा न सांगावा आणि पादशाहींत चाकरी करणें अगर घोडें घेऊन शिलेदारी करणें, असें सांगोन निरोप द्यावा. मुलखास कारकून ठेवावे, त्यांस माहाल पाहून हवालदारास तीन होन तैनात अगर चार पांच होन इतकी तैनात; मजमुदारास तीन चार पांच, पन्नास पाऊणशें होन, येणेंप्रमाणें करावें. दोन माहाल मिळोन लाख, सव्वा लाख, पाऊण लाख होन पाहून एक सुभेदार व एक कारकून करावा. त्यास दर असामीस चारशें होन तैनात करावी. मजमुदार सुभ्याचा करावा त्यास शंभर सवाशें होन करावे. सुभेदारास पालखी चारशें होनांत करार करवावी. मजमुदारास अबदागिरी द्यावी. तैनात सरकारची द्यावी. पादशाहींत छत्री वजिरी उमराव मातबर लोकांस होती, तो शिरस्ता मोडून टाकिला; कीं पादशाहावर छत्र आणि चाकर लोकांवरही छत्र, ही गैर-पद्धत. याकरितां पादशाही कायदा छत्रीचा मोडून अबदागिरीचा घातला. सर्वत्र लष्कर, हशम मुलुखगिरीस (जातील) त्यांत भर सवाशें होन तैनात असेल त्यानें अबदागिरी बाळगावी. मुलुखांत देश पाहून लाख रुपयास सुभा ठेविला. धामधुमीचा मुलूख सरदेचा[५] पाहून मुलुखगिरीच्या कारकुनासमागमें लष्कर, स्वार, हशम जे जागां जितकी तोलदारी पाहिजे तितकी करून द्यावी.

१ सुव्यवस्था. २ कागदघडणी – डॉ. सेन याचा अर्थ One who has drafted papers असा देतात; राज्यव्यवहारांतील 'पत्रें', आज्ञा लिहिणारा. ३ मोसबा असा पाठ हवा. मोसबा – हिशेब. ४ वसुलीचें काम ५ सरहद्द, सीमा.

### ३४. अंमल राजाचा; जहागीरदार, जमीनदार यांचा नाही

(तशीच) मुलखाची जमीन मोजणी करून धुरंग,[१] झाड, चावर करून आकार केला. पांच हात व पांच मुठींची काठी. हात चवदा

तसूंचा असावा. हात व मुठी मिळून वैशी तसूंची लांबी काठीची. वीस काठ्या औरस चौरस त्यांचा बिघा एक. बिघे एकशें वीस त्यांचा एक चावर. अशी जमीन मोजून, आकारून गांवची गांवास मोजून चौकशी केली. बिघेयास पिकाचा आकार करून पांच तक्षिमा[2] पिकाच्या करून तीन तक्षिमा रयतेस द्याव्या. दोन तक्षिमा दिवाणांत घ्याव्या. येणेंप्रमाणें रयतेपासून घ्यावें. नवी रयत येईल त्यास गुरें ढोरें द्यावीं. वीजास दाणा पैका द्यावा. भक्षावयासि दाणे पैका द्यावा. तो ऐवज दोहों चोहों वर्षांनीं आयुर्दाव[3] पाहून उगवून घ्यावा. ये जातीचें रयतेचें पालग्रहण करावें. गांवचा गांव रयतेची रयत कारकुनानें कमावीस पाहून रयतेपासून वसूल पिकाचे पिकावर घ्यावा. मुलखांत जमीदार, देशमुख व देसाई यांचे जप्तीखालीं कैदेंत[4] रयत नाहीं. यांणीं साहेबी करून नागवीन म्हटलियानें त्यांचे हातीं नाहीं. इदलशाही, निजामशाही, मोंगलाई देश कबज केला, त्या देशांत मुलकांचे पाटील कुळकर्णी यांचे हातीं [ व ] देशमुखांचे हातीं कुल रयत. यांणीं कमाविसी करावी आणि मोघम टक्का द्यावा. हजार दोन हजार जे गांवीं मिरासदारांनीं घ्यावे, ते गांवीं दोनशें तीनशें दिवाणांत खंडमक्ता द्यावा. त्यामुळें मिरासदार पैकेकरी होऊन गांवास हुडे,[5] वाडे, कोट बांधून प्यादे बंदुखी ठेवून बळावले. दिवाणास भेटणें नाहीं. दिवाणानें गुंजाईस[6] अधिक सांगितल्यानें भांडावयास उभे राहातात. ये जातीनें पुंड होऊन देश बळाविले. त्यास राजियानें देश काबीज करून हुडे, वाडे, कोट पाडिले. नामांकित कोट जाहाला तेथे (आपलें) ठाणें ठेविलें. आणि मिरासदारांचे हातीं नाहींसें ठेविलें. असें करून मिरासदार इनाम इजारतीने[7] मनास मानेसारखें आपण घेत होते तें सर्व अमानत[8] करून जमीदारास गल्ला व नक्त गांव पाहून देशमुखास व देशकुळकर्णी यांस व पाटील कुळकर्णी यांसि हक्क बांधून दिला. जमीदारांनीं वाडा बुरजांचा बांधूं नये. घर बांधून राहावें. ऐसा मुलकाचा बंद केला.

१ धुरंग, झाड, चावर हीं जमिनीचीं मापें आहेत. २ वाटा, हिस्सा. ३ साधनसामग्री, सांपत्तिक परिस्थिति. ४ कायद्यांत. ५ बुरुज. ६ कूस, कमीजास्त देण्यास अवसर (असणें). ७ खंडाची पद्धति, मक्तेगिरी. ८ अमान्य, रद्द.

### ३५. देवस्थानांची व ब्राह्मणांची व्यवस्था

मुलखांत देव देवस्थानें जागजागां होतीं त्यांस दिवाबत्ती, नैवेद्य, अभिषेक, स्थान पाहून यथायोग्य चालविलें. मुसलमानांचे पीर, मसिदी, त्यांचे दिवाबत्ती नैवेद्य स्थान पाहून चालविलें. वैदिक ब्राह्मण यांसि योगक्षेम ब्राह्मण विद्यावंत, वेदशास्त्रसंपन्न, ज्योतिषी, अनुष्ठानी, तपस्वी गांवोगांवीं सत्पुरुष पाहून त्यांचें कुटुंब पाहून अन्नवस्त्र ज्यांस लागेल त्याप्रमाणें, धान्य द्रव्य त्यांस गांवचे गांवीं माहालीं नेमून देऊन, साल दरसाल त्यांस कारकुनांनीं पाववावें. ब्राह्मणांनीं तें अन्न भक्षून, स्नानसंध्या करून, राजियासि कल्याण चिंतून सुखरूप असावें. असे गड, कोट, लष्कर, हशम, मुलूख हुजरातीची चौकशी करून राज्य करीत चालले.

### ३६. शास्ताखानाची दक्षिणेस रवानगी

मोंगलाईत धुंद उठविली ही खबर दिल्लीस औरंगजेब पादशाहास कळोन, मनांत बहूत चिंतातुर होऊन, 'शिवाजी बळाविला; विजापूरच्या अफजलखानासारखी फौज, बारा हजार स्वार, बुडविले; गडकोट पादशहाचे घेत चालिला; त्याची तरतूद काय करावी ?' म्हणून विचार करून, कुल वजीर उमराव बोलावून आणून एक लाख सुभा फौज घोडा राजियावर दक्षिणेस रवाना करावा म्हणून विचार करितां, नबाब शास्ताखान म्हणजे पादशाहाची प्रतिमाच दुसरी, आणि नातलग, याची रवानगी करावी असा मजकूर करून नबाबास बोलावून आणून विचार केला. नबाब बोलला जे, 'शिवाजी म्हणजे काय ? त्यासि जातांच कैद करतों. गड कोट मुलूख घेऊन फत्ते करितों.' अशा कित्येक गोष्टी बोलून सिद्ध जाहाले. उपरांत पादशाहा बहूत संतोष होऊन शिरची[१] कलगी[२] व पोशागी[३] सनगें[४] व घोडे, हत्ती अलंकार देऊन खुशाली केली. बराबरि पाऊण लाख घोडा व हत्ती, यांखेरीज कित्येक लोक मुच्छदी वगैरे, तिरंदाज, बरखंदाज, रजपूत व स ती ली[५] वाले [ ? ] तसेच हत्तीचा तोफखाना, उंटाचा तोफखाना,

घोडियावरील तोफखाना, बरचीवाले, आडहत्यारी,[६] पाईच्यांची गणतीच नाहीं. बराबरि फरासखाना[७] त्यासि शंभर हत्ती, तसेच भांडते हत्ती चारशे, असे पांच सहाशे हत्ती. तसेच अगणित उंट. याखेरीज बाजारबुणगे, दारूगोळी, बाणांच्या[८] भांडत्या गाड्या, आराबा.[९] असें अमर्याद सैन्य दिलें. स्वारी म्हणजे कलीयुगींचा रावणच! जैशी रावणाची संपत्तीची गणना न करवे, तैसाच बरोबरी खजीना, बेमोहिन[१०] हत्ती, उंटें, खेचरें, गाडियावरी भरून नख्त व सोनें, रुपें, मोहरा, होन, रुपये असे बत्तीस कोटी द्रव्य घेऊन दिल्लीहून निघाला. नबाब शास्ताखान म्हणजे पादशाहाची प्रतिमाच दुसरी. ऐसा सेनासमुद्र सर्व संपत्तीनिशीं दक्षिणेस राजियावर चाल करून आला. लष्कर मुक्काम करीत तेव्हां दोन गांवें[११] लांब व दीड गांव रुंद लष्कर राहात असे. मजल दरमजल चालून येऊन तीन महिन्यांनी पुणियास आला.

१ रत्नजडित तुरा. २ पागोटें. ३-४ 'पोशागी सनगे' याचा अर्थ डॉ. सेन dress of honour असा देतात. ५ समतोल हत्यारवाले (वाकसकर). हा शब्द 'सतेलवाले' असा असावा. याचा अर्थ पाणी वाहून नेणारे' (डॉ. सेन : रा. ब. गुप्ते यांची टीप) ६ सुरे, कोयते इत्यादि हत्यारें वापरणारे. ७ तंबू, जाजमें, खुर्च्या आणि बैठकीची व्यवस्था करणारें खातें व या खात्याची जागा. ८ दारूचे बाण भरलेले गाडे. ९ तोफखाना १० अगणित. ११ गांव-चार कोस. हा शब्द महानुभाव वाङ्मयांत याच अर्थाने आला आहे. (गो. प्र. चरित्र)

### ३७. शिवाजीचा शास्ताखानाच्या महालावर छापा

हें वर्तमान दिल्लीहून रवाना होतांच राजियासि कळलें. राजे राजगडास होते. कुल सरकारकून व मोठे मोठे लोक सरनोबत बोलावून विचार केला. सर्वांचे मतें कीं, 'सला करावा. भेटावें. युद्ध करितां गांठ' न पडे. आपली फौज काय, दिल्लीची फौज काय!' असा [विचार] जाला. राजियाच्या मतें सला करावा

तरि कोणी मातबर रजपूत नाही, जे आपणही रजपूत, तेही रजपूत, हिंदूधर्म रक्षून आपलें संरक्षण करील. शास्ताखान म्हणजे मुसलमान, पातशाहाचा नातलग, येथें लाचलुचपत चालेना. अगर आपणास रक्षीना. सल्याने भेटल्याने नाश करील. आपणास अपायच आहे. ऐशी तजवीज[२] केली. तेव्हां निदानीं मारतां जें होईल तें करावें अशी हिम्मत राजियानें धरिली. तों ते दिवशीं रात्रीं श्री भवानी राजियाचे आंगांत[३] बोलूं लागली की, 'लेंकरास म्हणावें कीं, शास्ताखान येतो त्याची फिकीर न करणें. जैसा अफजलखान मारिला तैसा शास्ताखान येऊन उतरल्यावरि त्याचे गोटांत शिरून मारामारी करणें. पराभवातें पावविटयें.' असें श्रीनें सांगोन मागती राजे सावध जाहाले. जवळ कारकून होते त्यांनीं श्रीचीं वाक्यें लेहून ठेविलीं होतीं तीं राजियास सांगितलीं. राजियांनीं श्री प्रसन्न जाहाली हें कळोन हिम्मत धरली. आणि आपले लष्करांत व मावळे व हुजूर लोकांत निवड करून, चखोट[४] धारकरी माणूस निवडिले. निवडक हजार माणूस काढिले. वरकड लष्करामध्यें हजार दोन हजार सडे सडे राऊत फौजेंत निवडिले. शास्ताखान पुणियास आला ही खबर तहकीक[५] आणविली, आणि राजे राजगडावरून सडे होऊन खालीं उतरून, निवडक लोक व लष्कर घेऊन चालिले. बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी देशकुळकर्णी, तर्फ[६] खेड, हे दोघे बहूत शाहाणे व शूर, राजियाचे प्रीतिपात्र. हे दोघे बंधू बरोबरी घेतले. राजियांनी नेताजी पालकर व मोरोपंत पेशवे, यांच्या दोन फौजा केल्या. नेताजी पालकर पागा देखील[७] एक फौज केली. शिलेदार व हशम मावळे मिळोन एक फौज पेशवे (यांची). अशा दोन फौजा शास्ताखानाच्या गोटाबाहेर अर्ध कोशावर दोन तर्फा उभ्या केल्या. आणि खासा राजियांनीं ढाल तलवार हातीं घेऊन, तयार होऊन, हजार माणूस बायउतारा[८] बरोबर घेतले. आणि नबाबाचे गोटांत चालिले. बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी खेडकर पुढे चालिले. त्यांचे पाठीवर कुल लोक व राजे चालिले. तांब्रांचें[९] दळ थोर, जागां

जागां लष्करांत राजियासि कोणाचे लोक? कोण? कोठें गेले होते? म्हणून पुसतात. 'कटकांतील लोक, चौकी पहाऱ्यास गेलों होतों,' असें भाषण बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी बोलत चालिले. इतकियांत मध्यान्ह रात्र जाहाली. नबाबाच्या डेऱ्याजवळ गेले. हजार माणसांच्या फौजा केल्या. डेऱ्यास जाऊन दोन तर्फांनीं उभे राहिले. दोनशें माणूस त्यामध्यें निवडून खासा राजियानें आंगेच चिमणाजी बापूजीस सांगोन बाड[१०] कटारीने चिरून आंत शिरले. तों डेरियांत डेरे, सात बाडांचे फेरे, तितकेही फोडून चिरून आंत गेले. लोक चौकीचे निजले होते. त्यांस कळों दिलें नाहीं. तेव्हां राजा खासा नबाबाचे डेरियासि पावले. डेरियांत डेरे सात व दाया असा समुदाय बायका होत्या, त्यांस कळलें कीं गनीम डेरियांत आला. हें कळोन नबाब शास्ताखान घाबिरा होऊन, मेणबत्त्या समया विझवून बायकांत लपून राहिला.[११] राजा बायकांवर हात न करी. असे दोन घटका होते. इतक्यांत सवड पाहून नबाब बायकांतून एकीकडे होऊन तरवारीस हात घालावयासि गेला. ती नदर राजियानें धरून वार केला. खानाचीं बोटें तीन उडालीं. तेव्हां गलबा थोर जाहाला. गनीम आला असें कळून चौतर्फांनीं लष्कर तयार जालें. मग राजे बाहेर निघाले. चौकीचे लोक व लष्करचे लोक गनीम कोठें म्हणून धाऊं लागले. त्यांजबरोबर हेही गनीम कोठें म्हणोन धांवत धांवत बाहेर निघाले! आणि आपली फौज सरनौबत व पेशवे होते त्यांत मिळून चालिले. गनिमांची फौज कुल तयार होऊन आपले गोटांतच शोध करूं लागले. यांचा मार्ग लागत नाहीं म्हणून नीट वाटेनें निघोन ठिकाणीं पावली.

---

१ गांठ न पडे – टिकाव लागणार नाही २ विचार, योजना. ३ भवानी देवी शिवाजीच्या अंगांत येऊन बोलत असे अशी कल्पना. (प्रस्तावना पहा) ४ उत्तम, कुशल, चोख. ५ पक्की. ६ शिवापूरजवळील खेडास खेडेबारें हें नांव आहे. तर्फ – तालुका, पेटा. ७ सह. ८ पायीं चालणारे. ९ यवन. १० कनात ११ या ठिकाणीं खानाच्या डेऱ्यांतील विस्तृत वर्णन करणारा उतारा अन्य

प्रतीत आहे. खान जनानखान्यांत स्त्रियांसहवर्तमान होता. या परक्यांना पाहून गडबड उडाली. चिमणाजी बापूजीने पांच खोज्यास मारून पुढे चाल केली. तेथे कांही लढाऊ स्त्रिया होत्या, त्यांनी हत्यार चालविलें इत्यादि.

## ३८. शास्ताखानाने शिवाजीची धास्त घेतली

दिवस उगवलियावर उपरांत नबाबाच्या परामृषास[1] कुल वजीर आले. पाहातात तों नबाबाचीं तीन बोटें तुटून गेलीं. वरकड कित्येक लोकांचा नाश व बायकांस व खोजेयांसि[2] जखमा जाहाल्या. कित्येक लोक मेले. असें कळून नबाब बोलिला जे, 'गनीम इतका खाशा डेऱ्यापर्यंत येई तों कोणी वजीर हुशार जाले नाहीत, खबरदार कोणी नाहीं. अवघे फितव्यांत[3] मिळाले. आतां इतबार[4] कोणाचा येत नाहीं. आज राजा येऊन आपलीं बोटें तोडिलीं. उद्यां मागती येऊन आपलें शीर कापून नेईल. शिवाजी मोठा दगेखोर आहे. दगा दिधला, आणखी दगा देईल. आमच्या लष्करचा इतबार येत नाहीं. आतां येथून कूच करून माघारां दिल्लीस जावें. या लोकांबरोबर आपणास राहावत नाहीं.' असा तूट[5] विचार करून तिसरे दिवशीं कूच करून माघारा दिल्लीस चालला.

१ परामर्ष, कुशल विचारणें. २ जनानखान्यांतील रखवालदार. (नपुंसक बनविलेले पुरुष रक्षक). ३ फितूर, शैथिल्य. ४ विश्वास. ५ कचखाऊ, पराभूत मनोवृत्तीचा, अदूरदर्शी.

## ३९. शिवाजीचा आनंदोत्सव

राजे राजगडास आले होते. बातमी खबर शत्रूच्या सैन्यांतून आणली कीं, 'शास्ताखानाचीं तीन बोटें तुटोन गेलीं. उजवा हात थोटा जाहाला. वरकडही कित्येक लोक मेले. नबाब दहशत खाऊन पळोन दिल्लीस चालिला.' हें वर्तमान आलें. त्याजवरून राजे बहुत खुशाल जाले कीं, 'फत्ते होऊन आलों. शास्ताखानास शास्त[1]

केली. पातशाहानें नांव ठेविलें परंतु नांव यथार्थ ठेविलें नाहीं. तें नांव आपण शास्त करून नांव रुजू[2] केलें!' अशी खुशाली करून साखरा वाटल्या. भांडीं[3] मारलीं.

१ शासन. २ यथार्थ. ३ तोफा.

## ४०. औरंगजेबाची बेदिली; राजा जयसिंगाची योजना

अशी फत्तेची खबर दिल्लीस पादशाहास अगोदरच जाहीर जाहाली होती. पातशाहा मनांत आश्चर्य करून मनांत बेदील जाले. 'नबाबाची फौज म्हणजे काय, आणि फौजेंत राजा आंगें शिरून (त्यानें) मारामारी केली म्हणजे काय! शिवाजी अदमी नव्हे, बडा सैतान होय.' ऐशा कित्येक गोष्टी बोलून राहिला. पुढें नबाब आला ऐसें कळोन दर्शन वर्ज्य केलें.[1] एक तर मसलत नामोहरम जाहाली, दुसरी शास्त केली या दोन गोष्टींवरून भेटीस येऊं न दिलें. आपले हवेलींत जाऊन राहाणें म्हणून सांगितलें. त्याजबरोबरि वजीर गेले होते त्यांस आणून अपमान केला आणि दौलती मना केल्या. त्यांहीं उत्तर दिलें जे, 'सरदार पादशाहांनीं दिला त्याच्या हुकमांत राहाणें म्हणून हुकूम केला. त्या करितां सरदार नामोहरम होऊन आला, आम्हीं काय करावें? आतां मर्दाना सरदार देणें. त्याजबरोबरि जाऊन जुंज करून कस्त[2] मशागत[2] करूं.' असें उत्तर देतांच मागती सर्वांचा दिलासा करून मनसबा[3] करार[4] केल्या. पुढें कोण सरदार पाठवावा? कोण फत्ते करून येईल? असा विचार करून सरदार निवडितां मिरजाराजा जयसिंग रजपूत निवडिला. त्यास आणून, घुशालखान्यांत[5] बसोन पादशाहांनीं नानाप्रकारें सांगितलें कीं, 'शिवाजीवर तुम्हीं जाणें. आपण पादशाहांनीं जावें किंवा तुम्हीं जावें. असें जाणोन तुम्हांस रवाना करतों. बरोबरि फौज देतों. नाना हुन्नरें शिवाजी हस्तगत करून बरोबरि घेऊन येणें.' म्हणोन हत्ती, घोडे, ढाला, फिरंगा, तर्कशकमान,[6] दौलत, इजाफा[7] देऊन, नांवाजून, तैसेच बरोबरि लढाईच्या तश्रीफा[8] देऊन रवाना केले. दिलेलखान पठाण उमराव वजीर मोठा

जोरावर त्यास पादशहांनीं कुल फौजेची हारोळी[९] देऊन, पांच हजार पठाण बरोबरि दिले. दिलेलखानासही हत्ती, घोडे, वस्त्रें दिलीं. ऐशीं हजार स्वार बरोबरि दिले. याखेरीज जेजाला व तोफखाना असें नाना जातीचें दिलें. स्वार पठाण उन्माद रजपूत रवाना केले. पादशाहांनीं दिलेलखानास वेगळे वाटेनें अंतस्थीं बोलावून आणून सांगितलें कीं, 'मिरजाराजा रजपूत आहे व शिवाजी हा हिंदु आहे. कांहीं फितवा करतील. त्यास तुम्ही आपले इतबारी[१०], पादशाहाचे खानाजाद[११] आहां अशी बातमी राखोन दगा न खाणें' असें सांगितलें आणि पाठविलें.

---

१. शास्ताखानाची हकीगत समजतांच औरंगजेब अतिशय चिंतातुर झाला. खानावर त्याची इतराजी झाली. त्याने बंगाल प्रांतावर परस्पर त्याची नेमणूक केली. दिल्लीला बादशहाला न भेटतां तो बंगालकडे गेला. बंगाल प्रांतावर नेमणूक करणें म्हणजे मोठी शिक्षाच समजत असत.

२. श्रम, कष्ट. ३. हुद्दा. ४. करार–ठराव. ५. खलबतखाना. ६. धनुष्य. ७. इनाम, वाढ. ८. पोषाख. ९. आघाडी. १०. विश्वासू. ११. खानाजाद–दासीपुत्र, घरांत वाढलेला, वंशपरंपरा नोकर.

### ४१. जयसिंगाचें दक्षिणेकडे प्रयाण; शिवाजीच्या पारिपत्यासाठी होमहवन

ते दिल्लीहून निघाले तेव्हां पूर्वी शास्ताखान चालिला त्याप्रमाणें दळभार निघाला. पृथ्वी-आकाशापर्यंत एकच धुरळा उठला. ऐसा सेनासमुद्र दक्षिणेस चालिला. मजल-दर-मजल चालिले. मुकाम होय तेथें दीड गांव[१] लांब, गांवभर रुंद, लष्कर राहात असे. तेव्हां जयसिंग राजियांनीं मनांत विचार केला कीं, 'शिवाजी मोठा दगेखोर, मोठा हुन्नरवंत आणि मर्दाना शिपाई आंगाचा[२] खासा आहे. अफजलखान आंगे मारिला. शास्ताखानाच्या डेऱ्यांत शिरोन मारामारी केली. आपणास यश कसें येईल?' म्हणून चिंता केली. तेव्हां मोठमोठे ब्राह्मण पुरोहित यांनीं उपाय सांगितला. 'देवी-प्रयोगीं अनुष्ठानें

करावीं म्हणजे यश येईल?' असें सांगितलें. मग मिरजा बोलिला जे, 'कोटचंडी[३] करावी आणि अकरा कोट लिंगें करावीं. कामनार्थं बगळामुखी[४] कालरात्री प्रीत्यर्थ जप करावा. असें अनुष्ठान करावें.' चारशें ब्राह्मण अनुष्ठानास घातले. प्रत्यहीं अनुष्ठान चालिलें. अनुष्ठानास दोन कोट रुपये अलाहिदा काढून ठेविले. आणि तीन मास अनुष्ठान चालून सिद्ध केलें. अनुष्ठानाची पूर्णाहुती करून, ब्राह्मणांस दान दक्षिणा देऊन संतर्पण केलें. मग मजल-दरमजल चालिले.

१. चार कोस. २. स्वतः मोठा लढवय्या आहे. ३. देवीचें कोटी अनुष्ठान. ४ एक देवता.

## ४२. शिवाजी महाराजांची चिंता

या उपरि महाराज राजगडीं[१] होते तों जासूद हलकारे आले. त्यांनीं खबर सांगितली कीं, 'जयसिंग मिरजाराजा ऐशीं हजार स्वार बरोबरि दिलेलखान पांच हजार पठाण ऐशी फौज येत आहे.' ऐसें ऐकोन राजश्री विचारांत पडले. आपले कारकून हुजूर आणून विचार केला. त्यांणीं सर्वांनीं सांगितलें कीं, 'अफझलखान मारिला आणि शास्ताखानास दगा दिला ते गैरहुशार मुसलमान होते. हुन्नरही नवाच केला. [ते] सर्वही रजपुतास जाहीर आहे. दगा करूं देणार नाहीं. याशीं सला करावा.' ऐसें बोलिले. राजे बोलिले जे, 'रजपूत कैसा तरी वळला जाईल, परंतु हा दिलेलखान मोठा हरामजादा,[२] बेमान आहे. पादशाहाचा मेहेरबानीचा अंतर्गत आहे. तो कांहीं भला नाहीं. तोच काय करील तें न कळे. तो बराबरि नसता तरि आमचा मनोरथ[३] पूर्ण होता. बरें आतांच काय आहे! श्रीचें राज्य! श्रीवर भार घातला आहे. तिचें चित्तास येईल तें ती करील,' असें बोलिले. त्यावर तो दिवस गेला. दुसरे दिवशीं श्रीभवानी येऊन बोलूं लागली कीं, 'अरे मुला, या वेळेचा प्रसंग कठीण आहे. जयसिंगास मारवत नाहीं. तो सला करीत नाहीं, भेटावें लागतें. भेटून दिल्लीस जावें लागेल. तेथें कठीण प्रसंग होईल. परंतु आपण बराबर येईन. लेंकरास नाना यत्नें करून रक्षून, घेऊन

येईन. यशस्वी करीन. चिंता न करणें. म्हणोन लेंकरास सांगणें. लेंकरास आपलें राज्य आपण वरदान दिलें तें आपण कांहीं एक पिढी दिलें नाहीं, सत्तावीस पिढी दिलें. दक्षणेचें (राज्य) नर्मदापर्यंत दिलें असे. राज्याची चिंता मला आहें. पूर्ण समजणें. लेंकरू वेडी-वाकडी वर्तणूक करील तें सर्व आपणास सावरणें लागतें. कोणेविशीं चिंता न करणें.' असें सांगोन श्री अदृश्य जाहाली. तीं वाक्यें लिहिणारांनीं लिहून ठेविलीं होतीं. त्याउपर राजे सावध जाहाले. मग श्रीचीं वाक्यें सर्वांनीं निवेदन केलीं, त्याजवरून राजे बहूत संतोष होऊन, हिंमत धरली.

१. या वेळीं शिवाजी महाराज रायगडावर होते. २. धूर्त, लबाड. ३. या वाक्यावरून शिवाजीच्या धोरणावर प्रकाश पडतो. दिलेलखान स्वारीबरोबर नसता तर आपला मनोरथ पूर्ण होता असें तो म्हणतो. जय-सिंगाशीं हिंदुत्वाच्या नात्याने बोलणें करून मोंगली सत्तेविरुद्ध हिंदुसत्ता संघटित करण्याचा त्याचा मनोरथ स्पष्ट दिसतो. शिवाजीने जयसिंगाला लिहिलेलें काव्यमय पत्र खरें असो वा नसो, शिवाजीच्या अंतरंगावर प्रकाश टाकणारें हें सूचक वाक्य एका समकालीनाने लिहून ठेविलें आहे याला महत्त्व आहे.

### ४३. रघुनाथ पंडिताची रवानगी

ऐशियांत जयसिंग [यानें] पुरंधर, कोंढाणा या दोहों गडांचें दरम्यान येऊन मुकाम केला. आणि राजियाकडे जासूद पत्रें पाठ-विलीं कीं, 'तुम्ही शिसोदे रजपूत. आम्ही तुम्ही एकाचे एकच आहों. तुम्ही भेटीस येणें. तुमचें सर्व प्रकारें बरें करूं.' म्हणोन पत्रें पाठविलीं. तीं पत्रें राजगडास आलीं. राजियांनीं वाचून हेजीब कोण पाठवावा ही तजवीज करून विचार करितां रघुनाथ पंडित[1] थोर संनिध होते त्यांस पाठवावें. 'रजपुताजवळ प्रसंग पडला तर हे थोर शास्त्रज्ञ आहेत. रजपूतही शास्त्र जाणतो. त्याशीं व यांशीं गांठ बरी पडेल.' असा विचार करून रघुनाथ पंडितास पंडितराव[2]

म्हणून किताब दिला. आणि त्यांबरोबर वस्त्रें, अलंकार देऊन मिरजाराजियापाशीं पाठविलें. ते शत्रुसैन्यांत गेले.

१ नल-दमयंती स्वयंवराचा लेखक रघुनाथ पंडित तो हाच होय. हा मोठा मुत्सद्दी असल्याने शिवाजीने त्याला जयसिंगाच्या भेटीस पाठविलें. रघुनाथ बल्लाळ कोरडे आणि रघुनाथ पंडित या दोन भिन्न व्यक्ति आहेत. पहिला पराक्रमी योद्धा होता तर दुसरा मुत्सद्दी पंडित होता. सर जदुनाथ सरकारांनी या दोन व्यक्ति एकच मानल्या आहेत. पण तें बरोबर वाटत नाही.

### ४४. जयसिंगाचें शिवाजीस भेटीचें निमंत्रण

राजियाचा हेजीब आला हें वर्तमान कळून मिरजाराजियांनीं बहूत सन्मान करून भेट घेतली. बोलणें जालें. जयसिंग बोलिला जे, 'दिल्लीचा पादशाहा बहूत जोरावर, याशीं शत्रुत्व लावलियानें शेवट लागणार नाहीं. राजियांनीं आपले भेटीस यावें. आपण बराबर घेऊन जाऊन पादशाहाची भेट करवूं. जैसा रामसिंग आपला पुत्र, तैसे तुम्ही आपले आहां. आपण तुमचें वाईट करणार नाहीं.' येविशीं श्रीकर्पूरगौराची[1] पूजा करून बेल तुळशीं[2] दिल्या. आणि पंडितरायासि वस्त्रें दिलीं व राजियासि वस्त्रें, अलंकार पाठविले. आणि सांगोन पाठविलें कीं, 'भेटीस येणें. साहा चार महिने गड, कोट भांडवणें. तोलदारी दाखवणें. मग भेटीस येणें.[3]' असें सांगून रघुनाथ पंडितराऊ यांस गुप्तरूपें निरोप दिला. ते परतोन राजगडास राजियाजवळ येऊन वर्तमान सांगितलें. त्याजवरून राजे संतुष्ट जाहाले. जागां जागां गड, कोट यांसि ताकीद करून तमाम मजबुदी करविली. आणि गड भांडवणें म्हणून स्थळास्थळास सांगोन पाठविलें.

१ शंकर. २ बेल-तुळशी देणें, आणाभाका करण्याचा एक प्रकार. ३ राजा जयसिंग हा आंतून शिवाजीला अनुकूल असावा, निदान त्याच्याकडे

तो सहानुभूतीने पहात असावा असें या सूचनेवरून वाटतें. पण बखरकाराचें हें म्हणणें ऐतिहासिक माहितीपुढे टिकत नाही. महाराष्ट्रांत येतांच जयसिगानें तांतडीने शिवाजीविरुद्ध युद्धयोजना आखली. पुरंदरवर चाल केली, शिवाजीच्या विरोधकांशी बोलणीं करून त्यांनाहि याच वेळीं उठाव करण्याची सूचना केली; शिवाजीच्या लोकांत फंदफितुरी चालविली. दिलेरखान पुरंदरकिल्ला जयसिंगाच्या इच्छेविरुद्ध लढवीत होता हें म्हणणें मुळीच खरें नाही. 'आपण आतांच जाऊन पुरंदर घेतों, तुम्ही कोंडाणा घ्याल तरी घेणें.' असें रागाने सांगून दिलेरखान जयसिंगापासून निघून गेला हें बखरकाराचें म्हणणें वास्तवतेला सोडून आहे. पुरंदर गड काबीज करण्याच्या सर्व योजना स्वतः जयसिंग आखीत होता. रायसिंग, किरातसिंग, कुतुबखान, मित्रसेन या सरदारांना त्याने दिलेरखानाच्या साहाय्यार्थ पाठविलें होतें. सासवडच्या आसपास राहून जयसिंगाचें सैन्य इतर मराठी प्रदेश उद्ध्वस्त करून गडाकडे सामग्री जाऊं न देण्याचें काम यशस्वीपणें पार पाडीत होतें. आपल्या अटी लादून त्याने शिवाजीला पुरंदरचा तह मान्य करावयास लाविलें. या तहाने शिवाजीला फार मोठा प्रदेश व अनेक नामवंत किल्ले द्यावे लागले. या तहानंतर जयसिंगाने शिवाजीवर **मोगली मसलत** करण्याचा – मारेकरी घालण्याचा विचार केला होता. आपला हा विचार त्याने जाफरखानाजवळ बोलून दाखविला होता. आग्र्याची भेट झाल्यानंतर शिवाजीला परत दक्षिणेकडे पाठविण्याचा बादशहाचा विचार होता. पण राजा जयसिंगाच्या कारस्थानामुळे बादशहाने शिवाजीराजांना आग्र्यांतच कैद करून ठेवलें असा स्पष्ट अभिप्राय श्री. बा. सी. बेन्द्रे देतात. हें सर्व पाहतां सभासदाचें जयसिंगाबद्दलचें मत निराधार वाटतें.

औरंगजेबाची आपल्यावरील खप्पा मर्जी पालटून, त्याला पुन्हा खूष करण्यासाठी त्याने वरकरणी हा सर्व उद्योग चालविला होता असेंहि एक मत रूढ आहे. दिलेरखानाच्या मनांत शिवाजीला मारावयाचें होतें. पण जयसिंगानें त्याचा हा डाव ओळखून शिवाजीला पन्हाळगड घेण्यासाठी पाठविलें आणि मोठ्या हुशारीने दिलेरखानापासून दूर ठेविलें असें मत सर जदुनाथ सरकार देतात.

## ४५. दिलेरखान पुरंदरावर चालून जातो.

पुढें जयसिंगाच्या लष्करांत राजियाचा हेजीब आला होता हें वर्तमान दिलेलखानास कळून मनांत कष्टी जाहाला. 'शेवटीं हिंदूस हिंदू मिळून काम जायां करतील.' ऐसें म्हणून दुसरे दिवशीं दिलेलखान मिरजाराजियाच्या भेटीस आला. आणि बोलूं लागला कीं, 'उगेच काय म्हणून बैसलेत? गोटाजवळ कोंढाणा व पुरंधर हे दोन किल्ले आहेत. पुरंधरास आपण सुलतानढवा[1] करितो, आणि गड घेतों. तुम्ही कोंढाणा गड घेणें. गड घेत चालला म्हणजे शिवाजी येईल.' असें बोलतां, मिरजाराजा बोलला जे, 'गड आले तरि बरें. नाहीं तर नामोश[2] जाईल. याजकरितां गडास न लागावें. मुलूक काबीज करावा. गडास सामान चालों न द्यावें म्हणजे गड आपाप येतील.' असें बोलतां, दिलेलखान रागें उठून चालिला. 'आपण आतांच जाऊन पुरंधर घेतों. तुम्हीं कोंढाणा घ्याल तरि घेणें.' असें म्हणून उठोन, गोटास येऊन, नगारा करून ढाल फिरंग घेऊन, पुरंधराखालें येऊन, मुकाम करून गडावरि येलगार[3] केला. पायउतारा होऊन पांच हजार पठाण व दहा हजार बैले[4] तोफाची पायउतारा जाहाले, पें ढा री [?] व आडहत्यारी व खलाशी लोक वीस हजार लहान थोर पायउतारा होऊन लगट करीत चालले.

१. सुलतानढवा – निकराचा हल्ला करून गड घेणें. 'सुलतानसवारी' असा याच अर्थाचा दुसरा पाठ आहे. २. लौकिक, कीर्ति. ३. हल्ला. ४. पादचारी सैनिक.

## ४६. मुरारबाजीचें पुरंदरावरील दिव्य

तेव्हां पुरंधरावरि नामजाद[1] लोकांचा सरदार राजियाचा मुरारबाजी परभू म्हणोन होता. त्याजबरोबर हजार माणूस होते. याखेरीज किल्ल्याचे एक हजार होते. असे दोन हजार लोक होते. त्यांत निवड करून मुरार बाजी यांनीं सातशें माणूस घेऊन [ते]

गडाखालें दिलेलखानावरि आले. दिलेलखान तोलदार, जोरावर पठाण पांच हजार, यांखेरीज बैले वगैरे लोक ऐशी फौज गडास चौतर्फा चढत होती, त्यांत जाऊन सरमिसळ जाहाले. मोठें घोरांदर युद्ध जाहालें. मावळे लोकांनीं व खासा मुरार बाजी यांनीं निदान[२] करून भांडण केलें. पांचशें पठाण लष्कर ठार जाहालें. तसेच बहिले मारिले. खासा मुरार बाजी परभू दिलेलखानाच्या देवडी[३] पावेतों साठी माणसांनिशीं मारीत शिरले. दिलेलखान देवडीसोडून माघारा जाहाला. आणि लोकांस सांगून तोफखाना व तिरंदाज बरच्या व आडहत्यारी एक हजार लोक यांजकडून मारा करविला, त्यामध्यें साठी लोक पडिले. मुरार बाजी परभू यांनीं ढाल फिरंगी घेऊन दिलेलखानावरि चालोन आले. महाराजांचे नांवाजलेले लोक ते खर्च[४] जाहाले. आतां काय मुख दाखवावें? म्हणोन नीट चालोन जावें असें मनांत आणोन खानाशीं गांठ[५] घातली. तेव्हां दिलेलखान बोलिला जे, 'अरे तू कौल[६] घे. मोठा मर्दाना शिपाई तुज नांवाजितों.' ऐसें बोलतां मुरार बाजी बोलिला जे, 'तुझा कौल म्हणजे काय? मी शिवाजी राजाचा शिपाई, तुझा कौल घेतों कीं काय?' म्हणून नीट खानावरि चालिला. खानावर तरवारीचा वार करावा तों खानानें आपले आंगें कमाण[७] घेऊन, तीर मारून, पुरा केला. तो पडला. मग खानानें तोंडांत अंगोळी घातली कीं, 'असा शिपाई खुदानें पैदा केला.' ऐसें आश्चर्य केलें. मुरारबाजीबरोबर तीनशें माणूस ठार जाहाले. वरकड चारशें माणूस गडावर गेले. दिलेलखानानें शीरची पगडी उतरली. आणि गडावर चालून घेतलें कीं, 'गड घेईन तेव्हां पगडी बांधीन.' ऐसा नेम करून चालिला तो दरवाज्याखालें येऊन, ढालेचा कोट करून बसला. किल्ल्याचे लोक मुरारबाजी पडला म्हणोन गणना न करितां शरतीनें भांडू लागले. 'एक मुरार बाजी पडला तरि काय जालें? आम्ही तैसेच शूर आहों. ऐशी हिंमत धरून भांडतों.'

१. नेमलेल्या, विख्यात. २. निर्वाणीचा लढा. ३. मुक्कामाच्या डेऱ्यापर्यंत. ४. पडले, कामीं आले. ५. समोरासमोर लढणें. ६. शरण आलेल्यास तह करून अभय देणें. ७ धनुष्य

### ४७. शिवाजी जयसिंगाच्या भेटीस जातो

हें वर्तमान राजियासि राजगडीं कळलें कीं, 'दिलेलखानानें पुरंधरास लगट केला. मुरार बाजी परभू पडला. तीनशें माणूस रणास आले.' हें कळोन मनांत चिंतातूर जाहाले कीं, 'गड दिलेलखान जेव्हां घेतो, तेव्हां वरकड किल्ले आपाप जातात. मग आपण भेटल्यानें रूप[1] नाही. जोंवर गड आहेत तोंवर भेटोन आपले होतें जे गड देणें ते देऊन सला करावा, हें उचित.' म्हणोन रघुनाथभट पंडितराऊ मिरजाराजियाजवळ पाठविले कीं, 'आपण तूर्तच भेटीस येतों. दिलेलखानानें गड घेतला, मग भेट जाहाल्यानें ह ल वा री[2] [ ? ] आहे.' असें सांगोन पाठवून भेटीस जावेंसें केलें. पंडितराऊ जाऊन जयसिंगास भेटले. वर्तमान श्रुत केलें. मग त्याणेंही उत्तम म्हणून मागती शफत क्रिया बळकटी केली. आणि पंडितराव राजगडास आले. येतांच खासा राजा हजार माणूस निवडक करून बरोबर घेतले. श्री शंभूस व भवानीस नमस्कार केला व मातोश्रीस नमस्कार केला. भेटले. शिष्ट, तपस्वी ब्राह्मणांस नमस्कार केला. सर्वांचा आशीर्वाद घेऊन गडाखालीं उतरोन चालले. ते एकाएकीं मिरजाराजियाचे गोटांत गेले. पुढें पंडितराव जाऊन सांगितलें कीं राजे आले. ही खबर कळतांच जयसिंग देवडीबाहेर पायउतारा खासा आला. राजे पालखींतून उतरून भेटले. उभयतां जाऊन एकासनीं बैसले. आणि राजे मिरजाराजियासि बोलूं लागले कीं, 'आपण जैसा रामसिंग तैसेच तुम्हांस, त्याचें रक्षण कराल तैसें आपलें करणें.' असें बोलून बैसले. मग जयसिंग बोलला जे, 'हीच गोष्ट खरी. आपण रजपूत, तुम्ही व आम्ही एकजाती आहों. अगोदर आपलें शीर जाईल, मग तुम्हांस काय होणें तें होईल.' असा भरंवसा बोलून शपत वाहिली. मग राजे बोलले जे, 'तुम्हांस जे गड पाहिजेत ते आपण देतों. दिलेलखानास बोलावून आणवणें. पुरंधर तुम्हांस देतों. निशाण तुमचें चढवितों. परंतु मुसलमानास यश देत नाहीं.' अशी गोष्ट बोलल्यावर जयसिंग खुशाल जाहाला. आणि बोलिला जे, 'दिलेलखान फामिदा[3] आहे, बादशाहाचे

मेहेरबानीचा आहे. त्यास मुजरा हातीं करून[४] लागतो. तुम्हीच दिलेलखानाचे भेटीस जावें लागतें. आपण रजपूत आप्तविषयी तुम्हाबरोबरि देतों, ते तुमची भेट करून आणतील, फिकीर न करावी. तुमचे लवेस[५] जडभारी[६] तरि आपण पन्नास हजार फौज रजपूत [सुद्धां] खस्त[७] होतों.' ऐकून राजे म्हणों लागले जे, '[मी] शिवाजी आहें. दिलेलखानाचा गुमान[८] धरितों कीं काय? तुमचे आज्ञेनें जातों. भेटतों.' म्हणून निरोप घेऊन मिरजाराजियांनीं सुभानसिंग आपला मामा, थोर योद्धा मोठा बळांचा शूर, दिलेलखानाचे सवाईनें तोलदार, दिलेलखानही त्यास जाणें, असा बराबर दिला. आणि 'राजा सांभाळोन घेऊन येणें. तुझे भरंवशावर पाठवितों,' असें बोलून पाठविला. सुभानसिंग पन्नास रजपूत आपले जोडीचे समागमें घेऊन चालिला. जेथे दिलेलखान पुरंधरचे दरवाज्याजवळ होता तेथें राजे गेले. पुढें दिलेलखानास खबर पाठविली कीं, 'शिवाजीराजे येऊन मिरजाराजियासि भेटले, तुमचे भेटीस येतात.' हें कळोन दिलेलखान मनांत जळला. मनगटें चाविलीं कीं, पुरंधर किल्लचाचें यश आपणांस आलें नाहीं, आपले विद्यमानें बोलणेंही नाही. यश रजपुतासि आलें म्हणून श्रमी होऊन, पुढें सामोरा येऊन, रागें रागें राजियासि जोरानें आंवळोन धरून घडीभर भेटला. दिलेलखान म्हणजे मोठा बळकट. एका हत्तीचें बळ किंवा जास्तीच होईल. आणि हत्ती बराबरि खाणें. दररोज हत्ती खातो तेणेंप्रमाणें वजनें खाणें. शरीर तरि दुसरा हेडंब राक्षसच! ऐसा थोर. त्याणें रागें[९] भरून एक घटकाभर रागें, जोरानें राजियास आंवळून धरिलें. परंतु सरदार जोरावर, बळकट तैसाच, त्याणें खातरेस[१०] आणिलें नाहीं. मग भेटीची मिठी सुटून एकीकडे लोडाजवळ उभयतां बैसले. दुसरे बाजूस लोडाशीं सुभानसिंग बैसले. दिलेलखान कटारी जवळ करून, वर हात ठेऊन बैसला. आणि क्रोधें करून सुभानसिंग यासि पुसिलें कीं 'राजाबरोबरि तुम्ही आलां आहां?' असें पुसिलें. तेव्हां मनामध्यें हा का रा[११] धरून सुभानसिंग बोलिला जे, 'खानजी, तुम्हांकडे राजे आले. आतां

उद्यां तुम्हांस जे गड पाहिजेत ते देऊं. तुम्ही उतरून गोटास येणें. असा मिरजाराजियांचा हुकूम आहे.' असें बोलिल्यावरि बहूत कष्टी जाहाला जे, आपला मनोरथ सिद्धीस गेला नाहीं. 'तुम्ही साहेब[१२] लोक आहां. तुमच्या हुकुमानें येऊं. परंतु हा किल्ला उदईक आपणास घेऊन देणें. निशाण चढवून येतों.' असें बोलतां सुभानसिंग म्हणूं लागला कीं, 'गड आपणाकडे आला, तुम्हीं चलावें.' त्यावरून दिलेलखान उतरोन खासा गोटांत आला. चौकी किल्ल्यास ठेविली. राजियासि पानविडे देऊन रवाना केलें. 'तुम्हीं मिळोन मिरजाराजियाजवळ जाणें, ते वडील आहेत. ते करतील त्यात आपण आहों.' [ असें बोलला. ]

१. नंतर भेटण्यांत आब राहणार नाही. २. हलवारी या पाठाचा अर्थ लागत नाही. डॉ. सेन, रा. ब. गुप्ते यांच्या वाचनाप्रमाणें हा पाठ हलकाई – कमीपणा असा घेतात. ३. गर्विष्ठ ४. करून – करावा (लागतो). ५. केसास. ६. लवेस जडभारी–केसास धक्का लागेल तर. ७. मरून जातो. ५–७. आपल्या केसास जरी धक्का लागला तरी ५० हजार रजपूत फौज घेऊन आपण आत्मनाश करून घेतों, असें जयसिंग शिवाजीला आश्वासन देतो. ८. पर्वा, हिशेब. ९. रागाने. दिलेरखानाची ही भेट धृतराष्ट्र-भीमभेटीसारखीच दिसते. दिलेरखानाने 'राजियास आवळून धरिलें.' या वाक्यांतील राजे म्हणजे शिवाजी महाराजच. पण पुढील वाक्य वेगळें वाटतें. 'परंतु सरदार जोरावर बळकट तैसाच.' हा सरदार सुभानसिंग कीं काय? पण ही भेट दिलेरखान व शिवाजी यांचीच होती हें निश्चित. १०. पर्वा केली नाही. खातरेस आणणें – ध्यानांत आणणें, परव करणें. ११. होकार देऊन. १२. स्वामी.

### ४८. पुरंदरचा तह

असें बोलतांच राजे व सुभानसिंग मिरजाराजियाकडे आले. वर्तमान सांगितलें. मग जयसिंगांनी व राजियांनी एकपंक्ती भोजन केलें. राजियास राहावयास डेरा दिला. रात्रीं उभयतांचें बोलणें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
क्रमांक ............ दि: ............



जालें. 'किल्ले अवघे पादशहास द्यावे आणि दिल्लीस चलावें.'... असें बोलतांच राजे म्हणूं लागले जे, 'आपल्यापैकीं सत्तावीस गड[1] देतों आणि आपण व आपला पुत्र संभाजी ऐसे पातशाहाचे भेटीस येतों. भेट करून इकडील दक्षणेच्या बादशाही इदलशाही व कुतुबशाही व निजामशाही वरि आपणास नामजाद[2] करणें. तीन पादशाही फत्ते करूं. एक पादशाही निजामशाही त्यांहीं फत्ते केलीच आहे. दोन पादशाही तुम्हांस घेऊन देतों." म्हणून बोलिले. मिरजाराजियांनीं कबूल केलें. आणि पुण्याहून कूच केलें. राजियांनीं संभाजीराजेही आणविले. सत्तावीस किल्ले तांब्रास दिले. निशाणें चढविलीं. वरकड राजगड व कोट मोरोपंत पेशवे व निळोपंत मजमदार व नेताजी पालकर[3] सरनोबत असे मातुश्रीच्या हवालें केले. आणि आपणही दिल्लीस[4] जावें, पादशाहाची भेट घ्यावी असा करार केला. पुढें पादशाहास कळावें म्हणून जयसिंग राजियांनीं आपला वकील रवाना केला. त्याजबराबरि राजाचा जावा, त्यास सोनोजीपंत डबीर याचा मेहुणा रघुनाथपंत कोरडे यांस दिलें हे उभयतां पुढें दिल्लीस रवाना केले. राजियांनीं अर्जदस्त[5] पादशाहास दिली कीं, 'आपण भेटीस येतों.' म्हणून पत्र लिहून दिलें.

१. पुरंदरच्या तहाने मोगलांना द्यावे लागलेले किल्ले — १ रुद्रगड २ पुरंदर, ३ कोंडाणा, ४ रोहिडा, ५ लोहगड, ६ विसापूर, ७ टंकी, ८ तिकोना, ९ माहुली, १० मुरंजन, ११ खैरदुर्ग, १२ भंडारगड, १३ तुळशीखुल, १४ नेरदुर्ग, १५ अंकोला, १६ मार्गगड, १७ कोंज, १८ बसंतगड, १९ नांगगड, २० कर्नाळ, २१ सोनगड, २२ मानगड, २३ कदकडा.

२. नेमणूक करणें. ३. दिल्लीस जातांना म्हणजे इ. स. १६६६ च्या मार्च मध्ये शिवाजीने जीं विश्वासू माणसें जिजाबाईच्या स्वाधीन केलीं त्यांत नेताजी पालकर नव्हता. तत्पूर्वीच त्याचें आणि शिवाजीचें बिनसलें असल्याने (जानेवारी १६६६) तो शिवाजीची नोकरी सोडून गेला होता. सभासदाने ही बखर स्मृतीवरून लिहिली असल्याने अनेक घटनांचा क्रम मागेपुढे झाला आहे. इ. स. १६६० मधील पन्हाळयाच्या वेढयाचा

उल्लेख तो १६६६ मधील घटनांनंतर करतो. (परिच्छेद ६९-७० पहा). ७० व्या परिच्छेदांत पन्हाळगडच्या युद्धाच्या प्रसंगीं वेळेवर न आल्यामुळें नेताजीस कमी केलें असें तो म्हणतो. ही घटना १६६० मधील आहे. ही घटना तात्पुरती असावी. कारण १६६६ पर्यंत नेताजी शिवाजीचा सरनोबत होता याविषयीचे अनेक उल्लेख जदुनाथ सरकारांनी दिले आहेत. १६६६ मार्चमध्ये त्याला कमी करून प्रतापराव गुजर याला सेनापति-पद दिलें. ४. बादशहाच्या भेटीस दिल्लीस जावें असें ठरलें. पण शिवाजी दिल्लीकडे निघाला तेव्हा औरंगजेब आग्रा येथेच आला होता. त्यामुळे ही ऐतिहासिक भेट आग्र्याला झाली. सभासदाची ही माहिती चुकीची आहे. ही भेट दिल्लीऐवजी आग्र्याला झाली ही माहिती प्रथम प्रो. जदुनाथ सरकार यांनी मांडली. ५. विनंति अर्ज, विनंति पत्रिका.

## ४९. उभयतांचें विजापुरीं आगमन

याउपरि मिरजाराजियाबरोबरि आपली फौज घेऊन राजे विजापुराकडे[१] चालले. मार्ग चालतां मिरजाराजे व शिवाजीराजे एका हौद्यांत बैसले आणि चालिले. कुल वजीर येऊन सलाम करीत. दिलेलखान जोहार[२] न करी. निमित्य कीं राजे (व) ते एके जागां, आणि आपण जोहार कैसा करावा? ये गोष्टीनें सलाम न करी. पुढें विजापूरासही सला केला. उपरि उभयतांनीं दिल्लीस जावें, त्यास मिरजा बोलिला जे, 'पादशाहा बहूत हुन्नरवंत[३] आहे, बेइमान आहे. आम्ही तुम्ही बरोबरि गेल्यानें दगा दोघांसि केलियानें कसें करावें? आपण मागाहून येतों. औरंगाबादेंत राहातों. तुम्हीं दिल्लीस जाणें. आपला पुत्र रामसिंग हुजूर आहे. तोही तोलदार, भिडेचा[४] आहे. त्यास सांगोन पाठवितों. त्याचे हातें भेट घेणें. सरंजाम करून दक्षणेस येणें. तुम्ही दिल्लीहून निघालां म्हणजे आपण दिल्लीस जाऊं. तोंपर्यंत आपण बाहेर आहों.' पादशाहास भेटल्यावर तो तुम्हांशीं बेइमानी न करी म्हणवून तजवीज सांगून रामसिंगास पुढें पत्रे पाठऊन, ठीक करून,

राजियांसि रवाना केले. राजियांनीं बरोबरि घेतले कारकून व हुजुरे तपशील:–

निराजी राऊजी शाहाणा १. त्रिंबकजी सोनदेव, सोनोजीपंताचे पुत्र, कलम १. माणको हरी सबनीस १. दत्ताजी त्रिंबक १. हिरोजी फरजंद १. राघोजी मित्रा १. दावलजी गाडगे १.

मावळे लोक १००० एक हजार, लष्कर ३००० तीन हजार.

१. पुरंदरच्या तहाप्रमाणे जयसिंगाला साहाय्य करण्यासाठी शिवाजी त्याच्याबरोबर विजापूरला गेला. २. सलाम. ३. कावेबाज, युक्तिबाज. ४. ज्याची भीड बादशहास पडेल असा वजनदार असामी.

## ५०. शिवाजीचें दिल्लीस प्रयाण

येणें प्रमाणें. यां-सहवर्तमान राजे राजगडास येऊन, सर्वांच्या भटी घेऊन, सदहूंप्रमाणें बरोबर घेऊन, राजे व पुत्र असे उभयतां मजल दरमजल दिल्लीस चालिले. पादशाहास राजे भेटीस येतात हें कळोन आपले कुल फौजदार व महालमोकासे यांसि ताकीदपत्रें पाठविलीं कीं, 'शिवाजी राजे मुलाजमतीस[१] येतात. जे जागां मुक्कामास राहातील तेथील फौजदारांनीं येऊन भेटावें. दाणापाणी जो लागेल तो द्यावा. शाहाजादे[२] यांचेप्रमाणें आदब[३] चालवावी. ऐसे रोखे[४] पाठविले. त्यावरून राजे मजलीस जात तेथे फौजदार भेटून दाणापाणी जो खर्च लागेल, तो द्यावा. असे दोन महिन्यांनीं दिल्लीस[५] पावले.

१. भेटीस. २. राजपुत्र. ३. मानसन्मान. ४. पत्रें. ५. आग्र्यास पाहिजे

## ५१. शिवाजी-औरंगजेब भेट

राजे आले ही खबर पादशाहास समजून रामसिंग पुढें भेटीस पाठविले. रामसिंग येऊन भेटले. रघुनाथपंत कोरडे पहिले हेजीब पाठविले तेही येऊन भेटले. पादशाहाचें सर्व वर्तमान सांगितलें.

बाह्यात्कार समाधान खुशाली सांगितली. 'मनांत पादशाहाचे काय आहे न कळे.' असें बोलिले. रामसिंग भेट घेऊन पादशाहापाशीं आले. वर्तमान सांगितलें. पादशाहानीं एक हवेली जागा सचंतर[1] सिवपुरा म्हणुन वसवून [तेथें राजे] राहिले. मुहूर्त पाहून पादशहाचे भेटीस चालिले. पादशाहांनी सदर करून पांच हत्यारें आपणाजवळ ठेवून, कंबरबस्ती[2] करून, अंगांत जरीची[3] कुडती घालून खासा तख्तीं बैसला. तैसेच तख्ताजवळ मोठे मोठे शूर मर्दानें व तख्ताचे आसपास दोन हजार माणूस उभे केले. तैसेच आमखास[4] यामध्यें कुल वजीर मुस्तेद[5] करून उभे केले. मनांत कीं 'शिवाजी सामान्य नाहीं. सैतान आहे. अफझलखान भेटीमध्यें मारिला. तैसाच उडोन तख्तावरि आला आणि आपणास दगा केला तरि काय करावें?' असें समजून मुस्तेदीनिशीं बसला. राजियासि भेटीस बोलाविले. राजे व पुत्र संभाजीराजे व कारकून व हुजुरे अगत्याअगत्य दहाजण भेटीस रामसिंग घेऊन गेले. पादशाहाची नजर जाहाली. पादशाहा बोलला जे, 'आवो, शिवाजी राजे.' असें बोलतांच राजियांनीं तीन सलाम केले. मनांत भाव धरिला कीं, श्रीशंभुमहादेव एक, दुसरा श्रीभवानी, तिसरा महाराज पितियास, ऐसे तीन सलाम केले. आणि उजवे बाजूस जसवंतसिंग महाराज, नवकोट मारवाडाचा राजा, त्याचे शेजारीं खालतें उभे राहावयासाठीं हुकूम [पातशाहानीं] केला. राजे व पुत्र उभे राहिले. रामसिंग यास पुसलें कीं, 'आपणावरते शेजारीं कोण?' असें पुसिलें. त्यास रामसिंग बोलिला जे, 'महाराज जसवंतसिंग.' असें ऐकतांच राजा क्रोधयुक्त होऊन बोलिला कीं, "जसवंतसिंगासारखा उमराव! याच्या पाठी[6] माझ्या लष्करांनीं पाहिल्या असतील!! याचे खालें आपण उभें राहावें म्हणजे काय? असें क्रोधें बोलून, रामसिंगाची कटार माजेची[7] घेऊन महाराजा यास मारितो म्हणवून कटार मागूं लागले. मग रामसिंग 'धीर धरणें' म्हणून बोलूं लागले. शब्दाशब्दी होतांच पादशाहास कळलें. पादशाहा म्हणूं लागले कीं, 'काय जाहालें?' रामसिंग बोलिला कीं,

'जंगली बाघ हयवान,[८] त्यास गर्मा[९] जाहाला. कांहीं करीणा[१०] जाहाला.' असें बोलतांच पादशाहाचे मनांत शंका उत्पन्न जाहाली. काय होईल तें न कळे. म्हणून रार्मासगास पादशाहा बोलिले कीं, 'राजियास घेऊन डेरियास जाणें. उद्यांसाद्यां सावकाश मुलाखत होईल.' असे बोलतांच राजे व राजपुत्र व रार्मासग राजियाचे लोक देखील हवेलीस गेले. राजा बाहेर गेल्यावरि पादशाहा संतोष जाहला. आणि 'मोठा अनर्थ चुकला. शिवाजीची व आमची नजर जाहाली होती,' ऐसें बोलून राहिले.

---

१. स्वतंत्र. २. कमरपट्याने कंबर कसून. ३. 'जिरेची' असा पाठ हवा. (लोखंडी जाळीचें कुडतें) ४. दरबारचा दिवाणखाना. ५. जय्यत. ६. जसवंतसिंगाचें सैन्य शिवाजीच्या सैन्याकडून पराभूत होऊन पळाल्यामुळे त्याच्या पाठी मराठी लष्कराने पाहिल्या. ७. कंबरेची. ८–९. पशु (वाघ जंगली जनावर; त्यास दरबारच्या हवेंत गरमी झाली.) १०. अनर्थ, प्रकार, हकीगत (कांहीतरी प्रकार घडलेला दिसतो.)

## ५२. शिवाजीची रार्मासगाजवळ तक्रार

राजे डेरियास गेलियावरि रार्मासग व आपण बैसोन बोलिले जे, 'कोण पादशाहा! मी शिवाजी, मजला जसवंताखालतें उभें करावें! करीणा[१] कांहीं पादशाहास समजत नाहीं,' ऐसें बोलिले. रार्मासग बोलिला जे, 'तुम्हीं भेटीस येऊं नये. आले तरि रस-रंग[२] राखून निघून जाणें. तुम्ही येथून सुखरूप गेलेत म्हणजे आम्हांस मोठी जोड जाहाली.'[३] असें बोलून रार्मासग आपले हवेलीस गेले.

---

१. (वागण्याचा) प्रकार. २. गोडी. ३. मिळविली. (तुम्ही सुखरूप परत गेलांत म्हणजे आम्ही मिळविली.)

### ५३. शिवाजीचें औरंगजेबास पत्र

राजियांनीं आपले कारकून, हुजुरे व रघुनाथपंत कोरडे यांसि बोलावून आणून विचार केला, 'पुढें तजवीज काय करावी?' पादशाहाची मजलस[1] कळली. तेथून यश पावून निरोप घेऊन कैसें जावें ? पादशाहाजवळ कांहीं एक कार्य कबूल करून गेलियाविना पादशाहा निरोप देत नाहीं.'[ मग ] रघुनाथपंत कोरडे यांस सांगोन पाठविलें कीं, 'तुम्हीं पादशाहास उद्यां जाऊन अर्ज करणें कीं, 'स्वामीशीं आमचा दुसरा विचार नाहीं. आपण निखालस[2] आपले पुत्र घेऊन देखील भेटीस आलों. सेवकाजवळोन चाकरी घ्यावी. दक्षणेस कुल अदलशाही व कुल कुतुबशाही दोनी पातशाही घेऊन हजरतीस[3] देतों. वरकड सुभे रवाना करतां त्यांची कामगिरी पाहाणें आणि आपली कामगिरी पाहाणें.' ऐसें कितीएक गोष्टी बोलून एकांतीं घुसलखानियांत भेटीस बोलाविलें [ म्हणजे ] भेटी घेऊन कित्येक मजकूर बोलू, म्हणून अर्ज करणें,' म्हणून सांगितलें. त्याजवरून रघुनाथपंत कोरडे दुसरे दिवशीं पादशाहाजवळ जाऊन येणेंप्रमाणें करीणा लिहून पाठविला. पादशाहानें रोखा वाचून चित्तांत विकल्प धरिला. आणि पत्राचे पाठीशीं जाब लिहिला कीं, 'सबुरी करणें. तुमच्या मुद्यामाफक[4] करूं.' असा जाब लिहिला. त्यांणीं येऊन राजियासि सांगितलें कीं, सबुरी करणें. तेव्हां विकल्प आहे. दिलखुलाशानें जाब दिला नाहीं, असा तर्क राजियांनीं केला.

१. धोरण. २. निष्कपटपणें. ३. महाराजांच्या चरणाशीं. ४.मुद्द्याप्रमाणें.

### ५४. शास्ताखानाचा जाफरखानास सावधगिरीचा इशारा

तेच दिवशीं शास्ताखानानें जाफरखान दिवाण, पूर्वील पादशाहाचे वेळेसही त्यास दिवाणगिरी चालत होती, परंतु मुतालिकाचे हातून कारभार होता ऐसे, त्या जाफरखानास सांगून पाठविलें कीं, 'शिवाजी मोठा दगेखोर आहे. विद्यावंत असे. आपल्या गोटांत

शिरला तेव्हां चाळीस गज जमीन उडाला आणि वाडांत शिरला. असा पादशाहांनीं भेटीस नेऊं नये. नेला तरि चाळीस पन्नास गज जमीन उडोन दगा देईल.' असें सांगून पाठविलें. त्याजवरून जाफरखानानें पादशाहास हें वर्तमान जाहीर केलें. पादशाहाचा मनांत खोंचून[१] त्यानें खरें मानलें. बळकट मनांत विकल्प धरिला.[२]

१. दुखावलेला. २. मनांत कपटाची शंका धारण केली.

### ५५. शिवाजी-जाफरखान भेट

दुसरे दिवशी राजे यांस कळलें कीं, जाफरखान दिवाणानें आपला गिल्ला पादशाहाजवळ केला. असें कळोन रघुनाथपंत कोरडे यांस जाफरखानाकडे पाठविलें कीं, 'आपले भेटीस येतों.' म्हणून पाठविलें. त्यानें बहूत वेळ मनांत तजवीज[१] करून 'बरें, येऊं द्या' म्हणोन सांगितलें. त्यावरून राजे जाफरखानाचे भेटीस गेले. सन्मान बहूत केला. कित्येक आपले सरंजामाविशीं[२] सांगितलें, परंतु त्याचे मनांत आलें नाहीं. बाहेर 'बहूत बरें' म्हणून बोलिला. जाफरखानाची बायको ती शास्ताखानाची बहीण; तिनें खानास आंतोन सांगून पाठविलें कीं, 'शास्ताखानाचीं बोटें तुटलीं. अफजलखान मारिला. तसे तुम्हांसही शिवाजी मारील. त्यास लवकर निरोप देणें.' मग राजास वस्त्रें देऊन निरोप दिला. 'पादशाहास अर्ज करून सरंजाम करवितों,' ऐसें बोलिला. मग राजे डेरियास आले. 'जाफरखानही दिलखुलाशानें[३] बोलिला नाहीं. बरें श्री करील तें खरें,' म्हणून बोलून राहिले.

१. विचार. २. साधनसामग्री, व्यवस्था. ३. मोकळ्या मनाने.

### ५६. शिवाजीच्या मुक्कामाभोंवतीं पोलादखानाचा पाहरा बसतो

दुसरे दिवशीं पादशाहा यांणीं राजापाशीं ५००० स्वार व पायदळ [ नेमून ] पोलादखान कोतवाल यास हुकूम केला कीं, 'तूं

राजाच्या डेऱ्याभोंवतीं चौकी देऊन खबरदारीनें राहाणें.' त्यावरून कोतवाल येऊन डेरा ठोकून राहिला. मग राजे घाबरे जाले. कष्टी होऊं लागले. संभाजीराजे यांस पोटाशीं धरून बहूत खेद केला. निराजीपंत व दत्ताजीपंत व त्रिंबकपंत यांणीं बहुता प्रकारें समाधान केलें. तेव्हां राजे बोलिले जे, 'आतां काय हुन्नर[1] करावा ?' असा विचार करितां रात्र जाली. मग श्रीभवानी स्वप्नांत येऊन साक्षात्कार जाला कीं, 'कांहीं चिंता न करणें. येथून तुजला सर्व शत्रूंस भूल घालून, मोहनास्त्र घालून, पुत्रासहवर्तमान घेऊन जातें. चिंता न करणें,' म्हणोन अभय जालें. मग जागृत होऊन आप्तविषयी लोकांस सांगितलें आणि समाधान मानिलें.

१. युक्ति.

### ५७. मिठाईची खैरात सुरू

दुसरे दिवशीं नाना जिन्नस मेवा खरेदी करून आणविला. आणि वेळूचे पेटारे आणवून १० पेटारे मेवा भरिला. एका पेटाऱ्यास दोघे दोघे मजूर लावून, मध्यें लाकूड घालून मेवा वजिरांस पाठविला. चौकीच्या लोकांनीं पुसलें कीं, 'पेटारे कोणाचे ? कोठे जातात ?' मजुरांनीं उत्तर दिलें कीं, 'राजे यांणीं चौघां वजिरांस मेवा पाठविला आहे.' त्यांणीं एक दोन उघडून पाहिले. तों मेवा खरा. मग जाऊं दिले. असा रावता[1] रोज लाविला. मग आठ चहूं रोजांनीं आपले स्वार व कित्येक कारकून लोक यांसही 'पळणें,' म्हणून सांगून पाठविलें. मग ते कुल पळाले.

१. वहिवाट, रोजचा क्रम.

### ५८. मिठाईच्या पेटाऱ्यांतून शिवाजीचें पलायन :

(१७ ऑगस्ट १६६६)

मग एके दिवशीं राजे व राजपुत्र एकाच पेटाऱ्यांत बसले. पुढे मागे पेटारे करून मध्यें पेटारियांत बसून चालिले. ते वेळीं आपला

साज सर्व उतरून, हिरोजी फरजंद यास घालून, आपले पलंगावरि निजविला. हात मात्र त्याचा उघडा बाहेर दिसूं दिला आणि शेला पांघरून निजविला. आणि एक पोरगा रगडावयास ठेविला. जवळील कारकून होते त्यांस अगोदर दिल्लीपलीकडे[1] तीन कोसांवर एक गांव होता. तेथें ठिकाण करून पुढें रवाना केलें होतें. आणि आपण उभयतां पेटारियांत बसून निघोन चालिले. चौकीचे लोक होते त्यांनीं एक दोन पुढील पेटारे उघडून पाहोन वरकड[2] पेटारे न उघडितां जाऊं दिले. शहराबाहेर दोन कोसांवरि जाऊन, पेटारे टाकून, पायउतारा होऊन, कारकून ज्या गांवीं होते त्या गांवास गेले. कारकून बराबरि घेतले. अवघियांनीं रानांत बसून विचार केला कीं, 'आतां जरि नीट आपले देशास जातों तरि तिकडे लाग[3] करून फौजा धावतील. तिकडे जाऊं नये. दिल्लीपलीकडे जावें. वाराणशीकडे जावें.' असें करून राजे व संभाजीराजे व निराजी राऊजी व दत्ताजी त्रिंबक व राघो मित्रा मराठा ऐसे निघोन चालिले. वरकडांस मनास मानेल तिकडे जाणें, म्हणून सांगितलें. आपण व राजपुत्र व इतर लोक कारकून ऐसे वाराणशीकडे आंगास राखा लावून, फकिराचें सोंग घेऊन मथुरेकडे गेले.

१. आग्रा. २. इतर. ३. पाठलाग.

### ५९. हिरोजी फर्जंदहि बाहेर पडतो

मागें दिल्लीमध्यें हिरोजी फरजंद पलंगावरि निजला होता. तो चार प्रहरे रात्र व तीन प्रहर दिवस तैसाच निजला. चौकीचे पोलादखानाचे लोक कोठडींत येऊन पाहातात (तों). राजे शेला पांघरून निजले. पोर[1] पाय रगडीत होता. पोरास लोक पुसतात कीं, 'राजे आज फार वेळ निजले ? पोर म्हणतो कीं, 'शीर दुखतें' ऐसे पाहोन लोक जातात. तैसाच तीन प्रहर दिवस हिरोजी निजला होता तों प्रहर दिवस असतां हिरोजी उठोन, आपलीं पांघरुणें चोळणा, मुंडासें घालून, पोर बरोबरि घेऊन, बाहेर आला.

चौकीदारांनीं पुसिलें त्यांस हिरोजीनें सांगितलें कीं, 'शीर दुखतें, कोणी कोठडींत जाऊं लागेल त्यास मना करणें. आपण औषध घेऊन येतो, म्हणून चौकीदारांस सांगून दोघे बाहेर गेले. रामसिंगाचे गोटास जाऊन त्यास एकांतीं वर्तमान सांगोन, आपण तेथून निघोन देशाचा मार्ग धरिला.

१. मदारी मेहतर नांवाचा मुसलमान मुलगा.

## ६०. रामसिंगानें आपल्यावरची जबाबदारी दूर करून घेतली

मग रामसिंग पादशाहाच्या दर्शनास गेला. पादशाहास अर्ज केला कीं, ' शिवाजी आपले मार्फतीनें आला होता. त्यास पादशाहानें चौकी आलाहिदा[१] दिली. आपणाकडे कांही इलाखा[२] नाहीं. पादशाहा बोलिले कीं, 'तुम्हांसि त्याचा इलाखा नाहीं. पादशाही बंदी[३] त्यास पादशाहा सर्फराजी[४] करतील. तुम्ही त्याचे दरम्यान नाहीं.[५] असें बोलल्यावर रामसिंगांनी तसलीम[६] करून डेरियास आले.

१. स्वतंत्र. २. संबंध, जबाबदारी. ३. नोकर, गुलाम. ४. सन्मान, मानमरातब. ५. तुमच्याकडे यांतील कांही नाही. (दरम्यान–जबाबदारी, मध्यस्थ.) ६. मुजरा, 'तुम्हाला शांति असो ' असें म्हणून केलेलें वंदन.

## ६१ शिवाजीच्या पलायनाची बातमी औरंगजेबाला समजते

नऊ तास दिवस आला. नववे तासा चौकीचे लोक म्हणत होते कीं, ' आज माणसाचा राबता नाही. राजा श्रमी जाहाला आहे म्हणून चाकर सांगतात. त्याजवर कोणी जात येत नाहीं, काय वर्तमान ? म्हणून कोठडींत पाहावयासि गेले तों पलंगावरि कोणी नाहीं. राजा पळाला ऐसें जाहालें. हें देखोन पोलादखानानें पादशाहाजवळ वर्तमान सांगितलें कीं, ' राजा कोठडींत होता. वरचेवर

जाऊन पाहात असतां एकाएकीं गइब[१]जाहाला. पळाला किंवा जमिनीमध्यें घुसला कीं अस्मानामध्यें गेला. हें न कळें. आम्ही जवळच आहों. देखत देखत नाहींसा जाला. काय हुन्नर जाहाला नकळे. ऐसें जाऊन सांगतांच पादशाहास आश्चर्य वाटून बहूत तजविजींत पडला आणि कुल फौजांत ताकीद करून चौतर्फा अष्ट दिशेस दोन लाख साठ हजार स्वार शोधावयास रवाना केले. त्यास सांगितलें कीं, 'शिवाजी हुन्नरवंत आहे. एकादा वेष धरून जात असेल. तरि तुम्ही जंगम, जोगी, संन्यासी, तापसी, बैरागी, नानकपंथी, गोरकपंथी, फकीर, ब्राह्मण, कंगाल, ब्रह्मचारी, परमहंसी, वेडीं नानापरींचीं सोंगें शोध करून, राजा ओळखून, कैद करून आणणें. अशी इशारति सांगोन रवाना केले. फौजा चोहोंकडे स्वार जाहाल्या आणि पादशाहांनीं मनांत शंका धरिली कीं, 'राजा शहरांत कोठें दडून राहिला असेल आणि रात्रीस आपणास दगा करील म्हणून तजवीज करून, बहुत सावध चौकी पहारा ठेवून जागेच पलंगावर राहून बैसले. लोक कंबरबस्ती करून रात्रंदिवस जवळ ठेविले. ये जातीनें राहूं लागले.

१. नाहीसा होणें.

## ६२. शिवाजीचें काशी-प्रयाग-भागानगरमार्गे राजगडास आगमन.

पुढें राजे व राजपुत्र मजल दरमजल चालोन मथुरेस गेले. मथुरेमध्ये ओळखीचे माणूस शोधितां कृष्णाजीपंत व काशीराऊ व विसाजीपंत हे त्रिवर्ग बंधु ब्राह्मण, मोरोपंत पेशवे यांचे मेहुणे, त्यांस निराजीपंत ओळखीत होते. त्यांनी जाऊन, त्यांची भेट घेऊन वर्तमान सांगितलें. त्यांणीं धैर्य धरून कबूल केलें. त्याजवर त्यांचे घरीं संभाजी राजे पुत्र ठेविले कीं, 'आपण देशास आपल्या राज्यांत जाऊन पावलों म्हणून तुम्हांस पत्र व जासूद पाठवितों. तुम्हीं राजपुत्रास घेऊन देशास सर्व बंधू आपल्या कुटुंबानिशीं येणें. तुमचे सर्व प्रकारें चालवूं. ऊर्जित करून बक्षीस देऊं.' असें सांगोन राजपुत्रास

ठेविलें आणि त्यांचा एक बंधू कृष्णाजीपंत समागमें घेऊन वाराणशीस गेले. 'गया-प्रयागीं यात्रा तुमचे ओळखीनें तुम्हीं आपल्यास करून देणें. म्हणून सांगून, त्यास बरोबर घेऊन, वाराणसीस आले. तेथें गुप्तरूपें स्नान करून श्रीविश्वेश्वर-दर्शन करून प्रयाग-स्नान केलें व गयावर्जन[1] केलें. तेथें कर्जही उदंड घेऊन धर्मही केला. पुढें देशास आपले राज्यांत यावें असें केलें. नीट वाटे यावें तरी पादशाहाच्या फौजा गेल्या त्या मार्गें जातां नये[2], म्हणून विचार करून गोंडवणांतून भागानगर विजापुरावरून राजगडास आले. मार्गीं कित्येक जागां उदंड शोध पडला होता. अपाय होतां दगाच व्हावा असें जालें होतें. परंतु श्रीभवानीनें संरक्षून स्वस्तिक्षेम आणिलें. निराजीपंत व दत्ताजीपंत व राघोजी मराठा असे चौघे आले. राजगडास आलियावर थोर धर्म, मोठा महोच्छाव केला. साखरा वांटल्या. तोफांचे आवाज केले. मातुश्रीनें व कारकुनांनीं व लष्कर गड, कोट, हशम, सर्वांनीं संतोष करून खुशाली केली.

१. प्रयाग येथे करावयाचा धार्मिक विधि. २. सरळ मार्गाने परत गेल्यास पाठलागास निघालेल्या सैन्याकडून आपण पकडले जाऊं या भीतीने शिवाजी महाराजांनी आग्र्याहून मथुरेस (उलट दिशेने) प्रयाण केलें. तेथून काशी, प्रयाग, गोंडवन, भागानगर विजापूर या आडमार्गाने ते राजगडला परत आले असा सर्वत्र समज आहे. बखरकारहि हाच मार्ग सांगतो. पण अलीकडे नव्या कागदपत्रांच्या आधारे, शिवाजी महाराजांचा हा प्रवास सरळ मार्गानें झाला असें सिद्ध होत आहे. १७ ऑगस्ट १६६६ या दिवशीं ते आग्र्याहून निघाले; आणि २० ऑगस्टला—म्हणजे ३ दिवसांतच आग्र्यापासून दक्षिणेला ११६ मैलांवर असलेली नरवरची घाटी ओलांडून गेले असा पुरावा उपलब्ध झाला आहे. हें ठिकाण नेहमीच्याच मार्गावर आहे. **बादशहाचा परवाना दाखवूनच** त्यांनी ही घाटी ओलांडिली अशी बातमी नंतर तीन दिवसांत फिदाईखान या मोगली अधिकाऱ्याकडे आली. एकंदर २५ दिवसांत ते स्वदेशी येऊन पोंचले; पण संभाजीराजे अद्यापि यावयाचे असल्याने शिवाजीचें आगमन जाहीर होणें धोक्याचें होतें. कृष्णाजी

विश्वासरावाबरोबर संभाजी राजगडीं परत आल्यानंतर २० नोव्हेंबर १६६६ मध्ये महाराजांचें आगमन जाहीर करण्यांत आलें. मराठ्यांच्या इतिहासांत हा प्रसंग अपूर्व होता. शिवाजीची अलौकिक बुद्धिमत्ता, निर्णय-कौशल्य, विलक्षण धडाडी इ. नेतृत्वाला आवश्यक असे महान् गुण या ठिकाणीं प्रत्ययाला येतात. शास्ताखान प्रकरण आणि आग्र्याहून सुटका या दोनच घटना घेतल्या तरी शिवाजीच्या अपूर्व व्यक्तित्वाचें दर्शन घडतें.

## ६३. गेलेलें राज्य परत घेण्यास प्रारंभ

पुढें सत्तावीस गड मोगलास दिले (होते) ते मागती घ्यावे ही तजवीज केली. मोरोपंत पेशवे व निळोपंत मजमदार व अंणाजीपंत सुरनीस यांसि सांगितलें की, 'तुम्हीं राजकारण, यत्न करून किल्ले घ्यावे.' आपण राजियांनी मावळे लोकांस सांगितलें कीं 'गड घेणें.'

## ६४. एक गड घेतला, परंतु एक गड गेला[1]

त्याजवरून तानाजी मालसुरा म्हणून हजारी मावळियांचा होता. त्यानें कबूल केलें कीं, 'कोंडाणा गड आपण घेतों,' असें कबूल करून वस्त्रें, विडे घेऊन गडाचे यत्नास ५०० माणूस घेऊन गडाखालीं गेला. आणि दोघे मावळे बरे, मर्दाने निवडून रात्रीं गडाच्या कड्यावरून चढविले. जैसे वानर चालून जातात, त्याचप्रमाणें कड्यावर चालून गेले आणि कडा चढून, गडावर जाऊन, तेथून माळ[2] लावून वरकड लोक देखील तानाजी मालसुरा चढून गडावरि तीनशें माणूस गेले. गडावरि उदेभान रजपूत होता. त्यास कळलें कीं, गनिमाचे लोक आले. ही खबर कळून कुल रजपूत कंबरबस्ता होऊन, हातीं तोडा[3] बार घेऊन, हिलाल[4] चंद्रजोती[5] लावून बाराशे माणूस तोफाची व तिरंदाज, बरचीवाले, पटाईत, आडहत्यारी ढाला चढवून चालोन आले. तेव्हां मावळे लोकांनीं 'श्रीमहादेव' असें स्मरण करून नीट फौजेवर रजपुतांचे चालून घेतलें. मोठें युद्ध एक प्रहर जालें. पांचशे रजपूत ठार जाले. चाळीस पन्नास मावळे ठार जाले.

उदेभान किल्लेदार खासा त्याशीं व तानाजी मालसुरा सुभेदार याशीं गांठ पडली. दोघे मोठे योद्धे, महाशूर, एक एकावर पडले. वार करीत चालले. तानाजीचे डावे हातची ढाल तुटली. दुसरी ढाल समयास आली नाहीं. मग तानाजीनें आपले डावे हाताची ढाल करून, त्याजवरि वोढ[६] घेऊन, दोघे महारागास पेटले. मोठें युद्ध केलें. एकाचे हातें एक तुकडे होऊन फिरंगीच्या वारें पडले. दोघे ठार जाले. मग सूर्याजी मालसुरा, तानाजीचा भाऊ, यानें हिंमत धरून, कुल लोक सावरून, उरले रजपूत मारिले. कित्येक रजपूत कडे उडोन पळोन मेले. असे बाराशे माणूस मारिलें. किल्ला काबीज केला आणि गडावर पागेचे खण होते त्यांस आग लाविली. त्याचा उजेड राजियांनी राजगडाहून पाहिला आणि बोलले कीं, 'गड घेतला. फत्ते जाली!' असें जाहालें. तो जासूद दुसरे दिवशीं वर्तमान घेऊन आला कीं, 'तानाजी मालसुरा यांनीं मोठें युद्ध केलें. उदेभान किल्लेदार यास मारिलें आणि तानाजी मालसुराही पडला.' असें सांगितलें. गड फत्ते केला असें सांगतांच राजे म्हणूं लागले कीं, 'एक गड घेतला, परंतु एक गड गेला!'[७] असे तानाजी-साठी बहूत कष्टी जाहाले. पुढें गडावरि ठाणें घातलें. सूर्याजी मालसुरा भाऊ नांवाजून त्याचा सुभा त्यास सांगितला. धारकरी लोकांस बक्षिसें सोन्याचीं कडीं दिलीं. द्रव्य अपार दिलें. वस्त्रें जरी कुल लोकांस दिलीं. ये जातीनें प्रथम कोंडाणा घेतला.

---

१. तानाजीने सिंहगड इ. स. १६७० त घेतला. आग्र्याहून सुटका झाल्यापासूनच्या मधल्या घटना सभासद देत नाही. तो ज्या घटना देतो त्या बऱ्याच ठिकाणीं कालक्रमाने देत नाही. संभाजी नोव्हें. १६६६ मध्ये राजगडीं परत आला. पण सभासद सिंहगडाच्या युद्धानंतर त्या आगमनाचें वर्णन देतो. परि. ६४ सिंहगडाचा पाडाव; परि. ६६ संभाजीचें स्वदेशीं आगमन, परि. ६९ शिद्दीजोहारचा पन्हाळगडास वेढा ही घटना तर अफजलखानाच्या वधानंतर लागलीच म्हणजे १६६० मध्ये झालेली आहे.

२. माळ – दोरीची शिडी. घोरपडीच्या साहाय्याने तानाजी सिंहगडावर चढून गेला असा उल्लेख अगिनदासाच्या पोवाड्यांत असल्याने हाच समज सर्वत्र रूढ

आहे. ३. बत्ती पेटवून उडवावयाची बंदूक. ४. दिवटी. ५. दारूने भरलेली उडविण्याची बत्ती. ६. आच्छादन. ७. सिंहगडावरील तानाजीचा हा पराक्रम अनेक कवींचा काव्यविषय झाला आहे. पण सभासदाने या रोमहर्षक प्रसंगाचें वर्णन अगदी जुजबी केलें आहे. (प्रस्तावना पहा.)

## ६५. पुरंदरच्या तहानें गेलेले किल्ले परत घेतले

पुढें मोरोपंत पेशवे यांणीं व निळोपंतीं व अंणाजीपंतीं व मावळे यांणीं सव्वीस गड ऐसेच ख्यात करून चौ महिन्यांनीं घेतले. सल्ल्यानें गड दिधले होते ते मागुती घेऊन आपलें राज्य करूं लागले.

१. आग्र्याहून परत आल्यावर दोन वर्षेपर्यंत शिवाजीने पुन्हा भांडण सुरू केलें नाही. सभासदाने या सर्व घटना कालक्रमाचा विचार न करता आठवणींत येतील तशा दिल्या आहेत.

## ६६. संभाजीचें स्वदेशीं आगमन[१]

राजगडास वाराणशी होऊन सुखरूप पावलियावरि मथुरेस माणसें व पत्रें पाठविलीं. त्याजवरून कृष्णाजीपंत व काशीराऊ व विसाजीपंत या त्रिवर्गांनीं आपले कुटुंबासहित संभाजीराजियास जानवें धोत्रें नेसवून, आपला भाचा म्हणवून राजगडास आले आणि राजियासि भेटले. मग राजे पुत्रास भेटले. आनंद थोर जाहाला. मोठा दानधर्म केला. आणि कृष्णाजीपंत त्रिवर्ग बंधूंस 'विश्वासराव' म्हणवून नांव किताब दिला. लक्ष होन बक्षीस दिले. तिघां बंधूंस दहा हजार होन तैनात केली. मातबर लोकांत असामी घातली. मोकाशे महाल दिधले. नांवाजिलें. तसेच निराजीपंत हे बराबरि बहूत श्रमसाहस करून आले व दत्ताजीपंत बरोबरि होते व राघो मित्राही बरोबरि होता. त्यास निराजीपंत नीतिन्याय सर्व जाणते, चतुर, चौकस, निजामशाई ब्राह्मण, त्यास न्यायाधिशी सरकारांतून सांगितली. जितकी राज्यांतील न्याय-मनसुबी तितकी

त्यानें करावी. त्यांचे पुत्र प्रल्हादपंत धाकटे बारा चौदा वर्षांचे होते. शाहाणा, बुद्धीचा देखोन त्यास लष्करची सबनिशीची मुतालकी सांगोन लष्करासमागमें सरनौबताजवळ ठेविला. प्रल्हादपंत[२] मोठे माणूस होतील, थोर भार घेतील, असें राजे बोलले. दत्ताजीपंतास हुद्दा काय सांगावा म्हणून तजवीज केली. तों गंगाजीपंत वाकनीस मृत्यू पावला. त्याची वाकनिसी दत्ताजीपंतास सांगितली. सरकारकूनांमध्यें गणना केली. राघो मित्रा यासि हुजूर लोकांचा हवाला सांगितला. समागमें जे जे लोकीं श्रमसाहस केला त्यांस नांवाजिलें.

---

१. संभाजीच्या दक्षिणेंतील आगमनाबद्दल काफीखानाने पुढील माहिती लिहून ठेविली आहे. अर्थात् या माहितीप्रमाणे शिवाजीने आग्र्याहून परततांना संभाजीस आलाहबाद येथें कब कलस नांवाच्या ब्राह्मणाकडे ठेविलें होतें. काफीखान लिहितो : 'शिवाजीने कब कलसाकडून आपणांस संभाजीच्या मरणाची बातमी देणारें पत्र आलें आहे म्हणून जाहीर करून तो शोक करूं लागला... संभाजीच्या बायकोने अतिशोकाने सती जावें असें इच्छिलें. पण मोठ्या मिनतवारीने तीस सती जाण्यांतून परावृत्त केलें. मात्र मयतासंबंधीं करावयाचीं सर्व उत्तरकार्येंहि उरकून घेतलीं व अशा तऱ्हेनें संभाजी मेल्याचें जाहीर केलें. ही बातमी सुरत बंदराचे व इतर ठिकाणचे वाकेनिगार व अखबारनवीस यांजकडून आल्यामुळें बादशहाहि म्हणाला कीं, खच्ची लोक कमी झाले तर जग तितकेंच शुद्ध होईल. यास चारपांच महिने झाले नाहींत तोंच संभाजी कबकलसासह आलाहाबादेहून त्याचे मुलखास येऊन पोंचल्याची बातमी पसरली व शिवाजीने मुलगा आल्याबद्दल मोठ्याने साजणें वाजविलीं. नंतर त्यानें उठविलेल्या त्याच्या मृत्यूच्या वाईट बातमीबद्दल शिवाजीची बायको व इतरांनीं त्यास विचारलें, तेव्हां तो म्हणाला कीं, त्या उठावणीनें बादशहास गाफिल व मुलाच्या शोधाविषयीं निष्काळजी न बनवितों तर सारखी धरपकड होत असलेल्या बिकट रस्त्याने दोन महिन्यांच्या अवधींत आपला मुलगा येऊन पोंचणें कठीण झालें असतें.' (बेंद्रे यांच्या '**छत्रपति संभाजी महाराज**' या ग्रंथावरून)

२. प्रल्हाद निराजी या वेळीं १२-१४ वर्षांचा होता. पण पुढे तो मोठा माणूस होणार म्हणून लष्करच्या सबनिशीची मुतालकी त्याला दिली. राजारामास महान् संकटांतून वांचवून जिजीस घेऊन येणारा प्रल्हाद निराजी हाच. बखरलेखक कृष्णाजी अनंत सभासद हा प्रल्हाद निराजीचा हस्तक. या घटनेनंतर सुमारें २७ वर्षांनी ही बखर जिजीस लिहिली आहे. आपल्या धन्याचें सभासदाने केलेलें हें वर्णन यथार्थ आहे.

## ६७. शरीररक्षकांची योजना

पुढें राजियांनीं आपले पालखीबरोबरि चाखोट माणूस पाहून निवडक असामी ठेविले. चहूं पातशाहांचे आपण दावेदार, एखादे वेळेस प्रसंग पडतो, तेव्हां जवळ आहेत ते कार्यास येतील. असें जाणून मावळे लोकांत पाहाणी करून, निवडक माणूस पाहून, पतकें केलीं. त्यांचीं [ नांवें ] नांवनिशीवार.

१ शंभरलोक म्हणून नांव ठेविलें. १ तीसलोक म्हणून ठेविलें.
१ साठलोक म्हणून नांव ठेविलें. १ वीस लोक म्हणून नांव ठेविलें.
१ चाळीसलोक म्हणून नांव ठेविलें. कलम १

## ६८. शरीररक्षकांना साज देण्यांत येतो

येणेंप्रमाणें पतकापतकांचीं नांवें ठेविलीं, मावळ्यामावळ्यांमध्यें लोक उत्तम निवडला. निवडक भरती करून चार पतकें मिळून दोन हजार माणूस ठेविलें. त्यांत कांहीं बंदुखी, कांही विटेकरी, वरकड आडहत्यारी, फिरंग [ वाले ] असे माणूस सजले. तितके माणसांस साज[१] करून दिले. डोईस मंदील, आंगास सखलादी[२] फतू, दोहों हातीं दोन सोन्याचीं कडीं, कोणास रुप्याचीं कडीं, तरवारास अबनाळ[३] तैनाळ[३] सोनेरुप्याचे, बंदुकीस कट[४] रुप्याचे व विटियांसि कट तैसेच, कानास जोडीं कुडक्यांची,[५] येणेंप्रमाणें अवघे लोकांस साज सरकार-निसबतीनें[६] देऊन लोक सजविले. अवघ्यांचे एकच साज. मर्दानी म्हणावे तर एकापेक्षां एक अधिक. अशी परीक्षा करून हमेशा २००० मावळे लोक पालखीबरोबर जवळ

असावे. तसेच त्यांस तैनाती सरदार हजारी हशमांत[७] केले. त्याप्रमाणें जुमलेदार प्रमाण केले. आणि दोन अडीच हजार माणूस हशम केला. रहस्तां[८] असावें. चालते वेळेस पालखीबरोबरि चौतर्फा चालत असावें. ये जातीनें लोक ठेविले.

---

१. अलंकार, वस्त्रें. २. बनातीचा डगला, शेंदरी कापडाचा डगला. ३. तरवारीच्या म्यानाचे वरील व खालील अडकवण. ४. बंदुकीच्या दस्त्याचा व नळीचा बंद. ५. अलंकार विशेष, कर्णभूषण. ६. सरकारमार्फत (सरकारकडून). ७. पायदळांतील सैनिक. ८. रस्त्यावर (महाराजांच्या पालखीबरोबर नेहमी जय्यत तयार).

## ६९. पन्हाळगडास सिद्दीचा वेढा[१]

त्यावरि पनाळा किल्ला अदलशाईचा तेथें भेद करून गड घेतला. राजे गडावरि राहिले. मग विजापुराहून शिद्दी जोर वजीर, वीस हजार स्वार, [ याणें ] राजियासि वेढा घातला. गड नवाच घेतला होता. सामान करून मजबुती करावयासि अवकाश जाहाला नाहीं. परंतु गड बरा भांडविला. नेताजी पालकर सरनोबत राजियाचा त्यास पत्रें जासूद पाठविले कीं, 'तुम्हीं लष्कर घेऊन उपराळचास[२] येणें आणि शिद्दी जोर यास मारून चालवणें.' म्हणून पत्रें पाठविलीं त्यास लष्कर दूर लांबलें. समयास यावयासि फावलें नाहीं, आणि गडावर सामान नाहीं. मग राजियांनीं विचार केला आणि गड शिद्दी जोरास दिला. आपण उतरोन आले. गड शिद्दी जोरांनीं घेऊन आपलें ठाणें बसविलें.

---

१. वास्तविक ही घटना अफझलखानाच्या वधानंतर लागलीच म्हणजे १६६० मध्यें घडलेली आहे. ६४ व्या परिच्छेदा वरील टीप पाहा. २. मदतीस.

### ७०. नेताजीची बडतर्फी[१]

मग राजियांनीं नेताजी पालकर यास बोलावून आणिला, आणि 'समयास कैसा पावला नाहींस?' म्हणून शब्द लावून, सरनोबती दूर करून, राजगडचा सरनोबत कडतोजी गुजर म्हणून होता, त्याचें नांव दूर करून, प्रतापराव नांव ठेविलें, आणि सरनोबती दिधली. प्रतापरावांनीं सेनापती करीत असतां शाहाण्णव कुळींचे[२] मराठे चारी पातशाहींत जे होते व मुलखांत जे जे होते ते कुल मिळविले. पागेस घोडी खरेदी केलीं. पागा सजीत[३] चालिले व शिलेदार मिळवीत चालिले. असा जमाव पोक्त केला. चहूं पादशाईत दावा[४] लाविला.

१. परिच्छेद ४८ मधील टीप २ पाहा. २. मराठ्यांची ९६ कुळें आहेत. तीं अक्षरानुक्रमाने — अहीर, आंगणे, आंग्रे, इंगळे, इचारे कदम, काकडे, काळे, कोकाट, खडतरे, खंडागळे, खैर, गवस, गव्हाणे, गायकवाड, घाटगे, चवाण, चालके, जगताप, जगदले, जगधने, जाधव, जालिंदरे, ठाकूर, ढमढेरे, ढमाले, ढवळ, ढेकणे, ढोणे, तावडे, तुवार, तेजे, थोटे, थोरात, दरबार, दळवी, दांडे, दाभाडे, देवकांते, धायबर, धुमाळ, नलोडे, निकम, निसाळ, पवार, पाठारे, पांढरे, पानसरे, पारटे, पालव, पालांडे, पिंगळे, पिसाट, फडतरे, फाकडे, फाटक, फाळके, बागराव, बागवे, घांडें, बाबर, भागवत, भोइटे, भोगले, भोंवरे, भोंसले, मधुरे, महाडिकं, महाबर, माने, मालप, मालुसरे, मुलिक, मोरे, मोहिते, यादव, रसाळ, राऊत, राणे, रेणुसे, लाड, वाघ, शंखपाळ, शितोळे, शिंदे, शिरके, शेलार, सांबादे, सालवे, सावंत, साळुंखे, सिसोदे, सुर्वे, हंडे, हरफळे, क्षीरसागर—(क्षत्रियोन्नति दर्पण वरून)

जगताप, जगदळे, दळवी, राऊत व राणे हीं पडनांवें आहेत. आडनांवें नाहीत. कडचुडे किंवा कलचुरे, राठोड किंवा राष्ट्रकूट, रट्ट किंवा रट्टे या तीन प्रसिद्ध कुळीस यांत फाटा दिला आहे. कदम, चाळके, किंवा साळुंके, जाधव किंवा यादव, नलवडे किंवा नलोडे, पालव, मोरे, शिंदे, शेलार सालवे इतक्या कुळी पुऱ्या ऐतिहासिक आहेत. महराष्ट्रांतील ताम्रपट व शिलालेख, कागदपत्रें यांत कांही नांवें येतात.

३. सुसज्ज. करणें. ४. अंमल सुरूं केला.

### ७१. औरंगजेबानें शहाअलममार्फत शिवाजीशी मैत्री करण्याचा बेत केला

राजे दिल्लीहून पळोन आपल्या देशास पितापुत्र सुखरूप आले. येऊन चहूं[१] महिन्यांत सत्तावीस गड घेतले. मोठी ख्यात केली. हें औरंगजेबास कळोन मनांत चिंतातूर जाला. तेव्हां शाहाआलम[२] वडील पुत्र, यास पादशाहांनीं कित्येक विचार राजकारण सांगून त्यासि फौजेनिशीं रवाना केलें. शाहाजादियास सांगितलें कीं, 'जोरावारीनें शिवाजी हातास लागत नाहीं. तुम्हीं जाऊन औरंगाबादेस राहाणें आणि सला मामला राजियासि करून त्याचें सख्य करणें. आणि भेटी न ये तरि मुलाज माफ करणें. आणि दौलत त्याचे नांवें अगर मुलाचें नांवें देऊन त्याची फौज चाकरीस आपणाजवळ आणणें. त्यास मुलूकमोकासा, पैकाटक्का, ठाणीं जें पाहिजे तें देऊन शिवाजी आपला चाकर जालासें करणें. येवढें यश तुम्ही घेणें. म्हणजे सर्व आलें. असें करणें.' म्हणून बुद्धिवाद सांगून शाहास फौजेनिशीं रवाना केलें. तो साठ सत्तर हजार स्वारांनिशीं निघाला. तो मजल दरमजल औरंगाबादेस येऊन राहिला. आणि राजियाकडे पत्रें, जासूद, हलकारे, हेजीब, पाठविले. ते राजगडास दाखल जाहाले. शाहाजादियाचीं पत्रें दिलीं. तीं वाचून पाहिलीं. तेथें लिहिलें होतें जे, 'सला करून तुम्हीं आम्हीं एक व्हावें.' असें लिहून पाठविलें. त्यावरि राजे बहूत संतुष्ट होऊन रघुनाथपंत कोरडे यास औरंगाबादेस पाठविलें. कित्येक जडजवाहीर वस्त्रेंही शाहास पाठविलीं. रघुनाथपंतीं जाऊन भेट घेतली. शाहानें बहूत सन्मान केला. एकांतीं कित्येक गोष्टी बोलिला कीं, 'राजे व आपण भाऊ, तुम्ही व आम्ही एक विचारें राहून तुम्हीं भेटीसही येणें, तुमचे पुत्राचे नांवें दौलत देतों. एक सरदार फौज चाकरीस देणें व एक ब्राह्मण मातबर देणें. मोकासा देऊन चालवूं. तुम्हीं पातशाही रुजवातीनें[३] असणें.' संभाजी राजाचे नांवें हप्तहजारी दौलत द्यावी, पंधरा लक्ष होनांचा मुलूख वऱ्हाड व खानदेश द्यावा, असें केलें. उत्तम भूषणें देऊन रवाना केलें.

१. आग्र्याहून येतांच चार महिन्यांत शिवाजीने मोगली मुलुख परत जिंकून घेण्यास प्रारंभ केला. हा सभासदाचा उल्लेख चुकीचा आहे. या घटना दोन अडीच वर्षानंतरच्या आहेत. ( इ.स. १६६९ नंतरच्या ). २. औरंगजेबाचा वडील पुत्र. ३. राजनिष्ठ.

## ७२. शिवाजी शहाअलमशी मैत्री करतो

ते परतून राजाच्या दर्शनास आले. भेट जाली. शाहाजादियाचे अलंकार, वस्त्रें, पत्रें दिलीं. दौलतीच्या गोष्टी सांगितल्या. सर्व भावार्थ कळलियावरि राजियांनीं विचार केला कीं, 'आपणास एक विजापुरचे पातशाहीशीं दावा, भागानगरकरांशीं दावा व मोंगलाशीं दावा असे तीन सोसवत नाहींत. आपलें राज्य नवें, त्याहीमध्यें दोन तीन चपेटे[1] होऊन हलाखी जाली आहे. त्यास एक शत्रु तरी मित्र करावा आणि दोन वर्षें[2] बळ धरून सांवरावें. मग पुढें जें कर्तव्य तें करावें.' असा विचार करून, मोंगलाशीं सला करावा हा विचार करून, फौज प्रतापराऊ सरनोबत याबराबरि पांच हजार स्वार देऊन, समागमें निराजीपंत सरकारकून दिधले. व मोरोपंत पेशवे व मजमदार व सुरनीस यांचे मुतालीक दिले. प्रल्हादपंत, निराजीपंताचे पुत्र, यांस लष्करची सबनिशी दिधली. मुलूख मोकासा देतील त्यास सुभेदार राउजी सोमनाथ कारकून करून दिधले. ऐसे रवाना केले. मोंगलाशीं सला केला. संभाजी राजे यांस हप्तहजारी कबूल करून निराजीपंत व प्रतापराव औरंगाबादेस गेले.

१. ठोकर, मार. २. या दोन वर्षांच्या उल्लेखाचा खुलासा परिच्छेद ७१ वरील टीप १ मध्ये पाहा.

## ७३ शहाअलम-निराजीपंत-प्रतापराव भेट

मग शाहानें बहूत सन्मानें भेट घेतली. सचंतर जागा दाखवून पुरा वसविला. हत्ती, घोडे, जवाहीर, वस्त्रें सर्वांस दिधलीं. वऱ्हाड

देश जागा जाहागीर पंधरा लक्षांचा होनांचा दिधला. त्या मुलखांत राऊजी सोमनाथ सरसुभेदार ठेविले. हुजूर वांटणीही दिली. टक्का पैका लोकांस बहूत पावला. खुशाल राहिले.

### ७४. शहाअलम-शिवाजी सख्य औरंगजेबास मानवत नाहीं

मग शाहाजादियानें दिल्लीस पातशाहास खबर लिहून पाठविली. त्यावरि पातशाहास कळतांच बहूत खुशाल जाला. आपला देश सुखरूप राहिला हा संतोष पादशाहास जाहाला. असे दोन वर्षें फौज (सुद्धा) औरंगाबादेस होते. आणि इकडे राजास फुरसत जाहाली. टक्कापैका मुलखांत मेळविला. कित्येक अदलशाही गड, कोट, देश काबीज केला. शाहाचा व राजियाचा घरोबा बहूत चालिला. परस्परें वस्ताभावा[1] धाडूं लागले. याकरितां दिल्लीस औरंगजेबास शंका उत्पन्न जाली कीं, 'शाहाजादे व शिवाजी एक जाहाले. एखादे वक्तीं फितवा होऊन आपणास दगा करतील.' अशी कल्पना केली कीं, 'आतां या उभयतांत कज्या[2] वाढवावा.' म्हणून शाहास लिहिलें कीं, 'शिवाजी हरामी आहे. त्याचा सरदार प्रतापराव व निराजीपंत हे दोघे फौजेनिशीं आहेत. याकरितां त्यांस पातेजों[3] नये. एकादे वक्तीं दौलताबादेस भेद करतील. तरी तुम्ही त्या दोघांस कैद करणें. त्यांचीं घोडीं अवघीं तबेल्यास लावणें. येविषयीं रयात[4] न करणें,' म्हणून लिहिलें. हें वर्तमान शाहाचा वकील पादशाहाजवळ होता, त्यांनीं टाकोटाक[5] इशारतीनें पुढें शाहास पाठविलें कीं, 'येथें मजकूर असा जाहाला असे.' तुम्ही हुशार राहाणें.

१. भेटीदाखल दिलेल्या देणग्या. २. कलह. ३. विश्वासणें. ४. कसूर ५. तांतडीने.

### ७५. शहा अलम मराठ्यांना अंतःस्थ सूचना देतो

असें वर्तमान पादशाहाजादे यांनीं निराजीपंतास एकांतीं बोलावून हें वर्तमान सांगितलें, आणि वस्त्रें अलंकार देऊन गुप्तरूपें निरोप

दिधला कीं, 'तुम्हीं उद्यां रात्रीचे कुल फौजेनिशीं उठून पळून राजियाकडे जाणें. तुमची बिशाद[1] राहिली तर पावेल. पायदळ लोक घरोघरीं ठेवणें. मागून वस्तभाव सावकाश नेणें. दोचौ[2] रोजांत पादशाहाचे कागद येतील. मग तुम्हांस कैद करावें लागेल. याकरितां अगोदर निघून जाणें.' असें सांगितलें. [3]त्याजवरून निराजीपंत येऊन प्रतापराव यास व अवघे लोकांस सांगून, दुसरे दिवशीं तयारी करून, रात्रीस फौजेनिशीं निघोन गेले, तेच मजल दरमजल राजियाजवळ आले. भेटी जाहाली. कित्येक खजीना व चित्रविचित्र वस्त्रें भूषणें घेऊन आले. राजे खुशाल जाहाले, आणि बोलिले कीं, 'दोन वर्षें लष्करचें पोट भरलें. आणि शाहाजादा मित्र जोडला. ही गोष्ट बरी जाहाली. आतां मोंगलाई मुलूख मारून खावयास वाव जाहाला.' असें बोलिले. मग औरंगाबादेस राजियाची फौज निघोन गेली.

१. चीजवस्त. २. दोनचार. ३. औरंगजेबाचा कपटी आणि संशयी स्वभाव त्याच्या मुलाला चांगलाच माहीत होता.

### ७६. शहाअलमचें औरंगजेबास उत्तर

यावरि आठा दिवशीं पादशाहाचीं पत्रें हुजूरचे लेख आले. वर्तमान कळलें. मग शाहा बोलिला कीं, 'मराठे हरामजादे. आठ दिवस अगोदर पळाले. हजीर असते तरि कैद करतों.' असें बोलिले. आणि दिल्लीस पादशाहास जाब लिहिला कीं, 'हुकुमाप्रमाणें वर्तणूक करावी, परंतु मराठे आठ दिवस अगोदर पळाले, कैद करावयास विलंब[1] नव्हता.' म्हणून लिहून पाठविलें. त्याजवरून पादशाहास कळोन थक्क जाहला. 'मराठे हरीफ[2] बहूत आहेत,' असें बोलिले. ये जातीचें वर्तमान जालें.

१. अवसर. २. लबाड.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलगत.
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों: दि: ............

## ७७. मोगली प्रदेशाची लुटालूट

प्रतापरावाची व राजियाची भेट जाहाली. पागा सजली. गनिमाची फौज आपले राज्यावर चालून आली त्यास मारून चालवून मोंगलदेश मारून धुंध उठविली.

## ७८. रस्तुमजमान व बेलोलखान यांचा पराभव

मग रांगणा किल्ला राजियाचा होता, त्यास विजापुराहून रुस्तूमजमा वजीर सात आठ हजार लष्कर घेऊन गडास वेढा घातला. ते वक्तीं गडकरी यांनीं थोर भांडण केलें, व राजियांनीं लष्कर पाठवून उपराळा[1] करून रस्तूम जमा मारून चालविला[2] आणि गड रक्षिला. रुस्तूम जमा नामोहम जाहाल्यावर अबदुल करीम[3] व बेलोलखान वजीर विजापुराहून बारा हजार जमाव स्वार घेऊन रांगणियास वेढा घातला. गडकरी यांणीं बहूत मारामारी केली व राजियांनींही लष्कर पाठवून बाहेरून उपराळा करून मारामारी केली. बेलोलखानाचा थोर वाखा[4] केला. आणि पाऊस पडला. झड लागली. पावसाळियांत कित्येक मेले. हत्ती, घोडे, उंटें मेलीं. लष्कर सडलें. अशी अवस्था जाहाली. बेलोलखान जीव वांचवून पळोन गेला. गड सुखरूप राहिला.

१. मदत. २. पळवून लाविला, पराभूत केला. ३. 'अबदूल करीम बेलोलखान' असें हवें. हा एकच सरदार आहे. बेलोलखान हा किताब आहे. ४. हैराण.

## ७९. मोगली शहरें परत घेतलीं

पुढें जितकीं शहरें मोंगलाईंत होतीं ते जागां चार पांच माणसें वेषधारी करून पाळतीस[1] ठेविलीं. पाळती घेऊन दोघे खबर सांगावयास यावे. दोघांनीं तेथें हुशार राहावें. मग लष्कर पाठवून हवेलिया, शहरें मारावीं. ही तजवीज केली.

१. गुप्त देखरेख, हेरगिरी.

## ८०. सुरतेची दुसरी लूट

तों इतक्यांत सुरतेहून पाळती बहिरजी[१] जासूद आला कीं, 'सुरत मारिल्यानें अगणित द्रव्य सांपडेल.' असें सांगितलें. त्याजवरून राजियांनीं विचार केला, 'लष्कर चाकरी-नफरी,[२] काम मनाजोगें होणार नाहीं. याजकरितां, जावें तरि आपण खासा लष्कर घेऊन जावें.' असा विचार केला. आणि मकाजी आनंदराव म्हणजे महाराज शाहाजी यांचा फरजंद[३] पाळलेला व वेंकाजी दत्तो ब्राह्मण मोठे लष्करी नामोशाचे सरदार, हे महाराजांकडून सेवा सोडून राजियाकडे आले होते; त्यांस राजियांनीं नांवाजून पागेच्या पंचहजाऱ्या सांगितल्या. आणि प्रतापराव सरनौबत व वेंकाजी दत्तो व [ मकाजी ] आनंदराव व वरकड सरदार दहा हजार पागा व दहा हजार शिलेदार असे वीस हजार जमाव लष्कर, तसेच सात पांच हजार मावळे लोक निवडक व सरकारकून मोरोपंत पेशवे व निळोपंत व अंणाजीपंत व दत्ताजीपंत व बाळ परभू चिटणीस असे बरोबर घेतले. कोळवणांतून[४] नीट सुरतेस पांच गांव, सात गांव एक मजल करून एकाएकी सुरतेस पावले. सुरतेचे लोक गैरहुशार होते. चढे घोड्यानिशीं सुरतेच्या दरवाज्याजवळ पेठेंत लष्कर शिरलें. मोंगलाचीही फौज पुढें आली. मोठी मारामारी जाहाली. तांब्राकडील लोक बहूत मारिले. आणि सावकारांचे वाडे काबीज करून सोनें रूपें, मोतीं, पोवळें, माणीक, हिरे, पाच, गोमेदराज, वैडूर्य, असे नवरत्नें; नाणें, मोहोरा, पुतळ्या, इभ्राम्या[५] सतराम्या,[५] असफ्या,[५] होन, नाणें नाना जातीचें इतक्या जिनसांच्या धोंकटिया[६] भरल्या. कापड भांडें ताब्याचें वरकड होन[७] (अन्य ?) जिन्नस यास हात लाविलाच नाहीं. असें शहर दोन दिवस अहोरात्र लुटिलें. उत्तम घोडे जितके युद्धांत व सावकारांच्या घरांत सांपडले तितके घेतले. आणि राजियांनीं विचार केला कीं, लौकर निघून जावें. असें करून कुल लष्करांतूत निमे घोडीं भांडावयास लष्करी ठेविलीं. निमे घोडियावरि धोंकटिया मालाच्या घातल्या. पाईच्या लोकांस हमेण्या[८]

करून त्यांजजवळ दिधल्या. अशी मुस्तदी[९] करून, वोझीं घेऊन निघाले. सुरतेचा कोट घेतला नाहीं. अवकाश थोडा म्हणून शहर मारून चालिले. ही खबर मोंगलांचे सुभेदार वीस उमराव व मोहबतखान व दाऊदखान असे सात गांवची[१०] दवड करून, बराबर हजार स्वार एक एक सुभ्याबराबर, चालून आले. त्यांनीं राजियास गांठलें. गनीम आला ऐशी खबर कळली. राजा खासा घोड्यावर बसून बक्तर[११] घुगी घालून, हातीं पट्टे चढवून, मालमत्ता घोडीं, पाईंचे लोक पुढें रवाना करून, आपण दाहा हजार स्वारांनिशीं सडे सडे राऊत उभे राहिले. वणी दिंडोरी[१२] म्हणवून शहर आहे. ते जागां उभे राहून सुभ्यांचे लोक आले त्यांशीं घोरांदर युद्ध केलें. मोहबतखान व दाऊदखान यांनीं युद्ध केलें. राजियांनीं आपली फौज पुढें करून पाठीवर आपण खासा राहून झगडा दिधला. प्रतापराव सरनोबत व व्यंकोजी दत्तो व आनंदराव वरकड सरदार पुढें होऊन मोठी कत्तल केली, आणि मोंगल मारून मुरदे पाडिले. दोन प्रहर युद्ध जालें. मराठे यांणीं शर्त केली. तीन हजार मोंगल मारिले. तीन चार हजार घोडे पाडाव केले. दोन वजीर मोंगलाई सांपडले. असे फत्ते करून आले. तों पुढें उदाराम वजीर मोगलांचा याचा लेंक जगजीवन [व] उदाराम[१३] [याची] बाईल रायबागीण असे व सरदार पांच हजार मोगल घेऊन उंबर-खिंडीस[१४] आले. त्यांस मारून चालविलें. रायबागीण कोंडली. तिणें दांतीं तृण धरून लेंक राजियाची म्हणून बोलून कौल घेतला. मग तीस कौल देऊन अनात करून सोडिली. आणि माघारे राजे राजगडास आले.

---

१. बहिर्जी जाधव. २. मोलाची चाकरी, भाडोत्री (मर्सिनरी). ३. लेकवळा मुलगा. ४. भीमाशंकर, जव्हार, रामनगर इ. कोळ्यांचा प्रदेश. ५. हीं विविध पातशाहांनीं आपल्या नांवें सुरू केलेलीं नाणीं आहेत. ६. दोन पुडी पिशवी, पडशी; जनावराच्या पाठीवरून सामान वाहून नेण्यास उपयुक्त अशा पिशव्या. ७. हान–अन्य अथवा हीन असा शब्द असावा.

किरकोळ सामान असा अर्थ. ८. कसा, लांब थैली. ९. तयारी. १०. **गांव** –अडीच कोस. ११. पोलादी जाळीचें चिलखत व शिरस्त्राण. १२. वणी दिंडोरी नाशिक जिल्ह्यांत आहे. १३. **उदाराम–रायबागीण**. उद्धवराव ऊर्फ **उदाराम** हा विदर्भांतील माहूरचा देशमूख, औरंगजेबाचा तो एकनिष्ठ नोकर होता. त्याची पत्नी रायबागीण हीहि औरंगजेबाच्या सैन्यांतील महान् पराक्रमी स्त्री सेनानी. औरंगजेबाने तिचा पराक्रम पाहून **राजव्याघ्री** –रायबागीण हा किताब दिला होता. पति व पुत्र दोघेहि मरण पावल्यावर नातवाला घेऊन ती बादशहाच्या सैन्यांत चाकरी करूं लागली. शिवाजीच्या सैन्यावर उंबरखिंडीच्या मार्गे ती चालून आली. शिवाजीच्या सरदारांनी तिचा पाडाव करून तिला पकडून आणिलें. महाराजांनी तिचा सन्मान करून तिला औरंगाबादेस पाठवून दिलें. १४. **उंबरखिंडीस** हाच पाठ योग्य आहे. 'उंदिरखिंडीस' नको.

### ८१. पाणियांतील डोंगर बांधून दर्यामध्यें गड वसविले

मालमत्ता सुरतेची आकार करितां सर्व बिशात[1] पांच क्रोड होनांची आणली. चार हजार घोडीं आणिलीं. ती पागा केली. पागेस खूण चौकटीचा डाग घोड्याचे उजवे टिरीवर देऊन, अशी ओळखण करून, पुढें ज्या ज्या मुलखांत अदलशाही, निजामशाही गड होते तितके घेतले. कित्येक डोंगर बांके[2] जागेंत होते ते गड वसविले. जागोजागां गांवावरि मुलखांत नूतन गड वसविले. गडाकरितां मुलूख जप्त होतो असें समजून गड बांधिले, व कोंकणांत कल्याण, भिवंडी, राजापूर पावेतों देश काबीज केला. काबीज करितां करितां जागां जागां पुंड[3] पाळेगार[4] होते व देशमुख होते, त्यांमध्यें जे युद्धास आले त्यांस मारून गर्दीस मेळविलें, आणि ज्यांनीं कौल घेतला, त्यांस यथायोग्य चालवून रक्षिलें. रेवदंडा, राजपुरी दर्यामध्यें किल्ला निजामशाही आहे. तेथें हबशी किल्लेदार जागियाचा खावंदच. याचीं पाणियांतील जाहाजें गुराबा[5] चाळीस पन्नास आरमार त्यानें करून, मुलूख मारून, पैदा करून जागा जतन आहे. त्याचे लोकांनीं राजियाचे देशास उपद्रव मांडिला. मग राजियाने बाजी पासलकर यास लष्कर मावळा हजार दोन हजार

[ दिला. ] तैसेच जाहाजें पाणियांतील जालीं. समुद्रास पालाण[६] राजियानीं घातलें. हा एक हात सजला.[७] राजपुरी[८] एक पाणियांत उरली, याकरितां अद्यापि निजामशाहाचें नांव चालतें. तें स्थळ हस्तगत करावें म्हणून राजियांनीं जागां जागां डोंगर पाहून गड वसविले, कीं येणें कडोन दर्या जेर[९] आहे, आणि पाणियांतील राजे जेर होतील. असें जाणून कित्येक पाणियांतील डोंगर बांधून दर्यामध्यें गड वसविले. पाणियांतील म्हणजे केवळ जंजिरे[१०] असे करून गड जाहाजें मेळवून दर्यास पालाण राजियांनीं घातलें. जोंवर पाणियांतील गड असतील तोंवर आपलें नांव चालेल, असा विचार करून अगणित गड जंजिरे जमिनीवर व पाणियांत वसविले. असें कर्म केलें.

---

१ मालमत्ता. २. कठीण. ३. पुंड. ४. **पाळेगार**– (पाळे=दरी) कर्नाटकांतील डोंगराळ प्रदेशांत राहणारे लुटारू आणि दरवडेखोर. पूर्वी हे महालकरी अधिकारी असत. ही पाळेगारी पद्धति युरोपियन फ्यूडल पद्धतीप्रमाणे असे. मदुरेकडील नायक घराण्यांतील राजाने ही पद्धति सुरू केली. दहाबारा गांवांचा मिळून एक गट असे. त्यास '**पाळयम्**' असें म्हणत. त्यावरील अधिकाऱ्याला पाळेगार म्हणत. यांच्या उत्पन्नांतील $\frac{1}{3}$ भाग राजाला कर म्हणून भरावा लागे. राजाच्या मदतीसाठी हे पाळेगार लहानसें सैन्यहि ठेवीत. काविलगारी अथवा फौजदारी म्हणजे जनतेच्या सुरक्षिततेचेंहि काम त्यांना पाहावें लागे. या कामाबद्दल ते करहि वसूल करीत. पुढे पुढे ते स्वतंत्र पुंडच झाले. (सातव्या हेन्रीच्या कारकीर्दींत अशा सरदारांचा मोड होऊन इंग्लंडमध्ये प्रथम मध्यवर्ती राजसत्ता प्रबळ झाली. शिवाजी महाराजांनी कर्नाटकच्या स्वारींत पुंड पाळेगारांना पराभूत करून मध्यवर्ती सत्तेचे प्रतिनिधि त्या भागांत नेमले.) ५. एक प्रकारचें जहाज. ६. खोगीर. ७. सज्ज झाला. ८. **राजपुरी**- कुलाबा जिल्ह्यांत समुद्रकाठीं असलेलें एक ठिकाण. अहमदनगरचें निजामशाही राज्य चालू असतां एका हबशी इसमाने या गांवास तटबंदी वगैरे करून त्याच्या आसपास आपली सत्ता स्थापन केली. तो स्वतःला प्रथम निजामशाही, नंतर आदिलशाही व पुढे मोंगली

मांडलिक म्हणवीत होता. यामुळे त्याचें व मराठ्यांचें सामान्यतः नेहमी शत्रुत्व होतें. शिवाजी महाराजांनी याचें समूळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला होता पण तो यशस्वी झाला नाही. ९. दर्या जेर आहे=(या बाजूने) सागरावर सत्ता प्रस्थापित करणें सुलभ आहे. १०. पाण्यांतील किल्ले.

## ८२. कायसावंत आणि बाजी पासलकर यांचें युद्ध

त्याजवरि राजपुराहून कायसावंत[1] म्हणोन पांच हजार फौजेनिशीं युद्धास आला. मोठें युद्ध होतां बहूत रणखंदल जालें. कायसावंत खासा व बाजी पासलकर महायोद्धा,– याच्या मिशा दंडाएवढ्या, यांस पीळ घालून वरि केशांच्या आधारें निंबें दोहींकडे दोन ठेवीत होता, असा शूरमर्द ठेविला – याशीं व त्याशीं खासाखाशी गांठ पडली. एकास एकानीं पंचवीस जखमा करून ठार पडले. मग उभयतांकडील दळ आपले जागियास गेलें.

१ कायसावंत हबशाच्या मदतीला आला होता.

## ८३. शहाजीचा मृत्यु[1]

इतकियांत राजियाचे बाप शाहाजी महाराज बेंगरूळीं होते ते विजापुराकडे येत असतां एकाएकीं चित्रदुर्गांत (ल्या) विलायती-[2] मध्यें बोगदरी गांवीं घोडियावरून पडून मृत्यु पावले. हें वर्तमान राजियास कळलें. बहूत शोक केला. सर्वही विधान[3] करून दानधर्म अपार केले, आणि बोलले कीं, 'मजसारख्या पुत्राचा पराक्रम महाराज पाहाते तरि उत्तम होतें. आपण आपला पुरुषार्थ कोणास दाखवावा? मागें अफजलखान मारिला व शास्ताखानास शास्ती केली, पराभवातें पावविला, आणि मिरजा राजियाची भेट घेऊन दिल्लीस गेलों, पादशाहाची भेट घेऊन मागती आपल्या राज्यास आलों. मागती कित्येक गड घेतले व शहरें मारिलीं आणि पागा, शिलेदार लष्कर चाळीस हजार केलें. असें पराक्रमाचें वर्तमान

ऐकून महाराज संतुष्ट जाले.[४] समाधान-पत्रें आपणास वरचेवर येत होतीं. तैशींच अलंकार वस्त्रें पाठवीत होते. या उपरि त्यामागें आपणास कोणी आतां वडील नाहीं!' म्हणून मोठा खेद केला. त्या उपरि मातुश्री अग्निप्रवेश करीत होती, तिचे मांडीवर बैसून गळां मिठी घालून आण घालून राहाविली. 'आपला पुरुषार्थ पाहावयास कोणीं नाहीं. तूं जाऊं नको.' म्हणून मोठा यत्न करून राजियांनीं व सर्व थोर थोर लोकांनीं राहाविली. असें वर्तमान जालें.

१. शहाजी इ. स. १६६४ त मरण पावला; पण सभासद ही हकीगत १६७० च्या घटनेनंतर देतो. हकीगत नंतर लिहिली असल्यामुळे शहाजीच्या मृत्यूनंतर घडलेल्या घटना शहाजी जिवंत असताना घडल्या असा वर्णनाचा रोख आहे. ["......असें पराक्रमाचें वर्तमान ऐकून महाराज संतुष्ट झाले ......" वगैरे] २. प्रदेश. ३. विधि. ४. शहाजी-शिवाजी यांचें सख्य होतें हें यावरून स्पष्ट दिसतें.

## ८४. राजापुरीवर स्वारी

पुढें राजियास राजपुरीचे शिद्दी, घरांत जैसा उंदीर तैसा शत्रू, यास कैसें जेर करावें म्हणून तजवीज पडली. तेव्हां रघुनाथ बल्लाळ सबनीस यांनीं आंगें अर्ज केला कीं, आपण शिद्दीवर स्वारी करितों. असें म्हणून सात पांच हजार मावळे खकम[१] पाईचे घेऊन राजपुरीवरि चालिले. त्यांनीं जाऊन राजपुरी पावेतों तळें, घोसाळें कुल देश मारून राजपुरी पावेतों सरद[२] दरियाकिनारा मोकळा केला. शिद्दीच्या एक दोन फौजा आल्या त्या मारिल्या. तेव्हां राजपुरीकडून रघुनाथपंताशीं राजकारण करून सला केला. देश थोडाबहुत मागून, पुढे सज्जन मनुष्य पाठवून, आणशफत देऊन रघुनाथपंतास भेटीस नेलें. भेट जाहाली. सल्याची बळकटी करून सख्य जालें. रघुनाथपंतास वस्त्रें घोडा दिधला. आपले देशास आले. पुढें काळानुसार रघुनाथपंत मृत्यू पावले. त्या नंतर शिद्दीचें शैल[३] तुटलें. यावरि हबशियांनीं बदल खाऊन देशास उपद्रव करूं लागले.

मग राजियांनीं व्यंकाजी दत्तो फौजेनिशीं नामजाद रवाना केले. त्यांनीं जाऊन, त्याचा मुलूख मारून तलफ[४] केला. मग शिद्दीनें आपले जातीचे हबशी लष्कर घोडेस्वार व हशम नामजाद व्यंकाजी दत्तोवर रवाना केले. यांशीं त्यांशीं युद्ध जालें. तीनशें हबशी व्यंकाजीपंतीं मारिले. घोडे पाडाव केले. व्यंकाजीपंतीं कस्त फार केली. बारा जखमा व्यंकाजीपंतास लागल्या. असा चौका[५] बसवून आले. शिद्दीनें सल्याचें नातें लाविलें होतें. परंतु राजियांनीं सला केलाच नाहीं. त्याचे देशांत जागां जागां गड कोट नवेच बळावून राहिले. राजपुरी नजीक डोंगर बळाविला होता, तो घेऊन, गड बांधून कुल देश काबीज केला. ठाणीं ठेविलीं. मग त्याचा इलाज चालेना. पांच सात हजार हशम व सुभे ठेविले. असें केलें. मग राजपुरीस मुलूख नाहीं. दाणे कोठून यावे ? त्यास पाणियांतील जाहाजें होतीं. तेणेंकरून वरकड मुलूख मारून, सामान आणून खाऊं लागले. त्यास राजियांनीं जाहाजें पाणियांतील सजिलीं. गुराबा व तरांडीं[६] व तारवें, गलबतें, शिबाडें,[७] गुराबा, पगार,[८] अशीं नाना जातींचीं जाहाजें करून दर्यासागर[९] म्हणोन मुसलमान सुभेदार व मायनाईक म्हणोन भंडारी असे दोघे सुभेदार करून, दोनशें जाहाजें एक सुभा, असें आरमार सजलें. त्यास व शिद्दीचे जाहाजांत युद्ध होऊन शिद्दीचीं जाहाजें पाडाव केलीं. युद्ध बहूत दिवस जाहालें. दर्यांत तरोंडें फिरेना असें जालें. त्यावर हमेषा युद्ध करीत चालले. मग चोरून मारून हबशी सामान नेत होता. राजियाचीं जाहाजें जागां जागां बंदरें शहरें मोंगलाई व फिरंगी व वलंदेज,[१०] इंग्रज, किलाताब[११] ऐशा सत्तावीस पादशाहा पाणियांत आहेत, त्यांचीं शहरें बेदनूर, सौंदें, श्रीरंगपट्टण ऐशीं दर्या किनारे नाना शहरें मारून पोट भरीत चालले. जागां जागां युद्ध करीत मालमत्ता मेळवून आपलें पोट भरून राजियास रसद द्रव्यें जिन्नस आणून देऊं लागले. ये रितीनें सातशें जाहाजें पाण्यांतील जालीं. समुद्रामध्येंही एक लष्कर जालें. हा एक बेत[१२] सजिला. पाण्यांतील एक राजपुरी[१३] निजामशाही उरली. याकरितां अद्याप निजामशाहाचें[१४] नांव चालतें.

१. डॉ. सेन 'irregular infantry' असा अर्थ देतात. वाकसकर **खकम**–खलाक–खलक–हलके लोक असा अर्थ देतात तो बरोबर वाटत नाही. '**हशम**' हा पाठ असावा (सरकार). २. सरहद्द ३. शल्य ४. जप्त ५. दहशत, पाहऱ्याची चौकी. ६–८तरांडी, शिबाडें, पगार हे जहाजांचे प्रकार आहेत. ९. **दर्यासारंग** असा शब्द असावा. १०. डच. ११. इंग्लिश फॅक्टरीच्या प्रमुखाचा हा उल्लेख असावा असें प्रो. सरकार म्हणतात. १२. '**बेत**' या शब्दाला '**हात**' हा पाठ रा. ब. साने देतात. बेत साध्य केला असाहि अर्थ होऊ शकेल. १३–१४. **राजपुरी**–जंजिरा. पण या वेळीं येथे निजामशाही नव्हती निजामशाही १६३६ तच बुडाली. जंजिरा मोंगलाकडे होता.

## ८५. कोकणाकडे महाराजांचा मोर्चा

तें स्थळ जेर करावें म्हणोन, कोंकणांत कुडाळीं लखम सावंत[१] देसाई म्हणोन पुंड होता. बारा हजार हशमानिशीं रहात असे. कुडाळ म्हणजे आदलशाही, त्यानें विजापुरास सांगून पाठविलें कीं, 'फौज घोडा-राऊत, हशम मेळवून राजियावरि चालोन जातों आणि कोंकण सोडवितों.' म्हणोन सांगोन पाठविलें. त्याजवरून विजापुरींहून खवासखान सरलष्कर, मोठा योद्धा, दहा हजार स्वारांनिशीं कुडाळास आला. लखम सावंत बारा हजार हशमांनिशीं सामील होऊन कोंकण सोडवीत चालले. इतकियांत राजास खबर कळून लष्कर व हशम निवड करून नीट चालून त्याजवर घेतलें. खवासखानास विजापुराहून मदतीस बाजी घोरपडे,[२] दीड हजार स्वार, येत होते. घाट उतरोन कोंकणांत राहिले. त्याजवर राजियांनीं लष्कर पाठवून छापा घालून, बाजी घोरपडे कुल भाऊबद सहवर्तमान बुडविले. बाराशें घोडीं पाडाव केलीं. मोठें युद्ध जालें. पुढें कुडाळावरि खवासखानावरि जावें, त्यासही यासारखे बुडवावें, तों त्यांनीं हें वर्तमान ऐकिलें. बाजी घोरपडे दीड हजार घोडे समवेत बुडविले. ही खबर ऐकून, धास्त खाऊन घाटावर पळून गेला. नीट विजापुरास पावला. पुढें लखम सावंतावरि राजियांनीं

नामजादी केली. त्याचीही फौज कित्येक मारिली. यावरि लखम सावंत कुडाळ प्रांत सोडून फिरंगणांत[३] बाहेर देशांत पळाला. कुडाळ देश राजियांनीं काबीज केला. फिरंगी यास राजियाचा धाक, तेथें त्यास ठेवून घेववेना असें जालें. जागा कोठें नाहीं तेव्हां राजियांशीं राजकारण लावून पितांबर शेणवी, मत्स्याहारी ब्राह्मण, म्हणून कुडाळीं हेजीब पाठवून दिला. राजियाचा कौल घेऊन भेटीस आला. भेट जाली. 'आपण सावंत म्हणजे भोंसले यांचा गोत्रज. आपलें तुम्हीं चालविणें उचित आहे.' असें कित्येक बोलिल्यावरि राजियांनीं देशमुखी कुडाळची करार करून तनकादाखल साहा हजार होन वेतन करार करून द्यावें असें केलें. वाडा-हुडा बुरजांचा बांधू नये. कुडाळीं राहावें. जमाव करूं नये. असें करून ठेविलें. त्याचे सरदार राम दळवी व तान सावंत यांस हशमांच्या हजारिया देऊन आपले आलाहिदा[४] चाकर तिघे तीन जागां नामजाद ठेविले. पुनः लखम सावंताची व यांची भेट होऊं न दिली. असा कुडाळ देश काबीज केला. फोंड कोट इदलशाही होता. तेथें मोहबतखान राजबिंडा सरदार जबरदस्त होता. ते जागां वेढा घालून, सुरंग लावून हुडे बुरूज उडविले. फोंड घेतलें. मोहबतखानास कौल देऊन विजापुरास जावयास निरोप दिला. तेव्हां राजियाकडील सरदार इभ्रामखान मोठा धारकरी, लष्कराचा हजारी, बरोबरि होता. त्यानें कष्ट मेहनत बहूत केली. फोंड घेऊन कडवाड,[५] शिवेश्वर, मिरज, अंकोलें, कदरें, सुपें, उडवें हे कोट कोंकणचे कुल घेऊन गोकर्ण महाबळेश्वर, वरघाट सुपें, येथवर सरद लाविली; व गोवियाचे फिरंगी यांस दबावून त्यांजवळून तोफा, नख्त, जडजवाहीर घेऊन, आपलेसे करून, त्यास उदमास[६] कौल देऊन आलम दरफ्ती[७] करावयासि निरोप दिला. असें कुल कोंकण काबीज केलें.

---

१. इसवीसनाच्या चौदाव्या शतकांत सांवतांची स्थापना झाली, पैकीं फोंड सावंताचा मुलगा खेम याने इ. स. १६२७ मध्ये विजापूरकरांकडून देशमुखी मिळवून तिचा १४ वर्षें उपभोग घेतला. इ. स. १६५१ मध्ये

त्याचा एक मुलगा लखम सावंत गादीवर आला. विजापूरकरांच्या वतीने याने शिवाजीला कोंकणांतून हाकून देण्याचा प्रयत्न चालविला, पण शिवाजीच्या हातून पराभव पावून हा तहास कबूल झाला. या तहान्वयें सावंताने शिवाजीचें मांडलिकत्व पत्करल्यासारखें झालें.

२. बाजी घोरपडे हा विजापुरी सरदार. मुस्तफाखान व शाहाजी यांचें कर्नाटकांतील युद्धांत बिनसलें तेव्हा खानाने बाजी घोरपडेकडून शहाजीला कपटाने कैद केलें होतें. त्याचा वचपा शिवाजीने या वेळीं काढला. ३. पोर्तुगीजांचा मुलूख. ४. स्वतंत्र, वेगळे. ५. कारवार ६. व्यापार. ७. आलम दरफ्ती=आमदरफ्ती=दळणवळण.

## ८६. बसनूर ऊर्फ बार्सीलोर

पुढें बिदनुरीं शिवापा नाईक जंगम होता. त्याचें शहर बसनूर[१] म्हणून थोर नामांकित होतें. दर्याकिनारा येथें पालती[२] पाठवून पालती आणून वर-घाटें जातां मार्ग नाहीं म्हणून पाणियांतील आपलीं जाहाजें आणून सिद्ध करून, आपण राजा खासा जाहाजांत बसून जाऊन बसनुरास[३] एकाएकीं दिवस उगवावयासि गेले. शहरचे लोक बेहुशार होते. एकाएकी जाहाजांतून उतरले. शहर मारिलें. एक दिवस शहर लुटून फन्ना केलें. जैसी सुरत मारून मालमत्ता आणिली, त्याप्रमाणें बसनूरची मत्ता अगणित माल जडजवाहीर कापडजिन्नस घेऊन आपले देशास आले. मत्ता सर्व पाहातां दोन कोटी होनांची आणली.

१. बसनूर हें दक्षिण कानडा जिल्ह्यांत आहे. बिदनूर प्रांताचें हें बंदर होय. २. टेहळेगिरी. ३. बसनूरची ही लूट १६७३ नंतरची आहे.

## ८७. कारंजें लुटलें

त्या उपरि कारंजें[१] मोगलाईंत मोठें शहर होतें तेथून पालती आणून खासा राजियांनीं लष्कर बरोबर घेऊन चालिले. जातां जातां

औरंगाबादेची पेठ मारिली. सात गांवची दौड करून जाऊन कारंजियावरि[1] तीन दिवस मुकाम करून, कुल शहरचे वाडे काबीज करून, मत्ता खणती[2]. लावून काढली. नक्त, जडजवाहीर, सोनेंरुपें, उंच कापड असें घेऊन स्वारी करून चालिले. मोगलांचे सुभे जागां जागां दिलेलखान व बाहादूरखान, एखलासखान व बेलोलखान व इंद्रमणी असे उमराव जागां जागां, कोणी दहा हजार, कोणी बारा हजार असे चौतर्फा चालून आले. त्यांशीं युद्ध करीत भांडत चालिले. मोठे मोठें झुंज करून मोगल मारून, गर्दीस मेळवून, हत्ती घोडे ऊंट मालमत्ता पाडाव करून आणिली. आणि कुल गनिमाचे वजीर माघारे नामोहरम होऊन गेले. राजे आपले फौजेनिशीं सुखरूप देशास आले. पाठीवर दिलेलखान बारा हजार स्वारांनिशीं दहा बारा गांवें अंतरानें भीमातीर पावेतों आला. मग राजे राजगडास (गेले.) मालमत्ता संख्या पाहतां सात कोडींचा आकार जाला.

१. कारंजें प्रतापरावाने इ. स. १६७० त लुटलें. या लुटींत प्रतापरावाने सर्व पाटील कुलकर्ण्यांकडून सारावसूलीपैकीं चौथाई शिवाजीस देऊं असें लिहून घेतलें व असें केल्यास दरवर्षीं लुटीचें भय नाही असें आश्वासन दिलें. २. जमिनीच्या पोटांत पुरलेली संपत्ति उकरून काढली.

## ८८. रायगड

पुढें रायरीगड[1] अदलशाही होता तो घेतला. राजा खासा जाऊन पाहातां गड बहूत चखोट, चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणें, दीड गांव उंच, पर्जन्यकाळीं कडियावरि गवत उगवत नाहीं, आणि धोंडा तासींव एकच आहे, [असा चखोट.] दौलताबादही[2] पृथ्वीवर चखोट गड खरा, परंतु तो उंचीनें थोडका. दौलताबादचे दशगुणीं गड उंच. असें देखोन बहूत संतुष्ट जाले आणि बोलिले, तक्तास जागा गड हाच करावा. असें करारीं करून तेच गडीं घर, वाडे, माडिया, सदरा, चौसोपे आणि अठरा कारखाने[3] यांस वेगळाले महाल, व राणियांस महाल, तैशींच सरकारकुनास वेगळीं घरें

व बाजार, पंच हजारियांस वेगळीं घरें व मातबर लोकांस घरें व गजशाळा व अश्वशाळा व उष्टरखाने, पालखी महाल व वहिली-महाल,[४] कोठी, थटीमहाल[५] चुनेगच्ची चिरेबंदी बांधिले.

१. **रायगड**—या प्रसिद्ध किल्ल्याचें पूर्वीचें नांव रायरी असें आहे. कुलाबा जिल्ह्याच्या महाड तालुक्यांतील हा डोंगरी किल्ला पुण्याच्या नैर्ऋत्येस सुमारे ७५ मैलांवर असून, त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची २८५१ फूट आहे. डोंगराच्या पूर्व, पश्चिम व दक्षिण बाजू इतक्या उभ्या आहेत की तेथे कृत्रिम तटबंदी बांधणें शक्य नाही. आकारमान, मजबुती, दक्षिण भाग व समुद्र यांतील सुलभ दळणवळण यांमुळे या किल्ल्यास महत्त्व आलें. बाराव्या शतकांत येथे लहान लहान मराठे सरदार रहात असत. चौदाव्या शतकांत त्यांनी विजयनगरच्या राजाचें आधिपत्य मान्य केलें. पंधराव्या शतकांत दुसरा अल्लाउद्दीन शाह वली याने त्यांच्याकडून खंडणी वसूल केली. इ. स. १४७९ मध्ये हा किल्ला निजामशाही सुलतानांच्या ताब्यांत आला. मोंगलांनी अहमदनगर जिंकल्यावर मात्र त्यांनी तो विजापूरच्या आदिल-शाही सुलतानांच्या हवालीं केला. शिवाजीने हा रायरी किल्ला इ. स. १६५६ मध्ये हस्तगत केला, व इ. स. १६७० च्या सुमारास तेथे आपली राजधानी करून त्याचें 'रायगड' नांव ठेविलें. या रायरीवरच पूर्वी यशवंतराव मोरे पळून गेला होता. त्यास पकडून तो डोंगर इ. स. १६५६ मध्ये शिवाजीने घेतला. ... मोगल सेनापति झुल्फिकारखान याने इ. स. १६८९ मध्ये हा किल्ला सर करून यास 'इस्लामगड' हें नांव दिलें.' नंतरच्या गडबडींत तो सिद्द्यांच्या ताब्यांत गेला पण पुढें शाहूच्या कारकीर्दींत १७३३ च्या सुमारास मराठ्यांनी तो आपल्या ताब्यांत आणला. २ निजाम-शाहीची राजधानी कांही काळ दौलताबादला नेली होती. ३. अठरा कार-खानें परिशिष्ट अ पहा. ४ रथशाळा. ५ गोशाला.

## ८९. राजारामाचा जन्म (इ. स. १६७०)

राजियास प्रथम स्त्री संभाजीराजियाची माता होती, ती निवर्तली. त्याजवरि राजियांनीं साहा स्त्रिया केल्या. त्यांमध्यें

मोहित्यांची[१] कन्या सोईराबाई गरोदर होती. तीस पुत्र जाहाला. तो पालथा[२] उपजला. राजियास वर्तमान सांगितलें. राजे म्हणू लागले कीं, 'दिल्लीची पातशाई पालथी घालील.' असें बोलिले. मग ज्योतिषी म्हणों लागले कीं, 'थोर राजा होईल. शिवाजी राजियाहून विशेष कीर्ती होईल.' असें भविष्य केलें. मग राजियांनीं राजाराम म्हणोन नांव ठेविलें. आणि बोलिले कीं, 'राजाराम प्रजा सुखी राखील. आपणापेक्षां याचा पराक्रम होईल. नांवाची कीर्त बहूत होईल. आपलें नांव रक्षील.' असें बोलिले, आणि दानधर्म बहूत केला.

१. सोयराबाई ही शिर्क्यांची कन्या. शिवभारतांत ती मोहित्यांची कन्या असा उल्लेख आला आहे.

२. मूल पालथें जन्माला येणें हें अशुभ चिन्ह समजलें जातें. पण शिवाजीने या अशुभाचेंच शुभांत रूपांतर करून 'दिल्लीची पातशाही पालथी घालील' असे उद्‌गार काढल्याचें सभासद सांगतो. हा सभासदकृत राजारामगौरव असण्याचीहि शक्यता आहे.

## ९०. मोरोपंताने अनेक किल्ले घेतले

पुढें मोरोपंत पेशवे यांनीं त्रिंबकगडापासून सालेरी किल्ल्यापावेतों किल्ले कित्येक घेतले. कितीएक नवे वसविले. असे चाळीस गड नवे कदीम[१] त्यांणीं घेतले, कोळवण काबीज केलें. रामनगर, जवाहीर[२] हा देश घेतला. त्या देशांतही गड वसविले. अशी ख्यात केली.

१. जुने. २. जव्हार.

## ९१. महाबतखान व दिलेरखान यांची रवानगी

हें वर्तमान दिल्लीस पातशाहास सर्वही कळलें कीं, 'सुरत मारिली, बसनूर मारिलें. बराणपूर, औरंगाबाद मारिलीं. सालेरी

आदिकरून सर्व किल्ले घेतले. खानदेश, बागलाण, गुजरात, वऱ्हाड देश बांधीत चालिले. असें ऐकून बहूत कष्टी होऊन बोलिले कीं, ‘ काय इलाज करावा ? लाख लाख घोड्यांचे सुभे रवाना केले ते बुडविले. नामोहरम होऊन आले. आतां कोण पाठवावें ? शाहाजादे पाठवावे तरि तिकडेच फितवियांत मिळून दिल्लीच घेतील. याकरितां कोणी पाठवावयास दिसत नाहीं. याउपरि आपण खासा कंबरबस्ती करून शिवाजीवर जावें, तर शास्ताखानाचा न्याय जालियास काय करावें ? याकरितां, शिवाजी जोंवर जिवंत, तोंवर दिल्ली आपण सोडीत नाहीं.’ असा विचार केला, आणि इखलासखान म्हणजे केवळ शूर व बेलोलखान यांस बोलावून आणून वीस हजार स्वारांनिशीं सालेरीस[१] रवाना केलें. सालेरी घेऊन फस्त करणें. तसें दिलेलखान यास दाहा हजार स्वारांनिशीं अहिवंत (किल्ल्यावर) रवाना केलें. दिलेलखान येऊन रवळा जवळ्यास[२] लागले. गडकरी बरे भांडले. मोठें युद्ध जालें. गड हातास आला नाहीं. मोरोपंत पेशवे यांनीं उपराळियास मावळे लोक बारा हजार रवाना केले. त्यांनीं जाऊन छापे घातले. ऐसा घाबरा केला. रामाजी पांगेरा म्हणून हशमांचा हजारी (त्यानें) हजार लोकांनिशीं कणेरागड आहे त्याखालें दिलेलखानाशीं युद्ध केलें. हजार लोक थोडे देखून दिलेलखान यानें फौजेनिशीं चालून घेतलें. रामाजी पांगेरे यांनीं आपले लोकांत निवड करून, निदान[३] करावयाचे आपले सोबती असतील ते उभे राहाणें, म्हणून निवड करितां सातशें माणूस उभे राहिले. ततकियांनीं निदान करून भांडण दिधलें. दिलेलखान याची फौज (इनें) पायउतारा होऊन चालून घेतलें, चौफेरा मावळे लोक वेढिले. एक प्रहर टिपरी[४] जैसी शिमग्याची दणाणते तैसे मावळे भांडिले. दिलेलखानाचे बाराशें पठाण रणास आणिले. मग सातशें माणूस व रामाजी पांगेरा सर्वही उघडे बोडके होऊन एकएकास वीस वीस तीस तीस जखमा तिराच्या, बर्चीच्या लागल्या. लोक मेले. मोठें युद्ध जालें. मग दिलेलखान यानीं तोंडांत अंगोळी घालून एक घटका आश्चर्य केलें.

१. सालेर हा बागलाण भागांतील एक प्रसिद्ध किल्ला. सुरतेच्या लुटी-नंतर प्रतापराव गुजराने खानदेशांत आणि मोरोपंत पेशव्यांनी बागलाणांत धुमाकूळ घातला. मोरोपंत पेशव्यांनी दाउदखान पन्नी याजबरोबर लढून बागलाणांतील औंढा, पट्टा, सालेर (साल्हेर), मुल्हेर, त्रिंबकगड, रामनगर वगैरे किल्ले व ठाणीं काबीज केली. शिवाजीच्या या चढाईच्या धोरणाने धास्तावलेल्या बादशहाने जसवंतसिंहास परत बोलावून फौजेच्या सर्व अखत्यारासह महाबतखान नामक आपल्या नामांकित आणि अनुभवी सरदाराची नेमणूक केली. बागलाणांतील शिवाजीने घेतलेले किल्ले परत घेण्याच्या हेतूने दाउदखान, दिलीरखान आणि महाबतखान यांनी जो जबरदस्त प्रयत्न केला, त्यामुळेच साल्हेरचा भीषण रणसंग्राम घडून आला. शिवाजीच्या आज्ञेनुसार प्रतापराव आणि मोरोपंत यांचें सैन्य सालेरीस एकत्र झालें.

२. रवळाजवळा, कणेरा, अहिवंत हे किल्ले नाशिक जिल्ह्यांत आहेत. ३. **'निदान करावयाचे ....'** –निर्वाणीने लढावयास सिद्ध असलेले सोबती. ४. हातघाईची लढाई. सभासदाचें हें युद्धवर्णन अत्यंत सुंदर वठलें आहे.

## ९२. सालेरचा वेढा

त्यावर इखलासखान नबाब याणीं येऊन सालेरीस वेढा घातला. आणि गडाखालें उतरला. हें वर्तमान राजियास कळोन राजियानीं प्रतापराव सरनोबत लष्कर देऊन मोंगलाईत पाठविले होते, त्यांस पत्रें व जासूद पाठविले कीं, 'तुम्ही लष्कर घेऊन, सिताबीनें[1] वरघाटें सालेरीस जाऊन, बेलोलखानावरि[2] छापा घालून बेलोलखान मारून चालवणें; आणि कोकणांतून मोरोपंत पेशवे यांस हशमानिशीं रवाना केलें; हे इकडून येतील आणि तुम्हीं वरघाटें येणें; असे दुतर्फा चालून घेऊन, गनिमास मारून गर्दीस मेळविणें.' अशी पत्रें पाठविलीं. त्यावरून प्रतापराव लष्कर घेऊन वरघाटें आले. मोरोपंत पेशवे कोकणांतून आले. उभयतां सालेरीस पावले. एक तर्फेनें लष्करांनीं घोडीं घातलीं. एक तर्फेनें मावळे लोक शिरले. आणि मारामारी

केली. मोठें युद्ध जाहालें. चार प्रहर दिवस[३] युद्ध जाहालें. मोंगल, पठाण, रजपूत, रोहिले, तोफाची, हत्ती, उंटें आराबा घालून युद्ध जाहालें. युद्ध होतांच पृथ्वीचा धुराळा असा उडाला कीं, तीन कोश औरसचौरस आपलें व परकें माणूस दिसत नव्हतें. हत्ती रणास आले. दुतर्फा दहा हजार माणूस मुर्दा जाहाले. घोडीं, उंट, हत्ती (यांस) गणना नाहीं. रक्ताचे पूर वाहिले. रक्ताचे चिखल जाहाले त्यामध्यें रुतों लागलें. असा कर्दम[४] जाहाला. मारतां मारतां घोडे जिवंत उरले नाहींत. जे जिवंत सांपडले ते साहा हजार घोडे राजियाकडे गणतीस लागले. सवाशें हत्ती सांपडले. साहा हजार उंटें सांपडलीं. मालमत्ता खजीना, जडजवाहीर, कापड, अगणित बिछाईत हातास लागली. बेवीस[५] वजीर नामांकित धरले. खासा इखलासखान व बेलोलखान पाडाव जाले. ऐसा कुल सुभा बुडविला. हजार दोन हजार सडे सडे पळाले. असें युद्ध जालें. त्या युद्धांत प्रतापराव सरनोबत व आनंदराव व्यंकाजी दत्तो व रुपाजी भोसले व सूर्यराव कांकडे, शिदोजी निंबाळकर व खंडोजी जगताप व गोंदजी जगताप व संताजी जगताप व मानाजी मोरे व विसाजी बल्लाळ, मोरो नागनाथ व मुकुंद बल्लाळ, वरकड बाजे वजीर, उमराव असे यांणीं कस्त केली. तसेंच मावळे लोक यांणीं व सरदारांनीं कस्त केली. मुख्य मोरोपंत पेशवे व प्रतापराव सरनोबत या उभयतांनीं आंगीजणी[६] केली. आणि युद्ध करितां सूर्यराव कांकडे पंचहजारी मोठा लष्करी धारकरी, याणें युद्ध थोर केलें. ते समयीं जंबूरियाचा[७] गोळा लागून पडला. सूर्यराव[८] म्हणजे सामान्य योद्धा नव्हे. भारतीं जैसा कर्ण योद्धा, त्याच प्रतिमेचा असा शूर पडला. वरकडही नामांकित शूर पडले. असें युद्ध होऊन फत्ते जाहाली.

---

१. त्वरेने. २. विजापुरी सरदार बेलोलखान याचा भाऊ. ३. दिवसपर्यंत. ४. चिखल. ५. बावीस. ६. शौर्य. ७. तोफेचा. ८. सूर्यराव हा शिवाजीचा जुना कसलेला योद्धा होता.

### ९३. सालेरीचा विजयोत्सव

हें वर्तमान प्रतापराव यांणीं मोरोपंत पेशवे यांणीं राजियास पत्रें लिहून जासूद पाठविले. राजियांनीं खबर ऐकून बहूत खुशाल जाले. तोफा मारल्या. साखरा वांटल्या. खबर घेऊन जासूद आले त्यांचे हातीं सोन्याचीं कडीं घातलीं. आणि प्रतापराव सरनौबत व मोरोपंत पेशवे, आनंदराव, व्यंकाजीपंत, यांस बक्षीस अपार द्रव्य दिलें. सरदार हजारी, पंचहजारी लष्करचे, मावळे त्यांस बक्षिसें दिधलीं. नांवाजिले. वजीर जे पाडाव जाले त्यांस वस्त्रें अश्व देऊन सोडणें म्हणोन हुकूम पाठविला. त्यावरून पेशवे व सरनौबत (व) सरदार खुशाल जाहाले. बेलोलखान[1] व नबाब व वजीर पाडाव जाले त्यास वस्त्रें व अश्व देऊन सोडिलें. दिलेलखान सालेरीहून चार मजलींवर होता. त्याणें ही खबर ऐकून माघारा पळोन गेला.

१. विजापूरच्या बेलोलखानाचा हा भाऊ मोगलाकडे होता.

### ९४. बहादूर कोकाची रवानगी

ही खबर दिल्लीस पादशाहास कळून बहूत दिलगीर झाले. तीन दिवस बाहेर आले नाहींत. आमखास[1] [ मध्यें ] तीन दिवस आले नाहींत. असे कष्टी जाले. 'खुदानें मुसलमानाची पातशाही दूर करून शिवाजीसच दिधली असें वाटतें. आतां शिवाजी अगोदर आपणांस मृत्यू होईल तरि बरें. आतां शिवाजीची चिंता जिवीं सोसवत नाहीं.' असें बोलले. मग बहादूर कोका, पातशाहाचा दूधभाऊ, याणें येऊन पातशाहाचें समाधान केलें कीं, 'तुम्हीं दिल्लीची पातशाई खुशाल करणें. आपण शिवाजीवरि जातों. त्यास हालखुद[2] ठेवितों. त्याचें लष्कर पातशाही मुलखांत न ये असें करितों. नाना हुन्नर करून त्यास जेर करितों. पातशाहांनी फिकीर न करावी.' असें समाधान करुन, पातशाहास आणून तख्तावर बसविलें. बहादूरखानास नांवाजून वस्त्रें अलंकार आपले गळ्यांतील पदक व शिरची कलगी जडावाची, दोन हत्ती व घोडे असें देऊन दौलत

जाफा[३] दिधली, आणि समागमें सत्तर हजार स्वार दिले. हारोलीस[४] दिलेलखानास हुकूम करून दिल्हा. येणेंप्रमाणें फौज दक्षणेस राजियावर पाठविली. ती मजल दरमजल दिल्लीहून चालिली. राजियास ही खबर बातमी दिल्लीहून आली. राजे बोलिले कीं, 'बहादूरखान[५] पेंडीचें गुरूं आहे. त्याचा गुमान काय आहे? त्यास आपले मुलकांत यावयास दोन वर्षें लागतील!' असें बोलिले.

१. दरबाराचा दिवाणखाना. २. 'यथावश्यं तु हाल्खुदं'; पुऱ्या बंदोबस्तांत. ३. अधिक. ४. आघाडी. ५. बहादूर खानाला शिवाजी 'पेंडीचें गुरु' समजतो; पैशाच्या लालुचीने वश होणारा. सभासदाचें वर्णन कित्येक वेळा अत्यंत मार्मिक असतें.

### ९५. पन्हाळा, सातारा आदि किल्ले घेतले

मग अंणाजी दत्तो सुरनीस यांनीं मालसांवत, मावळे यांचा हजारी, यास सांगून, हल्ला करून पन्हाळा किल्ला अदलशाही होता तो घेतला, व सातारा, चंदन, वंदन, नांदगिरी, परळी असे किल्ले घेतले, राजा खासा किल्ले देश पाहावयास रायरीहून निघोन आले. वांईचा कोट येतांच घेतला तसाच कोट कऱ्हाडचा घेतला. सिरोळ, कोल्हापूर हे कोट घेतले. हुकेरी, रायबागपर्यंत देश घेतला.

### ९६ राज्याची व्यवस्था :

मुलूख चौतर्फा सुटला.[१] मुलकांत आटोप कैसा होय? तेव्हां मोरोपंत पेशव्याचा हवाला कल्याण-भिवडीपासून देखील कोळवण सालेरीपर्यंत वरघाट व कोंकण, त्यांचे स्वाधीन देश केला. लोहगड व जुन्नर देखील बारा मावळें हाराळ्याचे घाटापासून पेशव्याचा हवाला केला. अंणाजी दत्तोचे स्वाधीन चऊलपासून दाभोळ, राजापूर, कुडाळ, बांदें, फोंड, कोपल[२] पर्यंत कोंकण अंणाजी सुरनीस याचे स्वाधीन केलें. वरघाट वाईपासून कोपल तुंगभद्रा पावेतों देश नेमून दत्ताजीपंत वाकनीस याचे स्वाधीन केला. दत्ताजीपंतास

पन्हाळां ठेविलें. असा देश तीन सरकारकुनांच्या हवालां केला. याखेरीज मोंगलाई देश येथें सुभेदार ब्राह्मण सात पांच ठेविले. तेही पेशव्याचे आज्ञेंत ठेविले. गड कोट किल्ले येथें सरकारकुनांनीं परामर्ष करावा. परंतु किल्लेदार कारकून लोक जे ठेवणें ते राजियांनीं आपले नजरगुजर[३] करून ठेवावे. कामाचा माणूस पाहून तैनात जाजती[४] हशमांस करणें ती सरकारकुनांनीं करावी. ये जातीनें तह केला. सरकारकुनांचे मुतालीक राजियाजवळ असावे. वर्षास हिशेब मुलकाचा व रसद घेऊन सरकारकुनांनीं राजदर्शनास यावें. येणेंप्रमाणें कारभार करीत चालले.

१. प्रदेश चारी दिशेने पसरला. २. हें गांव तुंगभद्रेच्या काठीं आहे. ३ पाहणी, परीक्षा. ४. बढती.

### ९७. उंबराणीची लढाई

पुढें विजापुराहून अबदुल करीम बेलोलखान बारा हजार स्वारानिशीं इकडे चाल करून आला. तो फौजेनिशीं हिकडे चालला ही खबर राजियास कळोन कुल लष्कर प्रतापराव यास हुकूम करून आणविलें आणि हुकूम केला कीं, 'विजापूरचा बेलोलखान येवढा वळवळ बहूत करीत आहे. त्यास मारून फत्ते करणें.' म्हणोन आज्ञा करून लष्कर नबाबावरि रवाना केलें. त्यांनीं जाऊन उंबराणीस[१] नबाबास गांठिलें. चौतर्फा राजियाचे फौजेने कोंडून उभा केला. पाणी नाहीं असा जेर केला. युद्धही थोर जाहालें. इतक्यांत अस्तमानही जाला. मग निदान करून नबाब पाणियावरि जाऊन पाणी प्याला. त्याजवरि प्रतापराव सरनौबत यास आंतस्त[२] कळविलें कीं, 'आपण तुम्हांवरि येत नाहीं. पादशाहाचे हुकमानें आलों. याउपरि आपण तुमचा आहें. हरएक वक्तीं आपण राजियाचा दावा न करीं.' असें कितीएक ममतेचें उत्तर सांगोन सला केला. मग राजियाचें लष्कर निघोन गेलें. राजियास खबर कळून लष्करास ताकीद करून फजीत केलें कीं, 'सला काय निमित्य केला?' असे रागास आले. पुढे प्रतापराव फौजेनिशीं मोंगलाईंत भागानगरचा देश, देवगड, रामगिरी, बाज[३] देश मारून लुटून माघारे आले.

### १०१. हुसेनखान मायणाचा पराभव

हंबीरराव लष्कर घेऊन संपगांवास गेले. इतकियांत विजापूरचा सरदार हुसेनखान मायणा पठाण मोठा तोलदार, पांच हजार पठाण, तिरंदाज, बरचीवाले, अडहत्यारी असे प च रू स[1] [?] तसे बहिले, बंदुकी, तोफखाना असा होता. हुसेनखान म्हणजे जैसा नबाब बेलोलखान याच्या जोडीचा सरदार. तो हंबीरराव याजवर चालून आला. मराठे म्हणजे मोठे हरीफ,[2] त्यांनीं शर्त करून भांडण दिधलें. नीट ग च ड ते[3] [?] घोडीं घालून मारामारी केली. हुसेनखानचे कित्येक लोक मारिले व घोडीं मारिलीं व हत्ती रणास आणिले. मोठें युद्ध बळकट दोन प्रहर दिवसापासून चार प्रहर रात्र-पर्यंत जालें. साहा प्रहरांत कुल फौज बुडविली. हुसेनखान खासा धरिला. चार साडेचार हजार घोडीं पाडाव केलीं. बारा हत्ती पाडाव केले. तसे उंट व बाजे जिन्नस, बिछाईत, खजीना व कापड बेमुहिन[4] सांपडलें. मोठें झुंज करून फत्ते केली. रण दुतर्फा अपार पडलें.

१. नकलकाराची कांही चूक असावी. २. धूर्त. ३. नकलकाराची कांही चूक असावी. ४. अगणित.

### १०२. दक्षिणचा दरवाजा घेतला

यानंतर फतेची खबर [ लिहून ] राजियाकडे जासुदाबरोबर पत्रें पाठविलीं. त्यानीं जाऊन वर्तमान सांगितलें. त्याजवरून राजे बहूत संतोष पावून खुशाल जाले. हुसेनखानाचा भाऊ किल्ले कोपल येथें होता त्याशीं राजकारण मोरोपंत पेशवे यानीं केलें आणि कोपल घेतलें. कोपल म्हणजे दक्षणचा दरवाजा. तक्ताची जागा. असा किल्ला घेतला. मोठें स्थळ प्राप्त जाहालें. कोपल म्हणजे तुंगभद्रेचे कांठीं. तुंगभद्रा पावेतों देश हस्तगत जाहाला. कोपलाकरितां[1] कनकगिरी, हरपनहल्ली, रायदुर्ग व चित्रदुर्ग व विद्यानगर, बुंदी कोट बाजे पाळेगार[2] [ रुजू ] जाले. असें कार्य जालें.

१. तुंगभद्रेच्या काठचें कोपळ घेऊन महाराजांनी दक्षिणेकडील स्वारीला प्रारंभ केला. २. इतर पाळेगार.

### १०३. मोंगली प्रदेशावर स्वारी करून प्रदेश काबीज केला

यानंतर पुढें दिल्लीहून बहादूरखान,[1] देखील-हरोल दिलेलखान, हे फौजेनिशीं अमदानगरास येऊन राहिले. हें वर्तमान राजियास कळलियावर राजियांनीं गड कोट किल्ले यांस खबर केली आणि मजबुतीनें राहिले. मग जासूद पत्रें नबाब बहादूरखान यांजकडे गुप्तरूपें पाठविलीं. हरंद्र सोधावें,[2] पुढें तजवीज करणें ती करावी,' असें केलें. आणि राजियांनीं आपले लष्करास हुकूम करून, हंबीरराव सरनौबत फौज घेऊन मोंगलाईत शिरले. खानदेश, बागलाण, गुजराथ, अमदाबाद, बऱ्हाणपूर, वऱ्हाड, माहूर वरकड देश नर्मदा पावेतों, देखील-जालनापूर, या देशांत स्वारी करून, मुलूख मारून, खंडणी करून जप्त केला. मालमत्ता अगणित जमा करून चालिले. तों बहादूरखान यांनीं कुल जमाव घेऊन हंबीररायाचे पाठीवर चालून आले. राजियाची फौज तोलदार गांठली. मोंगल बहूत धास्तीनें घाबिरा होऊन सात आठ गांवचे अंतरानें चालिला. दिलेलखान उतावळा होऊन फौजेशीं गांठ घातली. हंबीरराव यांनीं दिलेलखान नजरेंत[3] धरिला नाहीं. तोलदारीनें मत्ता घेऊन आपले देशास आले. मालमत्ता राजियास दिली.

१. दिलेलखान आघाडीवर होता. त्याच्या सैन्यासह बहादूरखान आला.
२. अंतरंगांतील हेतु काढून घ्यावा. ३. पर्वा केली नाही.

### १०४. राज्याभिषेक आणि अष्टप्रधानांची नेमणूक

पुढें वेदमूर्ति राजेश्री गागाभट्ट[1] म्हणून वाराणशीहून राजियाची कीर्ति ऐकून दर्शनास आले. भट गोसांवी, थोर पंडित, चार वेद साहा शास्त्रें योगाभ्याससंपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येनें निपुण, कलयुगींचा ब्रह्मदेव, असे पंडित—त्यास राजे व सरकारकून सामोरे जाऊन, भेट घेऊन सन्मानें आणिलें. त्यांची पूजा नाना प्रकारें रत्नखचित अलंकार, पालखी, घोडे, हत्ती देऊन द्रव्यही

उदंड देऊन पुजिलें. गागाभट बहुत संतुष्ट जाले. भट गोसांवी यांच्या मतें, मुसलमान बादशाहा तक्तीं बसून, छत्र धरून, पातशाही करितात, आणि शिवाजी राजे यांनींही चार पादशाही दबविल्या आणि पाऊण लाख घोडा लष्कर गड कोट असें [ मिळविलें ] असतां त्यांस तक्त नाहीं, याकरितां मऱ्हाठा राजा छत्रपती व्हावा असें चित्तांत आणिलें. आणि [ तें ] राजियासही मानिलें. अवघे मातबर लोक बोलावून आणून विचार करितां सर्वांचे मनास आलें. तेव्हां भट गोसांवी म्हणूं लागले कीं, तक्तीं बसावें. तेव्हां राजियाचे वंशाचा शोध करितां राजे शुद्ध क्षत्री शिसोदे उत्तरेहून दक्षिणेस एक घराणें आलें, तेंच राजियाचें घराणें असें शोधिलें. उत्तरेचे क्षत्रियांचे व्रतबंध होतात त्याप्रमाणें व्रतबंध करावा हा विचार आधीं करून भट गोसावी यांनीं राजियाचा क्षेत्रीं व्रतबंध केला. शुद्ध क्षत्रिय आधीं केला. अपार द्रव्य धर्म केला, कुल आपले देशांतून पर देशांतून पन्नास सहस्र वैदिक ब्राह्मण थोर थोर क्षेत्रींहून मिळाले. तो सर्वही समुदाय राहून घेतला. प्रत्यहीं मिष्टान्न भोजनास घालूं लागले. पुढें तक्तारूढ व्हावें [ म्हणून ] तक्त सुवर्णाचें, बत्तीस मणाचें, सिद्ध करविलें. नवरत्नें अमोलिक जितकीं कोशांत होतीं त्यामध्यें शोध करून मोठीं मोलाचीं रत्नें तक्तास जडाव केलीं. जडित सिंहासन सिद्ध केलें. रायरीचें नांव 'रायगड' म्हणोन ठेविलें. तक्तास स्थळ तोच गड नेमिला. गडावरि तक्तीं बसवावें असें केलें. सप्त महानदियांचीं उदकें व थोर थोर नदियांचीं उदकें व समुद्राचीं उदकें, तीर्थ क्षेत्र नामांकित तेथील तीर्थोदकें आणिलीं. सुवर्णाचे कलश केले व सुवर्णाचे तांबे केले. आठ कलश व आठ तांबे यांनीं अष्ट प्रधानांनीं राजियास अभिषेक करावा असा निश्चय करून, सुदिन पाहून मुहूर्त पाहिला. शालिवाहन शके १५९६ ज्येष्ठमासीं[2] शुद्ध १३ स मुहूर्त पाहिला. ते दिवशीं राजियांनीं मंगलस्नानें करून श्रीमहादेव व श्रीभवानी कुलस्वामी, उपाध्ये प्रभाकर भटाचे पुत्र बाळंभट कुलगुरू व भट गोसांवी, वरकड श्रेष्ठ भट व सत्पुरुष अनुष्ठित, यांची सर्वांची पूजा यथाविधी अलंकार

वस्त्रें देऊन [ केली. ] सर्वांस नमन करून अभिषेकास सुवर्ण-चौकीवर बसले. अष्ट प्रधान व थोर थोर ब्राह्मणांनीं स्थळोस्थळचीं उदकें करून सुवर्ण-कलशपात्रीं अभिषेक केला. दिव्य वस्त्रें, दिव्य अलंकार घेऊन, सर्व पूज्य मंडळीस नमस्कार करून सिंहासनावर बसले. कित्येक नवरत्नादिक सुवर्ण-कमळें व नाना सुवर्ण-फुलें, वस्त्रें उदंड दिधलीं. दानपद्धतीप्रमाणें षोडश महादानें इत्यादिक दानें केलीं. सिंहासनास अष्टखांब जडित केले. त्या स्थानीं अष्टप्रधानांनीं उभे राहावें. पूर्वीं कृतायुगीं, त्रेतायुगीं, द्वापारीं, कलियुगाचे ठायीं पुण्यश्लोक राजे सिंहासनीं बैसले, त्या पद्धतीप्रमाणें शास्त्रोक्त सर्वही साहित्य सिद्ध केलें. अष्ट खांबीं अष्ट प्रधान उभे राहिले. त्यांचीं नांवें बितपशील :—

१ मोरोपंत, त्रिंबकपंताचे पुत्र, पेशवे, मुख्यप्रधान.

१ हंबीरराव मोहिते सेनापती

१ नारो निळकंठ व रामचंद्र निळकंठ मुजुमदार, यांचे नांव अमात्य.

१ त्रिंबकजी सोनदेव डबीर, यांचे पुत्र रामचंद्रपंत, सुमंत.

१ अंणाजीपंत सुरनीस, यांचें नांव सचिव.

१ रावजी पण्डितराव होते त्यांचे पुत्रास रायजीराज [ ? ]

१ दत्ताजी त्रिंबक वाकनीस, यांचें नांव मंत्री

१ निराजी रावजी यांस न्यायाधिशी.

---

१. **गागाभट्ट**: विश्वेश्वर दिनकर ऊर्फ गागाभट्ट हा मोठा पंडित होता. याचें वास्तव्य काशीक्षेत्रीं होतें तरी त्याचें मूळ घराणें महाराष्ट्रांतीलच होतें. पैठणचे अनंत देवभट्ट हे त्याचे गुरुबंधु होते. गागाभट्टाचे वडील दिनकरभट्ट व चुलते कमलाकरभट्ट हे मोठे विद्वान् पंडित होते. कमलाकरभट्टांचा **निर्णय सिंधु** हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. शिवराज्याभिषेकाच्या प्रसंगाने गागाभट्टाचा शिवाजीशीं परिचय झाला ही समजूत चुकीची आहे. उभयतांचा परिचय पूर्वीचाच होता. शेंडे-गोळक यांच्यावरील ग्रामण्य निर्णय व शेणवी जातीच्या भांडणाचा निर्णय गागाभट्टानेच दिला होता. यासाठीं तो १६६३ मध्यें

कोंकणांत आला होता. हा निर्णय शिवाजीमहाराजांच्या सांगण्यावरूनच त्याने दिला होता. 'कायस्थधर्मप्रदीप' ग्रंथ लिहून त्यांच्या षोडश संस्कारांच्या अधिकारांचें त्यानें विवेचन केलें. **श्येनवीजातिनिर्णयास शिवप्रशस्ति** जोडलेली आहे. त्यावरून शिवाजीशी त्याचा चांगलाच परिचय होता. हिंदुपदपातशाही स्थापन करणाऱ्या शिवाजीमहाराजांबद्दल त्यास आदर होता. इ. स. १६७४ त गागाभट्ट नाशिक येथे आला होता. तेथून तो महाराजांना भेटण्यास गेला; व याच वेळीं राज्याभिषेकाची कल्पना त्यास सुचली. त्यानें आपणहून शिवाजीमहाराजांना ही कल्पना सांगितली व त्यांची संमति घेऊन अनंतभट्टांच्या साहाय्यानें त्याने हा राज्याभिषेकविधि तयार केला.

राज्याभिषेकाला ब्राह्मण सरदारांकडून अगर वैदिक ब्राह्मणांकडून विरोध झाला हें फारसें खरें नाही. किरकोळ विचारमंथन झालें असावें. गागाभट्टाने सर्व अडचणी दूर करून भोसल्यांचे उपाध्याय बाळंभट यांच्याकडून सर्व विधि करवून घेतला. राजांची मुंज करविली; नंतर वैदिक मंत्रांनी पुन्हा विवाहविधि करविले आणि त्यांना राज्याभिषेकास योग्य बनवून हा महान् समारंभ घडवून आणिला. बहुतेक सर्वच बखरींनी या प्रसंगाचें अतिशयोक्त वर्णन केलें आहे. हा विधि प्रामुख्याने धार्मिक होता. राजांना धर्माची आणि समाजमताची मान्यता मिळवून देणें एवढाच हेतु यांत होता. बखरकारांना हें रहस्य न समजल्यानें त्यांनी या समारंभाचें राजकीयदृष्टया वर्णन केलें आहे. (वा. सी. बेंद्रे यांच्या 'श्रीशिवराजाभिषेक' या ग्रंथावरून)

२. सभासदाने राज्याभिषेकाचा शक बरोबर दिला आहे. सबंध बखरींत ३।४ घटनांचा उल्लेख कालगणना देऊन केला आहे. त्यांपैकीं हा उल्लेख महत्त्वाचा आहे. ३. 'रघुनाथ पंडितराव याचे पुत्रास दानाध्यक्ष' केलें असाहि पाठ अन्यत्र आहे.

### १०५. राज्याभिषेक शक सुरू केला

येणेंप्रमाणें संस्कृत नांवें ठेविलीं. अष्ट प्रधानांचीं नांवें ठेविलीं ते स्थळें नेमून उभे केले. आपापले स्थळीं उभे राहिले. बाळ प्रभू चिटनीस व नीळ प्रभू पारसनीस वरकड अष्ट प्रधानांचे मुतालीक व हुजरे, प्रतिष्ठित सर्वही यथाक्रमें पद्धतीप्रमाणें सर्वही उभे राहिले.

छत्र जडावाचें मोतीलग झालरीचें करून मस्तकावर धरिलें. छत्रपती असें नांव चालविलें. कागदीं पत्रीं स्वस्तिश्री[1] [राज्याभिषेक] शक[2], सिंहासनावर बसले त्या दिवसापासून नियत[3] चालविला. पन्नास सहस्त्र ब्राह्मण वैदिक मिळाले. या वेगळे तपोनिधी व सत्पुरुष, संन्यासी, अतिथी, मानभाव, जटाधारी, जोगी, जंगम नानाजाती मिळाले. तितक्यांस चार मास मिष्टान्न उलफे[4] चालविले. निरोप देतां पात्र पाहून द्रव्य, अलंकार, भूषणें, वस्त्रें अमर्याद दिधलीं. गागाभट मुख्य अध्वर्यू, त्यांस अपरमित द्रव्य दिलें. संपूर्ण खर्चाची संख्या एक क्रोड बेताळीस लक्ष होन जाले. अष्ट प्रधानास लक्ष लक्ष होन बक्षीस दर असामीस, त्या खेरीज एक एक हत्ती, घोडा, वस्त्रें, अलंकार असें देणें दिलें. येणेंप्रमाणें राजे सिंहासनारूढ जाले. या युगीं सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशाहा. मऱ्हाटा पातशाहा येवढा छत्रपती जाला. ही गोष्ट कांहीं सामान्य जाली नाहीं.

१. स्वस्ति म्हणजे कल्याणाची सत्ता. कोणत्याहि मंगलकार्याचे प्रारंभीं पुरोहिताकडून म्हटल्या जाणाऱ्या मंत्रांत कल्याणाचीच मागणी असते. जुन्या मराठी पत्रलेखनांत 'स्वस्तिश्री' हा शब्द मायना म्हणून वापरलेला असतो. २. शिवाजीमहाराजांनी राज्याभिषेकानंतर नवा शक सुरू केला यामध्ये त्यांची युगपुरुषाची दूरदृष्टि दिसून येते. आनंदनाम संवत्सरे शालिवाहन शके १५९६ (इ. स. १६७४) मध्ये शिवाजींचा राज्याभिषेक झाला. या वेळेपासून स्वराज्याची खूण म्हणून त्याने हा स्वतंत्र शक सुरू केला. त्याच्या हयातीपर्यंत तो चालू होता. पुढें ही प्रथा बंद होऊं लागली., नाना फडणीस आणि सखारामपंत बोकील यांना तो शक गैरसोयीचा वाटल्यानें त्यांनी तो पूर्ण बंद केला. ३. अढळपणें. ४. शिधा.

### १०६. बादशहाला खेद होतो

हीं वर्तमानें बहादूरखान कोका यासि कळलीं. त्यानें पुढें पेडगांव भीमातीर येथें येऊन छावण्या केल्या. आणि दिल्लीस पातशाहास हें वर्तमान सिंहासनाचें लिहिलें. पातशाहास कळून तक्तावरून

उतरून अंत:पुरांत गेले. आणि दोन्ही हात भुईस घांसून, आपले देवाचें नांव घेऊन परम खेद केला. दोन दिवस अन्न उदक घेतलें नाहीं. आणि बोलिले कीं, 'खुदानें मुसलमानाची पादशाई दूर करून, तक्त बुडवून मराठियास तक्त दिलें. आतां हद्द जाली!' असो, बहूत खेद, दु:खाचे पर्वत मानिले. मग मोठे मोठे वजिरांनीं नानाप्रकारें समाधान करून आणा खुणा घालून तक्तावर बसविलें. ऐसेंच विजापूरचे पातशाहास व भागानगरचे पातशाहास वरकड सर्वांस वर्तमानें कळून खेद जाहाला. रुमशाम,[1] इराण, दुराण व दर्यांतील[2] पातशाहांस खबर कळून मनांत खद करूं लागले. खेद करून आशंका मानिली. ये जातीचें वर्तमान जाहालें.

१. इस्तंबूल आणि सीरिया येथील पातशहा, २. युरोपियन राजे : इंग्रज, डच, पोर्तुगीज इ.

## १०७. भागानगरच्या शहाशीं सख्य

पुढें राजे तक्तीं बसून राज्यभार करूं लागले. निजामशाही देश काबीज केला व मोंगलाईही जप्त केली. भागानगरच्या[1] बादशाहांनीं राजे यांशीं सला करून, निराजीपंताचे पुत्र प्रल्हादपंत मोठे बुद्धिवंत यांस हेजिबीस ठेवून घेऊन, करभार राजियास देऊन स्नेहांत मिळाले. वरकड किरकोळीं राज्यें होतीं तीं घेतलीं. कितीएकांनीं करभार देऊन अंकित होऊन राहिले. तुंगभद्र देशापासून कावेरीपर्यंत कर्नाटक साधावें, हा हेत मनांत धरिला. त्यास लष्कर पाठवून साधावे, तरि दिवसगतीवर पडतें. म्हणून खुद्द राजियांनीं आपण जावें असें केलें. त्यास पेडगांवीं बहादूरखान गनीम पाठीवर येईल म्हणून निराजीपंत न्यायाधीश पाठविले. कित्येक द्रव्य अलंकार (भूषणें) रत्नखचित पाठविलीं. त्यास अंतरंगें सख्य (करून) 'एक वर्षपर्यंत आपणास कर्नाटक साधावयास लागेल, तुम्हीं राज्यास उपद्रव न करणें,' असें त्यास सांगून ठायीं ठेविलें. आणि कर्नाटकास जावयास समागमें निवडून पागे पतके पंचवीस हजार

स्वार व सरकारकून रघुनाथ नारायण व जनार्दन नारायण हे कर्नाटकचे माहितगार यांस बरोबर घेतले. वरकड पेशवे व सुरनीस व वाकनीस वरकड लष्कर राज्यास रक्षणास ठेविलें. आणि विचार केला कीं, 'कर्नाटक साधावयास द्रव्य लागेल त्यास खजिन्यांतील द्रव्य वेंचूं नये. नूतन मिळवावें आणि वेंच करून देश साधावा.' असा विचार करितां भागानगरचे पातशाहींत द्रव्य उदंड आहे. तेथें निष्ठुरता करून द्रव्य मेळवावें, तरि वर्षास करभार भागानगरकर देतात. तेथें निष्ठुरता करूं नये. सख्य करून त्यांची भेट घ्यावी. भेटीनंतर सर्वही अनुकूळ करून देतील. असा विचार करून भागानगरीं प्रल्हादपंत हेजीब राजियाचे होते त्यांसि हें वर्तमान लिहून भेट घ्यावी हा विचार केला. तानाशाहा पातशाहा भागानगरकर यांनीं मनांत बहूत शंका धरिली कीं, 'जैसा अफजलखान बुडविला, कीं शास्ताखान बुडविला, दिल्लीस जाऊन अलमगीर पातशाहास पराक्रम दाखविला, ऐसा एखादा अनर्थ जाहाला तर काय करावें? भेट मात्र राजियाची न घ्यावी. जें मागतील तें देऊं,' असें बोलिला. मग पातशाहाशीं व अकंणापंत व मादंणापंत कारभारी यांशीं प्रल्हादपंतें आण, शपथ, क्रिया बहूत दिधल्या. अपाय नाहीं, स्नेहाची भेट घेऊन जातील, अशी बळकटी केली.

१. भागानगर हें शहर महंमद कुली कुतुबशहा यानें इ. स. १५८९ मध्यें वसविलें. भागानगर म्हणजे हैद्राबाद. कुतुबशाही राजा मुहम्मद (१५८०-१६११) याने गोवळकोंडयाजवळ नवीन शहर वसविलें, व त्यास त्याच्या आवडत्या स्त्रीचें भागमती हिचें नांव दिलें.

### १०८. शिवाजी-कुतुबशहा भेट

येणेंप्रमाणें राजियाशीं घटाई[१] केली. उभयतांच्या भेटी व्हाव्या ऐसा नेम करून मग राजे मजल दरमजल लष्कर घेऊन भागानगरास चालिले. भागानगरची विलायत[२] लागल्यावर ताकीद[३]

केली. एक काडी रयतेची तसनस न व्हावी ऐसें केलें. कित्येक गर्दाना मारून जाबता[४] बसविला, आणि मजलीस[५] जाऊन तेथें खुष-खरेदी सर्व पदार्थ घेऊन चालिले. लूट नाहीं. असें जातां पुढें पातशाहास खबर कळून बहूत संतुष्ट जाहाला. पातशाहा पुढें दोन चार गांव सामोरे यावे असें केलें. राजा मोठा साधक, आण घालून पातशाहास सांगून पाठविलें कीं, 'तुम्हीं न येणें. आपण वडील भाऊ, मी धाकटा भाऊ. आपण पुढें न यावें.' असें सांगून पाठविल्यावरि पातशाहा बहूत संतुष्ट जाहाले. आणि मादंणापंत व अकंणापंत[६] म्हणजे ब ज या[७][?] पातशाहा, सर्व पातशाही [मध्यें] धणी, हे उभयतां पुढें येऊन, राजियास घेऊन शहरास गेले. राजियांनीं आपले लष्करास कुल जरी सामान केलाच होता. सुमुहूर्त पाहून पातशाहाचे भेटीस नगरामध्यें चालिले. पातशाहांनीं कुल नगर शृंगारिलें. चौफेरी बिदीस कुंकुम-केशराचे सडे रंगमाळा घातल्या. गुढिया, तोरणें, पताका, निशाणें नगरांत लाविलीं. नगर-नागरिक लोक कोट्यानकोटी राजा पाहावयास उभे राहिले. नारींनी मंगळआर्त्या अगणित उजळून राजियास दिलें. सोनें-रुपियाचीं फुलें राजियावरि उधळलीं. राजियांनीं लोकांस खैरात द्रव्य वस्त्रें अगणित दिलीं, आणि सर्व सैन्यासहित दाद-महालास[८] पावले. पातशाहास 'खालते उतरूं नका, आपण खासा येतों' म्हणून शफत घालून सांगून पाठविलें. पातशाहा महालावरि राहिले. राजियांनीं आपले लष्करचे लोक कंबरबंदी करून महालाखालीं बसविलें आणि शिडीवरून चालिले. खासा राजा व जनार्दन नारायण व प्रल्हादपंत व सोनाजी नाईक दौलतबंकी[९] व बाबाजी ढमढेरे पांचजण चढले. महालांत गेले. पादशाहा पुढें येऊन क्षेम आलिंगन केलें. उभयतां एकासनीं बसले. मादंगापंत व अकंणापंत व जनार्दनपंत, प्रल्हादपंत, सोनाजी नाईक बंकी व बाबाजी ढमढेरे असे होते. पादशाहा व राजे व मादंणापंत त्रिवर्ग बसले, वरकड उभे राहिले. उभयतांचा स्नेह अतिशय. बोलणें जालें. पातशाहाच्या स्त्रिया झरोकियांतूत जाळपालांतून[१०] राजा पाहातां बहूत थक्क जहाल्या. पादशाहाही बहूत खुशाल

जाहाले. एक प्रहर बसून राजियाच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकिल्या. कित्येक अलंकार रत्नजडित व वस्त्रें, हत्ती, घोडे राजियास व राजियाकडील लोकांस सर्वांस देऊन निरोप दिला. राजे व पातशाहा महालाखालीं येऊन राजे आपल्या स्थळास चालिले.

---

१. मैत्रीचा तह. २. प्रदेश. ३. जरबेचा हुकूम. ४. धाक. ५. मुक्काम. ६. मादण्णापंत व आकण्णापंत हे कुतुबशाहींतील प्रख्यात ब्राह्मण मुत्सद्दी होते. हे दोघे सख्खे बंधू होते. यांचे आडनांव पिंगळी. इ. स. १६६६ त हे गोवळकोंड्यास आले व सय्यद मुस्तफा नांवाच्या सरदाराकडे चाकरीस राहिले. आकण्णा धूर्त, मुत्सद्दी होता तर मादण्णा विद्वान्, बहुभाषी पंडित होता. इ. १६७२ त अबुल हसन ऊर्फ तानशहा गादीवर आला. त्याने मादण्णास वजिरी दिली. यानेच शिवाजी महाराज व तानशहा यांची ही ऐतिहासिक भेट घडवून आणिली. अबुल हसननें आपली दक्षिणेकडील सुभेदारीची जागा आकण्णाला दिली. हे दोघेच कुतुबशाहीचा कारभार पाहात असत. शिवाजी महाराजांच्या दक्षिण मोहिमेमुळे कुतुबशाहीला मोठा लाभ झाला. या मोहिमेनंतर मादण्णापंताने राज्यकारभारांत अनेक सुधारणा घडवून आणिल्या. पण लवकरच औरंगजेबाने कुतुबशाहीवर आक्रमण सुरू केलें. मादण्णापंताला वजिरीवरून दूर करण्याविषयीं त्याने कुतुबशहाला फर्माविलें. पण शहाने त्याला दाद दिली नाही. पूर्वीच्या कुतुबशहाच्या बायका सरुमा व जानी साहिबा या मादण्णापंताच्या विरोधी होत्या. त्यांनी कांही मुसलमान सरदारांशीं कारस्थान करून या दोघा बंधूंचा खून करण्याचा विचार निश्चित केला. तानशहाशी खलबत करून रात्रीचे वेळीं हे दोघे बंधू परत येत असतां, मारेकऱ्यांनीं त्यांचा पाठलाग करून त्यांना ठार केलें. त्यांचा पुतण्या रस्तुमराव नांवाचा होता, त्यासहि ठार केलें. शहरांतील ब्राह्मण वस्तीवर हल्ला करून कटवाल्यांनी अनेक घरें उद्ध्वस्त केलीं. यामुळें औरंगजेब प्रसन्न होईल असें त्यांना वाटत होतें. पण त्याच वर्षीं औरंगजेबाने कुतुबशाहीचा शेवट केला.

मादण्णापंताने शिवाजीशीं मैत्री करण्याचें जें धोरण आखलें होतें त्याच परिणाम हैद्राबादच्या **पहिल्या असफजहाच्या** धोरणावरहि झाला होता. मरतांना त्यानें आपल्या मुलास मराठ्यांशीं युद्ध न करतां सलोख्याने राहण्यासंबंधीं उपदेश केला होता.

७.दुसरे (बादशहाच). ८. न्यायमंदिरास. ९. द्वारपाल. १० जाळींतून.

## १०९. शिवाजीचा प्रामाणिकपणा पाहून पादशहा चकित होतो

महालाखालीं रघुनाथपंत व हंबीरराव वरकड सरदार लष्कर ठेविले होते, त्यांसही समागमें घेऊन आपले जागियास आले. मार्गीं येतां नगरलोकांस खैरात केली. राजे उठोन गेलियावर पादशाहाचें समाधान जालें कीं, राजा प्रामाणिक, आपल्यास रक्षिलें, क्रिया जतन केली. ऐसें आश्चर्य मानून प्रल्हादपंतास कित्येक बक्षिसें पादशाहानीं दिलीं कीं, तुम्ही प्रामाणिक, [ असें ] म्हणून नांवाजून राजियाकडे पाठविलें.

## ११०. मादंणापंत व अकंणापंत यांची शिवाजीस मेजवानी

दुसरे दिवशीं मादंणापंतीं राजियास आपले घरास मेहमानीस[१] नेलें. आणि आपले मातोश्रीचे हातीं पाक सिद्ध करून मादंणापंत व अकंणापंत जवळ बसून राजियास भोजन घातलें. वरकड राजियाकडील समुदाय होता त्यासही भोजनास घातलें. आणि अलंकार वस्त्रें, हत्ती घोडीं देऊन स्थळास पोंहोंचविलें. पातशाहांनीं मादंणापंतास बोलावून नेऊन विचारलें कीं, 'राजियास काय पाहिजे तें देऊन, राजियास संतुष्ट करून निरोप द्यावा.' असा विचार करून सुमुहूर्त पाहून मागती राजे भेटीस आणिले, आणि जडजवाहीर रत्नाचे अलंकार, हत्ती, घोडे अपरमित दिधले. कुल सरकारकून व हंबीरराव व वरकड सरदार यांचे मुजरे महालावरि उभयतां छत्रपती बैसून, मुजरे घेऊन, सरदारांचे पराक्रम नांव पाहून, सर्वांस अलंकार वस्त्रें हत्ती, घोडे, मनुष्य पाहून दिधले. आणि

(११८) ग्रंथ संग्रहालय, ग्राम. स्थळ
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ दि ........

पातशाहा बोलिले कीं, 'सर्वांप्रसंगीं आपणांस तुम्हीं सहाय असावें.' ऐशी बळकटी करून, राजियाची आण शपथ घेऊन निरोप[1] दिला. प्रतिवर्षी करभार जो देणें तों येणेंप्रमाणें देऊन, प्रल्हादपंत नेहमीं आपणाजवळ ठेऊन आपले निजबतीनें[2] आमचेजवळ असों देणें, ऐसें बोलिले. राजे आपले स्थळास आले.

१. पाहुणचार. २. तर्फेने.

## १११. राजांचें श्रीशैल्यास आगमन

त्या उपरि, राजियास भागानगरचे मोठमोठ्या सरदारांनीं मेहमान्या केल्या. ऐसे एक महिनाभर भागानगरीं होते. तेथील द्रव्य वस्तभाव घेऊन चंदीकडे सेनासमुदाय घेऊन चालिले. मग श्रीशैल्यास[1] आले. नीळगंगेचें स्नान करून श्रीचें दर्शन जालें. तीर्थविधी जाला. राजियांनीं स्थळ देखोन परम आनंद जाला कीं, केवळ कैलास दुसरें, असें स्थळ वाटलें. तेथें हें देह श्रीस अर्पण करावें, शिरकमल वाहावें, ऐसें योजिलें. [ते] समयीं श्रीभवानी अंगांत आविर्भवली आणि बोलिले जे, 'तुज ये गोष्टी मोक्ष नाहीं, हें कर्म करूं नको. पुढें कर्तव्यही उदंड तुझे हातें करणें आहे.' असें सांगून श्री गेली. हें वर्तमान सावध जाल्यावरि राजियास कारकुनांनीं सांगितलें. मग श्रीस शिरकमल वाहावें हा विचार राहिला.

१. बारा ज्योतिर्लिंगांपैकीं श्रीशैलमल्लिकार्जुन हें प्रसिद्ध लिंग आहे.

## ११२. चंदीस वेढा

पुढें कर्नाटकचा देश साधावा म्हणोन चंदीस वेढा घेतला. चंदीमध्यें[1] खानखान विजापूरकरांचा वजीर याचे पुत्र रुपलखान व नासरीखान हे उभयतां होते. त्यांस राजकारण करून, त्यांस कौल देऊन, बाहेर काढिलें आणि स्थळ साध्य केलें. त्रिमल महाल

म्हणून आहे तेथें शेरखान विजापूरचा वजीर पांच हजार स्वारांनिशीं होता. पठाण तोलदार, हत्ती सामान द्रव्य अगणित होतें. तो राजावर चालून आला. त्याशीं युद्ध करून त्यास बुडविला. जिवंत खासा शेरखान धरिला. पांच हजार घोडे बारा हत्ती पाडाव केले. द्रव्य जवाहीरही अपार हस्तगत जालें. मोठें युद्ध केलें. असें कर्म करून त्रिमल महाल फत्ते केला.

---

१. चंदी ऊर्फ जिजी हें कर्नाटकांतील शहाजीच्या राज्याचें प्रमुख केन्द्र होय. चंदी अथवा चंजी हें जिजीचें रूप. दमयंती स्वयंवराच्या प्रस्तावनेंत श्री. प्रियोळकर म्हणतात, 'इंग्रजींत ज्याला जिंजी म्हणतात त्याचे तंदी चंजी, चंदी व तंजापूरचें तंजावर, चंजावर, चंदावर असे सारखेच फरक होत गेलेले दिसतात. या चंदी व चंदावर प्रांतामध्ये मराठी सत्ता प्रस्थापित झाल्यावर पुढील लेखकांनी या कर्नाटकांतील महत्तर महाराष्ट्राला चंदी-चंदावर असें संयुक्त नांव दिलें आहे.' अर्काट जिल्ह्यांतील हा किल्ला राजगिरी, कृष्णगिरी व चंद्रगिरी अशा तीन टेकड्या मिळून बनला आहे. इ. स. १६४९ मध्ये शहाजीने हा किल्ला सर केला आणि १६६५ पर्यंत येथे हिंदु सत्ता होती. याच वर्षी तालीकोटची लढाई होऊन जिंजी मुसलमानांच्या ताब्यांत गेली. कर्नाटकच्या मोहिमेंत शिवाजीने आदिलशहाच्या ताब्यांतून हा किल्ला काबीज करून इ. स. १६७७ त त्याचा बंदोबस्त केला. त्याची सुभेदारी रघुनाथपंत हणमंते याजकडे दिली आणि सात लाखांचा जिंजीचा सुभा व्यंकोजीस दूधभातासाठी जहागीर म्हणून दिला.

## ११३. शिवाजी-व्यंकोजी भेट

त्या उपरि राजश्री व्यंकाजी राजे, धाकटे भाऊ राजियाचे[१] यांनीं चंदावरचें राज्य साध्य करून राज्य करीत असत. त्यांनीं आपले कारकून होते ते समागमें घेऊन राजियाचे भेटीस आले. भेट बंधूबंधूंची जाली. एकाजी[१] राजाचे कारकून काकाजीपंत पेशवे भेटले व कोन्हेर महादेव मुजूमदार भेटले. जगंनाथपंत, व्यंकाजी दत्तोचे पुत्र, सर्व सैन्य भेटलें व भिवजी राजे व प्रतापजी,

राजे नाटकशाळेचे[२] पुत्र महाराजांचे[३] होते, तेही भेटले. बहूत संतोष जाला. उभयतां बंधूंची मेहमानी परस्परें जाली. देणेंही. उभयतांनीं उदंड दिलें. आठ दिवस एकत्र होते. मग राजियांनीं व्यंकाजी राजे यांसि प्रश्न केला कीं, 'महाराज तुमचे आमचे पिते. आपण त्यांजकडून निरोप घेऊन पुण्याकडे जाऊन येवढें राज्य साधिलें. कीर्त केली. ऐशियासि वडिलांची बारा[४] बिरदें तुम्हांजवळ आहेत. तीं तुम्ही चालवीतच आहां. ऐशियास आपण वडील पुत्र आणि पराक्रमी, तुम्हांहून पराक्रम विशेष केला. बारा बिरदें मात्र तुम्हांजवळ आहेत तीं आपणास देणें. आपण चालवूं. नवी बिरदें करावयाची काय आशंका आहे ? परंतु वडिलांचीं हातचीं आहेत तेवढीं आपणाजवळ असावीं म्हणून मागितलीं.' त्याजवरून त्यांनीं विकल्प चित्तांत आणून दिलीं नाहींत. त्याजवर एकाजी राजे यांच्या कारकुनांनीं व कारभारी यानीं त्यांचे पोटांत भय घातलें कीं, राजे तुम्हांशीं खटखट करून बिरदें जोरावारीनें घेतील. असें सांगून, त्यांस धास्त उत्पन्न करून रात्रीचे वेळेस व्यंकाजी राजे पळून चंदावरास बिरदें घेऊन गेले.

१. व्यंकोजी. २. विवाहबाह्य रखेली स्त्री. ३. शहाजी महाराज ४. विरुदें = मानाचे किताब. प्रस्तुत स्थळीं एवढाच मोघम अर्थ अभिप्रेत नाही. तंजावरच्या देवळांतील शिलालेखांत अश्वबिरुदें, गजबिरुदें, पालखीबिरुदें इ. चा उल्लेख आहे. यावरून हत्ती, घोडे, वगैरेंना विशिष्ट अलंकार घालण्याचा अधिकार राजाला प्राप्त होत असावा असें दिसतें. या शिलालेखांत पालखीच्या बिरुदाचें वर्णन विस्तृत आलें आहे. त्यांतील पुढील उतारा उद्बोधक वाटल्याने देत आहे. "पालखीची तबकडा व कमान देखील, हत्तीचे दांताची शिफेद येक रंग; त्यास रेशमी कान्हण्या व नवार रेशमी; दांडीचे पुढिले बाजूस सिंहललाट सोन्याचें, दांडीचें मागले बाजूस शार्दूल वदन सोन्याचे, पिंजरीचे शेवटास, दोनी बाजूस जडीत केळीचें फुलाकृति कलश २; पिंजरीचे चारी कोनेस जडित गोंडे, जरी झालरी ४; दोनी बाजूचे कतरीवरील दांडीस, रुप्याचे खुब्याचे जरी गोंडयाचे घोंस; दांडीस समदाजडित खुब्याचे, थोरवदे सोन्याचे खुब्याचे, भरजरी गोंडे; पालखींत

समोर आरसा; ... येणेप्रमाणें त्या येक शिवमहाराजांनी **बिरुदाचें** पालखींत स्वारी करूं लागले." प्रत्यक्ष सांब प्रसन्न होऊन त्यानें हीं बिरुदें धारण करण्याची आज्ञा महाराजांना दिली. " महाराज बिरुदें समग्र वागविणेस तुम्हीं योग्य, करितां उत्तम बिरुदें समग्र वागविणें म्हणून आज्ञापिलें।"

या अलंकार व बिरुदांना विशिष्ट महत्त्व असावें. इतरांना हे अलंकार धारण करण्याचा अधिकार नाही. दिवसा मशाल पुढें घेऊन जाण्याचा अधिकार हें शंकराचार्यांचें बिरुदच समजतात.

## ११४. रघुनाथ नारायण हणमंते यांजकडे चंदीची व्यवस्था सोपविली.

त्यास दुसरे दिवशीं राजियास वर्तमान कळलें कीं, व्यंकाजी राजे पळून गेले. त्याजवरून आश्चर्य केलें कीं, 'काय निमित्य पळाले? आम्ही त्यांस धरीत होतों कीं काय? आम्हांस बिरदें काय करावयाचीं? आमचीं बिरदें अष्ट दिशेस लागलीं आहेत. समुद्रवलयांकित भूमंडळीं कीर्त आपली जाली आहे. तेथें बिरदें काय करावयाचीं? वडलांची वस्त असावी म्हणून मागितलीं होतीं. पळावयाचें नव्हतें. द्यावयाचीं नव्हतीं तरि न देणें. उगेच उठून पळून गेले. अति धाकटे ते धाकटे, बुद्धीही धाकटेपणा योग्य केली.' असें बोलिले. मग त्यांचे कारकून व सरदार पळत होतें ते राजियाच्या लोकांस सांपडले. त्यांस धरून आणिलें. मग त्या अवघियास वस्त्रें भूषणें, अश्व देऊन चंदावरास बंधूसंनिध पाठविलें. संताजी राजे म्हणून महाराजांचे नाटकशाळेचे पुत्र होते. ते शूर पराक्रमी होते. ते राजियाच्या भेटीस आले. भेट जाली. त्यांस कर्नाटकांत हजार घोड्यांची दौलत दिधली. महाल मोकाशे दिले. हत्ती, घोडे वस्त्रें देऊन रवाना केले. आणि येळूरकोट[१] यामध्यें इदलशाई ठाणें होतें. तो कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाहीं. कोटांत जीत[२] पाणियाचा खंदक, पाणियास अंत नाहीं असें. उदकांत दाहा हजार सुसरी, कोटाचे कांजियावरून[३] दोन गाडिया जोडून जावें ऐशी मजबुती. पडकोट[४] तरि चार चार फेरियावरि फेरे. ये

जातीचा कोट. त्या कोटास वेढा घालून कोट घेतला. वरकडही जागां जागां गढी कोट घेतले. कित्येक नवे वसविले. असे शंभर कोट त्या प्रांतीं केले. वीस लक्ष होनाचें राज्य साध्य केलें. चंदी म्हणजे जैसें विजापूर, भागानगर, तैसाच तक्ताचा जागा. येथें राजियांनीं राहावें. परंतु इकडेहि राज्य उदंड, त्याचें संरक्षण जालें पाहिजे. याजकरितां चंदीस रघुनाथ नारायण ब्राह्मण त्यास मजमू[५] संपूर्ण राज्याची सांगितली, आणि त्यास तो प्रांत स्वाधीन करून चंदीस ठेविलें. त्यापाशीं तूर्त फौज असावी म्हणून हंबीरराव सेनापती सेनेसहित ठेविले. आणि राजियांनीं आनंदराव व मानाजी मोरे हे दोघे सरदार फौजेनिशीं बराबर घेऊन चंदीहून निघाले. घाट चढून वरतें आले. कोल्हार, बाळापूर हे कोट घेतले. देश काबीज केले. कित्येक गड वसविले. पुंडपाळेगार मारून गर्दीस मिळविले. त्या प्रांतीं रंगो नारायण म्हणून कारकून सरसुभेदार ठेविले. तोही प्रांत रघुनाथपंताचे स्वाधीन केला. कोल्हार प्रांतें मानाजी मोरे सरदार फौजेनिशीं ठेविले आनंदराव राजियांनीं बराबर घेऊन कोपलास आले. तेथून लक्ष्मेश्वरास आले. तेथून मजल दरमजल संपगांव प्रांतीं आले. बलवाडा म्हणून कोट होता. तेथें देसाईण[६] बायको होती. तिनें राजियाचे लष्करचे कहीकाबाडी[७] बैल नेले. हें वर्तमान राजियास कळलें. बलवाडास वेढा घातला. कोट घेऊन देसाईण धरिली. तीस शिक्षा केली. मग पुढे पन्हाळियास आले, आणि राज्याचाही परामृष केला. मग राजे आले हें वृत्त सर्वांस कळलें. त्याजवरून निराजीपंत बहादुरखानाजवळ ठेविले होते, तेही दर्शनास आले, व खानांनीही जडजवाहीर, वस्त्रें राजियासि पाठविलीं.

---

१. वेलोर. २. जिवंत झऱ्यांचें पाणी. ३. तट. (प्राकारवेदिका फांजि:) ४. प्राकारवलयं. (मुख्य किल्ल्याच्या भोंवती असलेले तटांच्या भिंतीचे वेढे.) ५. मुजुमदारी. वसुली कारकुनी. ६ देसाईण. बेलवाडीचा किल्ला दादजी रघुनाथ या सरदारानें जिंकून घेतला. युद्धांत किल्लेदार पडला; पण त्याची

शर पत्नी सावित्रीबाई इने किल्ला बराच काळ लढविला. शिवाजीच्या एका इसमाने तिच्याशी गैरवर्तन केल्यावरून राजांनी त्याचे डोळे काढून त्याला कडक शासन केलें. (९१ कलमी बखर) ७ लाकूड धान्य वगैरे सामान वाहून नेणारे.

### ११५. व्यंकोजीच्या फौजेचा पराभव

त्या उपरि, कर्नाटकांत हंबीरराव फौजेनिशीं व रघुनाथ नारायण ठेविले होते हें वर्तमान व्यंकाजी राजे यांस कळोन राजियांनीं आपली फौज व पाळेगारांची फौज मिळविली, आणि हंबीरराव यावरि चालून आले. ते समयीं हंबीरराव याचे चौगुणी[1] घोडा राऊत हशम अगणित व्यंकाजी राजे यांचे होते. मग यांस त्यांस युद्ध जालें. मग राजियाचा पुण्यप्रभाव अधिक आणि भाग्योदय, हंबीरराव यांनीं व्यंकाजी राजियाची फौज मोडली. मोठें युद्ध जाहालें. अगणित रण पडलें आणि व्यंकाजी राजियाचे चार हजार घोडे पाडाव केले. व हत्ती जड-जवाहीर बाजे सरदार भिवाजी राजे व प्रतापजी राजे वरकडही नामांकित लोक पाडाव केले, अशी फत्त केली. यश आलें. आणि पाडाव केले सरद्वारांस वस्त्रें देऊन सोडिले. यावरि रघुनाथपंत व हंबीरराव चालोन चंदावराकडे गेले मग व्यंकाजी राजे यांनीं सभ्य मनुष्य मध्यस्त घालून सख्य करावें असें जालें, त्याजवर रघुनाथपंतीं व हंबीररायांनी राजियाकडे जासूद पत्रें देऊन पाठविलें. मग राजियास वर्तमान कळोन या उभयतांस उत्तर पाठविलें कीं, 'व्यंकाजी राजे आपले धाकटे बंधू आहेत. मूलबद्धी[2] केली. त्यास तोही आपला भाऊ त्यास रक्षणें. त्याचें राज्य बुडवूं नका.' अशीं उत्तरें आलियावरि उभयतांनीं व्यंकाजी राजे यांशीं सला केला. आणि द्रव्यही उदंड घेतलें. मग रघुनाथपंतीं हंबीरराव यास लष्कर सहवर्तमान निरोप देऊन राजियाकडे पाठविलें. आणि रघुनाथपंत आपण तिकडे कर्नाटकांत फौज दाहा हजार स्वार पागा व शिलेदार जमा करून तें राज्य रक्षून राहिले.

---

१. चौपट. २. बालबुद्धि.

### ११६. मोगलाईंतील जालनापूर लुटलें

हंबीरराव याची व राजियाची भेट जाहाली. कित्येक नांवाजिलें बक्षिसें दिलीं. आणि पुढें खासा राजियांनीं अवघें लष्कर घेऊन जालनापूर मोंगलाईत त्यास वेढा घातला. पेठा मारिल्या. शहर लुटून फन्ना केलें. अगणित द्रव्य, सोनेंरुपें, जडजवाहीर, कापड घोडे, हत्ती, उंटें फस्त केलीं. मोंगलांची[1] फौज [ घेऊन ] रणमस्तखान चालोन आला. युद्ध जालें. सिदोजी निंबाळकर राजे यांजकडील पांच हजार फौज, तीन दिवस युद्ध केलें. रणमस्तखान यासि कैद करून आणिला. त्यासि बुडवावें तों त्याचे कुमकेस केसरसिंग व सरदारखान व बाजे[2] उमराव असे वीस हजार फौज तीन कोसांवर राहिली. मग केसरसिंग यानें अंतरंगें सांगून पाठविलें कीं, उभयपक्षीं भाऊपणा आहे. आमची गांठ पडली नाहीं तोंवर तुम्हीं कूच करून जाणें. हें वर्तमान कळतांच राजे तेथून निघाले. लष्कर, जडगिरी मार्गानें जावें अशी तजवीज केली. ते समयी बहिरजी जासूद यानें कबूल केलें कीं, 'मोंगलांची गांठ न पडतां लष्कर घेऊन ठिकाणास जातों. साहेबीं फिकीर न करणें.' तीन रात्रीं खपोन रात्रंदिवस अवकाश न करितां पा व गड येथें लष्कर घेऊन आला. राजे बहिरजी नायकावर खुशाल झाले. त्याजकडे फाजील[3] होतें तें माफ करून आणखीही बक्षीस दिलें. तेथून सावकास लष्कर घेऊन राजे पुरंदरास आले.

---

१. पाठभेदांत मोगली फौजेचा आणि युद्धाचा तपशील दिला आहे. २. इतर, दुसरे. ३. अधिक मिळकत होती तेवढी.

### ११७. संभाजी मोगलांकडे जातो.

इतकियांत संभाजी राजे राजियाचे पुत्र ज्येष्ठ राजियावर रुसून[1] मोंगलाईंत गेले. ते जाऊन दिलेलखानास भेटले. मग त्यांनीं बहूत सन्मान करून चालविलें. पातशाहास दिल्लीस दिलेलखानांनीं

लिहून पाठविलें कीं, 'राजियाचा पुत्र संभाजी राजा रुसून आपणाजवळ आला आहे. त्यास गौरव करून आम्ही ठेवून घेतला आहे. तर पादशाहांनीं मेहेरबान होऊन त्यास नांवाजावें म्हणजे राज्यांत दुई[२] होईल. राज्यांतील लष्कर उठोन आपोआप येईल आणि किल्ले कोट साधतील,' म्हणून लिहिलें. त्याजवरून पादशाहांनीं विचार केला कीं, 'राजियाचा पुत्र आला आहे, त्यास नांवाजितां पातशाहींत फितवा करून पातशाही बुडवितील. नांवाजूं नये. हुजूर[३] आणून कैदेंत ठेवावा.' ऐसा विचार करून दिलेलखानास लिहून हुकूम पाठविला कीं, संभाजी राजियास घेऊन हुजूर येणें. असें लिहिलें. तों अगोदर दिलेलखानाचा वकील पातशाहाजवळ होता, त्यांनीं हें वर्तमान खानास लिहून पाठविलें. तें वर्तमान खानास कळतांच संभाजी राजियास सूचना करून पळविलें. ते पळून पन्हाळियास आले. हें वर्तमान राजियास पुरंधरास कळतांच संतोष पावून पुत्राचे भेटीस पन्हाळियास आपण आले. मग पितापुत्रांची भेट जाहाली. बहूत रहस्य[४] जाहालें. त्या उपरि राजे म्हणूं लागले कीं, 'लेंकरा, मला सोडूं नको. औरंगजेबाचा आपला दावा. तुजला दगा करावयाचा होता, परंतु श्रीनें कृपा करून सोडून आणिला. थोर कार्य जालें. आतां तूं ज्येष्ठ पुत्र थोर जालास, आणि संचतर[५] राज्य कर्तव्य हें तुझ्या चित्तीं आहे असें आपणास कळलें. तर मजला हें अगत्य आहे. तरि तुजलाही राज्य एक देतों. आपले पुत्र दोघेजण, एक तूं संभाजी व दुसरा राजाराम. ऐसियास हें सर्व राज्य आहे, यास दोन विभाग करतों. एक चंदीचें राज्य, याची हद्द तुंगभद्रा तहद कावेरी हें एक राज्य आहे. दुसरे तुंगभद्रा अलीकडे गोदावरीनदीपर्यंत एक राज्य आहे. ऐसीं दोन राज्यें आहेत. त्यास तूं वडील पुत्र, तुजला कर्नाटकीचे राज्य दिधलें. इकडील राज्य राजारामास देतो. तुम्हीं दोघे पुत्र दोन राज्यें करणें. आपण श्रीचें स्मरण करून उत्तर सार्थक करीत बसतों,' असें बोलिले. तेव्हां संभाजी राजे बोलिले कीं, 'आपणास साहेबाचे पायांची जोड आहे. आपण दूधभात खाऊन साहेबांचे पायाचें चिंतन करून

राहीन.' असें उत्तर दिधलें. आणि राजे संतुष्ट जाहाले. मग पिता पुत्र बैसून कुल राज्य आपलें देखिलें. कर्नाटक किती आहे व खजीना काय आहे व कारखाने व मुत्सद्दी सरकारकून लोक कोण कोण? लष्कर, पागा, शिलेदार किती? सरदार काय काय? गड कोठें? किती? हशम काय? समुद्रांतील जंजिरे, पाणियांतील जाहाजें किती? इसमांचा आकार[६] केला. बितपशील :- कारखाने अठरा व महाल मुलूख नाना जिन्नसवार संख्या करणें तो केला. बितपशील :-

१ संभाजीच्या गैरवर्तनासाठी महाराजांनी त्यास नजरकैदेंत ठेवलें होतें; संभाजी त्यामुळे शिवाजीमहाराजांवर रागावून मोंगलांना मिळाला. इ. हकीगत श्री. वा. सीं. बेंद्रे यांनी अनैतिहासिक ठरविली आहे. संभाजी-बद्दलच्या सर्वच प्रचलित समजुती त्यांनी आपल्या '**छत्रपति संभाजी महाराज**' या ग्रंथांत खोडून काढल्या आहेत. अण्णाजी दत्तो आणि इतर कांही मंत्र्यांच्या कारस्थानाला विटून संभाजी मोगलांकडे गेला. तो मोंगलांना फितूर झालेला नव्हता. या घटनेचें वर्णन परमानंद कवीच्या काव्याच्या आधाराने व इतर बहुमोल साधनांच्या आधाराने बेंद्रे यांनी केलें आहे. त्यांतूनच या प्रसंगाचें अवलोकन करूं. 'संभाजी परळीवर असतां त्यांनी एके दिवशीं तेथील सुभेदाराला सांगितलें की 'आज मोठी पर्वणी आहे... म्हणून मी माहुली क्षेत्रास स्नानार्थ जात आहे.' त्यांनी आपल्याबरोबर अगदीं थोडेच लोक घेतले व घोड्यावर स्वार होऊन ते निघाले. माहुली क्षेत्रास आल्यावर तीर्थस्नान वगैरे करून ब्राह्मणादिकास विपुल दानधर्म केला. नंतर बरोबर आलेल्या गडावरील माणसांना सांगितलें की, 'तुम्ही आतां परत जा व किल्लेदारांना व महाराजांना कळवा की, मी मोगली सेनेंत गेलों आहे. मी जात आहे तो दिल्लींद्राचें सैन्य अवगाहन करण्यास जात आहे. परत येईन तो सह्याद्री जिंकण्याकरतां परत येईन.' असें त्यांना सांगून संभाजीराजे मोंगली सैन्याच्या बाजूला निघून गेले. संभाजी राजांबरोबर त्यांची बायको येसूबाई ही नव्हती.

संभाजीच्या अशा अचानक जाण्याने अनेक अफवा उठल्या. त्याच्या चारित्र्यावरहि बखरकारांनी शितोडे उडविले. श्री. बेंद्रे यांच्या मतें या सर्व

घटना निव्वळ कपोलकल्पित आहेत. मोगलाकडे असताना कच्छवाह वंशांतील चंपा नांवाच्या राजकन्येशीं संभाजीचा विवाह झाला. वास्तविक हा विवाह शास्त्रोक्त असूनहि नंतरच्या बखरकारांनी या स्त्रीचें वर्णन 'रक्षा' असें केलें आहे. या विवाहाची समग्र माहिती श्री. बेंद्रे यांनी वरील ग्रंथांत दिली आहे.

संभाजी क्रूर होता. तो व्यसनी होता, त्याने अनेक मंत्र्यांना नाहक ठार केलें, सावत्र मातेला भिंतींत चिणून मारिलें इ. सर्वच रूढ समजुती त्यांनी सप्रमाण खोडून काढिल्या आहेत.

२ दुही ३ राजाचा खास अधिकारी–त्याचेकडून. ४ गुप्त बोलणें ५ स्वतंत्र ६ गणना.

## ११८. स्वराज्यांतील गड, जंजिरे, संपत्ति, अधिकारी, सैनिक वगैरेंची गणना[1]

### अठरा कारखाने

१ खजिना. १ जव्हाहीरखाना. १ अंबारखाना. १ शरबतखाना. १ तोफखाना. १ दफ्तरखाना. १ जामदारखाना. १ जिसतखाना. १ मुदबखखाना. १ उष्टरखाना. १ नगारखाना. १ तालीमखाना. १ पीलखाना. १ फरासखाना. १ आबदारखाना. १ शिकारखाना. १ दारूखाना. १ शहतखाना (?)

**बारा महाल** :– १ पोतें. १ सौदागीर. १ पालखी. १ कोठी. १ इमारत. १ वहिली. १ पागा. १ सेरी. १ दरुनी. १ थट्टी. १ टंकसाळ. १ छबीना.

### खजिना नाणेंवार व कापड जिन्नसवार बी ।।

सुवर्ण ———————— ———————— नाणें.

१००००० गंबार एक लक्ष, २००००० मोहरा दोन लक्ष, ३००००० पुतळ्या तीन लक्ष. १३६४५२५ पातशाही होन. १००००० सतलाम्या एक लक्ष. १००००० इभराम्या एक लक्ष. ४००००० शिवराई होन. १५००००० कावेरी पाक [होन.]

१२७४६५३ सणगरी होन. २५४०३० अच्युतराई होन. ३००४५० देवराई होन. १००४०० रामचंद्रराई होन. १००००० गुती होन. २००००० धारवाडी होन. ३००००० फलम न.णेंवार. २००००० प्रलखटी [?] होन. १००००० पाक (व) नाईकी होन. ३००००० आदवणी होन. ५००००० जडमाल होन. १४०००० ताडपत्री होन. १००००० साधें सोनें नग कांबी, वजन खंडी १२॥

**पुरवणी होनांचीं नांवें** (फलम याचे पोटीं).

१ अफरजी. १ त्रिवाळुरी. १ त्रिसुळी. १ चंदावरी. १ बिलधरी. १ उलफकरी. १ महमदशाई. १ वेळुरी. १ कटेराई. १ देवजवळी. १ रामनाथपुरी. १ कुनगोटी.

**रुपय ———————— जड जव्हाहीर**

५००००० रुपये. २००००० आसरफ्या. १०००००० आबाशा. २५००००० दाभोळी कबरी. १०००००० चुली कबरी. ५००००० बसरी कबरी. १०००००० रुपें साधें व मीनगारी व भांडीं नग वजन खंडी ५०. [जवाहीर] १ माणकें. १ पांच. १ वैडूर्यें. १ नीळ. १ पैराज. १ मोतीं. १ पोवळें. १ पुष्कराज. १ हिरे. एकूण ९.

कापड जरी व साधे व रंगाचें व खुमास जिन्नसवार छपन्न देश व दर्यावरील अजमासें किंमत होन १,००,००,००० ५०,००० निशाणी होन.

धान्यसंग्रह, रससंग्रह, अगणित होता. कोठार व देशांत अमर्याद होती. ———— कलम.

एकूण चंद्रमे संख्या २५००५००

५००००० येळुरी होन.

**घोडें-राऊत संख्या पागा सिलेदार १०५,००० एक लक्ष पांच हजार, तपशील.**

**पागा ४५,००० यांचे सरदार. नांवें** :—

१ हंबीरराव सरनौबत. १ संताजी घोरपडे. १ मानाजी मोरे. १ येसाजी काटकर. १ संताजी जगताप. १ निंबाजी पाटोळे.

१ जेतोजी काटकर, १ परसोजी भोंसले. १ गणोजी शिरके १ बाळोजी काटकर. १ निळोजी काटे. १ नेताजी पालकर. १ तुकोजी निंबाळकर १ गोंदजी जगताप. १ संभाजी हंबीरराव. १ धनाजी जाधव. १ शामाखान. १ वाघोजी शिरके. १ हरजी निंबाळकर. १ भवानराव. १ आनंदराव हशमहजारी. १ तेलंगराव. १ रुपाजी भोंसले. १ व्यंकटराऊ खांडकर. १ खंडोजी जगताप. १ उदाजी पवार १ रामजी कांकडे. १ कृष्णाजी घाडगे. १ सावजी मोहिते.–एकूण २९.

**शिलेदार व मुलखींचे सुभेदार :–**

१ नागोजी बल्लाळ. १ गणेश शिवदेव. १ चंदो हिरदेव. १ नेमाजी. शिंदे. १ रामाजी भास्कर. १ बयाजी गडदरे. १ बाळाजी निळकंठ. १ हिरोजी शेळके. १ त्रिंबक विठ्ठल. १ महादजी नारायण. १ बाळोजी शिवतरे. १ जानराव वाघमारे. १ संक्रोजी माने. १ अमरोजी पांढरे. १ रामाजी जनार्दन. १ मुधोजी थोरात. १ कृष्णाजी भांदडे. १ बहिरजी वडगरे. १ चंदो नारायण. १ खेमणी. १ खंडोजी आटोळे. १ राघो बल्लाळ. १ बळवंतराव देवकांते. १ बहिरजी घोरपडे. १ मालोजी थोरात. १ बाळाजी बहिरव. १ देवाजी उघडे. १ गणेश तुकदेव. १ केरोजी पवार. १ उचाले. १ नरसोजी शितोळे.

| हत्ती व हत्तिण, छावे सुमार | पाणियांतील जहाजें आरमारचे सरदार | |
|---|---|---|
| १२६० | १ दर्यासागर | १ इब्रामखान. |
| | (दर्यासारंग ?) | १ मायनाईक. |

**हशम मावळे सरदार असामी १,००,००० यांचे सरदार :–**

१ येसाजी कंक सरनोबत. १ सूर्याजी मालसुरे. १ गणोजी दरेकर. १ मुग्बाजी बेनमणा. १ माल सावंत. १ विठोजी लाड. १ इंद्रोजी गावडे. १ जावजी महानलाग. १ नागोजी प्रल्हाद. १ पिलाजी गोळे. १ मुधोजी सोनदेव. १ कृष्णाजी भास्कर. १ कलधोंडे. १ हिरोजी मराठे. १ रामाजी मोरे. १ हिरोजी भालदार. १ तुकोजी कडू. १ राम दळवी. १ दत्ताजी इडि (तु) लकर. १ पिलाजी सणस.

१ जावजी पाये. १ भिकजी दळवी. १ कोंडजी वडखले. १ त्रिंबकजी प्रभू. १ कोंडजी फरजंद. १ तानाजी तुंदुसकर. १ तानसावंत मावळे. १ महादजी फरजंद. १ येसजी दरेकर. १ बाळाजीराव दरेकर. १. सोन दळवे. १ चांगोजी कडू. १ कोंडाळकर. १ ढवळेकर. १ तानसावंत भोंसले. एकूण ३६.

**गड, कोट, जंजिरे व देशांतील जंजिरे, गड, कोट बितपशील.**

१ कोंढाणा ऊर्फ सिंहगड. १ घनगड. १ येलबर्गीगड. १ रांगणा ऊर्फ प्रसिद्धगड. १ लिंगाणा. १ चंदन. १ मसीतवाडे ऊर्फ मानगड. १ जयगड. १ लोहगड. १ कोट फोंड. १ कोट लावड. १ रसाळगड. १ हडपसर ऊर्फ पर्वतगड. १ कोट केचर. १ सातारागड. १ परळीगड ऊर्फ सज्जनगड. १ वल्लभगड. १ जवळेगड. १ हरुषगड. १ कुरडू ऊर्फ मंदरगड. १ सालोभागड. १ रोहिडा. १ मदगिरिगड. १ जिवघण. १ कोट मंगळूर. १ कोपलगड. १ कोट कुष्टगी. १ पन्हाळगड. १ नौबतगड. १ कोटसुपें. १ पुरंदरगड. १ पाली ऊर्फ सरसगड. १ अचलागिरीगड. १ भोरप ऊर्फ सुधागड. १ कोट अंकोलें. १. पांडवगड. १ वंदन. १ कोट शिवेश्वर. १ खेळणा ऊर्फ विशाळगड. १ त्रिंबक ऊर्फ श्रीगड. १ कोट हलियाळ. १ बहादूरगड. १ तानवडा. १ सालेरीगड. १ मनोहरगड. १ अहिवंतगड. १ ठकरीगड. १ माहुलीगड. १ चाउड ऊर्फ प्रसन्नगड. एकूण ४९.

**नवे राजियांनीं गड वसविले त्यांची नांवनिशीवार सुमारी. सुमार १११.**

१ राजगड चारी माच्या. १ तोरणा ऊर्फ प्रचंडगड. १ केळजा. १ वैराटगड. १ कमलगड. १ वर्धनगड, १ प्रतापगड. १ कांगोरी ऊर्फ मंगळगड. १ गहनगड. १ पताकागड. १ पद्मागड. १ सुबकरगड. १ सबलगड. १ बहिरवगड ऊर्फ सारंगा. १ गगनगड ऊर्फ बावडा. १ सारंगगड. १ सुरगड. १ जंजिरे विजयदुर्ग. १ जंजिरे सिंधुदुर्ग. १ जंजिरे खांदेरी. १ पावनगड. १ पारगड. १ भिवगड (भीमगड). १ भूधरगड.

१ राजगड. १ सहन (ज) गड. १ नाकगडगड. १ लोणजागड. १ काचणागड. १ सिदीचा गड. १ वसंतगड. १ सुंदरगड. १ महीमानगड. १ मच्छंद्रगड. १ व्यंकटगड. १ माणिकगड. १ लोकलगड (कलोल? ) १ कोथळागड. १ श्रीवर्धनगड. १ कमरगड. १ वासोटा ऊर्फ व्याघ्रगड. १ खोलगड. १ प्रचितगड. १ प्रौढगड. १ वनगड. १ नरगुंदगड महद्गड. १ रामदुर्ग ऊर्फ भुजबळ. १ बालेराजा. १ अंजनवेली. १ सरगड. १ मुरगोड. १ श्रीमंतगड. १ गजेंद्रगड. १ कोट येळूर. १ कनकाद्रिगड. १ रवळागड. १ नाचणागड. १ रामसेजगड. १ रुद्रमाळगड. १ समानगड. १ वल्लभगड. १ महीपालगड. १ मयोरगड ऊर्फ नवलगुंद. १ पटगड. १ सोनगड. १ कुंजरगड. १ तुंगगड ऊर्फ कठीणगड. १ महीपतगड. १ मदनगड. १ कांगोरीगड. १ वारूगड. १. भूषणगड. १ कोट बोटगीर. १ कंबलगड. १ मंगलगड. १ स्वरूपगड. १ ढोलागड. १ मनरंजनगड. १ बहुलगड. १ महींद्रगड. १ रजेगड. १ बळवंतगड. १ श्रीगलडवगड. १ पवित्रगड. १ कलानिधीगड. १ गंधर्वगड. १ सुमनगड. १ गंभीरगड. १ मंदरगड. १ मर्दनगड. १ दहीगड. १ मोहनगड. १ गडागड. १ वीरगड ऊर्फ घोसाळा. १ तिकोना ऊर्फ वितंडगड. १ जंजिरे सुवर्णदुर्ग. १ जंजिरे रत्नागिरी. १ राजकोट. १ सेवणागड. १ सेवकगड. १ कोहजगड. १ कठोरगड. १ भास्करगड. १ कपलगड. १ हरिश्चंद्रगड. १ जंजिरे कुलाबा. १ सिद्धगड. १ मंडणगड. एकूण सुमारें १०८.

**कर्नाटक प्रांतीचे गड केले नवे एकूण सु॥ ७९ बितपशील :–**

## कोलार, बाळापूर–वरघाट.

१ कोल्हार, बाळापूर भोर. १ नंदीगड. १ चंदनगड. १ ब्रह्मगड. १ गणेशगड. १ श्रीवर्धनगड. १ वज्रगड. १ मर्दनगड. १ कोट बिदनूर. १ भास्करगड. १ पिपला ऊर्फ प्रकाशगड. १ कोट ढमकूर. १ कोट कोलार कदीम. १ दुर्गमगड. १ भीमगड. १ सरसगड. १ अहिनिजादुर्ग. १ कट्टरगड. १ मकरंदगड. १ बुरवडगड. १ सोमशंकरगड. १ हातमलगड. १ भूमंडणगड. १ मेच कोल्हारगड. १ महीपालगड.

१ भीमगड नजीक कपशेरी. १ बुंदीकोट. १ कोट एलूर. १ कैलासगड. महीमंडणगड. १ अर्जुनगड. १. अर्काटगड. १ पडवीरगड. १ भंजनगड. १ राजगड चंदी. १ मदोन्मत्तगड चंदी. १ मुखणे गड कोटवेल. १ पाले कोट. एकूण ३८.

## घाटाखाली गड कोट

१ पतनगदनेगड. १ जगदेवगड. १ केवळगड. १ गगनगड. १ मदगड. १ कस्तुरीगड. १ रत्नगड. १ प्रबळगड. १ मार्तंडगढ. १ कृष्णगिरी चंदी. १ १ शारंगगड चंदी. १ लागगड चंदी. १ कोट त्रिचंदी. १ सुदर्शनगड. १ महाराजगड. १ कृष्णागिरीगड. १ रंजनगड. १ शिदगड. १ मल्लकार्जुनगड. १ प्राणगड. १ कुंजरगड. १ आरकोटगड. १ कर्नाटकगड. १ बिगेवाळुंगड. १ बहिरवगड. १ कोटसुभा. १ मनगड. १ कोट त्रिकळूर. १ वेटवल ऊर्फ केमल. १ विशाळगड. १ कोट त्रिमल. १ चेलगड चंदी. १ गर्वगड चंदी. १ कोट देवणा पाटी. १ रामगड. १ चिताहर कोट. १ वृद्धाचल कोट. १ चवीकोट. १ निलसाजित गड. १ यशवंत गड. १ देवगड एकूण ४१.

एकूण गड बेरीज ७९.

## एकंदर गड बेरीज.

५० प्रथम पन्नास. १११ नवे राजियांनीं वसविले. ७९ कर्नाटक प्रांतींचे. एकूण २४०.

---

१. सभासदाने या सर्व याद्या कागदपत्रांच्या आधारानेच दिल्या असल्या पाहिजेत.

**खजीना** – रोकड शिल्लक; **अबारखाना** – हत्तीशालेंतील कोठार; **आबदारखाना** – पिण्याच्या पाण्याचा साठा. **जामदारखाना** – वस्त्र, द्रव्य वगैरे सुरक्षित ठेवण्याचें ठिकाण; **जिरातेखाना** – शस्त्रागार; **मुदबखखाना** – पाकगृह; **शरबतखाना** – औषधालय. **दारूखाना** – दारूगोळयाचा साठा. **शहतखाना** – संरक्षकालय. **पीलखाना** – हत्तीखाना; **फरासखाना** – तंबू, गालिचे, बैठकी वगैरेचें कोठार.

**बारा महाल पोते** – खजीना, कोषागार; **सेरी** – सुख-समाधान-महाल; **वहिली** – रथशाला. **सौदागरी** – व्यापार; **दरुनी** – जनानखांना; **छबीना** – संरक्षकदल **सुवर्ण** – गादर, मोहरा, पुतळचा, हे सुवर्णाचे विशिष्ट वजनाचे टांक आहेत. पातशाही, सणगरी, गुती, धारवाडी हे विविध प्रकारचे सोन्याचे होन आहेत. १ होन = ५० ग्रेन सोन्याचें नाणें. सतलाम्या, इभराम्या वगैरे निरनिराळचा पातशहांनी पाडलेलीं सोन्याचीं नाणीं आहेत. फलम = एक सोन्याचें नाणें. पुढील कलमांत निरनिराळचा राजांचे व कारकीर्दींतील रुपये दिले आहेत. **गड, कोट, जंजीरें यांचा तपशील.** सभासदाने दिलेलीं किल्लयांचीं नांवे व शेवटीं दिलेले आंकडे हे नेहमी जुळतातच असें नाही. रा. ब. साने यांनी तळटिपांत इतर प्रतींतील पाठभेदाने आणि स्वतंत्ररीत्या आलेले अनेक किल्ले दिले आहेत. ते या ठिकाणीं घेतलेले नाहीत. सभासदाने एकूण किल्ले २४० दिले आहेत. ५० मूळचे, १११ शिवाजीने नवे बांधलेले, आणि ७९ कर्नाटकांतील अशी वर्गवारी त्याने केलेली आहे. चिटणिसांच्या बखरीत हाच आकडा ३१७ आहे.

### ११९. राज्याची मर्यादा

एणेंप्रमाणें आपलें राज्य सालेरी किल्ल्यापासून गोदावरी नदी अलीकडे कुल देश वरघाट तळघाट तुंगभद्रा पावेतों हा एक प्रांत, व तुंगभद्रेपलीकडे देखील कोल्हार, बाळापूर, चंदी, येलूर सरद कावेरी पावेतों हा एक प्रांत. असे दोन प्रांत मिळून एक राज्य आहे. ऐशी तजवीज करून संभाजी राजियास पन्हाळ्यास ठेविलें. त्याजवळ जनार्दन नारायण सरकारकून व सोनोजी नाईक बंकी व बाबाजी ढमढेरे असे ठेविले. आणि पुत्राचें समाधान केलें कीं, 'आपण रायगडास जातों. धाकटा पुत्र राजाराम याचें लग्न करून येतों. मग राज्यभाराचा विचार कर्तव्य तो करूं. तूं वडील पुत्र आहेस. सर्व प्रकारें भरंवसा तुमचा.' असें बोलून रायगडास गेले.

### १२०. राजारामाचा विवाह

धाकटा पुत्र राजाराम यास वधू पाहातां प्रतापराव पूर्वील सेनापती होते त्यांची कन्या नवरी नेमस्त केली, आणि लग्न सिद्धीतें

पाववितें. वधूचें [नांव] सौभाग्यवती जानकीबाई असें ठेविलें. मोठा महोच्छाह केला. दानधर्म अपार केले.

१. राजारामाला चार बायका होत्या. राजारामाच्या मृत्यूनंतर ताराबाईने कोल्हापूरची गादी स्थापिली.

१२१. **शिवाजी महाराजांचा शेवट**

मग कांहीं दिवसांनीं राजास व्यथा ज्वराची जाहाली. राजा पुण्यश्लोक, कालज्ञान[1] जाणे. विचार पाहातां आयुष्याची मर्यादा जाली असें कळून जवळील कारकून व हुजरे लोक होते त्यांमध्यें सभ्य, भले लोक बोलावून आणिले. बितपशील :–

**कारकून**– १ निळोपंत प्रधानपुत्र. १ प्रल्हादपंत. १ गंगाधरपंत जनार्दनपंताचे पुत्र. १ रामचंद्र निळकंठ. १ रावजी सोमनाथ. १ आबाजी महादेव. १ जोतिराव. १ बाळप्रभू चिटणीस.

**हुजरे लोक**– १ हिरोजी फरजंद. १ बाबाजी घाडगे. १ बाजी कदम. ९ मुधोजी सरखवास. १ सुर्याजी मालुसरा. १ महादजी-नाईक पानसंबळ.

असे मातबर लोक जवळी बोलावून आणिले. मग त्यास सांगितलें कीं, 'आपली आयुष्याची अवधी जाली. आपण कैलासास श्रीचे दर्शनास जाणार. शरीर क्षीण देखून पन्हाळियावरि संभाजी राजे वडील पुत्र यांस सांगितलें [होतें] कीं, 'तुम्ही दोघे पुत्र आपणास यांस राज्य वाटून देतों. आणि उभयतां सुखरूप राहाणें.' म्हणोन सांगितले. परंतु वडील पुत्र संभाजी राजे यांनीं ऐकिलें नाहीं. शेवट आपला तो निदानसमय दिसताहे. राज्य म्यां शिवाजीनें चाळीस हजार होनाचा पुणें महाल होता, त्यावरि एक क्रोड होनाचें राज्य पैदा केलें. हे गड, कोट व लष्कर पागा ऐसें मेळविलें परंतु मज माघारें हें राज्य संरक्षण करणार ऐसा पुत्र दिसत नाहीं. कदाचित धाकटा कुंवार राजाराम वांचला. तर तो एक हें राज्य वृद्धीतें पाववील. संभाजी राजे वडील पुत्र जाणता आहे, परंतु बुद्धी

फटकळ[२] आहे. अल्पबुद्धी आहे. त्यास काय करावें? आपण तो प्रयाण करतों. तुम्ही कारकून व हुजरे मराठे कदीम[३] या राज्यांतील आहां. तुम्हांस या गोष्टी कळल्या असाव्या. आपणांमाघारें संभाजी राजे पराक्रमानें राज्य सर्व आटोपतील. लष्करही थोरला राजा संभाजी म्हणून त्याजकडे डौल देऊन मिळतील. राजाराम धाकटा म्हणून याजकडे लष्कर येणार नाहीं. सरकारकून राजाराजाचा पक्षपात करून उभयतां बंधूंस राज्य वाटून दोन राज्यें करूं म्हणतील. शेवट लष्करचे मराठे कारकुनांचे विचारांत येणार नाहींत. शेवट अवघे सरकारकुनांसि विश्वास देऊन धरतील. संभाजी राजे हे आपले वेळचे थोर थोर ब्राह्मण यांस मारील. ब्राह्मणहत्त्या करील. पुढें मराठे यांस लष्करचे सरदारांसही मारील, धरील, इजत घेईल. लहान माणसें, गुलाम, यांचा पगडा पडेल, आणि थोर लोकांची चाल मोडील. संभाजी कैफ खाईल, गांज्या ओढील, इषकबाजी[४] करील. गड-कोट-देशामध्यें अनाईक[५] होईल. राजा परामृष करणार नाहीं. द्रव्य खजीना सर्व उडवील. सर्व राज्य गमावील. संभाजीचे गूण ऐकून औरंगजेब दिल्लीहून चालून येईल. भागानगर विजापूर मोगल घेईल. हें राज्यही घेतील, आणि संभाजी शेवट दगा खाईल[६]. जे गती मलिक अंबर निजामशाहा त्याचा पुत्र फत्तेखान[७] मलिका माघारां जाहाला, आणि पातशाही बुडविली, तैशीच संभाजी राजा करील. मग राजाराम राज्य करूं लागेल. तेव्हां गमाविलें राज्य साधील. मजपेक्षां पराक्रम विशेष करील. ही पुत्रांची लक्षणें. आतां कारकुनांमध्यें माझे वेळचे थोरले कारकून यांस तो संभाजी वांचू देणार नाहीं. त्यांपैकीं एक प्रल्हादपंत निराजीपंताचे पुत्र व रामचंद्रपंत निळोपंताचे पुत्र हे दोघे ब्राह्मण पराक्रमी होतील. निळोपंत, प्रधानाचा पुत्र, हाही नांव धरील. या वेगळे कोणी होणार होतील. मराठ्यांमध्ये बहुतेक संभाजी मोडील. उरल्यापैकीं संताजी घोरपडे व बहिरजी घोरपडे व धनाजी जाधव हे जरि वांचले तरि हे तिघे मोठे पराक्रम करतील. मोडिलें राज्य हे तिघे ब्राह्मण व तिघे मराठे सांवरतील.' असें बोलले. येणेंप्रमाणें राजे

बोलिले सर्वांचे कंठ दाटून नेत्रांपासून उदक स्रवूं लागलें. परम दुःख जालें. त्या उपरि राजे बोलिले कीं, 'तुम्ही चुकूर[५] होऊं नका. हा तो मृत्युलोकच आहे. या माजे किती उत्पन्न जाले तितके गेले. आतां तुम्ही निर्मळ सुखरूप बुद्धीनें असणें. आतां अवघे बाहेर बैसा आपण श्रीचें स्मरण करतों,' म्हणोन अवघियांस बाहेर बसविलें. आणि राजियांनीं श्रीभागीरथीचें उदक आणवून स्नान केलें. भस्मधारण करून रुद्राक्ष धारण केलें. आणि योगाभ्यास करून, आत्मा ब्रह्मांडास नेऊन, दशद्वारें फोडून प्राणप्रयाण केलें. शालिवाहन शके १६०२, रौद्रनाम संवत्सरे, चैत्र शुद्ध १५, रविवारीं दोन प्रहरीं काळ रायगडीं जाला. त्यानंतर शिवदूत विमान घेऊन आले, आणि (राजे) विमानीं बैसून कैलासास गेले. हें जड शरीर, (त्याचा) मृत्युलोकीं त्याग केला.

---

शिवाजी हा दैवी अवतार होता असेंच सभासद मानतो. १ त्रिकालाचें ज्ञान असणारा. २. तापट. येथे 'अनीतीची' असा पाठ कांही प्रतींत आहे. ३. जुने माहितगार. ४. व्यसनी (परि. ११७ वरील टीप पाहा.) ५. निर्नायिकी, अराजक. ६. कपटाने मोगलाकडून पकडला जाईल. ७. मलिक अंबर हा निजामशाहींतील मोठा मुत्सद्दी. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा फत्तेखान याने आपल्या स्वामीद्रोही भूमिकेने निजामशाही बुडविण्यास हातभार लावला. उत्तरेंतून शहाजहानचें सैन्य दक्षिणदेश जिंकण्यासाठी आलें होतें. निजामशाही मुलखांत मोठा दुष्काळ पडला होता. फत्तेखान तरी आपणाला संकटांतून वाचवील या आशेने मूर्तजा निजामाने त्याला तुरुंगांतून मुक्त केलें. त्याने बाहेर येतांच मूर्तजाचा खून करून हुसेन नांवाच्या एकां मुलाला गादीवर बसवून दौलताबादहून राज्यकारभार चालविला. इकडे शहाजी व आदिलशहा यांनी मोंगलाविरुद्ध चढाई करून निजामशाही वाचविण्याचा प्रयत्न सुरू केला होता, दौलताबादच्या किल्ल्याला महाबतखानाने वेढा दिला. शहाजहानने आदिलशहाला अर्धी निजामशाही देण्याचें आश्वासन देऊन शहाजीपासून फोडलें. शहाजीचाही इलाज चालेना. फत्तेखानाने शेवटीं महाबतखानाला शरण जाऊन निजाम हुसेन याला

मोगलांच्या स्वाधीन केलें व निजामशाहीचा शेवट केला. मोंगलांनी या स्वामिद्रोहासाठी फत्तेखानाला शहाजीची जहागीर इनाम दिली.
८. चितातूर, कष्टी.

## १२२. महाराजांच्या निधनानें निसर्गाला झालेलें दुःख

राजियाचें देहावसान जालें ते दिवशीं पृथ्वीकंप जाहाला.[1] गगनीं धुमकेत उदेला. उल्कापात आकाशाहून जाला. रात्रीं जोड-इंद्रधनुष्यें निघालीं. अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्रीशंभुमहादेवीं तळयाचें उदक रक्तांबर जालें. पाण्यांतील मत्स्य बाहेर पडून अमावसणी[2] ? उदक जाहालें. ऐशीं अरिष्टें जाहालीं. मग राजियाचें कलेवर चंदनकाष्टें व बेलकाष्टें आणून दग्ध केलें. स्त्रिया राजपत्न्या, कारकून व हुजरे सर्व लोकांनीं सांगितलें कीं, धाकटा पुत्र राजाराम यानीं क्रिया करावी. सर्वांनीं खेद केला. राजाराम यांनीं अत्यंत शोक केला. त्यानंतर उत्तरकार्य कनिष्ठांनीं करावें असें सिद्ध केलें. वडील पुत्र संभाजी राजे वेळेस नाहींत, याजकरितां धाकटयांनीं क्रिया केली. ऐसें राजियाचें चरित्र-आख्यान उत्पन्न काळापासून देहावसानापर्यंत जाहालें.

१. युरोपीय बखरींतूनहि महापुरुषांच्या निर्याणानंतर अशाच प्रकारचा निसर्गकोप झाल्याची वर्णनें आढळतात. शेक्सपीअरने ' **ज्यूलियस सीझर** ' नाटकांत मूळ बखरीच्या आधाराने या निसर्गकोपाचें वर्णन केलें आहे. तें अगदीं असेंच आहे.
२. मासे बाहेर पडून मरण पावले. त्यामुळे जल अमासवाणी झालें.

## १२३. शिवाजी राजांच्या कार्याचा गौरव.

राजा साक्षात केवळ अवतारीच जन्मास येऊन पराक्रम केला. नर्मदापासून रामेश्वरापर्यंत द्वाही फिरली. देश काबीज केला. अदलशाही, कुतुबशाई, निजामशाई, मोगलाई ह्या चारी पातशाह्या व समुद्रांतील बेवीस पादशाहा असे जेर जप्त करून, नवेंच राज्य

साधून मराठा पातशाही सिंहासनाधीश छत्रपती जाहाला. प्रतिइच्छा[1] मरण पावून कैलासास गेला. ये जातीचा कोणी मागें जाहाला नाहीं. पुढे होणार नाहीं. असें वर्तमान महाराजांचें जाहालें. कळलें पाहिजे.

१. इच्छामरणी.

## १२४. समाप्ति

चरित्र पुण्यश्लोक राजियाचें जे घरीं लिहून ठेवतील त्याच्या भाग्यास पारावार नाहीं, व जे वाचतील त्यांस मोठें पुण्य जोडेल. निपुत्रिकास पुत्र होतील व दरिद्रियांस लक्ष्मीवंत होतील व अपेशियांस यशवंत होतील व पुण्यश्लोक पराक्रमी होतील. जे पुत्रवंत असतील त्यांसही पुत्र होतील जे लक्ष्मीवंत असतील ते विशेष भाग्यवंत होतील. यशस्वी असतील ते दिग्विजयी होतील. येणेंप्रमाणें सर्व मनोरथ पूर्ण होतील. बरें समजणें. ही बखर संपूर्ण जाहाली. चैत्र शुद्ध प्रतिपदा ते दिवशीं वर्णन समाप्त जाहालें. ईश्वर संवत्सर. मुकाम चंदी. शालिवाहन शके १६१६ (त)[1] जाहाली कळलें पाहिजे. बहूत काय लिहिणें? हे विनंती.

१. बखरकार पौराणिक शैलीमध्ये लिहीत असल्यामुळें त्याने ग्रंथपठणाचें फल सांगितलें आहे. शैलीच्या अधिक माहितीसाठीं प्रस्तावना पाहा. १ बखरीची समाप्ति (शक १६१६) इ. स. १६९४ मध्ये झाली असें स्वतः सभासद म्हणतो. शक १६१६ ला ईश्वर संवत्सर नसून भाव संवत्सर होतें. संवत्सर सोडल्यास सभासदाने दिलेल्या मितीस १६ मार्च १६९४ हें वर्ष येतें. पण ईश्वर संवत्सर घेतल्यास, चैत्र शुद्ध प्रतिपदा, ईश्वर संवत्सर, शक १६१९ म्हणजे इ. स. १६९७ मध्ये येतो. सर्व प्रतींत ईश्वर संवत्सरच आहे. त्यावरून शक १६१६ ऐवजीं शक १६१९ हा समाप्ति शक असावा. नवा ऐवजीं सहा पडले असावेत. अथवा श्री. राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें श. १६१६ त लेखनाला प्रारंभ केला आणि श. १६१९ त शेवट केला. ही कल्पनाहि चिंत्य आहे.

## परिशिष्ट (अ)

# भोसल्यांचा वंशवृक्ष

( डॉ. बाळकृष्ण यांच्या ग्रंथाच्या आधारें )

लक्ष्मणसिंह
|
अजयसिंह
|
सजनसिंह (इ. स. १३२० मध्ये दक्षिणेकडे आला)
|
दिलीपसिंह
|
सिधोजी
|
भैरोजी अथवा भोसाजी
|
देवराजजी
|
उग्रसेन
|
शुभकृष्ण
|
रूपसिंह
|
भूमेंद्रजी
|
धोपाजी
|
बरहतजी
|
खेलोजी
|
परसोजी
|
बाबाजी
|
मालोजी
|
शहाजी
|
शिवाजी

मालोजी
- शहाजी
  - संभाजी
  - शिवाजी
    - संभाजी
    - राजाराम
  - व्यंकोजी
- सरफजी

### शिवाजीची राजमुद्रा

प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.
............ दि. ............
क्रमांक ............ नों. दि. ............

## परिशिष्ट (ब)

## शिवकालीन मराठी भाषा

पंधराव्या शतकापासून मराठी भाषेवर फारशी भाषेचा परिणाम फार मोठ्या प्रमाणावर होऊं लागला. राजभाषेच्या सहवासाने व्यवहाराची भाषा संपूर्ण फारशीमय बनली. धार्मिक वाङ्मयांतहि फारशीचा प्रवेश झाला. एकनाथांनी आपल्या अनेक भारुडांतून फारशी मिश्रित मराठीचा उपयोग केला आहे. यानंतरच्या काळांत महाराष्ट्रांत मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास, वामनपंडित, सामराज, रघुनाथ पंडित यांसारखे संत व कवि होऊन गेले. मराठी वाङ्मय समृद्ध झालें, पण व्यवहाराची भाषा, म्हणजेच गद्याची भाषा मात्र फारशीमयच राहिली. याच काळांत पोर्तुगीजांचा संबंध महाराष्ट्राशीं आल्याने अनेक पोर्तुगीज शब्द मराठींत प्रविष्ट झाले. विशेषतः हत्यारें, आरमार, सैन्य, पोषाख इ. संबंधीचे शब्द त्या भाषेंतून आले आहेत.

फारशी ही राजभाषा असल्याने राज्यव्यवहारांतील अनेक शब्द त्या भाषेंतून मराठींत यावेत हें साहजिक होतें. बहामनी राज्यांतील कर्तबगार सरदार मराठे, प्रजा मराठी आणि राज्यकर्ते व त्यांची भाषा मात्र परकी. याचा परिणाम मराठी भाषा या सुमारास '**इंडो-आर्यन**' ऐवजीं '**इंडो-पर्शियन**' बनत चालली होती. शिवाजीसारख्या युग पुरुषानें राजव्यवहार कोश तयार करवून भाषाशुद्धीचा दांडगा उद्योग त्या काळांत सुरू केल्यामुळे मराठी भाषा जिवंत राहिली. व्यवहारांत आणि विशेषतः राजव्यवहारांत संस्कृतनिष्ठ शब्द रूढ होऊं लागले. पण सामान्यपणें फारशी शब्द, फारशी भाषेच्या पद्धतीची वाक्यरचना, प्रयोगपद्धति, नाम-विशेषण संबंध हे विशेष मराठी गद्यांत रूढ झाले. तत्कालीन पत्रव्यवहार आणि बखरी यांचें अवलोकन केल्यास या सर्व फारशी लकबी मराठीच्या अगदी रक्तांत मिसळून गेलेल्या दिसून येतात.

**वर्ण प्रक्रिया** : मराठीच्या वर्णप्रक्रियेंत कोणताहि मूलभूत फरक झालेला नसला तरी अनेक उच्चार भ्रष्ट झालेले दिसतात : **अ**=आ, इ, उ, ए; **आ**=अ, ओ; **इ**=ऐ, ओ; **उ**=व, ओ, अ, इ; **ऋ**=रि, ऊ; **ऐं**=य; **औ**=अव, आँव; **ख**=क; **छ**=सं, त्स; **ज**=झ; **द**=त; **न**=ण, न्ह; **य**=ऐ; **श**=ष, **स**=श; **ष**=स; **ळ**=ल;

सर्वंच वर्णांच्या तपशिलांत न जाता ठळक असे भेद येथे दिले आहेत. **उदाहरणें** – अमच्या, मजमदारी, मेळवावे, उठोन, उपद्रौ, सिवाजीराजे, गइब, महोछाव, निशान, राऊ, तह्द, मज्बूद, यैस्यास सेत, केश, जाले, जाहाली; वर्णागम, वर्णलोप, अनुनासिकलोप, समानोच्चारित वर्णलोप, निभृत अ इत्यादिमुळे बरेच शब्द नव्या स्वरूपांत दिसतात: दिसताहे (दिसत आहे), दुई (दुही), सरद (सरहद) उप्रांतिक (उपरांतिक), धोत्रें (धोतरें), दरमियान (दरम्यान) ऐसियास (अशास), राजियानें (राजाने)

**विभक्ति**– विभक्ति प्रत्यय मुळचेच आहेत.

प्रत्ययाचा लोप करून वाक्यांत उपयोग करण्याची लकब आली होती.

शास्ताखानासी, राजियाने, समुद्रास, दिल्लीहून, राजियाचा, खानाचा, विजापुरीं, बिदनुरीं इ.

सलिकां माघारा; बेलोलखान मारून, स्वारांनिशीं अहिवंत रवाना केलें. (प्रत्ययलोप)

**सामान्यरूप**– सामान्यरूप करतांना 'य' ऐवजी 'इय' होतो. तेयाचे, पाणियांतील, तितकियांनीं.

**क्रियापदरूपें** –(विशेष वेगळेपण नाही.)

**नाम-विशेषण** संबंधांत फारशी लकब आली होती. विशेषण, षष्ठ्यंत विशेषण नामाच्या नंतर योजिण्याची लकब सर्रास रूढ झाली होती. कटार माजेची, हात चवदा तसूंचा; हात मात्र त्याचा उघडा; लष्कर सर्व; कारभार कुल; पुत्र मोठा; लोक श्रमी बहुत होतात; तळें एक थोर; सरनोबत लष्करचे केले; मंगळार्त्या अगणित;

नामाप्रमाणे विशेषणांचें सामान्यरूप करण्याची लकब दिसून येते. शब्दयोगी अव्ययाच्या पूर्वी सामान्यरूप करण्याऐवजी विभक्तीचें रूप येतें.

**महत्त्वाचे वाक्प्रचार**– गर्दीस मेळविणें, खस्त खाणें, खातरेस न आणणें, गड भांडविणें, दर्यास पालाण घालणें, दर्या जेर आहे, धाशत खाणें, एकांगीं करून (एकटचाने), गांठ न घडे; चढे घोडियानिशीं; सुलतानढवा करणें, पेंढीचें गुरू; बुद्धिवाद सांगणें, उपराळचास येणें, रसरंग राखणें, जोड होणें इ.

(प्रस्तुत विवेचनांत ठळक ठळक असेच विशेष दिले आहेत. भाषाशास्त्राच्या दृष्टीने सर्व अंगांचा विचार केलेला नाही.)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम 20322
क्रमांक ८८९ नों. दि. 22/7/60

# शिवाजीचें राज्य




" सालेरी किल्ल्यापासून गोदावरी नदी अलीकडे कुलदेश व घाट तळघाट तुंगभद्रापावेतों हा एक प्रांत व तुंगभद्रे पलीकडे देखील कोल्हार, बालापूर, चंदी, एलर सरद कावेरीपावेतों हा एक प्रांत. असे दोन प्रांत मिळून एक राज्य आहे." –सभासद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम .................. वि:
क्रमांक .................. नों: दि
REFBK-0010954
REFBK-0010954